

# बटाट्याची चाळ

पु. ल. देशपांडे



मौज प्रकाशन गृह



मौज प्रकाशन ३१

आवृत्ती पहिली १९५८
आवृत्ती दुसरी १० जून १९६१
आवृत्ती तिसरी ३० नोव्हेंबर १९६३
आवृत्ती चवथी १० एप्रिल १९६९
आवृत्ती पाचवी १० सप्टेंबर १९७६
आवृत्ती सहावी १ ऑगस्ट १९८०
आवृत्ती सातवी १५ ऑगस्ट १९८३
आवृत्ती आठवी १ जून १९८८
आवृत्ती नववी १ सप्टेंबर १९८८
आवृत्ती दहावी २४ एप्रिल १९९३
आवृत्ती अकरावी २६ जानेवारी १९९५
आवृत्ती बारावी १५ ऑगस्ट १९९६
आवृत्ती तेरावी ३० सप्टेंबर १९९७
आवृत्ती चौदावी १ डिसेंबर १९९८
आवृत्ती पंधरावी १ जानेवारी २०००
आवृत्ती सोळावी २६ जून २०००

© २००० : या पुस्तकाच्या प्रकाशनाचे, पुनर्मुद्रणाचे, पुस्तकातील उतारे घेण्याचे आणि भाषांतराचे हक्क 'मौज प्रकाशन गृह' यांच्याकडे आहेत. इतर सर्व हक्क 'पु० ल० देशपांडे फाउंडेशन', १बी, मालतीमाधव, ८१९ भांडारकर इन्स्टिट्यूट रोड, पुणे ४११ ००४ यांच्याकडे आहेत.

मुखपृष्ठ व शीर्षके
वसंत सरवटे

प्रकाशक
संजय वि० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत सत्तर रुपये

ISBN 81-7486-163-7



माझे बटाट्याच्या चाळीइतकेच पुराणे मित्र
बाळ मेढेकर, सदाशिव धुरंधर आणि शरू रेडकर
यांस अत्यंत प्रेमपूर्वक अर्पण.                    पुरुषोत्तम

बटाट्याची चाळ दर दिवाळीला थोडी थोडी बांधत आणली. श्री० श्री० पु० भागवतांच्या तगाद्यामुळे शेवटी ती पुरी झाली. माझ्या आयुष्यातल्या निदान प्चारपाच दिवाळ्या ह्या चाळीत गेल्या. ह्या मंडळीवर माझा लोभ आहे. वाचकांचाही जडावा ही इच्छा.

पु० ल० देशपांडे



## बटाट्याच्या चाळीतील...


सांस्कृतिक चळवळ १

सांस्कृतिक शिष्टमंडळ ९

निष्काम साहित्यसेवा २१

गच्चीसह—झालीच पाहिजे ४४

राघूनानांची कन्येस पत्रे ६३

काही वासऱ्या ८७

काही स्त्रीगीते १०५

उपास ११६

आगामी आत्मचरित्र १२९


भ्रमण-मंडळ १४२

संगीतिका १६१

एक चिंतन १७५



हे लेख 'जनवाणी', 'साधना', 'हंस', 'दीपावली', 'विविधवृत्त', 'शिरीष', 'किर्लोस्कर', 'सत्यकथा', इत्यादी मासिकांतून यापूर्वी प्रसिद्ध झाले आहेत.



# ....सांस्कृतिक चळवळ

साऱ्या हिंदुस्थानात काही ना काही चळवळी चालू आहेत आणि मुंबई शहराच्या अगदी पोटात असून आपली चाल थंड असावी याचे बटाट्याच्या चाळीतील सर्व बिऱ्हाडकरूंना एके दिवशी सामुदायिक दुःख झाले. समोरच्या जुठाभाई बिल्डिंग्जमध्ये वर्षातून बारा-बारा अखिल भारतीय पुढाऱ्यांची व्याख्याने व्हावी आणि आपल्या चाळीत भाषण करायला गल्लीचा दादासुद्धा मिळू नये, बाजूच्या चाळीतील भगिनींनी शिशुसप्ताह साजरा करून गव्हर्नरांच्या हस्ते बक्षिससमारंभ घडवून आणावा आणि आपल्याला संक्रांतीच्या हलव्याचे साधे प्रदर्शनसुद्धा भरवता येऊ नये, याचे बटाट्याच्या चाळीतील बंधूंना आणि भगिनींना मनस्वी दुःख झाले. तसे पाहू गेल्यास बटाट्याच्या चाळीत गुणी माणसांना तोटा नव्हता. एक नंबरातील सोकाजी दादाजी त्रिलोकेकर आणि त्यांच्या सुविद्य (आणि सुदृढ) पत्नी सौ० बाबलीबाई त्रिलोकेकर यांच्यापासून ते तळमजल्यावरील मुकुंद गणाजी समेळ ('धी न्यू गजकर्ण औषधालया'चे मालक) व त्यांच्या पत्नी रूपाबाई समेळ (रांगोळीचे त्वष्टा कासार ज्ञाती भगिनी मंडळाचे तिसरे बक्षीस) ह्यांच्यापर्यंत विविधगुणसंपन्न मंडळी त्या चाळीच्या अंधारात दडून राहत असत.

श्री० सोकाजी आणि सौ० बाबलीबाई ह्यांच्याकडे त्या चाळीचे नैसर्गिक पुढारीपण होते. त्यांच्या घरात अनेक स्टेशनांची खरखर ऐकू येणारा रेडिओ होता. त्यांच्या घरी रोज 'टाइम्स' पडत असे. सौ० बाबलीबाई ह्या त्या चाळीतील प्रथम विकच्छ नेसण्याची प्रथा पाडणाऱ्या भगिनी होत्या. त्यांच्या खोलीत काचेची आणि आरशाची अलमारी होती. अलमारीत काही स्कॉटच्या इंग्रजी कादंबऱ्या सोकाजीनानांचे वाङ्मयप्रेम दाखवीत होत्या. माणसांच्या खुराड्यासारख्या दिसणाऱ्या त्या

वास्तुविशेषात हौशी ज्योतिष्यापासून ते गुलहौशी गवयापर्यंत सारे नमुने होते. आज कित्येक वर्षे मानवांची ही विविध रूपे त्या चाळीच्या गळक्या छताखाली सुखा-समाधानाने नांदून आपल्या वंशाचे दिवे दिवाळीच्या हुरुपाने वाढवीत होती.

तेरा नंबरातील अण्णा पावशे केवळ मुंबई मुन्सिपाल्टीच्या पाणीखात्यात जुंपले गेल्यामुळे महाराष्ट्र एका ज्योतिष्याला मुकला होता. वास्तविक नवग्रहांनी ज्यांच्या घरी पाणी भरावे त्याला उद्याची चिंता सोडवायला वॉटर डिपार्टमेंटमध्ये खर्डेघाशी करावी लागत होती. अण्णांची भविष्यवाणी अचूक होती. मुन्सिपाल्टीच्या नोकरीत जन्म गेल्यामुळे कामाची दिरंगाई त्यांच्या स्वभावात उतरली होती. गांधींच्या खुनाचे भविष्य खुनानंतर केवळ एक दिवस उशिरा त्यांनी वर्तविल्यामुळे इतरांना त्याचे महत्त्व वाटले नाही. दुनियेत देशाची रास मांडणारे लोक आहेत, पण अण्णांनी बटाट्याच्या चाळीतल्या जिन्याचीसुद्धा कुंडली मांडली होती. आज गेली कित्येक वर्षे त्या जिन्याला साडेसाती असल्यामुळे त्याच्या निसटलेल्या फळ्या दुरुस्त होत नव्हत्या. चाळीतल्या बहुतेक बिऱ्हाडकरूंच्या कुंडल्या अण्णांच्या बारदानात होत्या. बढत्या, संतानयोग, अचानक धनलाभ, इत्यादी अनेक विषयांवर अण्णांच्या खोलीत फलज्योतिषविषयक चर्चा चालत. खुद्द चाळीला रवी वक्री आणि त्याच्यावर राहूकेतूंची पापी दृष्टी असल्यामुळे दिव्याची अडचण, अंधार वगैरे चालू होता. बटाट्याच्या चाळीची आणि हिंदुस्थान देशाची रास एक असल्यामुळे चाळीत जातीय तंटे, एकीचा अभाव, रोगराई, जिन्यावरून काही भगिनी चढल्याउतरल्यास भूकंपाचा भास, इत्यादी संकटे हजर होती. तेरा नंबरात अण्णा पावशे हे ज्योतिर्भूषण तर सोळा नंबरात मंगेशराव हट्टंगडी हे संगीतकलानिधी! आज एच० मंगेशराव किंवा यम्म० हट्टंगडी हे यांचे नाव गायकश्रेष्ठ म्हणून लोकांच्या जिभेवर नाचले असते. ज्यांच्या सुस्वर कंठातून निघालेल्या स्वरांनी असंख्य कान निवले असते ते एच० मंगेशराव आज 'धी रियल अँड रिलायेबल सिद्धारूढ फार्मसी'त डेप्युटी ॲसिस्टंट सबचीफ अकाउंटंट म्हणून यम० अँड बी०च्या गोळ्यांची बिले करण्यात गुंतले आहेत. ज्या बोटांनी तंबोऱ्याचे षड्जपंचम छेडावे त्या बोटांनी मॅक्सल्फ कॅल्शमचे हिशेब करताना मंगेशरावांच्या मंगळुरी मनाला काय वाटत असेल? मुंबईच्या भर दंग्याच्या दिवसांत मंगेशरावांच्या 'क्लॅसिकल म्यूझिक'ने बटाट्याच्या चाळीचे संरक्षण केले. "आता क्लॅसिकल संगीत कॉण आयकर्ता!" म्हणून मंगेशराव केविलवाण्या भाषेत विचारू लागले की अंतःकरणाला पीळ पडतो. मंगेशरावांच्या पत्नी वरदाबाई ह्यादेखील गाऊ लागल्या की भान हरपते. मंगेशरावांच्या शेजारचे बाबूकाका खरे! ऐतिहासिक संशोधनात राजवाड्यांनादेखील ज्यांनी विचार करायला लावला असता ते बाबूकाका लोकोपयोगी संशोधन करण्याऐवजी 'लोको' हफिसात इंडेंट्स तपासत बसले आहेत. तेवढ्यातल्या तेवढ्यात बाबूकाकांनी बटाट्याच्या चाळीचा त्रोटक इतिहास लिहिला आहे.

बटाट्याची चाळ कै० धुळा नामा बटाटे (क्रॉफर्ड मार्केटातील टोपल्यांचे व्यापारी) यांनी अठराशे ऐंशी साली कशी बांधली, तेव्हापासून ती निरनिराळ्या मालकांच्या हाती जात जात चाळीचे भाडे वसूल करणारा आद्य पुरभय्या देवकीनंदन तिवारी ह्याचा खापरपणतू जानकीदुलारे तिवारी ह्याच्या मालकीची कशी झाली, येथपर्यंतचा इतिहास मराठेशाही शिवाजीपासून दुसऱ्या बाजीरावापर्यंत कशी गेली ह्या इतिहासापेक्षा अधिक रोमहर्षक आहे. चाळीत विजेचे दिवे कोणत्या साली प्रथम आले, कोणत्या साली गेले, बटाटे-कुलोत्पन्नांपैकी तिसऱ्या दर्जाचे कैसरे हिंद मेडल मिळालेल्या एका वंशजाने चाळीला रंग कसा व कोणता दिला होता, प्रातर्विसर्जनकेंद्रातल्या साखळ्या ओढल्या म्हणजे एके काळी पाणी कसे येत असे, कठड्याला प्राचीन काळी पॉलिशही कसे लावलेले होते, चाळीतल्या खिडक्या पूर्वी बिऱ्हाडकरूंच्या इच्छेनुसार कशा झाकताउघडता येत असत, आजवर निरनिराळ्या नंबरांत कोण बिऱ्हाडकरू नांदले, ब्युबॉनिक प्लेगात कोण तगले, इन्फ्लुएंझाच्या साथीत कोण दगावले, चाळीच्या इतिहासात चोऱ्या किती झाल्या आणि कृतप्रयत्नांचा चोराला पश्चात्ताप न होता चोरण्यालायक वस्तू त्याच्या हाती लागण्याचे योग कितीदा आले, याचा इत्थंभूत वृत्तांत बाबूकाकांनी टिपून ठेवला आहे. इतकेच काय, पण सात नंबरातील द्वारकानाथ गुप्ते (रॅली ब्रदर्स) यांचे ज्येष्ठ बंधू बंडोपंत आणि अकरा नंबरातील भाईसाहेब चौबळ (कलेक्टर्स ऑफिस) यांची भगिनी चंपू ह्यांचा प्रेमविवाह हा गिरगावातील आद्य प्रेमविवाह का व कसा हा इतिहास बाबूकाका सांगू लागले की पुराणातल्या अर्जुन-उलुपीच्या आख्यानाची आठवण होते. बंडोपंत आणि चंपू माहीमच्या जंगलात पळून गेली होती याची आठवण दिली म्हणजे बंडोपंतांच्या चेहऱ्यावर अजून टवटवी फुलते आणि सुनेच्या सहाव्या लेकीसाठी आपल्या पतीचे धोतर आणि आपले खडीचे लुगडे यांची गोधडी शिवत बसलेल्या चंपूमावशींच्या मोतीबिंदू पडलेल्या डोळ्यांत पाणी चमकते.

असल्या सर्वगुणसंपन्न चाळीतील भाडेकरूंची तोंडे दहा दिशांना असावीत हे त्यांचे त्यांनाच पटेना. इतकी वर्षे एकत्र नांदूनही आपण जातिभेद विसरत नाही, तेवीस नंबरातील जनोबा रेग्याला अजून आपण 'तोतरा शेणवी' म्हणतो, खुद्द अण्णा पावश्यांच्या पत्नीला 'भटुरगी' म्हणतो, चंपूमावशींना बाबूकाका खऱ्यांची नात आजीच्या शिकवणीने 'परभटली मेली' म्हणते, कोणाला 'कोलंबीखाऊ' तर कोणाला 'सोनारडा' ही जातीयवाचक विशेषणे लावण्यात येतात, बाबलीबाईंच्या नथीतल्या हिऱ्याच्या खरेपणाची शंका घेण्यात येते, इत्यादी गोष्टींचा त्यांचा त्यांनाच पश्चात्ताप होऊ लागला. त्यात 'शेजाऱ्यांवर प्रेम करा', 'सौजन्यता (!) हा उभयपक्षीय गुण आहे', 'जातिभेद नष्ट करा', 'अधिक धान्य पिकवा', 'वनमहोत्सव साजरा करा', इत्यादी स्वतंत्र भारत सरकारचे प्रेमळ हुकूम वाचून आणि ऐकून बऱ्याच चाळकऱ्यांमध्ये हृदयपरिवर्तन झाले. एकाएकी साऱ्यांना एकीचे बळ पटू लागले.

नळावर आपली निम्मी भरलेली कळशी बाजूला करून दुसऱ्याला टमरेल भरू देण्याचे सौजन्य दिसू लागले. दुपारची 'झाकपाक' झाल्यानंतरच्या गोष्टींमध्ये चक्क शेजारणी-शेजारणींमध्ये परस्परप्रशंसा सुरू झाली. "परभटलीं झालीं तरी एकाच देहामासांचीं माणसंच ना मेलीं—" अशा प्रवृत्तीचे वारे खेळू लागले. बायामावशींनी बाबली-बाईच्या हातचा चहा घेतला.

चाळीच्या एकीकरणाचे सायंटिफिक प्लॅनिंग केले पाहिजे, असे नुकताच चष्मा लावू लागलेला व मिश्या काढू लागलेला भाऊ भंडाऱ्यांचा फर्स्ट इयर फेल मुकुंदा गंभीरपणाने सांगू लागला. आणि त्याच बैठकीत चाळीत 'सांस्कृतिक सप्ताह' साजरा करण्याचे ठरले. चाळीची सांस्कृतिक उन्नती हे ह्या चळवळीचे ध्येय होते. ही बैठक सोकाजीरावांच्याच बिऱ्हाडी भरली असल्यामुळे सोकाजीराव त्रिलोकेकर 'बटाटे चाळ ऐक्यवर्धक व सांस्कृतिक उन्नतिकारक समिती'चे अध्यक्ष झाले. यापूर्वी त्यांच्या आयुष्यात एका ज्ञातिबांधवाच्या दुखवट्याच्या सभेला अध्यक्ष होण्याचा प्रसंग आल्या-मुळे अध्यक्षीय कार्याचा त्यांचा अनुभव जमेस धरून ही योजना झाली. बाबूकाका खऱ्यांनी बटाट्याच्या चाळीचा समग्र इतिहास व चाळकरी मंडळींचे 'हूज हू'च्या धर्तीवर 'कोणाचा कोण'नामक ग्रंथ लिहावा असे ठरले. गणपती तोंडावरच आले होते, तेव्हा सालाबादच्या उत्सवात फेरबदल करून त्यात हा सांस्कृतिक सप्ताह घातला गेला. त्यात एक ऐक्यवर्धक दिन होता. परस्परांतील भेदभाव विसरून मानवतेच्या भूमिकेवरून जगाकडे पाहावे आणि एकूण ऐहिक आणि पारलौकिक कल्याणाप्रत जावे या हेतूने प्रेरित होऊन समस्त चाळकरी बंधूंनीही सांस्कृतिक सप्ताहाचा कार्यक्रम आखला. सुदैवाने गणपती आणि हा सप्ताह साथसाथच आले.

बटाट्याच्या चाळीत 'सालाबादप्रमाणे यंदाही' ह्या पद्धतीचा गणेशोत्सव साजरा होतो. बाजूच्या तेजूमल काळूमल चाळीतल्या दोनशे भाडेकरूंच्या धडाक्याने होणाऱ्या उत्सवापुढे हा गणपती उपेक्षिला जातो. परंतु बटाट्याच्या चाळीतल्या गणपतीला ऐतिहासिक महत्त्व आहे. हा गणपती पहिल्या महायुद्धात विकत घेतला तेव्हापासून वर्षातून एकदा मधला चौक साफ करून तेथे बसविण्यात येतो. विसर्जनाच्या रानटी रूढीपासून बचावलेला हा गणनायक अलिकडे रंग उडाल्यामुळे बराच ॲनिमिक दिसतो. त्याच्या लंबोदराचे सौष्ठव जाऊन थोडासा जलोदराचा भासही निर्माण होतो. वयोमानाप्रमाणे मूळच्या एकदंतावर दंतहीन होण्याचाही प्रसंग आला होता. परंतु त्या जागी हल्ली एक खडू तासून बसवल्यामुळे नवी कवळी लावलेल्या वृद्धाचा टुणटुणीतपणाही त्याला प्राप्त झाला आहे. सदरहू गणपतीसंबंधीची ही दंतकथा हा इतर चाळकऱ्यांना थट्टेचा विषय होऊन राहिला आहे.

गणेशोत्सवासारख्या नित्य आणि इतर काही नैमित्तिक स्वरूपाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक चळवळीही चाळीत झाल्या आहेत. एकतीस सालच्या सत्याग्रहात तीन नंबरातील बाबा बर्वे ऊर्फ नारूचे बाबा हे महारबावडी पोलीस ठाण्यात एक दिवसाचा

कारावास सोसून आले आहेत. बाबासाहेब हे बटाट्याच्या चाळीतले एकमेव देशभक्त आहेत. आपल्या तुरुंगातील आठवणी सांगू लागले की अजून त्यांना स्फुरण चढते आणि स्वराज्य आल्यामुळे असल्या संध्या आता हुकल्या याचे चाळकरी मंडळींना दुःख होते. चाळीतून एकतीस सालच्या चळवळीत प्रभातफेरी निघत असे. कचेरीच्या सोयीच्या वेळा पाहून प्रभातफेरी संध्याकाळी काढायची टूम ह्याच चाळीची! बाबलीबाईच्या सुस्वर कंठातून 'चर्खा चला चला के', यम्म० हट्टंगडींचे 'नव हिंद राष्ट्र झंड्या' वगैरे ऐकून गोरे सार्जेटसुद्धा निमूटपणे परतल्याच्या आख्यायिका आहेत. याशिवाय सूतकताई वगैरे अजूनही करण्यात येते; स्वतः बाबलीबाईनी काढलेल्या सुताची जाजमे त्यांच्या घरात अजून वापरण्यात येतात. सोकाजीरावांनीसुद्धा आपल्या कोटाला आतून खादीचे अस्तर लावून त्यांच्या साहेबाच्या डोळ्यांत धूळ फेकली होती. याप्रमाणे राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक आणि धार्मिक पार्श्वभूमी असलेल्या ह्या चाळीत सांस्कृतिक सप्ताह साजरा व्हावा हे उचितच होते.

'हूज हू' ऊर्फ 'कोणाचा कोण' (ह्या ग्रंथाची 'कोण कोण', 'कोण कुणाचा?', 'कोण कसा तर कोण कसा'—अशी बहुविध नावे होती!) हा ग्रंथ निर्माण करण्यात मातुःश्री गं० भा० बायामावशी ऊर्फ शकूच्या आजी यांचे बहुमोल साहाय्य झाले. पहिल्या दिवशी ह्या हस्तलिखित ग्रंथाचा प्रकाशन-समारंभ झाला, व श्रीगणराजाच्या चरणी हा ग्रंथ अर्पण करण्यात आला. प्रत्येकाचे चरित्र लिहिताना 'चित्रमयजगता'-तील मृत्युलेखांचा आदर्श पुढे ठेवण्यात आला होता. काही बाबतींत खबरदारी घेण्यात आली होती. नवऱ्यांचे पगार, स्त्रियांचे वय, सौंदर्य यांसंबंधीचे उल्लेख काळजीपूर्वक टाळण्यात आले होते. नमुन्यादाखल पुढील चरित्र पाहा:

***सोकाजी दादाजी नानाजी त्रिलोकेकर:***

जन्म—एकोणिसशे दोन. जन्मस्थळ—झावबाची वाडी. नानाजींचे नातू. दादाजी यांचे चौथे चिरंजीव. शिक्षण—प्रभु सेमिनरी हायस्कूल. (किती ते कौशल्याने टाळले होते.) इंपीरियल बँक लेजरकीपर; ब्रिक्षिकपटुत्व; क्रिकेटच्या चौरंगी व पंचरंगी सामन्यांतील हिंदूंच्या बाजूचे महत्त्वाचे प्रेक्षक—बँकेच्या टीमचे स्कोअरर. व्यायामाची आवड—बँकेतून रोज चालत येतात. छंद—येताना चिराबाजारातून बाजार आणणे. वृत्ती—धार्मिक. सालिना गोऱ्या रामास एक नारळ. सुंठसाखर खाल्ल्याशिवाय भोजन न करण्याचे व्रत. प्रेमळ व समतोल वृत्ती. अपत्ये—सहा; तीन मुलगे व तीन मुली.

अशा प्रकारे प्रत्येकाचे चरित्र प्रसिद्ध झाले. तो दिवस आपली व इतरांची चरित्रे वाचण्यात गेला. दुसरा दिवस साक्षरताप्रसाराचा होता. चाळीत सर्व जण सुशिक्षित असल्यामुळे साक्षरतेचा कार्यक्रम कसा पार पाडावा हा पेच पडला. शेवटी तिन्ही मजल्यांवरील भांडीधुणी करणाऱ्यांचे दादा वस्त्रपात्रप्रक्षालक श्री० रामा बाळू मालवणे

ह्याला सर्वांनी मिळून साक्षर करायचे ठरविले. परंतु समोरच्या शत्रुपक्षीय चाळीतल्या एका उपद्व्यापी समाजसुधारकाने त्याला सहा महिन्यांपूर्वीच साक्षर केल्याचे कळले. ह्या अतिक्रमणाबद्दल त्या साक्षरताप्रसारकाचा निषेध करण्यात येऊन साक्षरतादिन पार पडला.

वनमहोत्सवाचा दिन मात्र मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. आदल्या दिवशी संध्याकाळी सोकाजीराव इतर दोनतीन भाडेकरूंना घेऊन बोरिवलीला आपले मामा भुजंगराव नवलकर यांच्या बगिच्यात जाऊन तेथून पन्नासएक रोपटी उपटून घेऊन आले. सकाळी सर्वांनी स्नाने उरकून गॅलरीच्या कठड्यांना ती रोपटी बांधली. हा उपाय वटसावित्रीच्या वडाच्या डहाळीला सूत बांधण्याचा धार्मिक आधार देऊन पावशीगमावशींनी सुचविला. मंडळातर्फे त्यांचे आभार मानण्यात आले. वृक्षारोपण मोठ्या उत्साहाने साजरे झाले. याशिवाय त्याला जोडून 'अधिक धान्य पिकवा' हाही कार्यक्रम पार पडला. वृक्षारोपणाचे दिवशी बाबूकाकांचे 'पेशवाईतील वृक्ष' ह्या विषयावर ऐतिहासिक स्वरूपाचे व्याख्यान झाले. समेळदादांनी 'काष्ठौषधींचा वृक्षाशी संबंध' यावर वैद्यकीय प्रवचन केले. भगिनींनी आपल्या सुस्वर कंठाने

*लावूं या झाडें सख्यांनो लावूं या झाडें*
*कुदळी घेउन एका घावें खोदूं या खाडे ॥*

हे गीत म्हटले. मुलींनी वनमहोत्सवाचा नाच करून दाखवला. त्यामुळे सर्वांच्या मनावर झाडाचे महत्त्व पटले. 'वाढत्या काळ्याबाजारवाल्यांना टांगायला केवळ झाडांची टंचाई कशी आहे' हा मुद्दा दे० भ० बाबा बर्वे यांनी आपल्या क्रांतिकारक भाषणात सांगितला. संध्याकाळी चाळीतील स्त्रिया व मुले राणीच्या बागेत झाडांचे दर्शन घ्यावयास गेली. त्यामुळे पुरुष मंडळींना वृक्षारोपणाचे महत्त्व अधिक पटले. 'चौपाटीवर मोकळ्या वाळवंटात झाडे लावून वृक्षसंपत्ती वाढवावी,' असा एक ठराव पास करण्यात आला. त्याचप्रमाणे 'झाडे जंगलात पडल्यामुळे शहरांतील लोकांना त्यांचे खरे महत्त्व कळले नाही. तेव्हा ती झाडे आणून शहरांत लावावी व शहरे जंगलांत नेऊन वसवावी; त्यामुळे झाडांची उपेक्षा थांबेल,' असा दुसरा ठराव करून दोन्ही ठराव दिल्लीला पाठविण्यात आले.

त्यानंतरचा 'सौजन्यदिन' ऊर्फ 'शेजाऱ्यावर प्रेम करा दिन' हाही पार पडला. त्यानंतर प्रत्येक शेजाऱ्याने प्रेमाने दुसऱ्याच्या उजव्या-डाव्या गालांवर चापट्या मारल्या आणि त्यानेही त्या तितक्याच प्रेमाने खाल्ल्या! शेजारणींनी एकमेकींच्या कळशा भरल्या, वेण्या घातल्या, प्रेमाच्या भरात एकमेकींची मुले चांगली म्हटले, दागिन्यांच्या खरेपणाची शंका घेतली नाही.

सांस्कृतिक सप्ताहाला कार्यक्रम कमी पडू लागला म्हणून 'दारूबंदी दिन' साजरा करण्यात आला. वास्तविक बटाट्याच्या चाळीत रामा बाळू याखेरीज इतर कोणाचाही

ह्या मादक, घातक आणि अराष्ट्रीय पेयाशी संबंध आला नव्हता. एकदा फक्त जनोबा रेग्यांच्या ऑफिसमधील टेलिफोन ऑपरेटर जॉन गोन्सालव्हिस ह्याच्या लग्नात त्यांनी पेलाभर 'स्वीट वाइन' घेतली होती. त्यामुळे दारूच्या दुष्परिणामावर त्यांचे व्याख्यान झाले. शेवटी हे घातक पेय बंद केल्याबद्दल सरकारचे अभिनंदन करण्यात आले. रामा बाळूला दारूचे दुष्परिणाम ऐकवण्यात आले. त्या दिवशी तो हातभट्टीचा नवटाक झोकूनच आला असल्यामुळे त्याने ते भाषण शांतपणे ऐकले. दारू किती वाईट असते हे ठसविण्यासाठी पुराणे, 'एकच प्याला'दी नाटके यांचे दाखले देण्यात आले. सर्व मंडळींनी दारूबंदीला साहाय्य करण्याचे ठरविले.

पुढे मात्र पंचाईत आली. कारण सप्ताहातले तीन दिवस हातात राहिले (कारण, आठवड्याचे सात दिवस असतात, तसे सप्ताहाचे आठ दिवस असावे, असे त्यांचे मत होते.) आणि सर्व कार्यक्रम संपले. शेवटी एक दिवस 'कला-दिन' म्हणून एच० मंगेशरावांचे गायन, चाळकरी भगिनींच्या फुगड्या, झिम्मा, वगैरे कार्यक्रम झाले. शेवटी चाळकऱ्यांच्या फोटोची टूम निघाली. सर्व भगिनी त्या फोटोत बसणार असल्यामुळे एक पूर्ण दिवस त्या कार्यक्रमात जाईल याची मंडळीला खात्री होती.

वर्गणी जमा करून करण्याचा हा पहिलाच कार्यक्रम झाला. सगळ्या चाळीतील बिऱ्हाडकरूंचा फोटो असल्यामुळे फोटोचे टेंडर मागवावे असाही बूट निघाला होता. परंतु वेळ नसल्यामुळे फोटोचे कॉंट्रॅक्ट 'शेक्स' फोटो स्टूडिओचे फोटोग्राफर चित्रे यांना देण्यात आले. एकूण खर्चाचा हिशोब करता पुरुषांनी दहा आणे, स्त्रियांचे नऊ-नऊ आणे, आणि मुलांचे पाच-पाच आणे अशी वर्गणी ठरली. तान्ह्या मुलांचा फोटो ग्रूपमध्ये मांडीवर घेतल्यास फुकट ठरला. वर्गणी गोळा करण्याचे कार्य सुरू झाले. "मला मेलीला काय करायचाय फोटो?" "हो, म्हातारपणात तेव्हढंच एक राह्यलंय!" —इत्यादी प्रकार होऊन संध्याकाळपर्यंत वर्गणी जमली. फोटोग्राफरचे पैसे जाऊन वर राहतील त्याची फ्रेम करून चाळीत सार्वजनिक जागी तो फोटो लावावा असे ठरले.

दुसरा दिवस 'फोटो-दिन' ठरला. दिवाळीच्या उत्साहाने स्नाने उरकली गेली. ठेवणीतले कपडे निघाले. भगिनी तयारीला लागल्या. नाक्यावर दुकानात स्नो-पावडरची विक्री झपाट्याने वाढली. नव्या रिबिनी आल्या. सेफ्टीपिनांची उसनवार सुरू झाली. सुमारे साडेबाराच्या सुमारास सर्व चाळ फोटोसाठी खाली उतरली. समस्त भाडेकरू, त्यांची कुटुंबे आणि परिवार मिळून संख्या शंभरावर केव्हाच गेली.

मधल्या चौकात समोरच्या चाळीची भिंत आणि स्वतःच्या चाळीचा कठडा म्हणून बावीस खुर्च्या राहू शकत होत्या. इतक्या भाडेकरूंत बावीस खुर्च्यांचा मान कोणी घ्यायचा हा मुद्दा सौजन्य, एकी, बंधुभाव ह्यांची कसोटी पाहणारा होता. सुरवातीला "आम्ही कशाला, आम्ही कशाला—" इथून सुरवात होऊन "आम्हीसुद्धा दिडक्याच मोजल्या आहेत ना?—मग गुत्या तेवढा खुर्चीवर आणि आम्ही त्याच्या पायाशी, हे का? त्याच्या लेकाला अधिक पगार म्हणून?" असा पारा चढत गेला.

मधल्या धुमश्चक्रीत फक्त एवढी वाक्ये ऐकू आली :

"अरे जा!!—परभटल्याच्या पायाशी त्या ब्राह्मणाच्या बच्च्याला बसायला सांगतोस काय म्हारा—"

"तर तर! फोटोतसुद्धा गळ्यात मोती काही खरे दिसायचे नाहीत—भटीणकाकू त्या भटीणकाकू! मुंबईकरांची ऐट आणली म्हणून कोकणी पाणी लपत नाही!"

"पगारावर मोठेपणा का म्हणून ठरवायचा?—आणि वासूकाकाला पाचशे रुपये मिळतात हे खरं कशावरून?"

"मध्ये तू कोण म्हणून बसणार? चार झाडं उपटून आणून गॅलरीत बांधलीस म्हणजे काय कन्हय्यालाल मुन्शी झालास असं वाटलं तुला सोक्या?"

"पैशाचा तोरा आम्हांला नका दाखवू! माझ्या माहेरी डझनावारी खुर्च्या पडल्या आहेत! भाऊ फर्निचरवालाच आहे माझा!" रूपाबाई ससेळ.

"बाबूकाका, तोंड आवरून बोला. तुमची विद्वत्ता घरात. मानाचा प्रश्न आहे हा—नारूचा बाबा काय गांधी समजतोय काय स्वतःला? तो खुर्चीवर आणि आम्ही त्याच्या मागे उभे—काय भालदार-चोपदार काय आम्ही? अरे, ऑफिसच्या फोटोतसुद्धा जनरल मॅनेजरच्या मागे उभा आहे मी; इथे या नाऱ्याच्या बापामागे राहू काय?"

"हे बघा—हा फोटो आहे—त्याला परमनंटनेसपणा आहे. उद्या लोक शेण खालतील बायकांना खुर्चीवर बसवून आम्ही मागे उभे राहिलो तर!"

"बसवायचं तर सगळ्यांना जमिनीवर बसवा म्हणावं. काय निघेल तो निघू दे फोटो—"

"सटवे, श्रीमंती काढतेस?"

"हडळ मेली!"

"शट अप!"

"तुझा बाप..."

"तुझी आई..."

"थाड—थाड—"

"कीऽऽऽ!"

"मेलो..."

पाच वाजता सांस्कृतिक चळवळीतला हा अखेरचा 'छायाचित्र-दिन' संपला त्या वेळी त्या चौकात दोन खुर्च्यांचे पाय, 'कोणाचा कोण' ग्रंथातील काही पानांच्या चिंध्या, वृक्षारोपणाच्या रोपट्यांचा छड्यांसारखा उपयोग झाल्याने झालेला ढीग, एक गंगावन, फुले ओरबाडलेल्या तीन वेण्या, एक गार्टरचे बकल आणि फाटून लक्तर झालेला फोटोग्राफर चित्र्यांचा काळा बुरखा—एवढ्या वस्तू सांस्कृतिक पुनरुज्जीवन आणि ऐक्यवर्धनाच्या चळवळीच्या इतिहासाची साक्ष द्यायला पसरल्या होत्या, आणि मखरातला भग्नदंत गजानन भग्न हृदयाने झाल्या प्रकाराकडे पाहत होता.



# ....सांस्कृतिक शिष्टमंडळ

शेवटी बटाट्याच्या चाळीतले सांस्कृतिक शिष्टमंडळ आंतरचाळीय परिस्थितीची पाहणी करण्यासाठी सांडगे बिल्डिंग्जमध्ये पाठवण्याचा निर्णय शनिवारी रात्री भरलेल्या चाळकरी मंडळीच्या सभेने एकमताने घेतला. हा निर्णय एकमताने घेतल्याचे जवळजवळ सर्वांना दुसऱ्या दिवशीच कळले. कारण चाळकरी मंडळीच्या प्रतिनिधींची सभा रात्री दोनला संपली, त्या वेळी चाळीतील चळवळीचे उत्साही जनक श्री० राघूनाना सोमण यांच्याखेरीज बाकी सारे प्रतिनिधी गाढ झोपले होते. सभा संपताच सोमणांनी “आता कॉफी घेऊ या—” म्हटल्यावर मंडळी लगबगीने जागी झाली.

मुंबईतल्या चाळींचा आंतरचाळीय अभ्यास ही एक जळती समस्या आहे, असे वाटल्यावरून अशा प्रकारची शिष्टमंडळे निरनिराळ्या चाळींत पाठवण्याच्या योजना आखण्यास बटाट्याच्या चाळीत केव्हाच सुरुवात झाली होती. सुरुवातीला एक सांस्कृतिक शिष्टमंडळ पाठवावे, नंतर राजकीय, त्यामागून केवळ भगिनींचे मंडळ— अशा प्रकारची योजना होती. परंतु प्रत्येक शिष्टमंडळात तीच तीच नावे पुन्हापुन्हा सुचवली जाऊ लागली. उदाहरणार्थ : यम्म० हट्टंगडी (अथवा एच० मंगेशराव) हे चाळीतील संगीतकलाप्रवीण तबलावादनपटू. तेव्हा कलावंतांच्या शिष्टमंडळात त्यांचे नाव कलावंत म्हणून पुढे आले आणि पुढे सगळ्या मजल्यावर अधिक वर्तमानपत्रे फक्त त्यांच्याच घरी येत असल्यामुळे राजकीय शिष्टमंडळात त्यांच्यासारख्या अभ्यासू माणसाला वगळणे अशक्य होते. त्यातून ओळीने न चुकता सातआठ इंग्रजी वाक्ये तेच बोलू शकत; कारण मागे एकदा चाळीची पाहणी करायला म्युनिसिपल अधिकारी आले असताना, त्यांच्याशी इंग्रजी बोलायचा प्रसंग आला होता तो

मंगेशरावांच्यामुळे निभावला. तीच गोष्ट देवरूखकरमास्तरांची. देवरूखकरमास्तर हे प्राथमिक शाळेत शिक्षक असल्यामुळे शैक्षणिक शिष्टमंडळाचेही सदस्य होऊ शकत होते आणि कापूर, उदबत्त्या, फणसपोळी, आंब्याची साटे, कोकम वगैरेचा व्यापार चाळीतल्या चाळीत करीत असल्याने व्यापारी शिष्टमंडळावरही त्यांना पुन्हा पाठवावे लागले असते. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून दहा जणांचे 'शिष्टमंडळ' आंतरचाळीय पाहणी करण्यासाठी सांडग्याच्या चाळीत पाठवायचे ठरले.

प्रथम मुद्दा आमंत्रणाचा निघाला. आमंत्रणाशिवाय कुठेही जायचे कसे? शेवटी सोकाजी त्रिलोकेकरने तोंड काढली. सांडग्याच्या चाळीत त्याचे साडू दादाजी ब्रह्मांडकर राहत होते. ("बाबलीबायचे धाकलीबायचे यजमान.") त्यांच्याकडून वशिला लावून आमंत्रणाच्या परतफेडीचे बोलीवर अगोदर बटाट्याच्या चाळीतल्या शिष्टमंडळाला त्यांनी आमंत्रण मिळवले. हे शिष्टमंडळ सांडग्याची चाळ पाहून गेल्यावर त्यांनी सांडग्याच्या चाळीतल्या शिष्टमंडळाला आमंत्रण द्यायचे ठरवले होते. "मंडळ प्रातिनिधिक असावे" असा ठराव दे० भ० आचार्य बाबा बर्व्यांनी मांडला. त्याला सर्वांची, 'प्रातिनिधिक' म्हणजे काय हे नीटसे न कळल्यामुळे, एकदम संमती मिळाली. कोणतीही चर्चा न होता पास झालेला हा बटाट्याच्या चाळीतल्या सदस्यांचा पहिला ठराव आहे, असे बाबा उद्गारल्यावर, यापूर्वी द्वारकानाथ गुप्त्याचे वडील वारले त्या वेळी दुखवट्याचा ठरावदेखील कोणतीही चर्चा न होता पास झाला होता हे जनोबा रेग्यांनी बाबा बर्व्यांना नम्रपणाने दाखवून दिले. आपल्या तोंडातून निघालेल्या असत्य उद्गारांबद्दल प्रायश्चित्त म्हणून बाबांनी दहा मिनिटे नैष्ठिक मौन पाळायचे ठरविले. (नैष्ठिक मौन हे नैष्ठिक ब्रह्मचर्याप्रमाणे मनानेच पाळायचे असते. मनात मौन असले म्हणजे झाले. उघड बोलल्यास हरकत नाही.) शेवटी मंडळींनी विनंती केल्यावरून आचार्य बाबा बर्व्यांनी पाव कप दूध घेऊन मौन सोडले. त्यांना शिष्टमंडळाच्या कार्याबद्दल चार शब्द सांगण्याची विनंती करण्यात आली आणि ह्या मंडळाचे त्यांनी नेतृत्व स्वीकारावे अशी गळ घालण्यात आली.

बाबा बर्वे बटाट्याच्या चाळीचे राजकीयात्मक आध्यात्मिक किंवा अध्यात्मात्मक राजकीय असे स्फूर्तिकेंद्र आहेत. मुंबईत अगदी बटाट्याच्या चाळीत राहूनही ते स्वतः पेरून उगवलेले धान्य खातात. त्याची कृती अशी : एका मोठ्या परातीत माती भरून त्यात दुसऱ्या दिवशी खाण्याचे गहू, हरभऱ्याची डाळ, वगैरे पेरतात; आणि त्याला कोंब आले की त्याचेच पदार्थ गाईच्या तुपात मिसळून खातात. आज कित्येक वर्षे चाळीतल्या भांडीधुणीवाल्या नोकरांसाठी त्यांनी उपनिषदाचा वर्ग चालवला आहे. "त्यांना सुसंस्कृत केल्याशिवाय भारताला तरणोपाय नाही" असे त्यांचे मत आहे. विशेषतः त्यांनी चाळीतील भगिनींसाठी चालवलेले 'मौनशिक्षण-केंद्र' हे फारच प्रभावी ठरले. भगिनीवर्गाच्या ह्या मौनाच्या साधनेला पुरुषवर्गाकडून फारच पाठबळ मिळाले. चाळीतल्या सगळ्या भगिनींची कामे मुक्याने होऊ लागली; त्यामुळे

चाळीत विलक्षण शांतता आणि सुव्यवस्था नांदू लागली. 'अधिक वेळ कोण मौन पाळू शकतो' ह्या चढाओढीत (सांस्कृतिक सप्ताहाच्या वेळी) द्वारकाबाईंनी एकूण तीन मिनिटे वीस सेकंद मौन पाळून नवा विक्रम केला, असे जाहीर करण्यात आले. आपापल्या बायका अशा तोंडे मिटलेल्या पाहून कित्येक जण त्यांना ओळखायला विसरले—कारण आजपर्यंत भगिनीसमाजाच्या कार्यकारी मंडळाचा ग्रूप फोटो केवळ एक मिनिट तोंड बंद ठेवण्याच्या अशक्य अटीमुळे निघू शकला नाही. शेवटी कॅमेऱ्याकडे पाठ करून ग्रूप फोटो घ्यावा अशी सूचनाही काही बंधूंनी मांडली होती; ती फेटाळण्यात आली. आपण सुचवलेल्या सुधारणांवर बायकांनी पाठ फिरवावी यात पुरुषांना नवल वाटले नाही!! तात्पर्य, असल्या भगिनींना मौनाचे पाठ देणाऱ्या बाबा बर्व्यांना शिष्टमंडळाचे धोरण, कार्य, इत्यादींवर चार शब्द सांगण्याची विनंती झाली. बाबांनी आपली अंगावरची शाल नीट करीत सुरुवात केली.

"मत्प्रिय बंधूंनो आणि मत्प्रिया भगिनींनो :

"आपल्या वसतिस्थानातून अन्य वसतिस्थानात सांस्कृतिक शिष्टमंडळ जात आहे ही आनंदाची गोष्ट आहे. ह्यातच राजकीय, धार्मिक, व्यापारिक आणिक शारीरिक अशी अनेक मंडळे अंतर्भूत आहेत. (सोकाजी त्रिलोकेकरने हट्टंगडीच्या कानात "अंतर्भूत म्हणजे काय?" असे विचारले. त्यावर हट्टंगडीने "इन्कॉर्पोरेटेड" असे सांगितले. "अस्सं!" असे म्हणून सोकाजीने जनोबा रेग्यांस इन्कॉर्पोरेटेडचा अर्थ विचारला. जनोबा रेग्यांनी अकाउंटंट्सचे इन्कॉर्पोरेटेड व चार्टर्ड असे दोन प्रकार आहेत असे सांगून, "पुढील माहिती नंतर विचारा—" असे म्हणून त्यांना गप्प केले.) 'सांस्कृतिक' ह्या शब्दात वास्तविक ही सारी अंगे येतात. प्रत्येक चाळीची एक विशिष्ट संस्कृती आहे. आपल्या चाळीलाही एक विशिष्ट संस्कृती आहे. (इथे मंडळींनी टाळ्या वाजवल्या. आपल्या चाळीला संस्कृती आहे हे कळल्यावर, "इतके दिवस आहोत, पण दिसली नाही कुठे?" असे द्वारकाबाई यश्वदाबाईंच्या कानात कुजबुजल्या. आणि "बाबा खोटं कशाला बोलतील?" असे म्हणून यश्वदाबाई भाषण ऐकत गवारीच्या शेंगा मोडू लागल्या.) आपल्या चाळीला विशिष्ट संस्कृती आहे म्हटल्यावर, तुम्ही म्हणाल, 'कुठे आहे?' ("अगदी मलाही हाच प्रश्न सुचला होता." शांबाराव गायतोंडे कुशाभाऊ अक्षीकरांच्या कानात कुजबुजला. कुशाभाऊंच्या कानाला गायतोंड्यांच्या मिश्या लागल्या. त्याने त्या झुरळ समजून जोरात झटकल्या. शांबाराव चूप बसला.)

"चाळीची विशिष्ट संस्कृती म्हणजे काय? चाळीची संस्कृती म्हणजे आपण सर्व! व्यापक अर्थाने पाहायचे म्हणजे हा चौक, ते नळ, त्या दारात दिसणाऱ्या तुळशीच्या कुंड्या, वनस्पतीच्या डब्यांत टांगलेल्या त्या चिमुकल्या वनस्पती, ते वाळत घातलेले कपडे ("अगबाई, गॅलरीत पापड वाळत घातले होते, काढायलाच विसरले मी!" म्हणून शांताबाई लगबगीने उठून निघून गेल्या.)—हे सारे सारे

काही म्हणजे ती संस्कृती! परस्परसाहचर्यातून, सहवासातून संस्कृती तयार होते. उदाहरणार्थ, जनोबा रेगे हे मांसाहारी आहेत—"

त्यावर जनोबांनी ताडकन उठून "परवा तुम्ही आमच्या घरी मटन नाही खाल्लेत?" असा सवाल टाकला.

"बरोबर!!" मनाची स्वस्थता ढळू न देता बाबा म्हणाले, "पूर्वी मी खात नव्हतो—परंतु तुमची मांसाहारी संस्कृती आणि माझी शाकाहारी संस्कृती एकरूप झाली. ("म्हणजे हा थेरडा हाडं का खातो?"—भगिनीवर्गापैकी अनेकींच्या डोक्यात विचाराची ऊ येऊन चावून गेली.) हा संस्कृतिसंगम माझ्या हृदयात झाला. (कुशाभाऊ अक्षीकर दादा ससेमिळांच्या कानात म्हणाला, "हृदयात की पोटात?") तेव्हा एवंगुणविशिष्ट नानाविध संस्कृतींनी फुललेले हे जीवन अन्य जीवनाशी आता पडताळून पाहिले पाहिजे. मला तुम्ही नेतृत्व स्वीकारायला सांगता आहा. अनिच्छेने मी कबूल करतो. झेड० विष्णुमूर्ती म्हणतात, 'ज्याचे त्याने पहावे! कोण कुणाचा नेता! तू तुला जाण. न कोणी ज्ञाता न कोणी नेता.' (इथून पुढे बाबांचा असा काही सूर लागला की, यश्वदाबाई गवारीच्या शेंगा वातींसारख्या वळू लागल्या. काही भगिनींना अशा वेळी हमखास येणारी पेंग सुरू झाली.)

"तस्मात आपल्याला कार्यप्रवण झाले पाहिजे. आपल्या जीवनाच्या अंगोपांगांशी इतरांच्या जीवनाची अंगोपांगे पडताळून पाहिली पाहिजेत. (स्नेहलताबाई गुप्त्यांनी आपल्या दंडावरचा ब्लाऊज सैल होतो आहे हे पाहिले आणि द्वारकाबाईंची चोळी दंडावर अगदी चेपून बसलेली पाहून मनातल्या मनात स्वतःच्या 'कृश'पणाचे समाधान मानले.) तो योग आला आहे. भारत स्वतंत्र झाल्यापासून देशोदेशीचे लोक येऊन आपली संस्कृती पाहून जातात. आपण आपल्या घरातून सुरुवात करू. शेवटी मानव तितका एक आहे. 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' म्हटले आहे भगवंताने. (इथे राघूनानांना जांभई आली आणि कुशाभाऊ अक्षीकराने मनातल्या मनात 'मनःषष्ठानींद्रियाणि'पर्यंत पुढचा श्लोक म्हटला. 'प्रकृतिस्थानि कर्षति' त्याला काही आठवले नाही.) तेव्हा आपल्या वसतिस्थानातून जे शिष्टमंडळ जाते आहे त्याला मी 'शुभास्ते पंथानः सन्तु' असा आशीर्वाद देतो. मीही बरोबर जावे अशी सगळ्यांची इच्छा आहे. मी होकार दिला आहे. तुम्ही न्याल तिथे मी आहे. पण मी निमित्तमात्र आहे. परंतु तुमचा आग्रह आहे तेव्हा आले पाहिजे. आपले शिष्टमंडळाचे कार्य यशस्वी होईल याची मला खात्री आहे, कारण 'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः' ('तत्र श्रीविजयीभूतिभूवाभूतिबुभुक्षितः'—कुशाभाऊला हा श्लोक लगेच आठवला.)—ही भावना ठेवून निघू या. बटाट्याच्या चाळीचा विजय असो."

मुख्य प्रश्न आला होता तो शिष्टमंडळात कोणाला घ्यावे याचा. त्याला तोंड निवणे अवघड होते. शेवटी येण्याजाण्याचा खर्च शिष्टमंडळाला करावा लागेल असा

ठराव केल्यावर निष्ठावंत कार्यकर्ते तेवढेच पुढे आले. शिष्टमंडळाचे अध्यक्ष म्हणून आचार्य बाबा बर्व्यांची सर्वानुमते निवड झाली. शिवाय इतर नऊ सभासद घ्यायचे ठरले. त्यांचा थोडक्यात परिचय येणेप्रमाणे :

### *कुशाभाऊ अक्षीकर :*

ह्यांना बटाट्याच्या चाळीत नाट्यभैरव अशी पदवी आहे. एके काळी ते गंधर्व कंपनीत (आचारी) होते. नाट्याचा ह्यांचा अभ्यास अत्यंत सूक्ष्म आहे. केशव-नारायणांच्या संयुक्त मानापमानात मुख्य चोराची भूमिका ह्यांच्याकडे होती. परंतु नाटकाच्या तालमीत ते ह्या भूमिकेशी फारच तद्रूप व्हायला लागले आणि कंपनीतल्या लोकांनी ह्यांची धास्ती घेतली. खुद्द धैर्यधराने ह्यांच्यापुढे हात टेकल्यामुळे प्रत्यक्ष प्रयोगात ह्यांना आवरणे कठीण होईल म्हणून ते कामच काय परंतु ती नोकरीही गेली आणि तेव्हापासून मुंबईच्या एका इंग्लिश फर्ममध्ये ह्यांनी कारकुनांच्यासाठी लहानसे हॉटेल चालवले आहे. एखाद्या कारकुनाने "काय कुशाभाऊ, गरम काय आहे?" एवढा सवाल केला की "गरम भजी, नरम उसळ, चटकदार मटकी, खुमासदार खमण, टेसदार टामाटोआमलेट, मजेदार मठ्ठा, कडक कॉफी, चटकदार चहा—" अशी नामावली उच्चारताना कै० गणपतराव जोश्यांची आठवण करून देतात. शिवाय कारकुनांना खायला घालण्याचे कार्य हे करीत असल्यामुळे देशातील अन्नपरिस्थितीचा ह्यांचा अभ्यास हाही जमेला धरण्यासारखा होता. कुशाभाऊ ह्या मंडळात नाट्यतज्ज्ञ व खाद्यपंडित अशा दुहेरी नात्यांनी हजर होते.

### *एच० मंगेशराव :*

मंगेशराव हट्टंगडी हे चाळीचे मूर्तिमंत संगीत. युद्धकाळात व दंग्याच्या दिवसांत चाळीचे 'मोराल' (नैतिक धैर्य) टिकवण्याच्या बाबतीत ह्यांचा फार उपयोग झाला. शास्त्रोक्त संगीताचा, विशेषतः तराण्यांचा, ह्यांचा अभ्यास फार दांडगा. तराण्यांच्या अभ्यासामुळे कोणतेही गाणे ह्यांच्या कंठातून तराण्यासारखेच बाहेर येते. गणपतीच्या दिवसांत कितीही गर्दी झाली तरी मंगेशरावांच्या नुसत्या षड्जपंचमाने मंडपात सामसूम होते. शिवाय राजकारणाचा ह्यांचा अभ्यासही चांगला आहे. व्यवसायाने हे जरी अकाउंटंट असले तरी रुपये-आणे-पैंच्या जोडीने ह्यांचा मात्रांचा हिशेब मापून घ्यावा. संगीतातील जमाखर्च ह्या विषयावर ह्यांचा विद्वत्ताप्रचुर प्रबंधही आहे. एका ख्यातनाम गवयाच्या बैठकीत एकूण साडेपाच हजार मात्रांचा हिशेब झाल्याचे ह्यांनी चटकन सांगितले होते. तबलावादनातही ह्यांचा हात धरणारा इसम क्वचित सापडेल. ऑफिसमध्ये ह्यांनी एकदा आड्याचौतालाच्या ठेक्यात ताळेबंद टाइप करून 'ऑडिटेड अँड फाउंड करेक्ट'च्या 'क्ट'वर सम आणून दाखविली होती. असा हा बहुगुणी हिरा शिष्टमंडळात असणे अत्यावश्यक होते.

### सौ० वरदाबाई हट्टंगडी :

ह्या श्री० एच० मंगेशरावांच्या पत्नी. मंगेशरावांच्या तालमीत तयार झाल्या. रेडियोवर पुढेमागे कार्यक्रम होणार होता. ह्यांनी महबूबे मोझिकी खाँसाहेब सुरावर्दी-खाँसाहेब राजा-की-मंडीवाले यांच्या जवळ संगीतशिक्षणाला सुरुवात केली. खाँसाहेबांनी ही शिकवणी सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांत आपला पिढीजाद बुरखे शिवण्याचा धंदा सुरू केल्यामुळे ह्यांचे संगीतशिक्षण थांबले. त्यानंतर काही दिवस ह्यांनी भरत-नाट्यम शिकायला सुरुवात केली. परंतु ह्यांचे नृत्यकलेतील गुरू टँजोर जंबुराज ह्यांनीही नृत्यकला सोडून न्यू मद्रास बेकरीत पायांनी पावाची कणीक तिंबण्याची नोकरी पत्करून कला आणि जीवनाचा संबंध जोडला. त्यामुळे यांना नृत्यकला सोडावी लागली. परंतु अजूनही त्यांना नृत्याची खूप आवड आहे. चाळीतल्या गणपतीत जाहीर कार्यक्रमात त्यांना नाचण्याची विनंती केली की नाचायला त्या अगदी एका पायावर तयार असतात. आपल्या सुविद्य पतीच्या प्रोत्साहनाने ह्यांनीही 'आपण नृत्यकला का सोडली?' ह्यावर 'नृत्यसाधना' नावाचे पुस्तक लिहिले आहे. ह्याशिवाय ह्यांच्यामुळेच चाळीतील इतर मंडळींच्या घरी उप्पिट्टू, उडदाचे पोळे, सांन्ने, वगैरे निरनिराळी नावे एकाच पदार्थाला देण्यात येतात. तिखटा सांजा बिघडला की तो उप्पिट्टू आहे असे सांगण्यात येते व त्याची रुची बदलते. हेच इतर पदार्थांच्या बाबतीत.

### प्राध्यापक नागूतात्या आढवे :

वास्तविक बटाट्याच्या काय, परंतु जगातल्या कोणत्याही चाळीत नागूतात्यांच्या इतका विद्वान माणूस शोधून सापडायचा नाही. पण चाळीतल्या कुठल्याही कार्यात मोडता घालण्याचे कार्य हे करीत असल्यामुळे एवढ्या विद्वान माणसाच्या सह-कार्याला चाळ मुकली होती. परंतु शिष्टमंडळ जाणार वगैरे कथा सुरू झाल्यापासून नागूतात्यांनी धोरण बदलले होते. ज्ञानेश्वरीपासून ते रेल्वे-टाइमटेबलापर्यंत सारे ग्रंथ नागूतात्यांना मुखोद्गत आहेत. गेल्या पस्तीस वर्षांचा 'टाइम्स' त्यांना पाठ आहे! जगातले सारे विद्वान महामूर्ख कसे आहेत हे ते तारीखवार सांगतात. एकदा नेपोलियनवरच्या व्याख्यानात, नेपोलियनने वयाच्या सहाव्या वर्षी बारा जून रोजी आंगठा तोंडात घातला होता, हे त्यांचे वाक्य ऐकून साऱ्या सभेने तोंडात बोटे घातली होती. रामदासांच्या दाढीची लांबी, मोरोपंतांच्या शेंडीचे केस आणि तुकारामाच्या मावळी पागोट्याचे माप यांचीदेखील त्यांनी मोजदाद केली आहे. इतकेच काय, परंतु लो० बाळ गंगाधर टिळकांनी आयुष्यात एकूण पंचाहत्तर मण बारा शेर सव्वासहा छटाक सुपाऱ्या कातरल्या हे पुण्याच्या एका विद्वानाने सिद्ध केले होते, त्यातील पावणेदोन छटाकांची चूक त्यांनी सप्रमाण सिद्ध करून

दाखवली.[१] बाबा बर्वे हे शिष्टमंडळाचे हृदयच होते, एच० मंगेशराव हे मंडळाचा गळा, तर नागूतात्या हे मंडळाची बोटे होते. काहीही पाहिले की नागूतात्यांनी बोटे मोडलीच. पलिकडच्या टुमण्याच्या चाळीत दहा वर्षांपूर्वी ते एकदा गेले होते. तिथल्या एकूण जिन्यांच्या पायऱ्या, बंद होणाऱ्या खिडक्या, आणि एकदा बंद झाल्यामुळे उघडू न शकणाऱ्या खिडक्या ह्यांची त्यांनी बोटे मोडून मोजदाद करून डोक्याच्या फडताळात तो आकडा ठेवून दिला होता. हे सध्या प्राध्यापक नाहीत—तसे कधीच नव्हते—परंतु त्यांच्या विद्वत्तेवरून व वेषावरून हे प्राध्यापक असावेत अशा समजुतीने एका गणेशोत्सवमंडळाच्या चिटणिसाने ह्यांच्या व्याख्यानाच्या वेळी बोर्डावर प्रा० नागूतात्या आढ्ये असे लिहून टाकले. ती उपाधी अनिच्छेने त्यांना चिकटली. त्यांना ती उपाधी आवडत नाही. जगातले सर्व प्राध्यापक गाढव आहेत, असे त्यांचे मत आहे. लोक त्यांना प्राध्यापक म्हणतात.

*प्रा० कल्पलता फुलझेले :*

वास्तविक नागूतात्यांसारखा एक प्रचंड विद्वान मंडळात असताना आणखी एका प्राध्यापिकेची आवश्यकता नव्हती. परंतु चाळीतील भगिनी मंडळातर्फे ह्यांना घ्यावे असा आग्रह दिसला. प्रा० कल्पलताबाई नुकत्याच आमच्या चाळीत राहावयास आल्या. श्री० किशोरचंद्र फुलझेले (सुप्रसिद्ध 'दिलिप्स रेडिओ'चे व्यापारी) ह्यांच्या ह्या पत्नी. कल्पलताबाई ह्या 'दमयंती टेलरिंग कॉलेज फॉर विमेन अँड चिल्ड्रेन'मध्ये ब्लाऊझ डिपार्टमेंटच्या मुख्य आहेत. त्या अंगुस्तान विद्यापीठाच्या पदवीधारिणी आहेत. त्याशिवाय 'वल्कल आणि वायल' ह्यांचा तौलनिक अभ्यास करून त्यांनी नुकताच आपला प्रबंध तयार केला आहे. ह्याशिवाय 'सुवर्णमृगकंचुकीसाठी सीतेचा हट्ट' हे त्यांचे वसनप्रधान खंडकाव्यही प्रसिद्ध होण्याच्या वाटेवर आहे. (त्यांच्या छापखानेवाल्याने त्यांना चावटपणाने कंचुकी तयार आहे, काजे व्हायची राहिली आहेत, असे सांगितल्यावरून त्यांनी 'शिवण आणि मुद्रण' नावाचा वक्रोक्तिपूर्ण लेखही लिहिला होता. त्यात शेवटी शेवटी छापखानेवाल्यावर इतका टोचून टोचून मजकूर लिहिला होता की कोणीही छापखानेवाला तो लेख छापायला तयार होईना.) काव्याप्रमाणे कल्पलताबाई खेळांतही फार हुशार आहेत. अंगुस्तान विद्यापीठात त्यांना सुईदोरा-शर्यतीत ढाल मिळाली होती. टेनिस, बॅडमिंटन, क्रिकेट, हॉकी, वगैरेच्या सामन्यांतही त्या प्रेक्षक असतात. खेळांप्रमाणेच चित्रकलेचेही त्यांना वेड आहे. चाळीच्या गणेशोत्सवात त्यांच्या चित्रकलेचे नमुने जागोजाग टांगले जातात. विशेषतः व्हॅन गॉफ्फ (हा त्याच्या नावाचा खरा उच्चार आहे, असे त्यांचे मत

१. कारण लोकमान्यांनी सुपारी आणायचे काम नागूतात्यांना सांगितले होते आणि पावशेर सुपारीतली पावणेदोन छटाक ह्यांनी आपल्या चंचीत टाकली होती म्हणे!

आहे.), डॅल ऑल, मूल गॉ० आवकर, प्राग्शि० रूर, डी० गॉ० डसी, गो० राय, वगैरे चित्रकारांच्या चित्रांची त्यांना विशेष आवड आहे. त्यांच्या चित्रकलेचे, ब्लाऊझकलेचे काही नमुने त्यांनी बरोबर घेतले होते. तात्पर्य, शिवणकला, क्रीडापटुत्व, चित्रकला आणि काव्य अशा चारी अंगांनी विकास पावलेली ही विदुषी हा ह्या शिष्टमंडळाच्या भाळावरचा मळवट होता.

***महापंडित श्री० बाबूकाका खरे :***

प्रा० सौ० कल्पलताबाई फुलझेले ह्या शिष्टमंडळाच्या भाळीचा मळवट तर बाबूकाका खरे हे शिष्टमंडळाच्या मस्तिष्कावरचे नवनीत घातलेले एरंडद्रुमाचे शीतोपचारी पर्ण! बटाट्याच्या चाळीचा 'हूज हू' ऊर्फ 'कोण कोण' तथा 'कोण कुणाचा' अथवा 'कोण कसा तर कोण कसा' किंवा 'कुणाला कशाचे' अशा विविध नामांनी नटलेला कोशराज निर्माण केलेले महापंडित बाबूकाका हे चाळीच्या शिष्टमंडळावर येणे केवळ अपरिहार्य होते. 'हूज हू'खेरीज बाबूकाकांनी अनेक कोश निर्माण केले होते, करीत आहेतही! उदाहरणार्थ, 'मुंबई शहरातील भद्रखाद्यकेंद्रे' (भद्र > भज > भजी > भजी ही व्युत्पत्ती त्यांनी सिद्ध केली आहे.), 'ओष्ठलौल्य-(ओष्ठलौल्य > होटलौल्य > हॉटेले) स्थानांची व्यापारी जंत्री', किंवा 'पुण्यातील मिश्या ठेवणाऱ्यांची "आकडे"वारी' किंवा 'प्रासंगिक भाषणे' ही बारशापासून एकसष्ठीपर्यंतच्या गौरवांची, निरोपसमारंभांची, परिचयात्मक, वगैरे नमुनेदार 'नऊशे तयार भाषणे'—ह्यांसारखे ग्रंथ ही त्यांची वाङ्मयसेवा शारदादेवीच्या दरबारी रुजू आहे. यल्लूरमठाच्या शंकराचार्यांनी त्यांना 'महापंडित' ही पदवी आणि कानटोपी मानपत्रासकट दिली होती. त्यात "खरेकुलोत्पन्नः बाबूकाकाख्यः बट्टकंदवसतिस्थानवासी सकलगुणालंकारकंदिलः खलु महापंडितः" असे म्हटले आहे. बाबूकाकांचा अभ्यास साक्षात पाणिनीप्रमाणे समोर वाघ उभा असताना चालू होता. राणीच्या बागेत बसून त्यांनी दादोबांच्या व्याकरणातील (मोठे) ल्यबन्त आणि तुबन्तातील उदाहरणांच्या चुका काढल्या होत्या. एकएक चूक सापडल्यावर त्यांनी आनंदाने केलेल्या गर्जना पिंजऱ्यातला वाघ कौतुकाने ऐकत उभा राहत असे. शिवाय गृहस्थ अत्यंत मनमिळाऊ. 'मुंबईतील एकारान्त आडनावाचे कारकून' हा कोश तयार करीत असताना साठे, टेंगशे, पाध्ये, वगैरे अनेक एकारान्त कारकून त्यांच्याशी एकेरीवर येत. परंतु ह्या महापंडिताने आपली मनःशांती ढळू दिली नाही. तूर्त त्यांचे 'दादर विभागातील पोटभाडेकरूंचा जातिवार कोश' लिहिण्याचे काम चालू आहे. बाबूकाका एवढे विद्वान असून निगर्वी. चाळीच्या कोणत्याही कामाला तयार. चाळीतली चारांहून अधिक माणसे कसल्याही सार्वजनिक कार्याला बाहेर पडली की सर्वांत पुढे बाबूकाका असायचे. त्यामुळे शिष्टमंडळातही तेच सर्वांत पुढे होते.

*ग्रहगौरव श्री० अण्णा पावशे :*

कोणत्याही सत्कार्याला ग्रहांचे पाठबळ असल्याशिवाय यश येणे कठीण. अण्णा पावशे हे चाळीतले अधिकृत होरारत्न. आज जगातील थोरामोठ्यांच्या कुंडल्या अण्णांच्या दप्तरी पडून आहेत. त्यांची ज्योतिष वर्तवण्याची शैली शि० म० परांजप्यांसारखी वक्रोक्तिपूर्ण आहे. काळकर्ते परांजपे ज्याप्रमाणे, 'इंग्रज सरकार दयाळू आहे' म्हणून त्या सरकारचे (गेले बिचारे!) क्रौर्य व्यक्त करीत, त्याप्रमाणे अण्णा भविष्य उलटे वर्तवितात.

हवामानखाते ज्याप्रमाणे 'कोकण भागात पाऊस' असे ढोबळमानाने सांगते आणि मग सारे कोकण सुके राहून नुसत्या साखरप्याला तीन सेंट पावसाची सर पडली तरी भविष्य खरे झाल्याचा आनंद मानते, त्याप्रमाणे अण्णांच्या 'आजार संभवतो' ह्या भविष्यात सर्दीपासून क्षयापर्यंत आणि दाढदुखीपासून कॅन्सरपर्यंत सारे आजार सामावलेले असतात. परंतु अण्णांना विचारल्याखेरीज चाळीचे पाऊल इंचभर पुढे सरकत नाही. त्याशिवाय ज्योतिषशास्त्रात अण्णांनी स्वतंत्र शोध लावले आहेत. आपला देश कृषिप्रधान, त्यामुळे ज्योतिषही तसेच. उदाहरणार्थ, नांगर चालवायचा मुहूर्त, बैल घेण्याचा मुहूर्त, इत्यादी मुहूर्त आहेत. परंतु अण्णांनी आधुनिक यंत्र-सामुग्रीत ग्रहमान कसे पाहावे याचा अभ्यास केला आहे. ऑफिसात 'सिक लीव्ह' मागण्याचा मुहूर्त, बदली-बढतीचे ग्रहमान, चाळीतील नळाचे पाणी वाढण्याचे योग, चौकातील कचऱ्याचा ढीग उचलला जाण्यासाठी येणारा कचराषष्ठी योग, साहेब-हेडक्लार्क इत्यादी वरिष्ठांच्या महादशा,—या गोष्टींचा विचार करून सायन आणि निरयन पद्धतींप्रमाणे अण्णा पावशांनी एक पौशियन पद्धत काढलेली आहे. अण्णांच्या पौशियन पद्धतीप्रमाणे सिनेमाची तिकिटे मिळणार की नाही हेदेखील अचूक वर्तवता येते. इतकेच काय, चित्रपट चालणार की नाही हे विचारायला त्यांच्याकडे निर्माते येतात. जुन्या आचार्यांनी त्या काळात चित्रपट नसल्यामुळे ग्रहताऱ्यांच्या परिस्थितीचा ह्या बाबतीतला विचार केला नव्हता. तो अण्णांनी केला. त्यांची पद्धती अनेक ज्योतिष्यांनी उचलली आहे. त्याशिवाय बोलपटविषयक भविष्य सांगताच येणार नाही.

अण्णांनी शिष्टमंडळातील प्रत्येकाची कुंडली मांडून योग्यायोग्यता ठरवली होती. त्याबद्दल ते विशेष बोलले नाहीत. "योग्य प्रसंगी सांगेन" म्हणाले. अण्णांच्या ज्योतिषाचे हे वैशिष्ट्य आहे. ते उगीच वारेमाप भविष्य वर्तवीत नाहीत. उदाहरणार्थ, बिहारला पूर येणार हे त्यांनी आधी सांगितले नाही. गुपचूप बसले. पुराच्या बातम्या आल्यावर दुसऱ्या दिवशी त्यांनी आपली वही काढून दाखवली. त्यात अगदी बारीकसारीक घटनांचा तपशीलवार उल्लेख होता. "दोन वर्षे आधी मी हे लिहून ठेवले होते."—अण्णा अभिमानाने म्हणाले. आश्चर्य हे की वर्तमानपत्र-

वाल्यांनीदेखील हा तपशील जणू अण्णांच्या वहीतून उतरून घेतल्यासारखा आदल्या दिवशी छापला होता, इतकेच नव्हे, तर अण्णांनी आपल्या वहीत "दिब्रूगढ धोक्यात आहे असे आमचा बातमीदार म्हणतो" हे दोन वर्षांपूर्वी लिहिलेले वाक्य वर्तमानपत्रात होते. सांडग्याच्या चाळीत ज्योतिर्विषयक चमत्कार करून दाखविण्यासाठी अण्णांना शिष्टमंडळात सर्वानुमते घेतले.

### *सोकाजी दादाजी नानाजी त्रिलोकेकर :*

सोकाजी चाळीत नसते, तर शिष्टमंडळ असून जायला जागा नाही अशी अवस्था झाली असती; परंतु सोकाजींमुळे सांडग्याच्या चाळीचे निमंत्रण येऊ शकले. सोकाजी चाळीतले अत्यंत लोकप्रिय भाडेकरू. आहारशास्त्रावर अधिकारी पुरुष. शिवाय खरे मुंबईकर. किंबहुना, त्यांचे पूर्वज त्रिलोक हिंडून शेवटी मुंबईत स्थायिक झाले, असे ते सांगतात. त्यामुळे शहराच्या ऐतिहासिक चर्चेत सोकाजींचा फार उपयोग होणार होता. त्यातून ते इंपीरिअल बँकेत लेजरकीपर असल्यामुळे एक अर्थशास्त्रज्ञ या दृष्टीने आमच्या शिष्टमंडळात त्यांनी येणे अगत्याचे होते. त्याशिवाय बिझिकपटुत्व हा त्यांचा वाखाणण्यासारखा गुण. दिवाळीच्या दिवसांत त्यांनी आपल्या घरी ब्रिजचा सप्ताह साजरा केला होता. वृत्तीने मात्र अत्यंत धार्मिक. दत्ताने ज्याप्रमाणे एकवीस गुरू केले, त्याप्रमाणे सोकाजींनीही केले होते. दशरथाप्रमाणे अपत्यप्राप्तीसाठी त्यांनी चाळीत 'पुत्रकामेष्टी' यज्ञ केला होता व पुन्हा करण्याचा त्यांचा विचार आहे. त्यांच्याबरोबर त्यांच्या सुविद्य व सुदृढ पत्नी सौ० बाबलीबाई ह्याही येणार होत्या; परंतु सांडग्याच्या चाळीला चार मजले आहेत हे आठवताच त्यांनी प्रकृतीच्या अस्वास्थ्यास्तव तो बेत टाळला.

### *राघूनाना सोमण :*

एका शब्दात वर्णन करायचे म्हणजे चाळीचा ओसंडणारा 'उत्साह'. चाळीच्या प्रत्येक समारंभाची उत्साहमूर्ती. चाळीतील 'अधिक पाणी वाचवा', 'सांस्कृतिक पक्ष', 'सामुदायिक श्रावणी', 'जागतिक श्राद्धयोजना', स्त्रियांसाठी 'रज्जूड्डाणस्पर्धा', वगैरे चळवळींत राघूनानांचा उत्साह सदैव सोडावॉटरच्या बाटलीसारखा फसफसून सांडत होता. शिशुसप्ताहात तर स्वतःच्या सातही मुलांची नावे नोंदवून त्यांनी सक्रिय सहानुभूती व्यक्त केली होती. प्रस्तुत शिष्टमंडळाचे ते चिटणीस होते. शिष्टमंडळ पाठवण्याची कल्पनाही त्यांचीच. चाळीच्या प्रत्येक कमिटीचे ते चिटणीस होते. किंबहुना, सोकाजींच्या पुत्रकमेटीयज्ञात चिटणीस म्हणून काम करण्याची त्यांची इच्छा होती. शेवटी प्रा० नागूतात्यांनी तो पुत्रकमेटी यज्ञ नसून कामेष्टी आहे हे त्यांच्या निदर्शनाला आणून दिले तेव्हा त्यांचा उत्साह शांत झाला.

*आचार्य बाबा बर्वे :*

शिष्टमंडळाचे नेतृत्व बाबासाहेबांकडे होते. चाळीच्या प्रत्येक वर्गाचे ते नेते. त्यांची हयात देशसेवेत गेली. देशाशिवाय त्यांनी कसलीही चिंता केली नाही. तत्त्वचिंतनात आयुष्य गेले. 'स्वच्छ चाळ सप्ताहा'त त्यांनीच नेतृत्व स्वीकारून गॅलरीतील विड्यांची दोन थोटके टोपलीत टाकून त्या सप्ताहाचे उद्घाटन केले. शिवाय महान भाषापंडित. एकूण ह्यांना चोवीस भाषा येतात. आणि चोवीसही भाषांत ते मौन पाळू शकतात. "त्यामुळे मौनाचे सामर्थ्य चोवीस पट वाढते" असे त्यांचे मत आहे. सध्या ते झेंद अवेस्ताचे तामीळमध्ये समश्लोकीत भाषांतर करीत आहेत. महात्माजींच्या निधनानंतर सफरचंदे खायचे त्यांनी सोडून दिले. सध्या ते फक्त द्राक्षे, पिस्ते, मुसुंबी, संत्री वगैरे खातात. साठी ओलांडलेला हा गृहस्थ; परंतु तोंडावर तेज काय आहे! त्यांचे एक चिरंजीव मेक्सिकोत आहेत व दुसरे अलास्का येथे. आचार्यांनी अनेक भाषांतून लिखाण केले आहे. त्यांचे पुश्तू भाषेतील 'पांडवप्रतापाचे भाषांतर' पठाण लोक आवडीने वाचतात आणि स्वाहिलीतील 'व्यंकटेशस्तोत्र' वाचल्याशिवाय कित्येक निग्रो बांधव अन्नग्रहण करीत नाहीत. मुंबईतील गिरणीवाल्यांचे परिवर्तन करण्यासाठी त्यांनी 'अध्यात्मोपचार' नावाची 'आध्यात्मिक ट्रीटमेंट' शोधून काढली आहे. त्याबद्दल मोठमोठे शेठ, सावकार, गिरणीमालक, कारखानदार यांची त्यांना शिफारसपत्रे आहेत. विशेषतः सर्वांच्या अंतःकरणात एकच परमेश्वर असल्यामुळे मालक श्रीमंत झाला काय, मजूर झाला काय, अर्थ एकच, ही त्यांची विचारसरणी मालकांना फार पटून त्यांनी मजुरांच्यातील द्रव्यार्जनाची पापवासना नष्ट करण्यासाठी आपापल्या कारखान्यातून बाबांची आध्यात्मिक प्रवचने ठेवली. कित्येक गिरण्यांतून काम सुरू होण्यापूर्वी प्रार्थना ठेवण्यात येते. त्यासाठी मजुरांना तासभर आधी बोलावण्यात येते. पगाराच्या दिवशी मालक मौन पाळतात. ह्या साऱ्या सुधारणांचे श्रेय बर्वे बाबांनाच आहे. "आधुनिक अविचारी विचारसरणीत 'सह नौ भुनक्तु'-ऐवजी 'सह नौ भुंकतु' आले आहे, ते घालवले पाहिजे," असे ते नेहमी म्हणतात.

जाण्याचा दिवस उजाडला. व्हिक्टोरियांची फैरच्या फैर बटाट्याच्या चाळीपुढे उभी राहिली. शिष्टमंडळाला निरोप देण्यासाठी चाळकरी मंडळीची खूप गर्दी उसळली होती. गर्दीतील एका माणसाने "नवरी मुलगी कुठे आहे?" असाही एक वावळट प्रश्न विचारून क्षणभर वातावरण तापवले. परंतु आचार्य बाबा बर्व्यांनी मनःशांतीवर चार शब्द बोलून गर्दी हटवली. सर्वांत पुढल्या व्हिक्टोरियात राधूनाना हातात बटाट्याच्या चाळीचे चाळीय निशाण घेऊन बसले होते. सोकाजींनी हातात 'आंतर्चाळीय प्रेमभाव हेच आमचे ध्येय' असा फलक धरला होता. मंगेशराव हट्टंगड्यांनी स्वतः तयार केलेल्या 'हट्टीकानडा' रागात 'कुणीकडून कुणीकडे, चाळीतून

चाळीकडे' हे चाळगीत वरदाबाईंच्या समवेत म्हणायला सुरुवात केली. एका व्हिक्टोरियात प्रा० नागूतात्या, कोशकार महापंडित बाबूकाका खरे आणि प्रा० कल्पलताबाई फुलझेले ह्यांनी 'चाळ' शब्द कोणत्या शतकात आला यावर चर्चा सुरू केली होती. कुशाभाऊ अक्षीकर व्हिक्टोरियात उभे राहून दुतर्फा वाहणाऱ्या गर्दीचे लक्ष पुढारी पद्धतीचा नमस्कार करून आपल्याकडे वेधून घेत होते; तर ग्रहगौरव अण्णा पावशे राघूनानांच्या कानात प्रस्थान ठेवून न निघाल्याबद्दल कुरकूर करीत होते. वळणावळणाने सगळ्या व्हिक्टोरिया सांडगे बिल्डिंग्जजवळ येऊन पोहोचल्या. सांडगे बिल्डिंग्ज दृष्टिपथात आल्यावर राघूनानांनी निशाण उंच करून मागून येणाऱ्या व्हिक्टोरियांतील मंडळींना 'होश्यार' असा इशारा दिला. महापंडित बाबूकाकांनी डोक्यावरचे एरंडाचे पान नीट बसवून शंकराचार्यांकडून मिळालेली लाल कानटोपी चढवली. प्रा० नागूतात्यांनी उपरणे गळ्याभोवती टाकले, आणि प्रा० कल्पलताबाईंनी ओठांवरून लिपस्टिक फिरवली.

सांडगे बिल्डिंग्जचा मधला चौक तुफान गर्दीने फुलला होता. 'सांडगे-बटाटे भाई भाई' अशा आरोळ्या मारीत मुले नाचत होती. चाळीचाळीतील प्रेमाने फुललेली ती बालहृदये पाहून आचार्य बाबा बर्व्यांना अश्रू आवरेनात. ते ओक्साबोक्शी रडू लागले. नेताच रडू लागल्यामुळे शिष्टमंडळातल्या इतर सभासदांनीही यथाशक्ती अश्रुपात केला. अश्रुपाताचा हा कार्यक्रम आटोपल्यावर स्वागतार्थ उभा असलेला बँड वाजू लागला. आश्चर्य असे की बँडवर शास्त्रोक्त संगीत वाजत होते. शिष्टमंडळातील संगीतज्ञ मंगेशरावांनी व्हिक्टोरियातून टुणकन उडी मारली आणि ते बँडवाल्यांना दाद देऊ लागले. प्रभुरामचंद्रामागून जाणाऱ्या सीतामाईप्रमाणे वरदाबाईही बँड ऐकायला गेल्या. वरदाबाई गेलेल्या पाहून प्रा० कल्पलताबाईही व्हिक्टोरियातून उतरल्या. वरदाबाईप्रमाणे चपळाईने उतरण्याची त्यांचीही इच्छा होती; परंतु ते त्यांना जमले नाही. कल्पलताबाई उतरल्यावर व्हिक्टोरिया युधिष्ठिराच्या रथासारखी चार बोटे वर आली. हळूहळू सारे शिष्टमंडळ बँडवाल्यांच्या भोवती गोळा झाले. बँडच्या पुढे उभे राहून आचार्य ताल देऊ लागले; त्यामुळे बँडवाल्यांचा ताल चुकू लागला. ढोलवाल्याच्या शेजारी कल्पलताबाई जाऊन उभ्या राहिल्यामुळे तोही दुग्ध्यात पडला! बँडच्या मुख्याने प्रसंगावधान राखून बँड थांबवला. बँडवाल्यांनी शिष्टमंडळाच्या टाळ्यांना वाकून अभिवादन केले.



"सुंदर!!" मंगेशराव उद्गारले. "बँडवर क्लासिकल म्यूझिक काय चांगले लागतें हॉऽऽ—",

इतक्यात "हारांसाठी मान वाकवा" असा कुशाभाऊंनी खणखणीत आवाजात इशारा दिला आणि चाळीचे मालक आणि प्रमुख नेते दादाराव सांडगे यांनी सर्व शिष्टमंडळाला हार घातले. सर्व मंडळींनी बँडवाल्यांचे कौतुक केले. दादाराव सांडग्यांनी चाळीचे बँडप्रमुख आणि संगीतमंत्री सुकुमारसेन दांगट यांचा परिचय करून दिला.

"संगीतमंत्री?" राघूनाना उद्गारले, "हा काय प्रकार आहे?"

"सांगतो," दादाराव म्हणाले. "आमच्या चाळीची चाळसभा आहे. त्यात विविध खात्यांचे विविध मंत्री आहेत. सुकुमारसेन दांगट हे संगीतमंत्री. चाळीत गाण्यावाजवण्यासंबंधी आमचे विशिष्ट नियम आहेत. शास्त्रीय संगीताविषयी आमचा कटाक्ष आहे. शास्त्रीय संगीताखेरीज इतर कसलेही सूर इथे ऐकू येता कामा नयेत, ह्यावर देखरेख करण्यासाठी आम्ही संगीत हवालदार नेमले आहेत. चित्रपटसंगीताचा सूर चुकूनदेखील येथे ऐकू येणार नाही. प्रेमगीतांना बंदी आहे. इतकेच नव्हे, तर बाथरूममध्येदेखील सकाळी आंघोळ करताना सकाळचेच राग गायले पाहिजेत, संध्याकाळी आंघोळ करणाऱ्यांनी संध्याकाळचे राग गायिले पाहिजेत—असा नियम आहे. हे आमचे संगीतसंरक्षक दलाचे प्रमुख पं० सिद्धिविनायक साधले, संगीत-स्यमंतक."

एका अतिनम्र गायकाने मंडळाला अभिवादन केले. त्याच्या कोटावर मिलिटरीतल्या अधिकाऱ्यांच्या छातीवर असतात तशी पदके होती.

"ह्यांनी कित्येक सूरबंदीचे गुन्हे पकडले आहेत." दादाराव सांगू लागले. "चोरून सूर काढणाऱ्यांना आम्ही कडक शिक्षा ठेवल्या आहेत."

"आता बँडवर वाजवला तो राग कुठला?" प्रा० नागूतात्यांनी विचारले.

"हा सांडभैरव." सुकुमारसेन दांगट म्हणाले.

"वाटलंच मला." नागूतात्यांनी सांगितले. "म्हणजे भैरवात सांडाचे सूर आले आहेत नाही का?"

"नाही! सांडात भैरवाचे सूर आले आहेत. सारेगम पधनीसांसांनीप मगरेसा हा सांड आणि सारे गम पधनीसां सांनीधपसांनी धप सांनीधप मगरेसा—हा भैरव."

"बरोबर!"

"काय बरोबर—" मंगेशराव संगीत संतापाने उद्गारले. "धैवत मध्यम रिखभ कॉमल कुठे लागलं?"

मंगेशरावांच्या पायावर कुशाभाऊ अक्षिकरांनी आपला जोडा दाबून वादाचा देठ मुळातच तोडला.

"संगीतविषयक आपले धोरण अत्यंत उच्च, उदात्त, गंभीर, श्रेष्ठ—अगदी सामवेदाच्या परंपरेला साजेसे आहे." असा शेरा आचार्यांनी मारल्यावर मंडळ पुढे सरकले.

चौकात दहाबारा चाळकरी रांगेत उभे होते. हे सांडगे बिल्डिंग्जच्या चाळसभेचे निरनिराळ्या खात्यांचे मंत्री आहेत, असे सांगून त्यांची ओळख करून देण्यात आली. हे मंत्री-उपमंत्री दादाराव नेमतात. चाळीत फक्त सांडगे पक्षच आहे. "हे सौजन्यमंत्री आप्पाराव पळशीकर—" आप्पारावांच्या प्रत्येक हालचालीत सौजन्य होते. आप्पारावांनी पुढे येऊन शिष्टमंडळाला साष्टांग प्रणिपात घातला. सौजन्याचा

हा कडेलोट पाहून चकित झालेल्या शिष्टमंडळाला नंतर त्यांच्या पायाखालची केळ्याची साल दिसली. लगबगीने उठून, दोन्ही हात हनुवटीला लावून (स्वतःच्या), मानेचा कोन करून त्यांनी सौजन्यप्रणाम केला. चाळीतील बहुतेक मंडळी असाच प्रणाम करीत होती.

"आपल्या खात्याचे प्रमुख कार्य कोणते?"

"सौजन्याची वाढ. आम्ही गेल्या महिन्यात सौजन्यपक्ष साजरा केला. इथल्या प्रत्येकाच्या वागण्यात अधिकाधिक सौजन्य कसे येईल याचा आम्ही विचार करतो." ही सगळी वाक्ये ते ओठाला ओठ न लावता मुद्रेवरचे हास्य टिकवून बोलत होते. "उदाहरणार्थ, आमचा हा पतिपत्नींचा सौजन्य-संवाद पाहा." एक पत्रक हाती देत ते म्हणाले.

"हरकत नसेल—आपल्याला कष्ट होणार नसतील, विशेष त्रास वाटत नसेल, तर तो आपण वाचून दाखवा, असे आम्ही सांगितले तर आपल्याला दुःख अगर वेदना तर होण्याची शक्यता नाही ना?" बटाट्याच्या चाळीतदेखील सौजन्य कमी नाही हे आचार्य बाबा बर्व्यांच्या ह्या वाक्याने त्यांना दाखवून दिले.

"छे छे! कष्ट कसले! उलट सौजन्याची वाढच." असे म्हणून त्यांनी पतिपत्नींचा सौजन्य-संवाद वाचून दाखविला :

पती : आपल्या हातात ज्याला ठेवता येत नाही अशा अनादी अनंत कालचक्राचे चिमुकले निदर्शक यंत्र जे घड्याळ, त्यात नऊ वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. संसारशकटाला मी कचेरीत वेळेवर जाणे लाभदायक आहे असे आपल्याला वाटत नाही का मत्प्रिय कुटुंबवत्सले?

पत्नी : नाथ! आपली आतुरता मी जाणू शकते, परंतु इंधनापणिकाला सौजन्यपूर्ण विनवण्या करूनही जलसिंचित कोळसा त्याने पाठवला. अग्निप्रज्वलन नीट होत नाही. ओदनाला ह्यामुळे विलंब लागला माझ्या प्राणप्रिया, मी तरी काय करू?

पती : छे! छे! त्यात तुझा काय प्रमाद? पण शक्य असेल तर पाहा. नाही तर मी नुसतीच लवणरसयुक्त अग्निपक्व पल्लविका आणि चपातिकांचे त्वयार्ध मयार्ध भक्षू का?

पत्नी : छे! छे! मी आपल्याला रिक्तोदरावस्थेत बरी जाऊ देईन?

"वा! याला म्हणतात पातिव्रत्यता!!" राघूनानांना आपल्या स्वतःच्या घरातला सौजन्य-संवाद आठवला. सौजन्य-मंत्र्यांचा संवाद वाचणे चालू असताना राघूनानांचा संज्ञाप्रवाह चालू झाला...

राघूनाना : अहो—ऐकलं का?

सौ० राघूनाना : ऐकतेय—कान फुटले नाहीत.

राघूनाना : तुमचे कशाला फुटतील? फुटायला हवेत आमचेच. पण गिळायला

घाला लौकर. गाडी चुकली तर तेथे आमचा साहेब भाजून खाईल.

सौ० राघूनाना : आज सोळा वरसं ऐकत आले आहे. सगळा मेला भिजलेला कोळसा भरतात. चुलीत हाडं घालते माझी !

राघूनाना : तुझी हाडं ! म्हणजे शोधण्यात आणखी वेळ जाणार ! त्यापेक्षा माझीच घाल ! लवकर सापडतील.

सौ० राघूनाना : आलं लक्षात ! फुकटचं खाऊन मीच माजले आहे.

[अश्रुपात. भिजलेले कोळसे आणखी भिजतात. हाताशी येतील त्या चारदोन पोरांच्या पाठीत धपाटे—आणखी आरडाओरड, इ० इ० इ०]

सौजन्यमंत्र्यांचा सौजन्यसंवाद वाचून संपला होता. शिष्टमंडळाने टाळ्या दिल्या. राघूनाना भानावर आले.

"पण ह्या तुमच्या चळवळीचा काही फायदा झाला का?" प्रा० नागूतात्या शंका काढते झाले.

"आत्मगौरवाचा प्रमाद पत्करून सांगतो—झाला."

"अगदी नळावरदेखील कुणी भांडत नाही?" राघूनाना म्हणाले.

"उलट, सगळ्यांचा एकमेकींना आग्रह असतो—तुम्ही पाणी भरा, तुम्ही पाणी भरा. कित्येकदा सौजन्यपालनात पाणी भरायचं राहून गेलं आहे!"

"पाहा! नाही तर आपल्याकडे—साली भांडणाशिवाय साली बात नाय!" सोकाजींनी तोंड उघडले.

"हे आमचे अक्षरमंत्री हरिराव लिखिते."

"अरे! साला लिखिते—तू इथे? हा तर आमचे बँकेतला साला! हाय की नाय? काय वंडर! तू इथे मिनिष्टर?" सोकाजींचा कोट प्रा० नागूतात्यांनी ओढला.

"नमस्ते मंडळी—" लिखित्यांनी सोकाजीला ओळख दाखविली न दाखविली असे करून सौजन्य-प्रणाम केला.

"अक्षरमंत्री म्हणजे?"

"चाळीतल्या प्रत्येकानं काय वाचावं, काय वाचू नये, ह्याच्यावर हे नियंत्रण ठेवतात. शिवाय शुद्ध, सकस आणि निर्भेळ वाङ्मय निर्माण करण्याचं कार्य आमच्या चाळीत चालू आहे. मीच काही नियम केले आहेत." दादाराव म्हणाले. "या—"

लिखित्यांच्या मागून शिष्टमंडळ गेले. एका खोलीत पाचसात डेस्के मांडून लेखक लिहीत होते. काहींच्या हातांत कात्री आणि काळे कागद दिसले. ते अश्लील मजकुरावरून तेवढे कागद चिकटवून बाकीचे पुस्तक वाचायची परवानगी देत होते. काही लोक लिहिण्यात दंग होते.

"आम्ही दर महिन्याला चाळीतील मंडळींचा बौद्धिक आणि शारीरिक विकास

मोजून ती ती पुस्तके वाचायला लावतो. हे श्री० देवरावजी, जुन्या वाङ्मयातील सगळा हिंसात्मक मजकूर काढून बालवाङ्मय तयार करीत आहेत."

देवरावांनी एक चिमुकले पुस्तक आमच्या हाती दिले. त्यात अफझुलखानाच्या वधाची कथा 'अफझुलखानाचे सदेह जन्नतारोहण' ह्या शीर्षकाखाली येणेप्रमाणे दिली होती :

"कुलावतंस गोप्रतिपालक शिवाजीजी व सरदार अफझुलखानजी यांची प्रतापगडावर भेट ठरली."

"का हो, क्षत्रियकुलावतंस आणि गोब्राह्मणप्रतिपालक ह्याऐवजी नुसते कुलावतंस आणि गोप्रतिपालक का?" महापंडित बाबूकाकांनी पृच्छा केली.

"क्षत्रिय आणि ब्राह्मण ही जातिवाचक नावे आहेत. मुलांच्या मनावर अनिष्ट परिणाम होतात त्यामुळे." देवरावजी म्हणाले. ते पुढील कथा वाचू लागले :

"शिवाजीजी आणि अफझुलखानजी यांची परस्परांना भेटायची फार दिवस इच्छा होती. मावळात यवन-पद्धतीने भातशेती केल्यास अधिक धान्य पिकेल अशी अफझुलखानजींची कल्पना होती. शिवाजीजींचे म्हणणे मावळी पद्धती चांगली असे होते. शिवाजीजी भवानी देवीचे दर्शन घेऊन निघाले. अफझुलजीही नमाज पढून निघाले. दोघांचीही प्रार्थनेवर श्रद्धा होती. दोघेही प्रतापगडाच्या पायथ्याशी भेटले. शिवाजीजींनी मावळी पद्धतीचे इतके हृदयद्रावक वर्णन केले की त्या भावनोत्कटतेने अफझुलजींचे आतडे आतल्या आत पिळवटून बाहेर पडले आणि त्यांचे देहावसान झाले. तात्पर्य, प्रतिपक्षाला आपली बाजू समजावून देताना इतका भावनापूर्ण बोलणारा शिवाजीजीही थोर आणि प्रतिपक्षाच्या उद्गारांनी आतड्याचे परिवर्तन करवून घेणारा अफझुलजीही थोर. हाही थोर, तोही थोर. दोघांच्याही स्मृतींना आपण नम्र वंदन करू."

"अहो, पण हे खरे नाही हो." बाबूकाका इतके कळवळून बोलले की अफझुलजींप्रमाणे त्यांचेही आतडे पिळवटून बाहेर येते की काय असे सगळ्यांना वाटले.

"हे शंभर टक्के अहिंसात्मक सत्य आहे. ऐतिहासिक हिंसात्मक सत्य हे सत्यच नव्हे!" दादाराव रागाने ओरडले.

"अहो, मग रामाने रावणाशी युद्ध केले हे तुम्ही कसे लिहिले आहे?"

"रामाने रावणाशी युद्ध केले असे कोण म्हणतो?" अहिंसात्मक त्वेषाने देवरावजी ओरडले. "रामाने लंकेवर पोलीस-ॲक्शन घेतली."

राम राम! सोकाजींनी मनातल्या मनात गोऱ्या अन काळ्या रामांची आळवणी केली. इतक्यात "शी—शी—शी—" असे उद्गार ऐकू आल्यामुळे शिष्टमंडळाची दृष्टी त्या बाजूला गेली. डेस्काजवळच्या कात्रीवाल्याने एक काळा कागद कापून एका कादंबरीवर चिकटवला.

"काय झालं हो?" कुणीसे विचारले.

"अश्लील! हे पाहा : 'सुशीलेला ते लहान मूल पाहिल्यावर क्षणभर अशा सुंदर मुलाची आपणही एखादे दिवशी माता होणार आहोत ह्या विचाराने गदगदून आले.'"

"ह्यात काय अश्लील आहे?" कल्पलताबाईंनी विचारले.

"आपणच हा प्रश्न विचारावा हे आश्चर्य आहे. अहो, ही सुशीला अविवाहित आहे अजून!"

"सो व्हॉट!" मंगेशरावदेखील चिडले.

"अविवाहित कुमारिकेच्या मनात मातृत्वाची कल्पना येणे हे अश्लील नाही तर काय? राष्ट्राला निराळे विचार हवेत. आम्ही ते वाक्य बदलले आहे : 'सुशीलेने ते लहान मूल पाहिले नाही. अशा मुलाची आपणही एखादे दिवशी माता होणार आहोत हा विचारदेखील तिला आला नाही. आणि गदगदून तर मुळीच आले नाही.'"

"अस्सं!! हा बदल केलात होय?"

"बदल केलेच पाहिजेत! हे सगळे मराठी लेखक नालायक आहेत. तुम्ही हे जे चालवलंय ते उत्तम आहे." नागूतात्या लिखित्यांना उद्देशून म्हणाले व दोन पावले पुढे गेल्यावर बाबूकाकांच्या कानांत त्यांनी हा मूर्खांचा बाजार असल्याचे सांगून शिष्टमंडळाशीही तोंडमिळवणी केली.

नागूतात्यांच्या प्रकट उद्गारांनी उत्तेजित झालेल्या लिखित्यांनी आपल्या अन्य वाङ्मयविषयक योजना सांगितल्या. "हा आमचा काव्यविभाग. इथे चाळीतल्या प्रत्येक कुटुंबातील एकदोन-एकदोन मंडळी नियमाने काव्य करून जातात. आम्ही विषय देतो आणि शब्दकोश पुरवतो. शिवाय यमकांचा एक कोश करायचे काम चालू आहे."

कोश म्हटल्यावर महापंडित बाबूकाका कानटोपी सरसावून पुढे गेले आणि त्यांनी यमकांच्या कोशात डोके खुपसले.

"गेल्या आठवड्यात" देवरावजी सांगू लागले, "आम्ही 'सहकारी शेतकरी पतपेढ्या' हा विषय दिला होता. शिवाय वेगवेगळ्या प्रसंगांच्या कविता लगेच घडवून देतो. पुन्हा कविता अत्यंत सोज्ज्वळ राखण्याकडे आमचा कटाक्ष. आजच्या पिढीला श्रद्धा नाही. ती ह्या काव्यातून निर्माण होईल. पलिकडले नाट्योत्पादनकेंद्र. इथे अत्यंत पवित्र नाटके लिहिली जातात. रंगभूमीवरदेखील पुरुषांचे स्त्रीपात्रविरहित व स्त्रियांचे पुरुषपात्रविरहित नाटक असते. आणि संमिश्र नाटके झालीच तर पतिपत्नीसंबंधाखेरीज अन्य संबंधच दाखवतो!"

"म्हणजे?" राघूनाना घाबरून म्हणाले व त्यांनी कल्पलताबाईंच्याकडे ओशाळ्या चेहऱ्याने पाहिले.

"म्हणजे बहीण-भाऊ, मुलगी-बाप, आई-मुलगा, आजी-नातू अशा प्रकारचे.

परवाच आम्ही 'एश्वदामामी' नावाचं नाटक केलं, त्यात एश्वदा ही कृष्णाची मामी असल्याचं दाखवलं आहे !"

"म्हणजे कंसाची वाईफ ?" सोकाजींनी नर्व्हस होऊन विचारले.

"नाही! आम्ही मामाचं पात्र टाकलंच नाही. एवढंच काय, पण मस्तानी ही बाजीरावाची आत्या दाखवलेलं नाटकही आम्ही केलं आहे. त्यातला शेवटचा देखावा फारच हृदयस्पर्शी आहे. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेप्रमाणे मस्तानीला बाजीरावापुढे आणली आहे. आणि बाजीराव तिला 'आत्याऽऽ' म्हणून हाक मारून म्हणतो, 'आत्या, तुला मिश्या असत्या तर मी काका म्हटलं असतं गऽ!!' इथे कडाडून टाळी आली. अर्थात दादारावांचा हुकूमच होता तसा !"

"चला—" राघूनाना म्हणाले. आणि शिष्टमंडळ अक्षरमंत्र्यांच्या खात्यातून पुढे आले. खोलीखोलीतून 'सांडगे-बटाटे भाई भाई' अशा गर्जना होत होत्या. त्यांना अभिवादन करून मंडळ पुढे सरकत होते. इतक्यात समोरून सोकाजींचे साडू दादाजी ब्रह्मांडकर येताना दिसले. सोकाजी पुढे जाऊन त्यांच्याशी काही बोलणार इतक्यात दादाराव सांडगे म्हणाले, "हे ब्रह्मांडकर. परचाळीय मंत्री. मुंबई शहरातील आंतरचाळीय संबंध प्रस्थापित करून सर्वत्र शांतता पसरविण्याचे कार्य यांचे. चाळीचाळींतूनच काय, परंतु खोल्याखोल्यांतून शांतता-करारांवर सह्या घेऊन ते पाळण्याचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत."

"छान! शांतिरस्तु पुष्टिरस्तु तुष्टिरस्तु—" असा वैदिक आशीर्वाद आचार्यांनी दिला.

"ब्रह्मांडकरांचे कार्य आमच्या चाळीपेक्षा इतर चाळींतून अधिक चालते."

"अरे, कसले कार्य न् काय घेऊन बसलेत सांडगेशेट. आपली ताकद असेल तितकी सोशल सर्विस करायची. आजकाल हापीसमदे टाय्म्पण नाय मिळ्ळत. —तुमची मेहरबानगी."

दादाजी ब्रह्मांडकरांचा हा विनय वाखाणण्यासारखा होता. परंतु अजून अनेक गोष्टी पाहायच्या असल्यामुळे मंडळाने त्यांचा निरोप घेतला. आता त्यांना 'आंग्रे-खटाव इंटरचॉल पॅक्ट' घडवून आणण्यासाठी जायचे होते. गोरेगावकरांच्या चाळीत इराणी ऑमलेटवरून वातावरण तंग झाले होते, तेथे समेट घडवून आणायचा होता. अनेक कामे होती. त्यामुळे तेही गेले.

एकदम सुस्वर आवाजात दहाबारा मुलींनी म्हटलेले स्वागतगीत ऐकू आल्यामुळे प्रथम एच० मंगेशराव आणि मागून सारे शिष्टमंडळ 'समस्त सामुदायिक केंद्र' नावाची पाटी असलेल्या हॉलपुढे उभे राहिले.

*"समुदायें अजि स्वागत करुं या*
*मुदित मनें अजि हर्षित होउनि ।*
*तनमनधन समुदायसमर्पित ॥"*

हे स्वागतपर गीत झाल्यावर दरवाजावर उभ्या असलेल्या समुदायमंत्री सौ० भरणीबाई महाशब्दे यांनी शिष्टमंडळाचे स्वागत सौजन्यस्मिताने केले. स्त्री-मंत्री असल्यामुळे साहजिकच शिष्टमंडळातील प्रा० कल्पलताबाई विदुषी म्हणून व वरदाबाई स्त्री म्हणून पुढे सरकल्या.

"समस्त सामुदायिक केंद्र ही आपली काय कल्पना आहे?" कल्पलताबाईंनी नुकत्याच ऐकलेल्या सौजन्यस्वरात प्रश्न विचारला.

"आमच्या चाळीतल्या बहुतेक गोष्टी आम्ही सामुदायिक पद्धतीने करतो. सकाळचा चहा सामुदायिक पद्धतीने इथेच होतो. प्रत्येकाने घरून फक्त कपबशी, चहाची पत्ती, थोडे दूध आणि साखर बरोबर आणायची. सामुदायिक चहामुळे भ्रातृभाव वाढतो असा आमचा अनुभव आहे."

"सामुदायिक पद्धतीने चहाच होतो की कॉफीसुद्धा?" वरदाबाईंनी एकदाच तोंड उघडले.

"कॉफीला आमच्या चाळीत बंदी आहे. आमच्या दादारावांचा कॉफीला विरोध आहे. गेल्या वर्षी आम्ही कॉफीबंदी आघाडीतर्फे 'काफीर' नावाचे कॉफीविरोधी नाटकही केले होते."

"कॉफी राग गायला काय ऑपूझीशन नाही ना?" मंगेशरावांनी संगीत विनोद केला.

"का नाही? अवश्य आहे!" भरणीबाई मंत्र्यांच्या आत्मविश्वासाने उद्गारल्या.

"थांबा हो. ही समस्त सामुदायिकाची कल्पना सांगा ना." कल्पलताबाईंनी पुन्हा विनंती केली.

"चहाप्रमाणे इथे दुपारचे सामुदायिक निवडणे होते. सगळ्या चाळीतल्या नागरिक स्त्रिया एकत्र बसल्यामुळे चहाड्या होत नाहीत. आणि त्याच वेळी आम्ही रेकॉर्ड्स लावतो. त्यामुळे त्या ठेक्यात निवडून होते."

भरणीबाईंचे हे सामुदायिक कार्याबद्दलचे वक्तव्य चालू असताना नागूतात्यांनी कुशाभाऊंशी हे खोटे असले पाहिजे वगैरे कुजबूज सुरू केली. त्यांना मागल्या मागे कोणीतरी जरा ओढून नेले आणि कसलीतरी समज देऊन परत पाठवले. कारण त्यानंतर प्रा० नागूतात्या, "वा, छान, सुंदर, बघा, नाही तर आपली चाळ!" असे उद्गार काढू लागले. एकाएकी ते सांडगेमय होऊन गेले.

"हे सामुदायिक स्नान-केंद्र. भगिनींना ह्याचा फार फायदा होतो."

सगळे शिष्टमंडळ लगबगीने आत शिरले. आणि भरणीबाईंचे पुढले वाक्य ऐकल्यावर परतले. "इथे आम्ही चाळीतल्या दोन वर्षांपर्यंतच्या मुलांना सामुदायिक आंघोळ घालतो—एकमेकींच्या मदतीने हे कार्य सोपे जाते. शिवाय सामुदायिक साबणाचा सामुदायिक फेसही तयार होतो. तोही उपयुक्त ठरतो."

"तुमच्या ह्या सामुदायिक चळवळींना स्त्रियांचं सहकार्य कसं काय मिळतं?"

कल्पलताबाईंनी विचारले. शिष्टमंडळाचे सभासद हे नेहमी प्रश्न विचारतात हे त्यांनी ऐकले होते.

"सुरुवातीसुरुवातीला भगिनी साशंक होत्या, परंतु आता खूप सहकार्य आहे. शिवाय आम्ही एक भगिनींचे मासिक चालवितो—हस्तलिखित! त्यात चाळीतल्या प्रत्येक भगिनीचा दर महिन्याला फोटो आणि तिचे चरित्र देतो."

"किती दिवस झाले?"

"पुष्कळ वर्षे हे मासिक चालू आहे."

"पण आता सगळ्या भगिनींचे चरित्र येऊन गेले असेल—"

"हो—एकदा सगळ्यांचे येऊन गेले. आता दुसरी खेप चालू आहे."

"म्हणजे पुन्हा त्याच बायकांची चरित्रे?"

"काय हरकत आहे? माणसाच्या चरित्रात कितीतरी नवे फरक पडत असतात. नाही का भगिनींनो?"

लगेच मघाच्या नमन म्हणणाऱ्या भगिनी एका तालात "हो!" म्हणाल्या.

"खरं आहे. अहो, म्हटलंच आहे स्त्रियश्चरित्रम्—"

राघूनाना बोलले आणि किंचाळले. त्यांचा श्लोक, कुणाच्या तरी बुटाचा पाय चुकून त्यांच्या कमरेच्या आसपास जोरात लागल्यामुळे, अर्धवटच राहिला.

"आणि हे आमचे सामुदायिक स्वयंपाकघर."

"पण आज इथे अजूनपर्यंत सामसूम कशी?" कुशाभाऊ अग्निकरांचा प्रांत आल्यामुळे त्यांनी विचारले.

"आज रविवार! भगिनींना सामुदायिक सुटी आहे. आज आमच्या चाळीत स्टोव्ह पेटता कामा नये असा दंडक आहे."

"म्हणजे सगळ्यांना निर्जळी एकादशी?"

राघूनानांना पुन्हा कुणाचा तरी पाय आपल्या कमरेजवळ येऊन गेल्यासारखे वाटले.

"आम्ही ह्याला सामुदायिक उपोषण म्हणतो. ज्या कोणाला भूक लागेल त्याने बाहेर जाऊन खावे!"

"पण पाहुणे आले तर त्यांच्यासाठी—"

महापंडित बाबूकाकांनी शंका काढली, तोच दादाराव गरजले,

"एकदा माणूस सांडग्याच्या कंपौंडात तो लोखंडी दरवाजा उघडून आला की त्याने आमच्या शिस्तीने वागलेच पाहिजे."

इतक्यात दहाबारा भगिनी लगबगीने आतल्या खोलीत गेल्या. तिथून कुणीतरी "वेण्या घालणे सुरूऽऽ!" असा हुकूम दिला. आश्चर्याने शिष्टमंडळ त्या दिशेने पाहू लागले. त्यांचे आश्चर्य ओळखून भरणीबाई म्हणाल्या, "सामुदायिक वेणी!"

"का हो, पण ह्या बायका ऐकतात—बऱ्या. वा—वा! कुशाभाऊ, आपल्या

चाळीतल्या बायका जर इतक्या शिस्तीत वागतील तर काय मजा येईल! मस्त आराम करू राव!!”

राघूनानांचे उद्गार संपतात न संपतात तोच कळश्या, बादल्या, तपेली घेऊन नळावर निघालेली पुरुषमंडळींची रांग दिसली.

“सामुदायिक जलभरण दिसतंय—” बाबूकाकांच्या बोलण्यात कोकणी खवटपणा होता.

“हो! आमच्या चाळीत पाणी भरण्याचे काम पुरुषवर्गाकडे आहे!”

“छान!” कल्पलताबाई उद्गारल्या, “पण तुम्ही सामुदायिक शिवण ठेवले नाही का?” स्वतःच्या विषयाकडे वळत त्या म्हणाल्या.

“ठेवणार होतो. पण त्यासाठी सर्वांनी एकाच तऱ्हेची पोलकी घालावी ही योजना पास करताना, एकाच मापाची ही उपसूचनाही पास झाली; आणि उपसूचनेची अंमलबजावणी करणे अवघड झाल्यामुळे सारीच योजना तहकूब केली आहे.”

सामुदायिक स्वयंपाकघर बंद हे ऐकल्यानंतर शिष्टमंडळातील बऱ्याच सभासदांचा जोर संपला होता. यापुढील खाती एकही प्रश्न न विचारता मंडळींनी पाहिली. राघूनानांनी दोनचार वेळा पाणी मागून दादाराव सांडगे काही बोध घेतात की काय पाहिले. पण छे! ते अरबी पद्धतीने लावलेल्या तुळशीत आणि चाळीच्या खरकट्यातून कंपोस्ट खत कसे केले हे सांगण्यात गर्क होते. बाराच्या सुमाराला शिष्टमंडळ भुकेने व्याकुळ झाले. त्या वेळी खोल्याखोल्यांच्या दारांतून मात्र मसालेदार फोडण्यांचा वास येत होता. हा चमत्कार कळेना. शेवटी आचार्यांनाच राहवले नाही. त्यांनी मौन सोडून पाकसिद्धीसारखा काही प्रकार चालू असल्याचा वहीम व्यक्त केला. त्यावर अलिकडे चोरून वरण शिजवण्याचे प्रकार चाळीत चालू आहेत, त्याची योग्य वेळी दखल घेण्यात येणार आहे, असे उत्तर मिळाले. स्वयंपाकघरावर छापाच घालायचा असल्यास आपली तयारी आहे, असे कुशाभाऊंनी स्वयंस्फूर्तीने कबूल केले; परंतु ती तसदी पाहुण्यांनी घेण्याचे कारण नाही, अशी दादारावांकडून सौम्य समज मिळाली.

त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यासाठी शिष्टमंडळाला चौथ्या मजल्यावरील गच्चीवर पाचारण करण्यात आले. त्या वेळी अवघ्या शिष्टमंडळाच्या कंठाशी प्राण आले होते. तशा अवस्थेत ‘काफीर’ नाटकाचा थोडासा प्रयोग म्हणून सुमारे दोन तास कॉफीच्या दुष्परिणामावर नाटक झाले. सांडग्याच्या चाळीच्या क्रांतिचळवळीचा पोवाडा झाला. ‘सांडगे-बटाटे भाई भाई’ झाले आणि मध्यंतरी थोडीशी विश्रांती असे जाहीर झाल्याबरोबर कधी नाही ते प्रसंगावधान राखून मंगेशराव हट्टंगड्यांनी वरदाबाईसमवेत बटाट्याच्या चाळीतील शिष्टमंडळाचे कृतज्ञतादर्शक म्हणून हट्टी-कानड्यातील ‘भूक लागली भूक’ हे गीत ‘भूकाभिनयासकट’ सुरू केल्यावर गच्चीवर फक्त बटाट्याच्या चाळीतील शिष्टमंडळ शिल्लक राहिले. ‘गुरीला’ युद्धासारखी ही

‘सुरीला’ पद्धती यशस्वी ठरली आणि शिष्टमंडळ सुखरूप निसटले. दाराशी ही गर्दी होती. डोकावून पाहिले तेव्हा होरारत्न अण्णा पावश्यांभोवती गर्दी जमलेली दिसली. अण्णांनी चाळीची कुंडली मांडली होती; आणि कळश्या, हंडे अंगाखांद्यांवर घेतलेले संत्रस्त नवरे अजून साडेसात वर्षे तरी चाळीचे मालक दादा सांडगे यांना मृत्युयोग नाही हे ऐकत होते. आणि ते दीनवाणे भाडेकरू नवरे, केवळ तुंबलेल्या भाड्यापायी सोसावा लागणारा हा सामुदायिक छळ आणखी साडेसात वर्षे सोसावा लागणार म्हणून अधिक बापुडवाणे चेहरे करून त्यांच्याकडे “नीट पाहा. असेल मृत्युयोग” अशी मूक आर्जवे करीत होते. कुशाभाऊ अक्षिकरांनी अण्णा पावश्यांना गर्दीतून बाहेर खेचले आणि जीव घेऊन शिष्टमंडळ परतले.

बटाट्याच्या चाळीत त्यानंतर कित्येक भांडणांच्या प्रसंगांत लोक “लेका, माणूस आहेस की दादा सांडगे?” असे विचारीत. प्रा० नागूतात्या मात्र कंबर शेकीत “पृथ्वीच्या पाठीवर सांडग्याच्या चाळीसारखी चाळ नाही” म्हणून प्रकट पत्रे, लेख, लघुनिबंध, व्याख्याने—काय मनाला येईल तो मालमसाला भरून प्रसिद्ध करीत होते. आणि प्रा० कल्पलताबाई फुलझेले ‘सांडग्याच्या चाळीतील स्त्री जीवना’वर प्रबंध लिहू लागल्या होत्या. आचार्य बाबा बर्वे मात्र आपली छत्री आणि जोडा हरवल्याच्या दुःखातून अजूनही डोके वर काढू शकत नाहीत.



# ....निष्काम साहित्यसेवा

" ओरिसात अजून पाऊस पडत आऽऽहे ! पूरग्रस्त भागाची विमानातून मंत्री पाहणी करीत आहेऽऽत. तिथल्या निर्वासितांचा लोंढा येत आऽऽहे. काही भागात मदत पोहोचत आऽऽहे! नवीन भाग पुराखाली जात आऽऽहे."—अण्णा पावश्यांच्या खोलीतला रेडिओ.

"पॅटेंक्स—पॅ-पॅ—टें—टें—क्स!...आजही खरीदिये! पॅ पॅ पॅ पॅटेंक्स—टीम-टीम—टांटू—टें टें-पं-पं-टेक्स!..."—सोकाजी त्रिलोकेकरांच्या रेडिओवरून सिलोनवाणी !

"चंद्रमा नभांगणीं डुलतो..."—गुप्त्यांच्या रेडिओवर मराठी भावगीत. गुप्ते-कुटुंबातील समस्त बालगुप्ते त्याबरोबर गात आहेत.

"वाघिणीचें दुहुध प्यालां वहाग बऽऽचचे पहाकडे; ब्रहांत तूमा काप डे?" —कारखानिसांच्या 'सूरेखा'चा सकाळचा अभ्यास.

"खीः खीः खीः-ख्या-ख्या-ख्या..." प्रा० नागूतात्या आढ्ये ग्यालरीत उभे राहून, सभोवती चाळीतली तरुण पोरे जमवून आपण ज्ञानकोशकार केतकरांपासून ते कालपरवाच्या लेक्चररापर्यंत प्रत्येकाची कशी 'केली' ह्या विषयावर चावून चरबट झालेल्या कथा सांगत आहेत. आणि ती तरुण मंडळी निमपट आदर आणि चौपट भीतीने खिंकाळत आहेत.

"प ध नी सां रेंऽनि सां रें—ग म प ग म प ध—जागो मोहन प्या—मोहन प्या—मोहन प्या रे"—चाळीतील संगीतसुरंग एच० मंगेशराव व सौ० वरदाबाई यांची भैरवाची जोडमेहनत.

अशा ह्या प्रातःकालीन गदारोळात आठ नंबरच्या खोलीत मी माझ्या 'दणकवली'

ह्या पार्श्वभूमिप्रधान प्रादेशिक कादंबरीचे पहिले प्रकरण लिहिण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो. वास्तविक 'दणकवली' ही माझी तिसरी कादंबरी. यानंतर आणखी निदान पंचवीस कादंबऱ्या झाल्या असत्या...इथे माझ्या साहित्यसेवेतील काही स्मृती सांगणे आवश्यक आहे...माझ्या मना बन दगड...

बटाट्याच्या चाळीत शारदादेवीचा कनिष्ठ असलो तरी मी एकनिष्ठ भक्त! शाळेत असतानाच मी आमरण साहित्यसेवेचे व्रत बोलून चुकलो होतो. वडिलांनी माझ्या व्रतात खंड पडावा म्हणून मला बऱ्याच ठिकाणी चिकटवण्याचा वायफळ उद्योग केला. शेवटी पोर्टट्रस्टमधून रिटायर होऊन बटाट्याच्या चाळीतला वंशपरंपरागत चालत आलेला आठ नंबरचा दोन खोल्यांचा गाळा माझ्या हवाली करून ते व मातुःश्री पोंबुर्प्याला घरचे पाहण्यासाठी निघून गेली—आणि मला साहित्यसेवेची वाट मोकळी करून दिली. माझी पहिली कादंबरी ही बहुतेक सुप्रसिद्ध कादंबरीकारांप्रमाणे ऐतिहासिक होती. (त्याशिवाय चाळीच्या गणपतीपुढे माझी नाटके, स्वागतपर पद्ये, मंगलाष्टके, इत्यादी साहित्यसेवा रुजू आहे.) चाळीत येणारा पोस्टमन गेली पाच वर्षे मला नियमाने जाडजाड पाकिटे परत आणून देत आहे; परंतु त्यामुळे माझा हुरूप ओसरलेला नाही.

माझी पहिली ऐतिहासिक कादंबरी 'उंबरवाडीचा उमाजी' खूपच गाजली.

"इतिहासाच्या अभ्यासकांना कदाचित यात स्वारस्य वाटेल; परंतु वाङ्मयदृष्ट्या ही कादंबरी अगदीच खालच्या दर्जाची आहे, असे नाइलाजाने म्हणावे लागते."
—साप्ताहिक 'फाळ', शेतीला वाहिलेले साप्ताहिक; टीकालेखक—च० वें० तु०

"...ललित वाङ्मय म्हणून कदाचित कुणाला यात स्वारस्य वाटेल—परंतु प्रस्तुत लेखकाने त्यात इतिहास व ऐतिहासिक विभूतींवर अकारण सूड उगवला आहे."—'इतिहासप्रदीप' षण्मासिक, प० खा० जु० रं० इ० मंडळाचे मुखपत्र.

वरील दोन्ही अभिप्रायांचा एकमेकांना छेद दिल्यास ह्या दोन्ही टीकालेखांनी (हे त्या प्रा० नागूताल्या आढ्याने दोन नावांनी लिहिले आहेत हे मी जाणतो.) साहित्यप्रेमी व इतिहासप्रेमी ह्या दोघांनाही माझ्या ह्या पहिल्या कादंबरीत स्वारस्य वाटल्याची छुपी कबुली दिली आहे हे सुज्ञांच्या लक्षात सहज येईल. परंतु पोंबुर्पे येथील रहिवाशांचे पोंबुर्पे ग्रामस्थ संघाचे वतीने प्रसिद्ध होणारे हस्तलिखित 'श्रीरवळूविजय' यात मात्र अत्यंत प्रामाणिक अभिप्राय आला होता. त्यात अभिप्रायलेखकाने म्हटले होते : "आपल्या पोंबुरप्यातील अशा लेखकांना आपण पूर्ण प्रोत्साहन दीले पाहिजे. ग्रामस्थ मीत्रांनी 'उंबरवाडीचा उमाजी' ही ग्रामबंधू श्रीयूत म्हाळसाकांत फट्ट पोंबुर्पेकर यांनी लीहिलेली कादंबरीची एक-एक प्रत घेऊन आपद्ग्रस्तांस मदत करावी अशी ग्रामबंधूंना नम्र वीनंती आहे!"

वरील अभिप्रायांचे उतारे देण्याचे कारण एवढेच की, पहिल्या साहित्यिक सलामीनेच मी महाराष्ट्रातील जनमनाचा ठाव घेतला होता. पहिल्या आठवड्यातच

मुंबईच्या एकाही बुकडेपोत माझे पुस्तक मिळेनासे झाले होते. अण्णा पावश्यांनी मात्र, "अरे, पोंबुर्पेकर, तुझा उमाजी कांदेवाडीच्या फुटपाथवर पाहिला." असे खवट उद्गार काढले. ह्या टीकेमागला जातीय वास मी तेव्हाच ओळखला. माझ्या पुढल्या कादंबरीत पावशे नावाच्या पात्राला जनता काळ्या घोड्यासमोर फोडून काढते आहे असा प्रसंग घालायचे त्या घटकेला मी ठरवले. असल्या टीकेमुळे माझा दुसरी कादंबरी लिहिण्याचा उत्साह वाढीला लागला.

दुसरी कादंबरी लिहायची असे ठरवून नाव 'पोंबुर्प्याचा पंपू' असे जाहीरही केले. त्या वेळी माझ्या पहिल्या प्रकाशकाने कच खाल्ली. माझी पहिली कादंबरी प्रसिद्ध केल्यावर माझे माजी उत्साही प्रकाशक 'बिच्चू आणि सायकर' यांनी व्यवसायांतर करून, पुस्तकप्रकाशन्-भांडार बंद करून दुग्ध-भांडार काढले. त्यांच्या दुकानी मिळणाऱ्या आरोग्यवर्धक चिवड्याला माझी पहिली आवृत्ती उपयोगी पडली असे भर गिरगावात मला मंगेश बिच्चू म्हणाला. ('पोंबुर्प्याच्या पंपू'तल्या खलनायकाचे नाव मी 'नागेश डिच्चू' असे ठरवून त्याचा काटा काढला.) प्रकाशकाच्या धमकावणीला भिणाऱ्यांतला मी नव्हतो हे त्यांच्या लक्षात माझ्या दुसऱ्या कादंबरीची 'सप्रेम भेट' द्यायला मी गेलो तेव्हा चटकन आले.

"प्रकाशक कोण मिळाला हो तुम्हांला पोंबुर्पेकर?" सायकराने हलकटपणाने मला विचारले.

"जनताजनार्दन!!—खेड्याखेड्यात विखुरलेल्या अमर जनतेच्या आधारावर उभा राहणारा हा लेखक आहे, सायकर दूधवाले! तुम्ही मला पानाला पाच आणे दिलेत. आता पात्राला सहा आणे हा माझा नवा दर आहे!"

सायकराला बुचकळ्यात टाकून मी ताणात निघालो: त्या वेळी दुकानात चढणाऱ्या ज्या ज्या गिऱ्हाइकांना माझा धक्का लागला असेल त्यांनी मला क्षमा करावी. तो दोष माझा नाही, कलावंतांच्या बेगुमान—अमर्याद—ओसंडत्या स्वातंत्र्याचा आहे!

प्रादेशिक कादंबरीच्या लिखाणाप्रमाणे प्रकाशनाचेदेखील मी अगदी नवे तंत्र स्वीकारले. ह्या तंत्राने प्रकाशित केलेली माझी पहिली कादंबरी म्हणजे 'पोंबुर्प्याचा पंपू'. ह्या कादंबरीची काही लोकांनी 'गारंबीचा बापू' नावाच्या कादंबरीशी तुलना केली. (हीही एक बऱ्यापैकी प्रादेशिक कादंबरी आहे म्हणतात.) पोंबुर्प्यालादेखील अचाट पंपू व पुचाट पंपू आहेत. गरजूंनी पोंबुर्प्याला जाऊन खात्री करून घ्यावी. आणि नारळीपोफळींच्या बागा काही बुरोंडीच्या परिसरातच उगवत नाहीत.

ह्या कादंबरीने मी पोंबुर्प्याचे नाव दिगंतात पसरवले. त्यापूर्वी 'पोंबुर्पे' हे नाव, तिथल्या जांगोबाच्या खाडीत हरूण उस्मान चिच्या नावाचा मुसलमान गाबीत मासे पागताना बुडून मेला त्या वेळी, एकदा छापून आले होते. त्याखेरीज पोंबुर्प्याचा उल्लेख नाही. घुमटेश्वराच्या जत्रेत पोंबुर्प्याचा 'भक्कम बापट' कुस्ती जिंकला त्याचे नाव नाही छापून आले आणि विखडवलीचा 'फॉरेष्ट फर्नांडिस' बदलून दांडेलीला

रेंजर झाला त्याचे फोटोसकट चरित्र! पोंबुर्प्यांची ही उपेक्षा मला सहन होईना. मी माझ्या कादंबरीत तमाम ग्रामस्थांची नावे ह्या ना त्या कारणाने गोवली. कादंबरीतील सारी सज्जन पात्रे पोंबुर्प्याची ठेवून व्हिलन मंडळीची आयात शेजारच्या बिघडवली गावातून केली. ज्या ज्या म्हणून पोंबुर्प्याच्या ग्रामस्थाला आपले नाव छाप्यात यावेसे वाटत होते त्याला सहासहा आणे भरून माझ्या 'पोंबुर्प्याच्या पंपू'त जागा करून दिली. खुद्द पोंबुर्प्याच्या दाजी खोतांनी पंधरा रुपये रोख आणि चौदा कुळव भात दिले. त्यामुळे मुळातल्या कुळांना लुटणाऱ्या दाजींनी त्या पैशांतून न कळत त्या सर्व कुळांचा विमा उतरवल्याचा प्रसंग टाकला. ही कलात्मक कलाटणी वाचकांना धक्काच देऊन गेली. आणि विमा कंपनीचे नावदेखील दाजी खोताचा जावई 'एजंट फडका' याजकडे ज्या कंपनीची एजन्सी आहे त्या 'ह्यूमन-वुमन फायर अँड वॉटर इन्शुरन्स कंपनी'चे ठेवले. कंपनीनेदेखील ह्या माझ्या सेवेबद्दल मला एक क्यालेंडर व डायरी दिली. गावातल्या पुरात काही मंडळींना (ही आगाऊ मयत झालेलीच मंडळी घेतली.) बुडवून त्यांच्या तेराव्याच्या दिवशी पॉलिसीचे पैसे पोस्टमन वाटीत सुटला असेही एक प्रकरण घातले. इतकेच काय, शेवटी दाजी खोत आपल्या सर्व जमिनीचे भूदान करतात असे दाखवून साऱ्या पंचक्रोशीतर्फे आचार्य दादा दाणोली-करांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. तिथले दाजी खोताचे भाषण इतके परिणामकारक लिहिले की सारे ग्रामस्थ दाजींनी भूदानात दिलेली जमीन पुन्हा दाजींना नव्या भूदानात देऊन टाकतात असा प्रसंग मला अतिविशाल मानवतेच्या भूमिकेवरून लिहावा लागला. त्याशिवाय लोणच्याची आजी, कुर्ड्यांची आत्या, सेतकुटाची मामी, भागूआक्का, आवडी तेलीण, इंग्लिश सरलाबाई, वगैरे भगिनींची दोनदोन आण्यांत हजेरी लावली, आणि महारापोरांना आण्याआण्याच्या कन्सेशन रेटने वाङ्मयात चिरंतन करून टाकले. त्यानंतर एकदा पोंबुर्प्याला खळनाथाच्या जत्रेला (माघी अष्टमी) गेलो होतो. तेव्हा फुलटन कुशामावशी (बागुलांची) आणि हाफटन कुशामावशी (गांगलांची) शेणव्याच्या बखळीपाशी भेटल्या. "फटवाच्या म्हाळशान् बुकांत नांव घातलनींत गो आमचं—" म्हणून दोघींनी मला कल्पनेत कुरवाळले.

एकूण माझा डाव कीर्ती व पैसा ह्या उभयपक्षी यशस्वी झाला. मुंबईत एकदा मला बसस्टॉपवर थांबलेला पाहून काही शाळकरी पोरांनी माझी सही घेतली. (आणि नंतर, "अरे हे बघ...पोंबुर्पेकर असं आहे नाव—आणि म्हाळसकंत...लेका—मालवण कुठे—आणि म्हाळ आहे ते, दामू नाही काही—" असे म्हणाली ती कारटी. हे प्रकरण मला नीट उमगले नाही.)

परंतु 'पोंबुर्प्याच्या पंपू'ने माझे नाव थोडेसे पसरले ह्यात शंका नाही. चाळीच्या सार्वजनिक उत्सवांना आलेल्या बाहेरच्या पाहुण्यांशी ओळख करून देताना, आमच्या चाळीचे 'फडके' असे दोनदा व आमच्या चाळीचे 'खांडेकर' असे एकदा म्हणण्यात आले, त्याबद्दल मी चाळीचे ऋण विसरू शकत नाही. शुक्लेंदूप्रमाणे

माझी कीर्ती वाढत होती. द्वारकानाथ गुप्त्याची मेहुणी रेवती एकदोनदा माझ्याकडे कवितांचे रसग्रहण समजावून घेण्यासाठी आली. गेली दोनतीन वर्षे इंटरचा सांगोपांग अभ्यास करणारी खुद्द अण्णा पावश्यांची प्रभा एकदा "तुम्ही काय बुवा मोठी माणसं—साहित्तिक!" असे म्हणाली. तिला मी पंपूची एक प्रत स्वाक्षरी करून दिली. ("बंबात घाल कारटे!—असली बुकं वाचशील तर याद राख!"—अण्णा पावश्यांचे हे शब्द 'पंपू'ला उद्देशून नसावेत याची मला खात्री होती.) परंतु बटाट्याच्या चाळीतल्या तरुणींच्या आदराला मी बेताबेताने पात्र होत होतो हे खरे! मला चाळीत विरोध होता तो छुपा! प्रा० नागूतात्या आढ्याला तेवढे माझे बरे बघवत नव्हते. एकदा पोट फुगवणाऱ्या बेडकीची, आणि एकदा पृष्ठभागी गोमय लावून वृषभ म्हणा म्हणणाऱ्याची,—अशा दोन्ही उपमा त्याने मला उद्देशून वापरल्या होत्या. वास्तविक ह्या चोराच्या 'इंगळेकालीन डभोई' ह्या ग्रंथाच्या थप्प्या लावून त्याच्यावर चादरी टाकून ह्याच्या कुटुंबातील मंडळी झोपतात हे मी पाहिले आहे. ह्याच्या कुटुंबाला झोपायला हा ऐतिहासिक आधार आहे हे खरे! हे बोलले तर विद्वान म्हणवणारा हा इसम जगातून उठेल, परंतु "चर्चा हे निर्मितिक्षम प्रतिभावंताचे कार्य नव्हे" हे प्रा० चिं० बं० लेले, एम० ए० यांचे सखोल मत मला मान्य होते.

'पोंबुर्प्याच्या पंपू'ची पहिली आवृत्ती त्यातल्या जिवंत पात्रांनी व त्यांच्या आप्तस्वकीयांनी घेऊन उठवली होती. माझी प्रादेशिक आणि माणसात्मक वर्णने हुबेहूब नाहीत म्हणण्याची कोणाची छाती नव्हती. प्रा० चिं० बं० च्या भाषेत सांगायचे म्हणजे त्यात "विच्छिन्न वास्तवाचा अविच्छिन्न आविष्कार होता." प्रस्तावनेत त्यांनी मला सत्यान्वेषणाचे तीक्ष्ण सामर्थ्य आहे हे कबूल केले होते. प्रा० चिं० बं०नी नुसत्या पैरणीच्या सहा वार कपड्याच्या बोलीवर अत्यंत 'आत्मीयतेने व कळकळीने' 'प्रादेशिक वाङ्मयात पंपूचे स्थान' ह्या शीर्षकाखाली सहापानी प्रस्तावना दिली होती. वाराला पान पडले; परंतु त्यामुळे कादंबरीला आगळा डौल आला.

खुद्द पोंबुर्पेकर ग्रामस्थ तर माझ्या 'सूक्ष्म अवलोकनशक्तीवर' व 'तरल संवेदनाशील सृजनशक्तीवर' (दोन्ही शब्द चिं० बं० चे) बेहाय खूष होते. नमुन्याला म्हणून हा तुकडा पाहा :

"दाजी खोत आपल्या माडीवर आपला पिवळा कोट घालून उभे होते. हा कोट त्यांनी पोंबुर्प्याच्या शामू सरमळकर या सुप्रसिद्ध शिंप्याकडून स्वस्त, माफक दरात व टायमशीर शिवून घेतला होता. पैरण मात्र आंतोन डुमीनच्या हातची होती. पोंबुर्प्याचा आंतोन पूर्वी मडमांचे झगेदेखील शिवत असे. शर्टचे सुंदर कापड भिकशेट मलुष्ट्याच्या दुकानातले आहे, हे रस्त्यातून जाणाऱ्या भोटम लिमयाच्या बगड्याने लगेच ओळखले. शर्ट परटवण्याच्या झांगडू परटाने नीळ घालून धुतल्यामुळे तकतकत होता. दाजींची नजर समोरच्या बांबर्डेकरांच्या हाटेलाकडे वळली. रस्त्यावर पोंबुर्प्याचे

सुप्रसिद्ध होमेपाथी डॉक्टर कुरतडकर हे तेथील वैद्यपंचानन अंतुशास्त्री ओक ऊर्फ मसणमार्तंड ओकांशी चरक आणि हानिमान ह्या विषयावर चर्चा करीत होते. वैद्यबुवांनी हेगिष्ट्याच्या (लंबू हेगिष्टा, गिड्डू हेगिष्टा नव्हे.) दुकानातली चिमूटभर कडक तंबाखू तोंडात टाकली. तेवढ्यात रेडकराच्या दुकानातून ताशी दोन आणे भाड्याने सायकल घेऊन काका सामंताचा सोनू बबडू पोवळ्याच्या दुकानातून शुद्ध तुपातली 'खाजी' घेऊन गेला. समोरच्या जगड्या कासाराच्या दुकानातून इलेक्ट्रिक इंदूताई पोंबुर्पे ग्रामोद्योग केंद्रात तयार केलेल्या स्वदेशी बांगड्या घेत होत्या..."

त्याखेरीज निसर्गाच्या वर्णनाला तर तोड नव्हती. पाहा :

"पंपू खिन्न मनाने दाजी खोतांच्या आडाच्या काठावर पावा वाजवीत बसला. (पंपू खिन्न होण्याचे कारण मंजुळा घोलप आणि बिवडवलीच्या हरचंद पालवाचा मवाली पोरगा नानू पालव ऊर्फ याकूबनानू ह्यांना त्याने रवळनाथाच्या देवळात हसतखिदळत बसलेले पाहिले होते. ही पात्रे मात्र सगळी कल्पनेतली. कारण ह्यात स्त्रीपुरुषसंबंध होते व पुढेमागे मला पोंबुर्प्यात जावे लागेल अशी खात्री होती. काही निराळ्या कारणाने मी तिथे कायमचा गेलो हे निराळे! "वास्तव पात्रांना कल्पनेची कल्हई दिल्यामुळे त्या कलाकृतीत कोणताही रस कळकला नाही."—हे चिं० बं० चे प्रस्तावनेतील वाक्य सूचक आहे!) वास्तविक दाजी खोताच्या आडावर कित्येक वेळा पंपू व मंजुळा सुखदुःखाच्या कहाण्या बोलली होती. पंपूने आडात वाकून पाहिले—गुडघाभरदेखील पाणी नव्हते त्यात—शिवाय त्याला पोहता येत होते. म्हणून त्याने एक दीर्घ उसासा टाकला आणि ओठांशी पावा घेऊन दूर रवळनाथाच्या देवळात मुऱ्या वाजपी सनई वाजवीत होता त्याच्या सुराशी त्याने सूर मिळवला. दाजी खोताची वाडी डोलू लागली. त्यातले एकशेबावन माड, सव्वीस पोफळी—नाना खोताच्या हिश्श्याच्या तेरा पोफळी व एकेचाळीस नारळी—पडवळी—दाजी खोताच्या व नानाच्या समाईक केळी—अळविणीच्या खाचा—पेरविणीचे झाड, कृष्णकमळीची तूर्त खूपच फोफावलेली वेल—एक चिंचीण—दोन जांभळिणी—ईशान्य कोपऱ्यातले सात आंबे—नैर्ऋत्येची रातांब्यांची झाडे—वायव्येच्या काजविणीवरचे सर्व बोंडू—पाच रायावळे...पंपूच्या पाव्याने मुग्ध झाले..."

हा सारा तपशील मी कागदपत्र चाळून नोंदला होता. ("परिष्करण हे प्रतिभेचे टॉनिक आहे."—चिं० ब० म्हणतात.)

'पोंबुर्प्याच्या पंपू'च्या असामान्य यशानंतर ठिकठिकाणांहून मला "आमच्या पार्श्वभूमीवर लिहा" म्हणून सुपाऱ्या येऊ लागल्या. 'दणकवली'चे आमंत्रण आले. "बनचुकवाडीवर लिवा—" म्हणून देशावरली मंडळी सांगावा घेऊन आली.

साहित्यिक यशाचे हे असेच आहे. एकदा ते मिळाले की मग पिच्छा सोडीत नाही. बृहन्महाराष्ट्रातल्या सर्व प्रदेशांतून मागणी येऊ लागली. त्यातून दणकवलीची ऑर्डर मी पहिल्यांदा स्वीकारली. दणकवलीला माझे आजोळ. त्यामुळे त्या

प्रदेशाविषयी मला विशिष्ट म्हणतात तो जिव्हाळा.

पण आज सकाळी पाच वाजल्यापासून मी मेजाशी बसलो होतो. पण पान जमेना. आकर्षक सुरुवातीवर माझा कटाक्ष आहे. 'उंबरवाडीच्या उमाजी'त पहिल्या पानावर नुसते 'ढुम ढुम ढुम ढुम' असे बावन वेळा लिहून हे ढोलाचे बोल की तोफांचे गडगडणे ह्या उत्कंठेत वाचकाला टांगून ठेवला आहे. शेवटी बालउमाजी काठीची बंदूक हातात धरून तोंडाने 'ढुम ढुम ढुम' असे ओरडताना दाखवला आहे. 'पोंबुर्प्याच्या पंपू'त मी काहीसा काव्यात्मकतेकडे झुकलो होतो.

मला तो दिवस आठवतो. सकाळची वेळ. दूर पहिल्या ट्रामचा खडखडाट... एखाद्या हॉटेलचे दार उघडल्याचा खट्रट्र असा ध्वनी...गॅलरीतून थप्प थप्प असा पावलांचा आवाज—बाबलीबाई गेल्या असाव्या...मी रवळनाथाला मनोभावाने हात जोडून रीम उघडले...हिरव्या शाईने (मी हिरव्या शाईने लिहितो.) 'श्रीरवळनाथ प्रसन्न', 'पोंबुर्प्याचा पंपू', ही अक्षरे लिहिली...दारावर टकटक, टकटक...टकटकीत किणकीण असा बांगड्यांचा मंजूळ ध्वनी...मला कानशिलावरून न चावणारी काळी मुंगी हुळहुळल्यासारखे काहीसे झाले...मी दार उघडले...अण्णा पावश्यांची प्रभी हातात भांडे घेऊन उभी...माझ्या ओठांशी 'हबसे खवीस'मधल्या 'इष्ककी यह है सुबह' ह्या काव्यपंक्ती नाकासमोर लोंबणाऱ्या सुतासारख्या लोंबू लागल्या.

"या ना—" माझ्या घशात इतके मार्दव आहे हे मला त्या वेळी जाणवले.

"तुमच्या लेखनात व्यत्यय नाही ना आला?" (१) माझ्या हातातील उघड्या पेनकडे तिरकस कटाक्ष फेकीत, (२) आपल्या ओठांना नाजूक मुरड घालीत, (३) हातातील भांड्याशी मोहक चाळा करीत, (४) आंगठ्याने उंबरठ्यावर नक्षी काढीत, (५) डाव्या कोपराने कपाळावरच्या पुढे झेपणाऱ्या बटा सावरीत, (६) उजव्या कोपराने दरवाजाच्या लोंबत्या कडीला नाजूक धक्का देत, (७) धनुष्याकृती भुवयांची लाडीक हालचाल करीत, (८) पापण्यांच्या पाखरांची पिसे फडफडवीत, थोडक्यात म्हणजे एका क्षणात ही आठही अवधाने सांभाळीत, एका असहाय अविवाहितावर गुलाबी घाव घालीत प्रभा पावशे उभी होती. माझ्या ओठांतून पुढला प्रश्न फुटक्या अंड्यातल्या बलकासारखा घरंगळला : "आज इतक्या पहाटे?"

"दूध आहे का थोडं?"

"नसतं तर गोकुळातली खिल्लारं उभी केली असती इथं!" अवसान सावरून मी!

"इश्य—तुम्ही काय बुवा साहित्तिक!" त्यानंतर दुधाचे भांडे भरून प्रभा केव्हा गेली हे भिंतीवरच्या रवळनाथाला माहीत. माझ्या संपूर्ण कादंबरीला तेवढी बेहोषी पुरली.

'पोंबुर्प्याचा पंपू' आणि 'दगकवली' ह्या कादंबऱ्यांनी साहित्याच्या जगात मी आता नाटक कंपनीच्या मालकाशी ओळख असलेली माणसे थेटरात वावरतात तसा वावरू लागलो. ठिकठिकाणची मला आता पत्रे येऊ लागली. 'सहा आणे पात्र' हा

माझा रेट मी वाढवून आठ-आठ आणे केला. इतकेच काय, परंतु जुन्या फर्निचरवर 'पालीस' मारून घ्यायला गिऱ्हाइके येतात त्याप्रमाणे जुन्या कादंबऱ्यांना मी प्रादेशिक पाणी चढवून देऊ लागलो. मी माझ्या ह्या वाङ्मयीन तपात दंग होतो. धंदा जोसात आला होता. फार काय, एका साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी माझे नाव परस्पर सुचविण्यात आले होते आणि मी "टाईम नाही" म्हणून ते नाकारले होते.

नुकतीच मी 'कुरुंदवाडचा गोंदू' ही कृष्णाकाठच्या पार्श्वभूमीवर आधारलेली कादंबरी हातावेगळी केली होती. तिथे पात्राचा रुपया पदरात टाकला होताच; परंतु एकेका बैलाचे चार आणे—शेळयामेंढ्या, शिकारी कुत्रे यांचे दोनदोन आणे—पाटलाचा पक्ष जिंकून दाखवायचे पन्नास रुपये—कुळकर्ण्याचा काटा काढायचे तीस रुपये—दरोड्याचा तिखट मसाला हवा असल्यास पंचवीस—गावकरी दरोडेखोरांना पकडतात असे दाखवायचे चाळीस—दरोडेखोर निसटवायचे असल्यास मोफत—असा 'चार्ज' लावून शेपाचशे रुपये पदरात टाकले होते. खानदेशच्या पार्श्वभूमीच्या कादंबरीत एरंडोलच्या झुंबरलाल मारवाड्याच्या घरातल्या लग्नातला प्रसंग टाकून साऱ्या पंक्तीतल्या मंडळींची शब्दचित्रे मी नावागावासकट छापली. लग्नाच्या पार्श्वभूमीचे घाऊक कंत्राट झुंबरशेटनी दीडशे रुपयांत दिले. प्रत्यक्ष जेवणानुभवाखेरीज लेखकाला आत्मीयता येणार नाही म्हणून लग्नात मला सन्मानाने जेवायला बोलावले. त्यांचे काम मी चोख करून दिले.

"...पंक्तीची शोभा काय वर्णावी? पहिल्या पानावर नंदुरबारचे सुकडमल पानाचंद लाडवावर आडवा हात मारीत होते. त्यांच्या शेजारी दगडूमल जेठूमल कढीचा भुरका घेत होते. पुढे जळगावचे बन्सीलाल गिरधरशेठ धाकूमल पोकरचंदाच्या जिलबीच्या आग्रहाला बळी पडत होते..." ह्या थाटात माझ्या 'खानदेशी खंडू'त केवळ त्या पंक्तीने पन्नास पान भरले होते. वाङ्मयात चिरंतन होण्यासाठी मानवप्राण्याची कोण प्रचंड धडपड असते ह्याचा मला त्या वेळी पूर्ण अनुभव आला. मोठमोठे वकील, बॅरिस्टर, नबाब, राजेरजवाडे, सर्कसचे मालक, हकीम व वैद्य यांनी नावाजलेल्या अशा माझ्या ह्या जिवंत साहित्याला आता चोहीकडून बेसुमार मागणी येऊ लागली होती. मी धुळ्याच्या पार्श्वभूमीवर कादंबरी लिहितो म्हटले की, अमळनेरहून "आमच्या पार्श्वभूमीवर लिहा" अशा तारा आणि ॲडव्हान्स! वाङ्मयात वास्तवतेला केवढी प्रचंड जागा आहे असे वाटले मला त्या वेळी! सारी अमर जनता "मला वाङ्मयात अमर करा!" म्हणून आक्रोश करते आहे, असा भास होत होता मला!—आणि...आणि...

—ती सकाळ मला आठवते. त्या दिवशी सकाळी सकाळची वेळ होती; आणि पावस्यांची प्रभी अण्णा किर्लोस्करांच्या भाषेत सांगायचे, म्हणजे माझ्या हातातील पेनकडे तिरकस कटाक्ष इत्यादी त्या आठ गोष्टी 'पूर्वोक्त' पद्धतीने करीत माझ्या दारात आली. आताशा अशा 'पूर्वोक्त' पद्धतीने ती माझ्या खोलीवर वारंवार

यायची हे मी मान्य करतो. त्याबरोबरच मला हेही इथे कबूल केले पाहिजे की, माझ्या साऱ्या नायिकांची वर्णने प्रभीच्या घाटावर जात होती. माझ्या तमाम नायिका —मग त्या घाटावरच्या असोत, खानदेशी असोत, वा कोकणी—सगळ्या तिरकस कटाक्ष टाकीत बोलायच्या. त्यांच्या हनुवटीची मोहक हालचाल व्हायची. त्यांचा वर्ण 'गहू' असायचा. सगळ्यांच्या डोळ्यांतून 'आगळे' तेज सांडायचे. आणि त्या बहुधा पोपटी पातळ नेसून धारवाडी खणाचा ब्लाऊज घालायच्या. (फक्त मालेगावी माली मालेगावी साडी नेसून डोक्याला मालेगावी आवळेल तेल लावून आली होती. कारण मालेगावच्या उस्मानशेठ अन्सारींनी मला साडीच्या प्रादेशिक पार्श्वभूमीचे पाच रुपये आणि आवळेलवाल्याने अर्धा डझन बाटल्या ॲडव्हान्स देऊन गुंतविले होते.) प्रभी म्हणाली,

"पोंबुर्पेकर, एक विचारू का?"

"विचारा की!" माझ्या गळ्यात तेच मार्दव.

"तुम्ही इतक्या कादंबऱ्या लिहिता—मग आपल्या चाळीच्या पार्श्वभूमीवर का नाही लिहीत?"

"आयडिया!" मी ओरडलो. हाच—हाच माझ्या पतनाचा क्षण! माझ्या साहित्यिक क्षयाची ही पहिली ढास! मला प्रभीचा गाढवपणा ही 'आयडिया' वाटली—इथे मी संपलो. 'आयडिया' म्हणताना मी प्रभीचा हात 'गच्चम' धरला होता, हे सोडवताना माझ्या लक्षात आले. त्या नादात मी टेबलाशी गेलो—आणि 'बटाट्याची चाळ' ह्या माझ्या कादंबरीची प्रथम अर्पणपत्रिका लिहिली : "माझ्या प्रतिभेला परक्यांच्या प्रदेशांतून स्वतःच्या प्रांगणात बागडायला लावणाऱ्या माझ्या स्फूर्तिदात्र्या प्रभावतीस माझी ही निष्काम साहित्यसेवा समर्पण!" माझ्या चाळीची मी निष्काम साहित्यसेवा करणार होतो. ती सेवा मी प्रभीला अर्पण केली. कसायाला गाईने सुरी अर्पण केली. पोलिसाला चोराने दंडुका अर्पण केला!

"पण किनई, तुमची कादंबरी लिहून होईपर्यंत ही 'जौ'म्मत बोऽऽलू नॉका हाँ कुठें—" वास्तविक त्या घोडीच्या—मी आता तिला अवश्य घोडी म्हणेन. मेलेले कोंबडे आगीला भीत नाही.—तोंडात 'जौ'म्मत शब्द शोभत नव्हता. पण माझी वेळ बरी नव्हती. मला ती ओठांची मोहक मुरड वाटली. मी वाहावलो— पार धारेला लागलो.

मी चाळीच्या पार्श्वभूमीवर कादंबरी लिहायला सुरुवात केली. 'पैसे घ्या, घ्या' म्हणून आलेल्या राजापूर, करमाळे, मौजे मंडणगड, बागलाण, बाणकोट, नांदेड, परभणी अशा दूरदूरच्या ऑर्डरी परतवल्या. मला चाळीची निष्काम साहित्यसेवा करायची होती. मी अण्णा पावश्यांच्या गांजलेल्या मध्यमवर्गीय जीवनाचे चित्र त्याला फुकट काढून देणार होतो. शेक्सपिअरने हॅम्लेट लिहून डेन्मार्कचे नाव अमर केले; मी ही कादंबरी लिहून आमच्या धुळा नामा स्ट्रीटचे नाव चिरंतन करणार

होतो. धुंडिराज, तळिराम, शंकरमामंजी, अफाट बापू, स्वच्छ आणि गलिच्छ 'बर्वा' ह्यांच्या जोडीला मी समेळकाका, अण्णा पावशे, एच० मंगेशराव, त्रिलोकेकर हे नवे साहित्य-चिरंजीव बसवणार होतो, आणि सिंधू, कालिंदी, रागिणी, उत्तरा, धनुष्याकृती भुवयांची इंदुमती ह्या चिरंतन नायिकांच्या यादीत त्रिलोकेकरशेटच्या बाबलीबाई, जानकीकाकू, गुप्त्यांची कुमुद आणि तिरकस कटाक्ष फेकणारी पावश्यांची प्रभी ही नावे घालणार होतो. जोवर मराठी शब्द म्हणून वाचला जाणार होता तोवर ही नावे टिकणार होती. मला एक प्रकारचा साहित्यिक उन्माद आला. मी 'बटाट्याची चाळ' एक आठवड्यात संपवली. साऱ्या पात्रांचा मला परिचय होता—वास्तवाला मी तसूभर सोडले नव्हते—प्रत्येक खोलीचे पोपडेन पोपडे मी वाङ्मयात उमटवले होते. दुर्दैवाने नारळीपोफळी नव्हत्या, पण डाल्डाच्या डब्यातील तुळसन् तुळस मोजली होती. प्रत्येक पात्र जिवंत होते—सगळ्यांची आर्थिक दुःखे, नैतिक कुचंबणा आणि धार्मिक अनवस्था मी यथार्थ उतरवली होती. काळज्या, चिंता, ओढघस्त यांचे ते एक आधुनिक रामायण होते.

मी चाळीत एक छोटासा प्रकाशनसमारंभ घडवला. समोरच्या व्यंकटप्पाच्या 'सिद्राम उपहारगृहा'तून मी खाद्यपदार्थ मागवले. प्रत्येकाने इच्छाभोजन आहे असे समजून हाणायला सुरुवात केली. एका कारटीने तर हा थाट पाहून "पण पोंबुर्के-कल्काका, नवली मुग्गी कुथाय?" असेही विचारले. त्या वेळी प्रभी तिथे होती. तिच्या गालावर काही रंगांची अदलाबदलही झाली. बाबा बर्व्यांनी चिवड्याचा बकाणा भरीत मला वाल्मीकी म्हटले. त्रिलोकेकर मला "साला चाळीचा वॉल्टर स्कॉट" म्हणाला व अख्खा बटाटावडा तोंडात लोटून गप्प झाला. अण्णा पावश्या तर दुर्गादेवीच्या दुष्काळातून आल्यासारखा गिळत होता.

खाद्यपेयांचे एकेचाळीस रुपये आणि गुप्त्यांच्या कुमुदने नाडकर्ण्यांच्या मंगेशचा धक्का (चुकून काय चांडाळा!) लागल्यामुळे फोडलेल्या चार कपबश्यांची पावणेचार रुपये 'लुस्कानी' एवढे पैसे तर मी खर्च केलेच; परंतु 'घरटी एक' ह्या हिशेबाने चाळीतल्या प्रत्येक बिऱ्हाडाला 'बटाट्याची चाळ' ह्या संपूर्ण वास्तववादी व मध्यम-वर्गीयांच्या जीवनाचे हृदयद्रावक दर्शन घडवणाऱ्या कादंबरीची एक-एक प्रत फुकट दिली—वर स्वतःची स्वाक्षरी करून!! हा कार्यक्रम सकाळी अकराच्या सुमाराला संपला.

साधारणतः दुपारी दोन वाजेपर्यंत काही गडबड नव्हती. सकाळी समस्त शेजाऱ्यांनी व शेजारणींनी व्यंकटप्पाचे 'सिद्राम उपहारगृह' वशाखाली रिचवले होते, त्यामुळे चुली थंड होत्या. मी झाल्या परिश्रमाने हुरदय करून माझ्या पुढल्या कादंबरीची मनाशी जुळवणी करीत पडलो होतो. इतक्यात दारावर थाप आली. "पोंबुर्पेकर!!" मी समेळकाकांचा आवाज ओळखला. अभिनंदन स्वीकारायला एक हात मोकळा ठेवून दाराची कडी काढली. पुढची तीन मिनिटे काय झाले हे मला कळले नाही.

माझा चष्मा त्यांच्या पायाशी उडाला होता आणि उजवा गाल आतल्या पोकळ दाढेसकट ठणकत होता.

"पोंब्र्या!—साल्या तुझा बाप हेटकरी भंडारी—" समेळकाका संतापाने थरथरत होते.

"पण झालं काय?" मी भेदरून विचारले. 'काय' म्हणताना माझा जबडा अवघडत होता.

"झालं काय? लाव तो चष्मा!" छडी फेकून मारणारे मास्तर पुन्हा छडी घेऊन ये म्हणून मारखाऊ विद्यार्थ्याला जवळ बोलावतात त्याप्रमाणे त्यांनी मला आपल्या पायाशी वाकायला लावले. मी चष्मा उचलायला वाकलो तोच पाठीवर "तुझा बाप हेटकरी भंडारी!" हे वाक्य उच्चारून 'भं'ची सम बुक्कीने माझ्या पाठीत गाठण्यात आली.

"अहो पण—"

"गधड्या, हे काय छापलं आहेस इथे?...'आमच्या चाळीतले अत्यंत प्रेमळ समेळकाका'—"

"पाहा, प्रेमळ म्हटलं हो मी तुम्हांला—" मी कळवळून उद्गारलो.

"पण कावळ्या—" आता पक्षीसृष्टीतल्या संबोधनावर ते आले. "अरे, पुढं काय...(ही वाक्ये लिहवत नाहीत मला—)...ते पाहा—'आपल्या हेटकरी भंडारी समाजाच्या उद्धारासाठी—' अरे बोंबला, मी हेटकरी काय रे? आँ!—मला भंडाऱ्यांत घालतोस? तुझा बाप—तुझी आई..."

हे त्यांचे संपेपर्यंत, 'हाणा, मारा, ठोका'च्या आरोळ्या आल्या. सारी चाळ माझ्या दिशेने धावत होती. ह्या चाळीतला सगळ्यांत सज्जन म्हणून ज्याचे मी कादंबरीत वर्णन केले त्या एच० मंगेशरावांच्या कुशीत मी "हटंगडीकाका, मला वाचवा—" म्हणून शिरलो. त्याने बरोबर तबल्याची हातोडी आणली होती.

"मी वाइफबरोबर फक्त यकसारकं तबलं वाजिवतो म्हणून प्रिंट करतो हा ड्यामफूल. वोकल म्युजिशियन मी—मला तब्लजी म्हंटो! ब्लडी स्वाईन!"

"अहो, पण तुमचं कलाप्रेम मी किती गौरवानं लिहिलं आहे—"

"ते एक आहेच. दुसरं—" माझ्या पोटात तरीही गुद्दा मारीत मंगेशराव म्हणाले, "आम्ही दोघे म्हणे कलावंत!—सारस्वत ब्रॅम्हीनला हा शब्द?"

"अहो, पण त्यात वाईट काय?"

"बगा—हे ड्यामफूल पुन्हा वर तोंड काढून बोलतो—वाचा त्रिलोकेकरशेट—'मंगेशराव शिद्धारूढ फार्मसीत हेड कंपौंडर असूनदेखील त्यांची संगीतसाधना अलौकिक आहे!'"

"अहो, हा तुमचा गौरव आहे!" मी त्यांच्या हातात शर्टचा खिसा ठेवून शरीर सोडवीत म्हणालो.

"गौरव!—ड्यामफूल—मी फार्मसीत हेड अकौंटंट आहे. मला कंपौंडर म्हणतो—"

तेवढ्यात त्रिलोकेकर उशीत ढेकूण सापडल्यासारखे एक पान धरून ओरडला.

"साला बग साला! माझ्या वाइफबद्दल काय रायटिंग करतो? 'बाबलीबाई—' लुक हिअर हं! दॅट ईज माय वाइफ! 'बाबलीबाई स्थूल असल्या तरी—' स्थूल म्हणजे फॅट ना पावशेअण्णा?"

"पण पुढं वाचा. मी 'चपळ आहेत' म्हटलं आहे!"

"अरे, पण साला आमची वाईफ स्टूल असेल नाही तर टेबल. कोल्ड प्रिंटमध्ये टाकतो?"

"पण त्रिलोकेकरशेट—" ही नऊ अक्षरे उच्चारीपर्यंत मला चार चिमटे आणि पाच टपला बसल्या होत्या. "ह्याला वास्तवाचा कलात्मक आविष्कार म्हणतात!"

मंडळी आणखी चिडली.

"ए पावशे, साला लाफा मार नी त्याला!"

"आणि द्वारकाबाई माझ्यापेक्षा उजळ का रे मेल्या! तिच्या तोंडाची पावडर पुसून तरी लिहायचं होतंस!"

"हो हो! आणि तुम्ही अगदी गंगेच्या पाण्यात थोबाड बुचकळून येता—" द्वारकाबाई.

ह्या उप-संग्रामाने मला पाचएक मिनिटे विश्रांती मिळाली. इतक्यात माझ्या पायाशी धाडकन आवाज आला. अण्णा पावश्यांनी साक्षात प्रभीला माझ्या पायांवर आदळली होती.

"पोंबुर्प्या—ही तुझी स्फूर्ती काय रे दातफुटक्या! हात लाव तिच्या अंगाला—तुझ्या आतड्याची स्फूर्ती काढतो पिळून आणि बाटलीत भरून ठेवतो!"

"अहो...पण खरं..."

"खरं...गधड्या...आम्ही कारकून मुक्या मेंढरासारखे जगतो काय रे? तुझ्या पोर्टट्रस्टमधून पेन्शनीत गेलेल्या बापानं धडा दिलंनीत काय रे तुला—अरे, हेडक्लार्क रजा नाही म्हणाला, तर 'आय डोंट वांट युवर जॉब' म्हणून डायरेक साहेबाकडून रजा मिळवणाऱ्या अण्णा पावश्याला मुकं मेंढरू म्हणतोस काय रे कुतरड्या!—आणि पोरीच्या लग्नाच्या काळजीनं खंगलेला मी बाप काय रे?"

"परंतु त्यात मानवतेची केविलवाणी कहाणी आहे—" मी बचावाचा शेवटचा प्रयत्न केला.

"आमचा त्या मानवतेशी काय संबंध रे दगडा? काळजीनं खंगायला ही प्रभी काय लंगडी आहे का तिरळी तुझ्यासारखी?—नीट ऐक, पुढल्या रविवारी प्रभीचा साखरपुडा आहे. मुलगा बेकार तुंबडीवाला नाही तुझ्यासारखा. जनरल पोष्टात आहे—मी हुंडा मोजतोय त्याला तीन हज्जार. शिवाय करणी, मानपान—सांग आता,

आमची परिस्थिती हलाखीची काय?—टू सेवण्टी प्लस फिफ्टी फाइफ डी० ए० वाजवून घेतोय दरमहा!—ही हलाखी काय रे चोरा!!"

"आणि मी म्हणे चाळीत कुणाच्याही हातचे खाते—जातीपातीचा म्हणे मला विधिनिषेध नाही—" आवडाक्कांचे बोळके वाजत होते.

"पण त्यामुळं तुमच्या क्यारेक्टरला विशाल—"

"रांडीच्या, धर्मबुडवी म्हणून शेण घालतील लोक तोंडात—"

"आणि कु—कु—मुदचा बांधा ससस्ऽसड—" नुसत्याच उंचीचे द्वारकानाथ गुप्ते संतापाने तोतरे झाले होते. "दर वर्षाला पाळणा हालला तरी मिसेस गुप्ते म्हणे हसतमुख—"

"मग त्यात काय चूक आहे गुप्तेसाहेब—हसतमुख ही काय शिवी आहे?"

"पण लेका, दरवर्षी पाळणा हालला म्हणूस लिहितोस—आमच्या बेबीला दोन वर्षं होऊन गेली—हाल्लाय पाळणा अजून?" माझा शर्ट धरून पाळण्याच्या दोरीसारखा ओढीत गुप्त्या म्हणाला. एरवी फुंकरीने उडवला असता, पण आज माझी वेळ बरी नव्हती. तेवढ्यात स्वतः कुमुदनेही तोंड घातले.


"माझा बांधा सडसडीत आणि चष्म्यातून डोळे चमकतात म्हणे—चष्म्याचं कशाला लिहायला पाहिजे होतं? आणि प्रभी मोहक काय?"

"त्याचा काका मोहक!" अण्णा पावस्याने आतापावेतो माझ्या सख्ख्या घराण्याची यादी संपवून चुलत घराण्याकडे आपली जीभ सोडली...

एकूण नतीजा असा : मी हल्ली पोंबुर्प्याला घरचे पाहतो—पेन्शनर आईबापे परत बटाट्याच्या चाळीत आली आहेत.

साऱ्या प्रकरणाचे तात्पर्य हेच की, वास्तववादी वाङ्मय लिहिताना पात्रांचे हात अंगावर सहजासहजी पडणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, आणि कसलीही सेवा निष्काम करू नये. खऱ्याची दुनिया नाही, हे एक; पिकते तिथे विकत नाही, हे दुसरे—ही दोनच 'सत्ये' खरी, बाकीची सत्ये खोटी!!





# ....गच्चीसह—झालीच पाहिजे

कोणत्याही सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, अथवा कसल्याही 'इक'-अगर 'ईय'-प्रत्ययान्त चळवळीपासून दूर राहायचे नाही हा बटाट्याच्या चाळीचा निर्धार सर्वश्रुत आहे. थोरांच्या जयंत्या, मयंत्या, सर्वधर्मीयांचे उत्सव, संस्कार, निषेध, अभिनंदनांचे ठराव असले कार्यक्रम चाळीय पातळीवरून करण्याचा शिरस्ता आज बटाट्याच्या चाळीत गेली काही वर्षे चालू आहे. अण्णा पावश्यांकडे (म्युनिसिपालिटी, पाणी खाते) सार्वजनिक वाढदिवस समारंभ आहेत; तर लखूअण्णा आगस्त्यांकडे 'श्राद्धविभाग' आहे. अण्णांना सूतिकागृहांकडून वार्ता येते आणि लखूअण्णा सोनापुराशी सतत 'इन कॉरस्पोण्डन्स' असतात. पावश्यांनी घुगऱ्या घातल्या, की आगस्त्यांनी 'पिंड' टाकलेच. एच० मंगेशराव सर्व घराण्यांच्या गवयांच्या पुण्यतिथ्या व सत्कार साजरे करतात. अर्थात हद्दूहस्सूखांची पुण्यतिथी असो, किंवा कु० शैलबाला शेरतुकडेला सार्वजनिक सत्यनारायण स्पर्धा, गट तीनमध्ये मिळालेल्या बक्षिसाबद्दल तिचा सत्कार असो, कार्यक्रम एकच! आचार्य बाबा बर्व्यांचे 'भारतीय संगीतकला' ह्या विषयावर भाषण (आणि गाणे चालू झाले की डुलक्या) आणि वरदाबाईंचे 'क्लॅसिकल' गायन—साथसंगत एच० मंगेशराव 'ऑन तबला'. आता काही कुजकट मंडळी कार्यक्रमाचे गांभीर्य लक्षात न घेता वरदाबाईंचे 'खुलखुल ज्या' सुरू झाले म्हणजे कॉफीला येतात ह्या गोष्टीचा माफक निषेध करणे आवश्यक आहे. एच० मंगेशरावांच्या सांनिध्यात संगीताची आस्था चाळीत व्हावी तितकी निर्माण झाली नसली, तरी वरदाबाईंचे 'खुलखुल जा बाजूबंद' सुरू झाले की त्यानंतर दहापंधरा मिनिटांनी कॉफी मिळते, एवढा अंदाज मात्र मंडळींना आल्यामुळे त्या चिजेचा भैरवीपेक्षा

कॉफीशी संबंध अधिक जोडला गेला आहे. मुद्दा एवढाच की, बटाट्याच्या चाळीत सर्व चळवळी होतात !

लोकशाहीत 'जागृत लोकशाही' ह्या शब्दप्रयोगाला काही विशेष मोल आहे. आणि बटाट्याच्या चाळीतील ह्या चळवळींमुळे बटाट्याचीच काय, परंतु आसपासच्या दोनपाच चाळी जागृतच राहतात ! रात्री वरदाबाईंची तालीम, सकाळी समेळकाकांची (न्यू गजकर्ण फार्मसी) एकतारीवर भजने, दुपारी पोरांना झोपविण्याच्या निमित्ताने गायलेले पाळणे आणि दिवसभर जवळजवळ प्रत्येक 'नंबरा'तून ऐकू येणारी भावगीते, ह्यामुळे जागरूकता हा या चाळीचा स्थायिभाव आहे. संगीताखेरीज नळावरील भांड्यांच्या आवाजांशी स्पर्धा करणारे तात्त्विक मतभेद आहेतच. (ह्यासंबंधी विशेष चौकशी केल्यावर असे कळले की, कालव्यावरून जर जागतिक भांडण पेटते, तर नळाच्या तोटीतून वाहणाऱ्या पाण्यावरून चाळीत भांडणे पेटली तर बिघडले कुठे ? एकमेकांना 'पाण्यात पाहणे' हा शब्दप्रयोग नळाच्या पाण्यावरून तर स्फुरला नसेल ना ? "आमच्याच चाळीला हसायला नको काही—चाळोचाळी पितळेच्याच तोट्या !" असे बटाट्याच्या चाळीतल्या एक प्रवक्त्या म्हणाल्या !)

परंतु गेले काही महिने 'चाळ' पूर्वीसारखी काही नांदत नाही, असे वारे चाळीत वाहू लागले. बटाट्याच्या चाळीत वारे वाहिलेले असे हेच. ह्यापलिकडे वाऱ्याचा आणि चाळीचा संबंध नाही. पूर्वी चाळीत मतभेद होते; परंतु ते तपशिलाच्या स्वरूपाचे होते. प्राध्यापक नागूतात्या आढ्यांच्या स्वभावाला स्पष्टवक्तेपणा म्हणावे की आगाऊपणा म्हणावे; गुप्त्यांची कुमुद चंदू भाटकरचा 'हात धरून गेली' म्हणावे की तिचा प्रेमविवाह झाला म्हणावे; द्वारकानाथ गुप्त्याला स्टोअरकीपरची जागा मिळाली की कॅशरची; आताशा वेणाक्कांचे चंद्रामावशीशी (गंगूच्या मावशी असाही एक पाठभेद आहे) सूत जमलंय की मेतकूट; बाबलीबाई त्रिलोकेकर आणि गुलाबबाई मानकामे ह्यांची जात एकच की नुसता 'पोट'भेद आहे;—असा केवळ तपशिलांतला मतभेद होता. परंतु आताशा खोल्याखोल्यांतून "तुमचं आमचं पटणं शक्य नाही", "मग जा हवं तर मफतलाल पार्कात राहायला", "वरच्या मजल्यावर राहता म्हणजे काय स्वर्गाला हात नाही लागत", "तळमजला म्हणजे काही रौरवनरक नाही"—अशी स्फोटक वाक्ये चाळीच्या फटीफटीतून आणि शेजाऱ्याशेजाऱ्यांतून घुमू लागली. त्यातून बटाट्याच्या चाळीचा आद्य मालक कै० धुळा नामा बटाटे यांच्या वंशजाने बहुतेक श्रीमंतांचे वंशज पुढेपुढे जे करतात ते धंदे केल्यामुळे चाळीच्या मालकीचाही खांदेपालट होत होत चाळीची मालकी बटाटे घराण्यातून नुकतीच मेंढे पाटलांच्या घराण्याकडे गेली. मेंढे पाटील कोथिंबिरीचे होलसेल मर्चंट. मालकीचा थारेपालट झाल्यादिवशी सर्व चाळीतल्या मंडळींनी 'चाळदिन' म्हणून साजरा करायचे ठरवले. नवा मालक कमालीचा प्रेमळ होता. त्याने कोणत्याही अधिकारारूढ पक्षाला लाजेने खाली पाहायला लावतील इतकी आश्वासने चाळकरी मंडळींना दिली. त्यांत प्रत्येक

खोलीत पंखा, धावनपात्री (ज्याला इंग्रज लोक वॉशबेसीन म्हणतात), शौचकुंडाची सफाई, गॅलरीत दिवे, चाळीला तेलाचा रंग, मूत्रस्थंडिलांतील समस्त फुटक्या फरशांची दुरुस्ती, जिन्याच्या काही पायऱ्या गायब होत्या त्या बसवणे, मधला चौक साफ करून तेथे बॅटमिंटन कोर्ट, अशा अनेक सुधारणा जाहीर केल्या. इतकेच नव्हे, तर चाळीतल्या मुलांची फुकट शिक्षणाची सोय, मुलींच्या लग्नांची तरतूद, प्रौढ स्त्रियांसाठी शारीरिक शिक्षणाचे वर्ग आणि पुरुषांसाठी पळण्याच्या शर्यती, तरुणांना दर आठवड्याला फुकट सिनेमा, मुलींसाठी भावगीतस्पर्धा, म्हाताऱ्यांसाठी दर गुरुवारी स्वखर्चात प्रवचने आणि वृद्ध स्त्रियांसाठी प्रापंचिक चर्चामंडळे स्थापन करून द्यायचीही घोषणा केली. चाळीची अशी ही सर्वांगीण विकासाची कल्पना त्याने जाहीर केली, त्या दिवसापासून बटाट्याच्या चाळीत उत्साहाचे वारे खेळू लागले. (चाळीत खेळलेले कालमानपद्धतीप्रमाणे हे पहिले वारे आणि असंतोषाचे मागाहून.) ह्या सुधारणा जाहीर करताना चाळीला गच्चीत जाण्याचा छोटा जिना जो आजवर बंद होता, तो सगळ्या चाळीला खुला करून देण्याची त्याने घोषणा केली आणि इथे सारे काही बिघडले.

वादाला तोंड फुटले ते 'गच्ची कोणाची?' या विषयावर!! आणि तिन्ही मजल्यांतल्या लोकांची रणे माजली ती ह्या विषयावर—'गच्ची कोणाची?' आजवर हा जिना बंदच होता. आणि शतकानुशतके चाळीत राहिलेल्या मंडळींना आपल्या चाळीला एक गच्ची आहे ह्याची दादही नव्हती. परंतु नवीन मालक मेंढे पाटील यांनी गच्चीसकट बटाट्याची चाळ भाडेकरूंच्या हवाली केल्याबरोबर 'गच्ची कुणाची? गच्ची कुणाची?' अशा हैराण आरोळ्या चाळीतून रात्रीअपरात्री उठू लागल्या. गच्चीवरील आपला हक्क शाबीत करण्यासाठी तीनही मजल्यांवरील मिळून वीस त्रीक साठ बिऱ्हाडांतील मंडळींनी गच्चीवर तळ ठोकला. नवरे कचेरीला गेले की, उन्हापावसाला न जुमानता बायकामंडळी ते परत येईपर्यंत गच्चीत बसून राहू लागल्या. संध्याकाळी पुरुष परतले की, 'खो' दिल्यासारख्या बायका नवऱ्यांना जागा करून देऊन आपापल्या बिऱ्हाडात स्वैपाकपाण्यासाठी येऊ लागल्या. चोवीस तास प्रत्येक बिऱ्हाडातला कोणी ना कोणी तरी गच्चीत बैठा संप करीत बसलेलाच असे.

दुसऱ्या माळ्यावरच्या लोकांचा दावा 'गच्ची आमची'. कारण गच्चीत जायचा रस्ता आमच्या गॅलरीतून आहे. भौगोलिक दृष्ट्या गच्ची आमची आहे. तर तळमजल्यावरील भाडेकरू म्हणत, आमच्या भिंतींच्या आधारावर तर सगळी चाळ उभी आहे! तळमजल्यावरील मंडळी जरा सधनपैकी म्हणजे एका खोलीत बिऱ्हाड आणि समोरच्या खोलीत दुकान अशा थाटात राहणारी. त्यामुळे त्यांची पुरुषमंडळी तर घरातच! त्यातून तळमजल्यावरील पाचसहा गाळे शा चापशी मुळशीच्या किराणाभुसार दुकानाने व्यापले होते, आणि चाळीचे भाडे वसूल करणारे गृहस्थ रामसहाय दुबे ऊर्फ भय्या ह्याच्याशी संगनमत करून तो सारा तळमजला गिळंकृत

करून बसला होता. त्यामुळे बाकीचे सर्व त्याचे पोटभाडेकरू झाले होते. वास्तविक खुद्द चापशी हा चाळीत कधीच राहत नसे. किंबहुना, त्या दुकानाला चापशीचे दुकान म्हणत, पण चापशी कुठला हे नक्की कुणाला माहीत नव्हते. बटाट्याच्या चाळीतला 'बटाटे' हा जसा भूमितीतल्या त्रिकोणाप्रमाणे 'समजा, हा बटाटे आहे' अशा अध्याहृत अवस्थेत असतो, त्याप्रमाणे 'चापशी' हीदेखील व्यक्ती नसून अध्याहृत संस्था होती. त्यातून चालू चापशी हा वजनाने व आकाराने समोरच्या पोत्याप्रमाणे स्थाणुत्वातून गतिमानतेकडे गेलाच तर स्वतःच्या पायांनी जाणार नाही याची सहज खात्री पटली असती. तरीही गच्ची ही मालक मेंढे पाटील यांनी केंद्रशासित करावी अगर स्वतःला भाड्याने द्यावी म्हणजे धान्य वाळवण्यासाठी आपण तिचा उपयोग करू, त्या निमित्ताने दहाबारा मंडळींना काम मिळेल आणि चाळीच्या आर्थिक अभिवृद्धीत भर पडेल,—असे त्याचे म्हणणे होते असे कळते. वास्तविक ह्या बाबतीत त्याचे म्हणणे कधीच कळले नाही. परंतु भय्या रामसहाय दुबे हाच त्याच्या वतीने बोलायचा. बरे, चापशीचा गच्चीला विरोध म्हटल्यावर सारा तळमजला उलटला! चापशीच्या पोटभाडेकरूंत उजव्या हाताला आत्मू सत्यवान माईणकराचे 'सत्यवान मटण प्लेट हाऊस'! ते सदैव चापशीच्या उधारीवर चालायचे. त्यामुळे तो चूप. वास्तविक आत्मू तोंडाचा जबरा! सदैव अमक्याचा खिमा करीन, तमक्याची शागुती करीन, ह्याशिवाय भाषा नाही. संध्याकाळी दिवेलागणीनंतर शब्द अस्खलित नसले तरी भावना अस्खलित असायची. "गच्ची काय ह्यांच्या बापाची? ज्यादा बकबक करील कोण तर गच्चीसाठी खच्ची करीन. रे अर्जुना, त्यांनला भेजा पाहिजे बघ—!*!*!*!च्या हाटलात नोक्री करतूस का हजामती करतूस—गच्ची मिळवीन तर नावाचा आत्मू—" अशी भाषा. पण द्वारकानाथ गुते "'गच्चीसकट बटाट्याची चाळ' दिनाच्या सभेत बोल" म्हणून सांगायला गेले, तर "गुतेशेट, हां भासनाबिसनाचां काम आमचां नाय—सुक्का मटण देव बांधून—" म्हणून मुद्दा डावलू लागला. आत्मूची ही अवस्था तर त्याच्या उजव्या हाताच्या जगन्नाथ प्लंबरची इस्से भी जादा! "हाय काय त्या गच्चीत? साली पान्याची टाकी हाय एक फुटकी. साली पलंबरशिवाय पायजे कशाला गच्ची ह्या लोकानला? काय उडी मारून जीव द्यायचाय—" असा खुला विरोध. तिसरा आगष्टिन फर्टाडो. टेलर्स अँड आउटफिटर्स. आचार्य बाबा बर्वे त्याला ही 'गाच्चिक समस्या' समजावून द्यायला गेले, तर एकदम "अँ! काय सांगतो रे तूं!" असा एकदम अरेतुरेवर आला. वास्तविक फर्टाडोचा बाबांवर राग होता तो निराळ्याच कारणासाठी. बाबा नुसता पंचा नेसायचे आणि शाल पांघरायचे. त्यामुळे फर्टाडो उखडून होता. सगळ्या चाळीचा तो 'टेलर', पण बाबांना त्याच्या बाबतीत वचकून राहण्याचे कारण नव्हते. मात्र चाळीतला तो एकमेव ख्रिस्ती. त्यामुळे त्याचे मन आधी वळविले पाहिजे ही बाबांची भूमिका. रविवारी सब्बाथ असतो ह्या पुस्तकी समजुतीने बाबा



त्याला भेटायला गेले, त्या वेळी फर्टांडो कुणाचा तरी गळा की खिसा कापत तोंडात चुरूटाची विडी आणि गळ्यात टेप घालून कामात गढला होता. फर्टांडोची बायको नवऱ्याच्या फाटक्या विजारीला ठिगळ जोडीत होती. मोठा मुलगा पेद्रू ट्रंपेटवर किती भयंकर सूर निघू शकतात याची जगाला जाणीव करून देत होता.

बाबा बर्व्यांना फर्टांडोच्या दुकानात शिरताना पाहून सारे आसमंत दचकले! फर्टांडोच्या दुकानात बाबा बर्वे म्हणजे मासळीबाजारात पावशांच्या काकू किंवा संस्कृत पाठशाळेत सोकरजी त्रिलोकेकर अगर आखाड्यात एच० मंगेशराव शिरण्यापैकी होते. खुद्द फर्टांडोदेखील तीन ताड उडाला आणि त्याच्या तोंडातली चुरूटाची जळती विडी समोरच्या कोटावर पडून कॉलर जळाली. फर्टांडोच्या बायकोच्या बोटात सुई गेली आणि ती कोकणीत किंचाळली. आणि पेद्रूच्या ट्रंपेटमधून अडाण्याचे सूर निघून गेले.

"गुड मॉर्निंग! मिस्टर फर्टांडो—" बाबा बर्वे आपल्या आचार्य ढंगाच्या मऊमुलायम आणि पातळ स्वरात अभिवादन करते झाले.

"गुड मॉर्निंग! पेद्रू, भितर वोस रे—" आपल्या ट्रंपेटवाल्या मुलाला आत पिटाळून फर्टांडोने बाबांना खुर्ची दिली. "बोस रे बोर्वे—"

फर्टांडोला आपले नाव ठाऊक आहे ह्या कल्पनेने बाबांच्या अंगावर मूठभर मांस आले. आश्चर्याचा भर ओसरल्यावर फर्टांडोच्या कोकणी चेहऱ्यावर मिस्किल स्मिताची रेषा उमटली आणि त्याने बाबांना विचारले, "सूट शिवतो काय रे बोर्वे—"

फर्टांडोची 'एकेरी' बाबांना रुचली नाही. परंतु त्याचे भाषिक अज्ञान ध्यानात घेऊन बाबांनीही त्याच्या विनोदाला हसण्याचा सर्वोदयी प्रयत्न केला.

"मिस्टर फर्टांडो—चर्चमध्ये गेला नाही वाटतं आज?" धार्मिक भावनांना आवाहन करून, आध्यात्मिक पातळीवरून हा गाचिक प्रश्न सोडवायचा असा बाबांचा निश्चय होता.

"अँ!!" खास गोमंतकीय तुच्छतादर्शक उद्गाराचा आश्रय घेऊन फर्टांडो म्हणाला, "टायम कोणाला असतो रे? माझा वाईफ जातो इगर्जीत. मी काय बायको काय रे? मी कोणाचा डेथ झाला, नाय तर वेडिंग असला, तर जातो. हाल्ली ते बी नाय जात. नो ड्रिंक, नो नथिंग—मग वगीच टायम वेस्ट कशाला करतोस? मी इगर्जीत—"

"पण आत्म्याची उन्नती नको करायला?"

"आत्मू डांबीस हाय! दोन प्लेट खिमा मांगतो तर कॅश मनी मांगतो आनी अजून सिल्क शर्टचा शिलाई नाय देत—बास्टर्ड!"

हृदयस्थ आत्मा आणि शेजारचा आत्मू ह्यांत फर्टांडोने केलेला घोटाळा आचार्य बाबांच्या ध्यानात आला आणि त्यांनी 'सोल' हा शब्द वापरून तोच प्रश्न टाकला. पण फर्टांडोच्या डोक्यात प्रकाश पडेना. शेवटी सरळ त्यांनी गचीचा प्रश्न केला.

"अरे, इथे टॅरेस कोनाला पायजे? तू काय तिथे लोळेल काय रे? ते मी काय नाय रे बाबा बरी करत—माज्या फादरपासून मी इकडे राहतो, तर कोण वगीच टॅरेसवर जातो रे! उगीच झगडी कशाला रे! तू तुझा धंदा कर, मी माजा करतो! तू काय धंदा करतो रे बोर्वे?"

शेवटला प्रश्न चरख्याच्या चातीसारखा बाबांच्या काळजात रुतला. तुमचा धंदा काय, हा प्रश्न आजवर कुठल्याही आचार्याला कोणीही विचारला नव्हता. आचार्य बाबा बर्वे गारठले.

"माझा धंदा जगात सद्भाव निर्माण करणं."



हा धंदा आहे हे काही फर्टाडोच्या लक्षात आले नाही. परंतु काहीतरी तयार करायचा धंदा आहे एवढे त्याच्या ध्यानात आले.

"सोल एजन्सी हाय काय रे तुझेकोडे?"

"हो, एका अर्थी 'सोल' एजन्सीच." बाबा 'सोल' शब्दावर कोटी करून म्हणाले. परंतु ती कोटी ऐकायला फर्टाडो, त्याची बायको, पेद्रू आणि पेद्रूचा धाकटा भाऊ डुमीन ही मंडळी असल्यामुळे ती कोटी आणि बाबांची सद्भाववृद्धिमिशनची पहिली आध्यात्मिक फैर फुकट गेली.

मात्र फर्टाडोवर जरी त्या मिशनचा परिणाम झाला नाही, तरी इथून चळवळीला तोंड लागले आणि त्याला कारण चाळीतील साहित्यिक म्हाळसाकांत पोंबुर्पेकर. वास्तविक बटाट्याच्या चाळीत निष्काम साहित्यसेवा करताना गेल्याच वर्षी पोंबुर्पेकरांचे हात भाजले होते. आणि ते पोंबुर्प्याला घरचे पाहायला गेले होते. मधल्या काळात पावश्यांच्या कन्येला विधीनेच ठरवलेल्या सौभद्रीय संकेताला अनुसरून कोणा एका पतीची निपज झाली होती आणि चाळीत आलबेल होऊन पुन्हा म्हाळसाकांतांचा तळ चाळीच्या दुसऱ्या मजल्यावर पडला होता. प्रसंग शूराला धीर देतो म्हणतात. बटाट्याच्या चाळीतल्या ह्या प्रसंगाने म्हाळसाकांत पोंबुर्पेकरांच्या लेखणीला पुन्हा धीर आला आणि त्यांनी चाळीय चळवळीला प्रोत्साहन देऊन चाळीय जीवनात चैतन्य उत्पन्न करण्याच्या उदात्त आणि पवित्र हेतूने 'चाळभैरव' नावाचे सायक्लोस्टाईल साप्ताहिक काढण्याचा संकल्प जाहीर केला. "गच्ची कुणाची?—चाळकऱ्यांची!" हा पहिला अग्रलेख तिन्ही मजल्यांवर गाजला. त्यातील सर्व उतारे देण्याचा मोह स्थळसंकोचास्तव टाळला पाहिजे. नुसते अग्रलेखांचे मथळेच पाहा :

"गच्चीसाठी स्वातंत्र्याची खची."

"चापशीला टापशी गुंडाळा."

"चाळकऱ्यांनो, वाचाळतेहून कृती श्रेष्ठ."

"मेंढे पाटील आणि मेंढरे" इ० इ०

'चाळभैरवा'च्या पहिल्या अंकाने अपेक्षेबाहेर खळबळ उडाली. चाळीतल्या भिंतींवर, गॅलरीमधून, खिडक्या-दारांवर खडूने "गच्चीसकट बटाट्याची चाळ झालीच

पाहिजे!" अशी घोषवाक्ये लिहिण्यात आली. "गची कुणाची?—आमची—नाही कुणाच्या बापाची!" वगैरे घोषणाही दुमदुमू लागल्या. दुसऱ्या आणि पहिल्या मजल्यावरील मंडळींनी संयुक्त आघाडी उघडली, तर चापशीच्या छुप्या नेतृत्वाखाली आत्मू माईणकर, जगन्नाथ प्लंबर आणि तळमजल्यावरचा डॉक्टर हातवळणे ह्यांनी गची ही मालकांनी आपल्या स्वतःच्या ताब्यात ठेवून केंद्रशासित करावी असा डाव सुरू केला. वास्तविक डॉक्टर हातवळण्याचा बटाट्याच्या चाळीत फक्त दवाखाना होता. आणि काही वर्षांपूर्वी समोरच्या चाळीत डॉक्टर रणभिस्यांच्या दवाखान्यात हा हातवळण्या कंपौंडर होता. रणभिसे डॉक्टरांच्या मृत्यूनंतर ("रणभिसे देवमाणूस होता! पैशाची पर्वा नव्हती त्याला. आमच्या वाइफची डिलिवरी सहा वेळेला मोफत केली." द्वारकानाथ गुप्ते यांचे डॉ० रणभिस्यांबद्दलचे हे मत 'चिंत्य' आहे!) त्यांची प्रिस्क्रिप्शने आणि दवाखान्यातल्या बऱ्याचशा बाटल्या पळवून हातवळण्यांनी त्यांच्याच पाटीवर बोळा फिरवून आपल्या नावाची अक्षरे रंगवली होती, आणि रणभिस्यांच्या 'एल० एम० अँड एस०' ह्या पदवीची अक्षरे पुसट ठेवली होती. पाहणाऱ्याला वाटावे, ह्या ह्याच्याच पदव्या! (अंदरकी बात रणभिस्यांच्या जळत्या जिवाला ठाऊक आणि पेंटर जिवाला ठाऊक!)

संयुक्त दुमजली आघाडीची पहिली सभा आचार्य बाबा बर्व्यांच्या अध्यक्षपदाखाली चाळीच्या चौकात भरली. वास्तविक ही सभा गचीवर जाण्याच्या जिन्याच्या दाराला चापशीचा हस्तक रामसहाय दुबे भय्या ह्याने घातलेले लठ्ठ कुलूप फोडून गचीवर घ्यावी, असे चाळीतल्या डाव्या गटाचे मत होते. परंतु कोणत्याही हिंसक मार्गांचा आश्रय करायचा नाही अशी प्रतिज्ञा करून आचार्य बाबा बर्व्यांनी चळवळीची सूत्रे आपल्या हातात घेतली. रात्री नवाला चौकात सभेला सुरुवात झाली. मंडळींना पोलीस-बंदोबस्त असावा अशी फार इच्छा होती. सभा सुरू होताना एक पोलीस आलाही होता. परंतु तो दुसऱ्या मजल्यावरील नाना सावंतांचा मेहुणा मालवणहून आलेले काजूचे पार्सल आपल्या बहिणीला देण्यासाठी आल्याचे कळले. सभेची सुरुवात प्रथम प्रार्थनेने व्हावी अशी सूचना एच० मंगेशरावांनी केली आणि त्याप्रमाणे ती चाळीतील कवी नाथ लोणंदकर ऊर्फ रंगो विठ्ठल याच्या गीताने व्हायचे ठरले. एच० मंगेशरावांचे 'म्युजिक' आणि वरदाबाईंचे गाणे एवढ्यानेच मेंढे पाटील वळणावर येतील असे पहिल्या मजल्यावरील दाजी नेरूरकर म्हणाल्याचे त्यांना कळले आणि त्याबद्दल दाजींवर डिसिप्लिनरी ॲक्शन का घेऊ नये, असा मंगेशरावांनी आणि नाथ लोणंदकरांनी आचार्य बाबांना संयुक्त सवाल केला. परंतु दाजींनी आपल्या कानांवर हात ठेवून "अहो, मी हो कशाला असे बोलू? काय समजलेत? मंगेशरावाच्या गायनाला मी नाय कशाला म्हणेन—काय समजलेत—" अशी पडक्या आवाजात नाकबुली दिल्यावर प्रकरण मिटले आणि शेवटी वरदाबाईंच्या नमनाला सुरुवात झाली.

"उचलू या झेंडे—" ह्या पहिल्या ललकारीने सारी चाळ हादरली. मंगेशरावांनी जवळजवळ सगळे राग त्या गाण्यात कोंबले होते. एका रागातून दुसऱ्या रागात शिरताना रूळ बदलल्यावर गाडीचा होतो तसा स्वरांचा खडखडाट होत होता. सुरांचा पत्ता नसल्यामुळे दार्जींनी पेठेमामांच्या कानात (पोस्टल डिपार्टमेंट) "अहो, सूर बेपत्ता की हो. डेड लेटर हापिसात टाका—" अशी कोटी केलीच !

वरदाबाई मुक्त कंठाने गात होत्या, "उचलू या झेंडे". तबल्यावर स्वतः एच० मंगेशराव आणि पेटीला काशिनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा (ह्याच नावाने हा चाळीत ओळखला जातो) होता. मंगेशराव तबला वाजवताना त्याच्यावर सारखे दातओठ खात होते. कारण काशीनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा वरदाबाईंनी "उचलू या" म्हटले की "झेंडे" वाजवायचा. त्यामुळे मंगेशरावांचा ठेका चुकायचा. त्यातून काशीनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा हा मंगेशरावांचा शिष्य. त्यामुळे गाणे चालू असताना "इत्ते करता रे—इत्ले सिंपल स्यून वाच्जैंच्या यन्ना जाल्यारि..." असे मधूनमधून ओरडलेले ऐकू यायचे. परंतु मागे सांस्कृतिक सप्ताहात मंगेशरावांनी स्वतंत्र तबला-वादन केले होते. त्या वेळीदेखील ते 'धत्तिरिकिड–कत्ता–तुन्ना' असे काहीसे करीत असल्यामुळे मंडळींना तो त्यातलाच प्रकार वाटला. नमन जेमतेम पहिल्या कडव्यापर्यंत पोहोचले. शेवटी काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाची पेटी असह्य होऊन त्याला एका हाताने भाता फुंकायला लावून उजव्या हाताने पेटी आणि डाव्या हाताने डग्गा अशा थाटात वरदाबाईंची साथ करायला मंगेशराव बसले.

*"चाळकऱ्यांनो, एकजुटीने उचलू या झेंडे*
*पातले मालक नवे हे चाळीला आता*
*गच्चीसह चाळीत नांदणे हवे अम्हा आता—*
*गाडून दुहीला आणिक पळवुन द्या मेंढे*
*चाळकऱ्यांनो, एकजुटीचा..."*

'पळवुन द्या मेंढे—' ह्या ओळीला कडकडून टाळी झाली. परंतु त्या गडबडीत 'एक ब्यूटीफुल म्यूझिक पीस वेस्ट' झाला म्हणून मंगेशराव व्याकूळ झाले.

नमनाला एच० मंगेशरावांचे घडाभर रक्त आटले आणि नमन पार पडले. सुरुवातीला द्वारकानाथ गुप्त्यांनी आचार्य बाबा बर्व्यांनी ह्या चळवळीचे नेतृत्व स्वीकारावे अशी सूचना करताना म्हटले,

"गच्चीचा प्रश्न हा आमच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. कायस्थाच्या इमानाला, बाजीप्रभूच्या पुण्याईला, मुरारबाजीच्या त्यागाला स्मरून मी प्रतिज्ञा करतो की, गच्चीसकट बटाट्याची चाळ ही आमची मागणी पुरी होईपर्यंत मी स्वस्थ राहणार नाही. माझी दोन महिन्यांची अर्न्ड लीव्ह मी रोह्याला न जाता चाळीच्या चळवळी-साठी खर्च करीन! (टाळ्या)—ह्या चळवळीचे नेतृत्व आचार्य बर्वे ह्यांनी स्वीकारले



पाहिजे. (टाळ्या) आचार्यांची पुण्याई मोठी आहे. (टाळ्या) त्यांचा त्याग अलौकिक आहे. (टाळ्या) त्यांचे ह्यावरील...(मधले शब्द कोणालाच कळले नाहीत तरीही टाळ्या.)"

पुढेपुढे टाळ्या देणाऱ्यांचा उत्साह इतका वाढला की, आधी टाळ्या आणि मग द्वारकानाथ गुप्त्यांचे वाक्य, असा प्रकार होऊ लागला. गुप्त्यांच्या भाषणाला दुजोरा द्यायला सोकरजी त्रिलोकेकर उभे राहिले. बराच वेळ इंग्रजीतून बोलावे की मराठीतून अशा विचारात त्यांनी घालवला, आणि सुरवात "फ्रेंड्स—" अशी करून पुढे मराठीवर घसरले :

"आत्ताच मिस्टर गुप्ते बोलला की साला वुई शॅल युनाइट अँड फाइट. ती गोष्ट आपण आपल्या माइंडमदी कीप अप करायला पायजे. सुरवातीच्या बिगिनिंगमदी मिसेस हट्टंगडी जे गाणे बोलल्या, त्यातले मीनिंग आपण समजून घेतले पायजे. की साला वुई मस्ट युनाइट—अँड फाइट! चापशीची चालबाजी आपण टॉलरेट करून चालणार नाय! पण आपल्यापैकीच काही लोक त्याच्यावर डान्स ॲटेंडन्स करतात. पण मी सांगतो, तो लबाड आहे. आय डोंट केअर. आपण तर सालं फ्रँक बोलतो. सगळा माल देतो तर साला रॉटन! एक पण वस्तू चांगली ठेवते नाय. (शेम! शेम!) गेल्या रविवारची गोष्ट आहे—आमच्या वाइफनी साली ब्रियानी बनविली होती फर्स्क्लास. आमच्या कम्युनिटीतल्या काही फ्रेंड्सची पिकनीक होती चेण्याच्या डोंगरावर. तर ह्या चापशीनी साला दिल्ली राईस म्हणून ऑर्डिनरी कोळंबा राईस मारला गळ्यात. साली सगळी ट्रिप स्पॉइल झाली आमची! आणि हा आता आपल्या चाळीचा ओनर आहे त्याचा राइटहँड मॅन आहे. डिसॉनेस्ट! आपण टॅरेसची स्ट्रगल जोरात चालवली पायजे. साली खुल्ली हवा आम्ही नाय खायची तर कोणी? आमचा फ्रेंड गुप्ते जे बोलला दॅट इज करेक्ट—आचार्य बर्वे बाबा आमचे लीडर होऊन दर्शन दाखवतील...('अहो, मार्गदर्शन म्हणा!'—अशी आरोळी.)—तेच, तेच! इथे सालं मराठी येते कोणाला? भरडामदी तर सगळं मिडिअम ऑफ इन्स्ट्रक्शन इंग्लीश होती ('पुरे, पुरे!'च्या आरोळ्या)— हे पाहा. ही युनिटी नाय आपली—डिसिप्लिन नाय. इंग्लीश लोक होते तर काय डिसिप्लीन. सालं आमच्या बँकेत दहाच्या ठोक्याला सगळे हजर. हल्ली काय—ऑल गॉन! ('विषयाला धरून बोला!'—एक आवाज.) हे बवा, असा मदीमदी हेकलिंग करून मी हारणार नाही. साला मी फ्रँक बोलणार—साला हेड क्लार्कला तापवतो मी ऑफिसमदी, तुम्हांला काय भितो? ('थापा मारू नका!') मिस्टर प्रेसिडेंट, आय वोंट अलाव धिस—साली काय चाळ हाय का कबुतरखाना!!"

"हा चाळीचा अपमान आहे! शब्द मागे घ्या!" कुशाभाऊ ओरडले.

"अरे जा—हू आर यू?"

"तुम्ही चाळीचा अपमान केला आहे! गच्ची नाही मिळाली तरी बेहत्तर.

चाळीचा अपमान सहन करणार नाही—" असे बोलत बोलत कुशाभाऊ व्यासपीठावर चढले. आणि टेबलाचा आधार घेऊन बोलू लागले. "मित्रहो, हा तत्त्वाचा प्रश्न आहे. मिस्टर त्रिलोकेकर स्वतःला काय समजतात? कोण म्हणतो चाळीत एकी नाही—"

एकदम एक आवाज आला, "मी म्हणतो—"

"कशावरून?" कुशाभाऊ ओरडले, "आज गच्चीसाठी प्राण द्यायला आपण तयार झालो आहो. चाळीतल्या खोल्या गेल्या तरी हरकत नाही. पण गच्ची मिळाली पाहिजे. गच्ची हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो आपण मिळवणारच!—बोला शिवाजीमहाराज की जय!! मित्रहो, परंतु त्याला आचार्य बाबा बर्व्यांसारखे पुढारी उपयोगाचे नाहीत. हे मी त्यांच्या तोंडावर सांगतो. त्यांचा हृदयपरिवर्तनावर विश्वास आहे; आमचा नाही. आज मेंढे पाटलाच्या घरावर मोर्चा नेऊ, त्याला त्राही भगवान करून सोडू (प्रचंड टाळ्या) तरच हा गच्चीचा प्रश्न सुटेल. बोला संभाजीमहाराजकी जय!! गच्ची आपली आहे. गच्चीवरून दिसणारं आकाश आपलं आहे. चौपाटीवरून येणारी हवा आपली आहे. बोला राजाराममहाराजकी जय!! (टाळ्या) ही आपल्या हातून कोण हिसकावणार? पानपतावर प्राणार्पण केलेल्या लोकांचे आपण वंशज आहो—बोला सदाशिवरावभाऊकी जय..."

ह्यापुढे कुशाभाऊला मुद्दा सुचेना तेव्हा सुमारे पन्नासएक महापुरुषांच्या नावांचा जयजयकार झाला. 'जय—जय' ओरडून मंडळीही थकली आणि आपोआप शांतता झाली. त्याचा फायदा घेऊन आचार्य बाबा उठले. तेवढ्यात अण्णा पावशे "मला बोलू द्या. हा कुशाभाऊ लुच्चा आहे!" एवढेच शब्द उच्चारू शकले. कारण अंधारात कुणीतरी त्यांचा सद्रा ओढून त्यांना खाली बसवले.

"माझ्या बंधूंनो आणि भगिनींनो," आचार्यांनी भाषण सुरू केले, "आपली भारतीय संस्कृती उच्च आहे! जीवनातील विकास सर्वांगीण व्हावा. प्राचीन ऋषिमुनींनी आध्यात्मिक पातळीवरून जीवितातली सारी कोडी सोडवली. त्यांना माझे लक्ष प्रणाम! (इथे दोनतीन मंडळींनी टाळ्या वाजवल्या. इतर कोणीच न वाजवल्यामुळे ती मंडळी जराशी वरमली.) जीवन म्हणजे गती! जे गतिमान आहे ते चैतन्य आहे. चैतन्य आणि मूळ आधार—कशाचे? विकासाचे."

"अरे पण गच्चीचं काय?" जनोबा रेगे काशीनाथ नाडकर्ण्यांच्या कानात कुजबुजले. "गप्प रे जनोबा. भारी शंका रे मेल्या तुज्या. असां काय! वशाड मेलो—" काशीनाथ नाडकर्ण्यांनी आपल्या खास 'कुडाळमें पैदा हुवा' स्वरात जनोबा रेग्याला चापले!...आचार्य बोलतच होते. त्यांच्या शांत, संथ आणि विषयाशी संबंध नसलेल्या बोलण्यातून मंडळी सुस्तावली. सुमारे पाऊण तास आचार्य वेदकालीन जंगलात वाट चुकून शेवटी बटाट्याच्या चाळीपर्यंत आले.

"हा लढा केला पाहिजे. मला गच्ची हवी; परंतु ती शांततामय मार्गानं हवी.

हिंसात्मक मार्गानं इंद्रासनदेखील मला नको. मेंढे पाटलांकडे आपण जाऊ. त्यांचं मन जिंकू. आज त्यांनी गच्ची दिली नाही तरी हरकत नाही. आज त्यांचं मन आपल्याला हवं आहे. त्यांचं मन मिळाल्यावर ते गच्चीचा सुवर्णनारळ आपल्या हाती दिल्याशिवाय राहणार नाहीत. प्रत्येकाच्या अंतःकरणात परमेश्वर आहे. ('आणि डोळ्यात झोप आहे!'—एक आवाज व त्यामागून हशा.) मेंढे पाटलांच्या अंतःकरणाला कौल लावा. गच्ची मिळाल्याशिवाय राहणार नाही...आणि मिळाली नाही तरी परमेश्वराचं आकाश आपण कुठूनही पाहू शकतो. त्यानं निर्माण केलेला वारा कुठूनही — ('ह्यांची टोकाची खोली आहे म्हणून मिळतो. काय समजलेत?' —काशीनाथ नाडकर्ण्यांच्या कानात जनोबा रेगे.) आपण चाळीतील प्रातिनिधिक शिष्टमंडळ घेऊन मेंढे पाटलांच्या घरी जाऊ—"

त्याप्रमाणे द्वारकानाथ गुप्ते, स्वतः आचार्य, सोकरजी त्रिलोकेकर यांचे शिष्टमंडळ मेंढे पाटलांच्या चेंबूरच्या बंगल्यावर भेटायला गेले. जाण्यापूर्वी त्याच चौकात शिष्टमंडळाचा सत्कार व्हायचे ठरले. अण्णा पावश्यांचा शिष्टमंडळाला विरोध होता. असल्या मार्गाने काहीही होणार नाही, आपण 'डायरेक्ट ॲक्शन' घेतली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे. भाडेबंदीची चळवळ सुरू करावी, असे त्यांनी आणि प्राध्यापक नागूतात्या आढ्यांनी ठरवले. नागूतात्यांचा एकूण कुठल्याही गोष्टीला विरोध असतो. गच्ची चाळीच्या मालकीची असावी ह्याही मताला त्यांचा विरोध होता आणि नसावी ह्याही मताला होता. चापशीच्या दुकानावर सर्वांनी बहिष्कार घालायचे ठरवले, त्या दिवशी स्वतः नागूतात्यांनी दुकानात जाऊन सर्वांच्या देखत घडाभर कांदे आणि बाटलीभर खोबऱ्याचे तेल चापशीकडून आणले. त्यांच्या सहकार्यामुळे चापशीचे हस्तक आत्मू आणि जगन्नाथ फ्रंबर त्यांच्याशी सलगी करू लागले, तर त्यांच्याही अंगावर ते खेकसले. वास्तविक शिष्टमंडळाचे एक सदस्य म्हणून त्यांना घ्यावे अशी एक सूचना होती. परंतु त्यांचे मत कोणालाच पक्के न कळल्यामुळे मंडळींनी त्यांना टाळले.

इकडे पुरुषांची ही संघटना चालू असताना स्त्रिया काही स्वस्थ नव्हत्या. त्यांनी आपलीही एक संयुक्त आघाडी उघडायचे ठरवले होते. परंतु कुणाचे नेतृत्व स्वीकारावे ह्याविषयी एकमत होईना. पहिल्या मजल्यावरच्या सुंदरराव सामंतांच्या सरलाबाई ह्या इंटर आर्ट्सपर्यंत शिकलेल्या असल्यामुळे चाळीतील विदुषी. परंतु आजवर त्यांचे धोरण एकूण इतर सर्व चाळकरी भगिनी "म्यानरलेस, अन्‌एज्यु-केटेड इ० इ०" असे होते. सुंदरराव सामंत तर कुणाच्या अध्यात ना मध्यात! ("बायकोपुढे नंदीबैलासारखा नुसता माना हलवतो!" हे एकूण स्त्रीवर्गाचे त्यांच्या-बद्दल मत.) कोणीही काहीही विचारायला आले, तरी "आमची वाईफ म्हणते" ह्या ध्रुवपदाखेरीज त्यांचे वाक्य पुरे होत नव्हते. तात्पर्य, सरलाबाई सामंतांना स्त्रियांच्या संयुक्त आघाडीचे नेतृत्व द्यायला बटाट्याच्या चाळीतल्या भगिनी

तितक्याशा तयार नव्हत्या. त्यांच्या खालोखाल म्हणजे अंबूताई चवाथे, ऊर्फ नर्सबाई. "पुरुष मंडळीत धिटाईनं बोलू शकणारी मेली आहे कोण चाळीत?"—एवढी एकमेव त्यांची स्त्रियांच्या पुढारीपणाला लायकी! परंतु त्यांनी साफ नकार दिला. कारण दोनच दिवसांपूर्वी मेंढे पाटलांच्या सुनेच्या बाळंतपणात त्यांना नर्स म्हणून बोलावणार असल्याची वार्ता रामसहाय भय्याने त्यांना सांगितली होती.

"हे पाहा, मला माझी ड्यूटी करता करता इतकं टायर्ड होऊन जायला होतं की फॉर अदर थिंग्ज मला टाईम नाही—सॉरी हं जानकीबाई—सॉरी ऑल्सो हं विमलाबाई—" ह्या शब्दांत त्यांनी बायकांची बोळवण केली! एकूण बायकांच्या चळवळीला काही पुढारी सापडेना. याचे एकमेव कारण म्हणजे प्रत्येकीला पुढारी व्हायचे होते!

मेंढे पाटलांच्या बंगल्यावर जायचा दिवस उजाडला. द्वारकानाथ गुप्त्यांनी साश्रू नयनांनी आपल्या बायकोचा आणि सर्व मुलांचा निरोप घेतला. सोकरजी त्रिलोकेकर बाबलीबाईंना काहीतरी सांगून येतो म्हणून आपल्या खोलीत गेले. त्यांनी आपल्या मिशनची इतकी जाहिरात केली होती की, शिष्टमंडळाच्या निरोपसमारंभाला त्यांचे सर्व 'रिलेटिव्ज' आले होते. त्यांपैकी हरिश्चंद्र चुनीलाल, गणपतराव विजयकर ऊर्फ काव्यप्रभू ह्यांनी सो-क-र-जी-त्री-लो-के-कर अक्षरे गोवून त्यांना निरोपाची दोन शार्दूलविक्रीडिते अर्पण केली—आणि शिष्टमंडळ चाळीतून बाहेर पडताना 'ॲटमॉस्फियर क्रिएट' करण्यासाठी एच० मंगेशरावांनी 'ओ दूर जानेवाले' ही रेकॉर्ड लावली.

मेंढे पाटलांच्या बंगल्याच्या दारात त्यांच्या प्रचंड अल्सेशियन कुत्र्याने शिष्ट-मंडळाचे भरगच्च स्वागत केले. प्रथम द्वारकानाथ गुप्त्यांच्या कोटाची चव त्याने घेऊन पाहिली, त्यानंतर सोकरजींना पुढल्या दोन पायांनी आलिंगन दिले आणि बाबा बर्व्यांचा पंचा ओढला. (बाबांचा पंच्यापासून काचा सुटला, पण कमरेपासून पंचा सुटला नाही!!) काही वेळाने एक गुरखावजा भय्या अगर भय्यावजा गुरखा धावत आला आणि त्याने नुसत्या "अबे टायगर—" एवढ्या दोन शब्दांनी त्या भयानक जनावराला लोळण घ्यायला लावली. भय्याच्या (अगर गुरख्याच्या) थाटावरून हेच मेंढे पाटील अशी सोकरजी त्रिलोकेकरांची समजूत झाली आणि त्यांनी त्याला गुड मॉर्निंग केले. मेंढे पाटलांच्या 'आश्वासनाच्या सभे'त सोकाजीराव हजर नव्हते. गुप्ते एक डोळा कुत्र्यावर व दुसरा गुरख्यावर ठेवून होते. शेवटी बाबांनी तोंड उघडले,

"नमस्ते—"

"क्या है?" गुरखा.

"हम बटाट्याची चाळकी ओरसे शिष्टमंडळ के नाते श्रीमान मेंढे पाटीलजी के दर्शनके लिये आये हैं—" आचार्य.

"हम सोकाजी त्रिलोकेकर और हम गुप्ते और बाबा बर्वे आचार्य होएंगा—" त्रिलोकेकरांनी हिंदीची चिंधी केली.

"जरा थांबा हं—" आचार्य बाबांनी त्यांना आवरले. "हमारी प्रार्थना है कि श्रीमान मेंढे पाटील हमें दर्शन देनेकी कृपा करेंगे!"

"हम करेंगे या मरेंगे—" गुप्ते उगाच ओरडला.

"गुप्तेसाहेब, जरा—" बाबांनी त्यांना थांबवीत म्हटले. "जनताकी मांग हम श्रीमानजी के प्रति निवेदन करने का स्वप्न—स्वप्न—"

"हमारे ऊर में बाळगते हैं!" त्रिलोकेकरांनी दुसरी चिंधी फाडली.

इतक्या संभाषणानंतरही गुरख्याच्या डोक्यात काही प्रकाश पडला नाही.

"काय आहे राव, नीट सांगा की—" गुरख्याच्या (अगर भय्याच्या) तोंडून अस्खलित मराठी ऐकून पाद्याने अथर्वशीर्ष म्हटल्याचा धक्का तिघांनाही बसला.

"माफ करा हं. मला वाटलं, आपण गुरखे आहा—"

"किंवा भय्ये!"

"भले! ह्यो आमच्या मालकाचा चावटपणा आहे! समद्यानला ड्रेस घालायची सक्ती हाय! अव, सोवळेकऱ्याला बी पांढरी इजार-पाटलोण घातलीया त्यांनी—मालकांना भेटायचंय व्हय?"

"होय. आहेत ना?"

"जानूऽऽ—" आतून कणखर हाक आली.

"मालक बलावत्यात. आलो. दमा तुम्ही हतंच. चूप बे टायगर. कुत्रंबी असं ठेवलंय, दिवसातून धा लोकांच्या धोतरांच्या चिंध्या करतंय—"

"जानूऽऽ यू फूल—" अशी गर्जना करीत एक सहा फूट उंच आणि जवळजवळ तितकीच रुंद व्यक्ती मुख्य दारातून बाहेर आली आणि तिघांना उद्देशून त्यांनी एकदम "व्हाट डु यू वॉंट?" असा विलायती सवाल टाकला. इंग्रजी ऐकल्यावर सोकरजींना जोर आला. कारण बटाट्याच्या चाळीत ज्यांना इंग्रजी शब्द आयत्या वेळी दगा देत नसत असे दोनच : एक सोकाजीराव आणि दुसरे एच० मंगेशराव!! ("साला भर्डाचा स्टूडंट आहे साला!"—सोकाजी.)

"गुड मॉर्निंग टु यू सर—"

"यस, गुड मॉर्निंग—"

"बीइंग गिवन टु अंडरस्टँड दॅट यू आर द ओनर ऑफ द चॉल ऑफ बटाट्याज, वुई हॅव द ऑनर टु सबमिट टु यू सर, दॅट वुई हॅव कम टु धिस पॅलेशियल बंगलो ऑफ युवर्स—"

"थँकिंग यू इन अँटिसिपेशन सर—" गुप्त्यांनी पुरती जोडली.

ह्या सातआठ इंग्रजीसारख्या दिसणाऱ्या वाक्यांनी मेंढे पाटील जेरीला आल्यासारखा दिसला.

"या—" त्यानेही अस्खलित मराठीत सुरवात केली. "कोन आपण? व्हाट बिजनेस?"



"आम्ही आपले भाडेकरू—हे आचार्य बाबा बर्वे—"

"मी सोकरजी त्रिलोकेकर, लेजरकीपर—"

"मी द्वारकानाथ गुते—"

"आय ॲम द मेंढे पाटील! शिट डाउन! काय काम आहे?"

"आपल्याला सध्या बटाट्याच्या चाळीत जी अस्वस्थता निर्माण झाली आहे ती कळली असेलच!" आचार्य.

"हे पाहा—अस्वच्छता काय मालक करत नाही; तुम्हीच करता—" मेंढे पाटील कडाडले.

"तसं नाही. स्वच्छतेबद्दल नाही. परंतु चाळीत सध्या जे एक वातावरण आहे—"

"कसलं वरण?"

"वातावरण—"

"मग ॲटमास्फेर म्हना की—" मेंढे पाटील.

"तेच—त्यामुळं मनःशांती ढळली आहे. गच्चीच्या प्रश्नाबद्दल बोलायचा आमचा हेतू आहे—"

"गच्चीचा कसला प्रश्न? अन काय हो, गच्ची काय तुमच्या बापाची?"

"आपण क्रोध आवरा! गच्ची मिळाली नाही तरी हरकत नाही. पण आपलं प्रेम आम्हांला हवं—" आचार्य.

"आनी आपलं भाडं आम्हांला हवं टायमावर. मग प्रेम भेटल लागाल तेवढं. जंटलमन लोक तुम्ही, आनी दोन-दोन वर्षांची भाडी थकवंता—"

"दॅट इज ए डिफरंट मॅटर—"

गुते एवढे वाक्य म्हणण्याच्या आत मेंढे पाटील एकदम ओरडले,

"मॅटर गेलं खड्ड्यात. भाडी भरा वेळेवर. नाहीतर समद्यांना नोटीस देऊन हाकलून देतो—"

"आपण पुन्हा रागावलात. तूर्त आपण गच्चीचा प्रश्न विचारात घेऊ—" आचार्य.

"गच्चीचा कसला प्रश्न? मी म्हटलं, गच्ची उघडीच पडली आहे. जावा, नाना तिथं जाऊन, तर भांडनं काढलीत! मानसं हाय का कोन? आमच्या कुत्र्याला अक्कल हाय ती तुम्हांला नाही राव!!" टायगरला गोंजारीत मेंढे पाटील म्हणाले.

"हे आपण बरोबर सांगितलंत. आमच्या चाळीत अजिबात एकी नाही. एकाचं तोंड इकडे तर दुसऱ्याचं तिकडे. परंतु गच्चीच्या बाबतीत—"

"हे पाहा, गच्चीबिच्ची जाऊ द्या खड्ड्यात."

"आपण ह्या प्रश्नाचा विचार करू—"

"मला असल्या फालतू गोष्टीला टाइम नाही. अहो, आमचा धंदा करायला टाइम नाही तर तुमच्या फालतू लफड्यात कोण पडेल? चांगली एज्युकेशनल मानसं तुम्ही. व्हाट इज धिस—आनी बजवून ठेवतो, गच्चीबिच्ची नो!!"

"पण आम्ही चाळकरी बंधूंची समजूत कशी काढायची?"

"कशाबद्दल?"

"गच्चीबद्दल!" त्रिलोकेकरांनी तोंड उघडले.

"पुन्हा गच्ची! त्यांना म्हणावं, गच्चीत कोणी पाय ठेवला तर तंगडं मोडीन. हाँ!!"

"पण आपण चाळ ताब्यात घेतली त्या वेळी बरीच आश्वासनं दिली होती. आपण फुकट शाळा काढणार होता. आपले दोष काढतोय असं नव्हे—केवळ स्मरण देतो—मुलांची शाळा, क्रीडांगण—"

"मुलींना स्थळं—" गुप्ते मर्मबंधातली गोष्ट बोलले.

"आता काय सांगायचं? अहो राव, चाळ ताब्यात घेतली तवा प्रत्येकाचं भाडं तुंबलं होतं. म्हटलं, लावा मदाचं बोट. पन तुमी राव कसले कोडगे! भाडं नाहीच, वर गच्ची हवी हवा खायला!"

"पण—" गुप्ते बोलण्याचा प्रयत्न करू लागले.

"हे पाहा पणवाले—तुम्मी तरी भाडं भरलंय काय सगळं?"

"फक्त तीन महिन्यांचं राहिलंय. अहो, वाइफची डिलिवरी झाली—"

"त्याच्याशी मला काय करायचं आहे? आय वॉंट मनी—इन क्याश!! यस—"

"ते आपल्याला देण्याची मी हमी देतो. आपलं म्हणणं बरोबर आहे—" बाबा बर्वे म्हणाले, "आम्ही कष्ट सोसू. देहदंड भोगू. जिन्यातल्या अंधारात ठेचाळू. चौकातल्या घाणीत बरबटू. परंतु आधी आपली पैन् पै चुकती करू. परंतु गच्चीचं लक्षात ठेवा—"

"सगळं ठेवतो, भाड्याचं बघा—"

"ते माझ्याकडे लागलं—" आचार्यांनी आश्वासन दिले आणि शिष्टमंडळ परतले. पुन्हा एकदा टायगरने प्रत्येकाच्या कपड्याचा नमुना चाखून पाहिला.

चाळकरी मंडळी आतुरतेने ह्या प्रतिनिधींची वाट पाहत होती.

'चाळभैरवा'चे तासातासाला बुलेटीन काढण्यात म्हाळसाकांत पोंबुर्पेकर गर्क होता. नुसते मथळे बदलून तोच मजकूर छापण्याचे काम चालू होते—

"**गच्चीच्या मागणीसाठी प्रतिनिधिमंडळ**

दिनांक बारा; दहा वाजता :—आज रोजी सकाळी येथून निघालेले प्रतिनिधिमंडळ श्री० मेंढे पाटलांच्या बंगल्यावर पोहोचल्याची बातमी आमच्या कानी आली आहे."

लगेच दोन तासांनी दुसरे बुलेटिन निघाले.

"प्रतिनिधिमंडळाची मेंढे पाटलांशी चर्चा

दिनांक बारा; बारा वाजता :—आमच्या प्रतिनिधींची आणि मेंढे पाटलांची प्रदीर्घ चर्चा झाल्याचे वृत्त आताच आले आहे. गच्चीचा प्रश्न हा चाळीच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे—"

दिनांक बारा; एक वाजता :—

"वाटाघाटी फिसकटल्या?

गच्चीच्या प्रश्नाबाबत चाळीतील काही मंडळींशी आमच्या प्रतिनिधीने आज चर्चा केली. दुसऱ्या मजल्यावरील मंडळींचा गच्ची तळ व पहिल्या मजल्यांवरील लोकांना देण्यास विरोध दिसला. याबाबत दुसऱ्या मजल्यावरील डाव्या बाजूचे पुढारी श्रीयुत बारटक्के म्हणाले की, हा प्रश्न वाटाघाटींनी सुटणार नाही. श्री० मेंढे पाटलांच्या बंगल्यापुढे सत्याग्रह आणि भाडेबंदीची चळवळ हा एकच मार्ग आहे—"

"भाडेबंदीच्या चळवळीस वाढता पाठिंबा!

शिष्टमंडळ अद्याप परतले नाही. त्यामुळे चाळकरी मंडळी हवालदिल झाली आहे. काहींच्या मते आचार्य बाबा बर्वे चेंबूरहून पदयात्रा करीत निघाले असावेत. त्यांनी 'गच्चीदान' चळवळीची घोषणा केल्याचे पहिल्या मजल्यावरील उजव्या टोकाचे नाना कुडाळकर यांचे बोलण्यावरून कळले. परंतु डाव्यांचा विरोध वाढतो आहे. भाडेबंदीच्या चळवळीस मुद्दाम पाठिंबा कसा द्यावा ह्या प्रश्नाचा विचार खोलीखोलीतून चालला आहे. बहुतेकांनी भाडेबंदी पूर्वीपासूनच आचरणात आणलेली असल्यामुळे ह्या परिस्थितीला चळवळीचे स्वरूप कसे द्यावे हे अजून नीटसे लक्षात येत नाही."

शिष्टमंडळ परतले त्या वेळी मंडळीने अत्यंत प्रेमाने त्यांचा सत्कार केला. 'भूमिका' समजावून देणारी भाषणे सुरू झाली. चाळकरी बंधुभगिनींचा उत्साह पराकोटीला गेला होता. चाळीतील नाट्यभैरव कुशाभाऊ अक्षीकर हे गुते, त्रिलोकेकर आणि बाबा बर्व्यांच्या जयजयकाराचे 'नारे' देत होते.

"द्वारकानाथ गुते झिंदाबाद!"

"सोकरजी नानांचा विजय असो!"

"आचार्य बाबा बर्वे की जय—"

पाळण्यातल्या पोरापासून ते जख्ख म्हाताऱ्यांपर्यंत सर्व जग जयजयकार करीत होते. ज्यांच्या ज्यांच्या घरी रेडियो होते, त्यांनी ते मोठ्याने लावले होते. काशीनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा गळ्यात पेटी बांधून चाळभर वाजवत हिंडत होता आणि त्याच्यामागून खळनाथ 'कामताचो झिलगो' नुसताच डग्गा बडवत होता. तळमजल्यावरून चापशी, आत्मू, जगन्नाथ फ्लंबर आणि कंपनीचे धावे दणाणल्याच्या बातम्या सारख्या येत होत्या. शेवटी सभेला सुरुवात झाली; आणि "थांबा—थांबा!" असा ध्वनी ऐकू आला.

डॉक्टर हातवळणे आपल्याबरोबर तळमजल्यावरील एकदोन भाडेकरू घेऊन वर आला होता.

"चापशी चोर आहे!" हातवळणे डॉक्टर ओरडला.

सभेला आश्चर्य वाटले.

"मित्रहो—" सभेच्या मागल्या बाजूने हातवळणे डॉक्टरांनी आपले भाषण सुरू केले, "चाळकऱ्यांच्या 'गच्चीसकट बटाट्याची चाळ' चळवळीला माझा पूर्ण पाठिंबा आहे—"

"हातवळणे डॉक्टरकी—" नाट्यभैरव कुशाभाऊंनी 'नारा' दिला. काही मंडळी 'जय' म्हणून ओरडली व काही 'झिंदाबाद'. त्यामुळे जयजयकाराचा दणका उडाला नाही.

"मित्रहो, आपण ही चळवळ नेटाने सुरू ठेवली पाहिजे. चापशीचा मी एके काळचा मित्र. अजूनही मी त्याचा मित्र आहे. परंतु वैयक्तिक नात्याचा हा संबंध नाही. सार्वजनिक सवाल आहे. तसं पाहिलं तर आपले पुढारी सोकरजी त्रिलोकेकर ह्यांनी कित्येक वेळा माझ्या दवाखान्यात येऊन द्वारकानाथ गुप्त्यांविरुद्ध मला अनेक गोष्टी सांगितल्या आहेत—"

"साला ब्लफिंग करतो काय डॉक्टर?" सोकरजी भडकले.

"प्रूफ करून देईन! पण माझं ऐका— ('ऐका, ऐका'च्या आरोळ्यांत कोणीच कुणाचे ऐकत नाही अशी सभेची अवस्था!)—माझं म्हणणं ऐका. चळवळीचं नेतृत्व स्वीकारायला मी तयार आहे." ('नको, नको!', 'स्वीकारा, स्वीकारा'च्या परस्परविरोधी आरोळ्या. आणि ह्या कोलाहलातून ऐकू आलेली काही वाक्ये—)

"डॉक्टर हातवळण्यांनाच लीडर बनवा. ह्या सोक्याला आणि द्वारक्याला काय कळतं—" प्रा० नागूतात्या आढ्ये शांबारावच्या कानात.

"हातवळणे हेर असेल चापशीचा. पानपतच्या युद्धात जेव्हा…" इतिहाससंशोधक बाबूकाका खरे.

"पण हातवळणे चाळीचा भाडेकरू कसा? ह्याचा दवाखाना चाळीत आहे. म्हणजे वस्तीला तो इथं नसतो—" जोगदंडांचा 'लॉ पाइंट'!

"ए सरोज, चल ना—" मधू चौबळ, सरोज गुप्तेला उद्देशून.

"अरे, त्या कंपौंडरला डॉक्टर रे कशाला म्हणतात?" जनोबा रेग्यांची मूलभूत शंका!!

"ए सरोज, चल ना—" मधू चौबळ, सरोज गुप्तेला उद्देशून.

"साली चाळीत युनिटी नाय—" सोकरजी.

"आई गं, मोठी माणसंदेखील शाळेतल्यासारखं ओरडतात का ग?" राघूनानांची कन्या, आपल्या आईस.

"हाकला रे कुणी तरी हातवळण्याला!" भाईसाहेब चौबळ.

"मंगेशराव, तुम्ही गायला सुरुवात करा. सभा बरखास्त तरी होईल—" शांबाराव गायतोंडे.

"ह्या देशात शिस्त केव्हा येणार? ओन्ली गॉड नोज!" देवरूखकरमास्तर.

"ए सरोज, चल ना—" मधू चौबळ, सरोज गुप्तेला उद्देशून.

"काय ग मेल्यांनी मासळीबाजार मांडलाय!" भीमाबाई जोगदंड.

"अय्या! तुम्ही कधी मासळीबाजारात गेलेलात?" काशीनाथ नाडकर्ण्यांची बायको!

केवळ ओरडून थकल्यामुळे सभा काही वेळाने आपोआप शांत झाली. आणि द्वारकानाथ गुप्ते प्रतिनिधिमंडळाने काय केले ते सांगायला उठले. तत्पूर्वी आचार्य बाबा बर्व्यांनी डॉ० हातवळण्यांना आपण आपल्यांत घेतले पाहिजे असा ठराव मांडला व तो पास झाला.

"मित्रहो," द्वारकानाथ गुप्ते म्हणाले, "आम्ही मेंढे पाटलांना स्पष्ट शब्दांत सांगून आलो की, गच्चीवर सर्व भाडेकरूंचा हक्क आहे! आम्ही गच्ची वापरणार. चाळीतील जनतेच्या आवाजानं मेंढे पाटील घाबरले आहेत. आम्ही 'गच्ची तुला देणार नाही' असं बजावून आलो आहो. आम्ही त्याच्या दरवाजावरच्या कुत्र्याला दाद दिली नाही. गुरख्याच्या सोट्याला घाबरलो नाही. मेंढे पाटलाचा बेत ठीक नव्हता. कोपऱ्यात बंदूक होती; तीही आम्ही पाहिली—पण भ्यालो नाही."

द्वारकानाथ गुप्ते सुमारे पाऊण तास बोलला. त्यानंतर सोकरजींनी भाषण केले :

"फ्रेंड्स, मेंढे पाटील चोर आहे. सालं तंगड्या तोडीत आम्ही चेंबूरपर्यंत गेलो, तर साला कपभर चा नाय दिला. साला बापकमाईवर मोटे झाले तर मॅनर नाय. घरी पण न्हातो काय! इडियट! आमच्यावर कुत्रा सोडला. माझ्या पायाला कुत्रा चावला. ("—कुत्रो मेलो असतलो!" जनोबा रेगे काशीनाथ नाडकर्ण्यांच्या कानात.) पण आय सेड, गो टु डॉग्ज! आम्ही गेलो आणि मेंढे पाटीलला वॉर्न केला की टॅरेस नाय दिल्ली तर रीजल्ट चांगला नाय होणार. साला एवढा पैसा हाय तर दोन लाइन्स इंग्लिश नाय येत बोलायला."



इतक्यात बाहेर जिन्यात आरडाओरड ऐकू आली म्हणून सभेने मागे वळून पाहिले. तर एका हातात मधू चौबळची मानगूट आणि दुसऱ्या हाताने सरोज गुप्तेचे

मनगट धरून कुशाभाऊ अक्षीकर आपल्या कमावलेल्या आवाजीत ओरडले,

"थांबा—हा पाहा काय प्रकार!"

सभेच्या कामाला निराळीच कलाटणी मिळाली.

"मित्रहो, चाळीवर काय प्रसंग आला आहे आणि चाळीची तरुण पिढी काय करते आहे पाहा. मघाशी आपली सभा ऐन रंगात असताना ही कारटी आणि हा कारटा हळूच सटकताना मी पाहिलं. हळूच त्यांच्यामागून गेलो. दोघांनीही सर्व वडील मंडळी सभेत गुंतलेली पाहून वर गच्चीत पोबारा केला होता. मी जिन्यात लपून बसलो आणि ही सरोज गुप्ते आणि हा मधू चौबळ—मित्रहो, नाही—माझ्याच्यानं नाही पुढं बोलवत—"

नाट्यभैरव कुशाभाऊंच्या जिभेवर "नाही बोलवत" ह्या वाक्यानंतर पंधराएक मिनिटे मराठीतले सगळे नाटककार नाचले. सभेत हलकल्लोळ उडाला. द्वारकानाथ गुप्त्याने भाईसाहेब चौबळाच्या मुलाच्या कानफटीत मारली आणि मनगट लचकल्यामुळे विव्हळून ओरडू लागला. भाईसाहेब चौबळांनी आपल्या बायकोला सांगून द्वारकानाथ गुप्त्याच्या कार्टीच्या झिंज्या ओढवल्या व आपण तिच्या बापाच्या समाचाराला गेला.

"काय समजलेत? अहो, गच्चीचा जर हा उपयोग, तर गच्ची हवी कशाला?" जनोबा रेगे ह्या खेपेला कोणाच्याही कानात न कुजबुजता मोठ्याने ओरडले.


गडबडीत संधी साधून काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने चौबळांच्या मधूच्या पाठीत गुद्दा मारून घेतला. सरोजने वास्तविक त्याला तीन पत्रे लिहिली होती!

एकूण गच्चीच्या प्रश्नाने निराळेच वळण घेतले. सभा मोडली. प्रा० नागूतात्या आढ्ये आपण हे केव्हाच ओळखले होते हे सांगू लागले. सारी चाळ अस्वस्थ झाली. त्या वेळी चापशीचे नोकर धान्य वाळत घालण्यासाठी सुपे भरभरून गच्चीवर नेत होते आणि रामसहाय भय्याने जिन्याला नवे भक्कम कुलूप ठोकून किल्ल्या चापशीच्या स्वाधीन केल्या होत्या.

आचार्य बाबा बर्व्यांनी गच्चीसकट बटाट्याची चाळ नको अशी चळवळ जाहीर केली आणि चाळीतली मंडळी मेंढे पाटलाला वेळेवर भाडे पोचवत नाही म्हणून लवकरच आम्ही उपवास करणार आहोत असा फतवा काढला. म्हाळसाकांत पोंबुर्पेकराच्या अंकांची रद्दी चापशीने दुप्पट भावाने घेतल्यामुळे चाळ-चळवळीचा मजकूर न देता त्याने 'सरोज-मधूचे गुप्त कारस्थान' ही लेखमाला सुरू केली.

ह्या गोंधळात दोन महिने गेले. पावसाळा सुरू झाला. चापशीला धान्य वाळवायला चाळीच्या गच्चीचा पावसात उपयोग नाही म्हणून चाळ खूष आणि फुकटात गच्चीचे भाडे लागू झाले म्हणून मेंढे पाटील खूष झाले.

धो धो पाऊस सुरू झाला आणि गच्चीचा प्रश्न गच्चीसकट भिजत पडला!!



# ....राघूनानांची कन्येस पत्रे

*[चि० सौ० कां० गोदूस राघूनानांची पत्रे : 'सोमण-दप्तर' रुमाल क्र० १०, पत्र एक ते पाच]*

जागतिक वाङ्मयात पत्रवाङ्मयाला अनन्यसाधारण स्थान आहे. हेच वाक्य काही विद्वान वाङ्मयसेवक काव्य, कथा, कादंबरी, कुठल्याही वाङ्मयप्रकाराबद्दल गाफील-पणाने लिहितात. त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. पेशवाईच्या रुमालांत बांधलेल्या पत्रांनी कित्येक खलबते उघडकीला आणली. चिमाजीची बाजीरावास पत्रे यांसारखी ऐतिहासिकरूपी कौटुंबिक, तर नेपोलियनने जोसेफाइनला लिहिलेली कौटुं-बिकरूपी ऐतिहासिक पत्रे आपल्यापुढे आहेत.

हे विश्वची माझे घर मानणाऱ्या त्यागमूर्तींची तत्त्वज्ञानात्मक पत्रे बरीच घरेलू असतात, तर कित्येक खाजगी प्रेमपत्रांतून वासनात्मक प्रेमाचा धिक्कार आढळतो. एक प्राच्य विद्यापंडित म्हणतात की, "पत्र म्हणजे जीवनाला नवदर्शन घडवणारे उपनेत्र!". तात्पर्य, संतकवी सखदेवाच्या (इ० स० पू० तीन वर्षे) शब्दांत सांगावयाचे म्हणजे "इये देशीचिया क्षोणीं। पत्रवाङ्मयाच्या गोणी। त्या भीतुरीं नवरत्नांच्या खाणी। गिंवसतील खणणारिया॥" शोधणाऱ्याला सापडेल हा सिद्धांत संतकवी सखदेवांनी (इ० स० पू० तीन वर्षे) कित्येक शतकांपूर्वीच देऊन ठेवला आहे.

असाच शोध भगवंतावर भरवसा ठेवून करता करता त्यात 'सोमण-दप्तर' हाती लागले. महाराष्ट्राच्या आंग्लपूर्व इतिहासात पेशवे-दप्तराला जे स्थान आहे तेच आंग्लोत्तर कालात सोमण-दप्तराला द्यावे लागेल, असे आमचे प्रांजल आणि विनम्र मत आहे. एकूण बावीस रुमाल आहेत. सोमणवंशीयांपैकी ह्या विशिष्ट मेणचवली

(जिल्हा रत्नागिरी, तालुके राजापूर) येथील शाखेचे एकच घराणे आहे. आणि प्रस्तुत लेखात त्यातील हयात वंशज राघूनाना हरिपंत सोमण (मुक्काम बटाट्याची चाळ, खेतवाडी, मुंबई) यांनी आपल्या प्रेमळ कन्येस लिहिलेल्या पत्रांतील काही पत्रांचा प्रिय वाचकांस परिचय करून देण्याचे योजिले आहे. सावकाशीने वीसबावीस रुमालांचे सारे 'सोमण-दप्तर'च वाचकांपुढे आणण्याचा संकल्प आहे. सत्य संकल्पाचा दाता भगवान आहे. त्याची इच्छा असल्यास हेही कार्य पुरे होईल.

अनेकांनी आजवर अनेकांना पत्रे लिहिली. त्यातल्या त्यात बऱ्याच जणांनी आपल्या सुपुत्रांना आणि सुकन्यांना लिहिली. आपल्या असलेल्या, पुष्कळदा नसलेल्याही, कुटुंबीयांना पत्रे लिहिताना स्वतःकडे जी एक द्रष्ट्याची भूमिका घ्यावी लागते, जे सौंदर्यशोधन करावे लागते, जो ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोन ठेवावा लागतो, तो महाकठीण आहे. आपल्या सुपुत्रांना आणि विशेषतः सुकन्यांना सुसंस्कृत करण्याचा आणि त्यांना अष्टच काय परंतु शतपैलू पाडण्याचा ह्या थोर पत्रलेखकांचा प्रयत्न प्रचंड आहे. दुसरीतल्या गणितातल्या पालीशी गणित जमविणाऱ्या आपल्या मुलाला पाली वाङ्मय पत्रांतून समजावून देणारे पालीतीर्थ पंडित किंवा बोळक्यांची भातुकली मांडणाऱ्या कन्येला मोहेनजोदारोतल्या भांड्यांची महती सांगणारे पिते खरोखर धन्य होत. आमच्या परिचयाच्या एका गणिताच्या प्राध्यापकांनी औटकीपर्यंत पोहोचलेल्या आपल्या लेकीला क्वांटुं फिजिक्स म्हणजे काय हे कार्डावर लिहून कळवल्याचे ऐकतो. असामान्यांची जर ही तऱ्हा तर बटाट्याच्या चाळीतल्या राघूनानांना आपल्या कन्येलाही पत्रे लिहावीशी वाटली ह्यात नवल ते कोणते ? शिवाय अपत्यप्रेम हे चोहीकडे सारखेच नाही का ? वात्सल्याचा झरा कुठे झुळझुळ वाहील, तर कुठे धोधो !!

पत्रलेखनाचा राघूनाना सोमणांचा अधिकार दुहेरी. एक, त्यांच्या सोमण घराण्याचा पूर्वापार पत्रव्यवहार आम्ही सध्या चाळत आहो त्यावरून लेखकाचे रक्त त्यांच्या नसानसांत खेळत आहे हे दिसते; आणि दुसरे म्हणजे सतत ते पत्रवाङ्मयाच्या वातावरणात वाढलेले. बावीस वर्षे त्यांची पोस्टात सर्विस झाली आहे. त्यांचे एक पूर्वज शिवकालीन टपालखात्यात सांडण्यांवर हशमी भरण्याच्या कामावर अधिकारी होते असा उल्लेख सापडतो. (पाहा : सोमणदप्तर, रु० क्र० आठ, पत्रक्रम अकरा... "परशराम हणमंत सोमण यानें जुन्नर दिशेस जाणाऱ्या सांडणीवर सिन्नरला पाठवावयाचे खलिते दिल्हे. त्यास जरब देणें. उपरांत ऐशी हेळसांड जहाल्यास सांडणीच्या आसपास त्यास फिरकूं देऊं नये व फिरोन मुदपाकांत लाडू वळणेंचे मूळ कामावर बदलोन टाकावें...")

गेल्या बावीस वर्षांच्या पोस्टातील नोकरीत अनेक पत्रांवर त्यांनी ठसे उमटवले, तर काही पत्रांनी त्यांच्या अंतःकरणांवर ठसे उमटवले. थोरामोठ्यांनी आपापल्या लेकीसुनांना लिहिलेली पत्रे पाहिली की, त्यांना सरसरून यायचे. ग्रंथरूपाने प्रसिद्ध

झालेली ही पत्रे जाताना पाहून, साऱ्या जगाचा इतिहास पत्रांतून सांगणाऱ्या लेखकांना पोस्टेज काय बसले असेल, असा व्यावसायिक विचार जरी त्यांच्या मनात डोकावला, तरी ती पत्रे लिहिणारे बाप आणि त्यांच्या त्या भाग्यशाली कन्या ह्यांचा त्यांना हेवा वाटे. सुदैवाने प्रत्येक मुलीला राजकीय, धार्मिक, सामाजिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक इतिहास स्वतंत्र ग्रंथरूप पत्रांनी लिहिण्याइतक्या कन्यांचा लाभ त्यांना ईश्वरकृपेने झाला होता.

वास्तविक नानांचे शालेय शिक्षण बेताचेच! ते मॅट्रीक पास कसे झाले हा इतिहास नास्तिकाला आस्तिक करणारा आहे. परीक्षेला असलेला प्रत्येक विषय जणू त्यांच्याशी खोखो खेळत असे. गणितातून सुटले की भूगोल हातातून निसटे; आणि भूगोल आणि गणित हाती लागले तर संस्कृताने खो द्यावा. इंग्रजी हा विषय अतिचपळ खेळाडू-प्रमाणे नागमोडी घालीत होता. त्यांचा प्रिय विषय इतिहास; तो मात्र भोज्यासारखा कायम हाताशी होता. मॅट्रीक झाल्यावर कॉलेजमध्ये जाऊ असा विचार नियतीनेच डावलला. नानांना पोस्टात नोकरी मिळाली आणि आशांचे अंकुर डेड लेटर ऑफिसात पडले! महत्त्वाकांक्षा 'रीडायरेक्ट' होऊन मूळ पत्त्यावर आल्या. त्या काळात नानांनी काही लिहिले नाही असे नाही. कथा लिहिल्या; त्या कॅरममधल्या त्यांनी मारलेल्या स्ट्रायकरप्रमाणे विरुद्ध बाजूला टप्पू खाऊन त्यांच्याच 'खिशात' पडल्या. नाटके लिहिली; तीही धक्के खाऊन आली. कवितांची कथा तर त्याहूनही करुण आहे. सारी कहाणी सांगण्याचे हे स्थळ नव्हे. नानांनी गेली कित्येक वर्षे हा नाद सोडला आहे. इमानेइतबारे संसार केला. 'साभार परत'ची चिठ्ठी लावलेले अन्य लेखकांचे लिखाण पोस्टातून परतताना पाहिले की, त्यांना आसुरी आनंद होत असे. शेकडो दिवाळी अंकांचे गठ्ठे महिन्याभरातच माहेरी घालवताना त्यांना अतिसमाधान होई. पुस्तकांची आणि इतर कुठल्याही आर्टिकलांची बंगी त्यांना सारखीच वाटे. एक काळ मात्र असा होता की, दिवाळी अंकांतील प्रत्येक अंक ते शबरीप्रमाणे चाखून वर्गणीदारांकडे पाठवीत. आता ते तिकडे ढुंकूनही पाहत नसत. परंतु दमा जसा कायमचा बरा होत नाही, किंवा विमाएजंट जसा धंदा बदलला तरी एजन्सी राखून ठेवतो, त्याप्रमाणे राघूनानांच्या अंतःकरणाच्या एका कोपऱ्यात लेखक होण्याची इच्छा, पोस्टल सेव्हिंग्ज बँकेत वर्षानुवर्षे पडून राहणाऱ्या खातेदारांच्या तीन रुपये तीन आणे एक पैच्या खात्याप्रमाणे पडून होती. लेखक होण्याचा अकौंट डेड झाला नव्हता. तिथे धुगधुगी होती; आणि 'वन्हि तो चेतवावा रे' म्हटले आहे त्याप्रमाणे अचानक एक दिवस एका थोर गृहस्थाने लिहिलेले 'कन्येस पत्रें' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले, आणि राघूनानांच्यातील लेखक जागा झाला. "मी माझी झाशी सोडणार नाही" म्हणणाऱ्या रणलक्ष्मीच्या थाटात ते गर्जू लागले, "मी माझे लेखन सोडणार नाही!"

राघूनाना आता नाना तऱ्हेची दिवास्वप्ने पाहू लागले. त्यांची ज्येष्ठ कन्या गोदी त्यांच्या डोळ्यांपुढे उभी राहिली. पूर्वी पाचही कन्या उभ्या राहत त्या जिवंत

काळज्या म्हणून; आता त्यांची गोदी निराळ्या स्वरूपात त्यांना दिसली.

...नानांची पत्रे वाचणारी गोदी! सुसंस्कृत गोदी! सुमेरिअन, बॅबिलोनियन आणि खाल्डियन संस्कृतींबद्दल पाऊणकी म्हटल्याइतकी फडाफड बोलणारी गोदी! "महाराष्ट्रात पूर्वी सातवाहन, चालुक्य, आंध्रभृत्य होऊन गेले" हे वाक्य "परवा दिवाळीला आमच्या घरी वैशंपायन, गणपुले आणि ग्रामोपाध्ये येऊन गेले" अशा लीलेने सांगणारी गोदी! कांबोडियाची माहिती आंबाडीच्या भाजीच्या कृतीइतक्या सहजतेने सांगणारी गोदी! ओल्वाल्ड ब्येंग्लर ह्या जर्मन ग्रंथकाराच्या 'उंटरडांग डेस आबेंड लांडेस' नावाच्या ग्रंथात पाश्चात्त्यांच्या विनाशकालाची माहिती आहे, हे 'अट्टंगणपट्टंगण' ह्या भोंडल्याच्या गाण्यासारखे ठासून सांगणारी गोदी! आपले सारे कुटुंब एकाएकी सुसंस्कृत झाले आहे. आपली बायको (इथे क्षणभर राघूनानांचे दिवास्वप्न तुटून जोडले गेले, असे आमचे सहकारी प्रा० पेंगुळवाडकर यांचे मत आहे. त्यांचा विवाहितांच्या मानसशास्त्राचा अभ्यास अधिक आहे.)—आपली बायको केवळ वंशवृद्धी न करता वंश आणि संस्कृतीच्या ऐतिहासिक संबंधावर नळावर बोलते आहे. आपला 'गुड फॉर नथिंग' मेहुणा 'दाद्या' 'अश्मयुगातील भारत' ह्या विषयावर पुण्याला शिवाजीमंदिरात नवविचारमालेत बोलतो आहे. आणि आपली दुसऱ्या नंबरची शकुंतला आपली सारी पत्रे वाचून हा महाराष्ट्रदेश "णी सस्स–सेस संपत्ति पमु अआसेस–पामर जणीहो सुव्वसिय गाम गोहण–भमारव मुहलिय दियंतो णीसेस सुहणिवासो आसय विसयो" असे प्राकृतात शेजारच्या धनव्राय धुरंधरांना ठसवीत आहे. आणि प्राकृत अर्धमागधी, पाली न जाणणारी ती अज्ञ भगिनी "चलाम चझीतु चषाभा चमजतस चहीना!" असे म्हणून 'च'च्या भाषेत उत्तर देत आहे. शकू तिला पाली-अर्धमागधींतला फरक आपल्या पत्र क्रमांक बावन्नावरून समजावून देत आहे आणि ती मग 'च'कार शब्द बोलत नाही...

ह्या स्वप्नसमाधीचा अनुभव घेताना नानांनी कार्डे पैशापैशाला विकली आणि कोऱ्या पाकिटावर आपण वाकाटकाचे कारणाधिप आहोत असे समजून राजमुद्रा ठोकल्याच्या आविर्भावात पोस्टाचे शिक्के ठोकले.

'काशिस जावें नित्य वदावें' अशी एक जुनी ओळ आहे. ह्या संकेताप्रमाणे केवळ कन्येस पत्रे लिहिता यावीत ह्या एकाच इच्छेने कोठे तरी दूर जावे असे बोकीत बसलेल्या राघूनानांना खरोखरीच प्रवासयोग आला.

तीनतीनदा कान टवकारून नाना ऐकत होते. "येस, तुम्हांला पी० एम० जी०च्या ऑफिसमधल्या एस० एर्नाक्युलमबरोबर पी० ए० कम टायपिस्ट म्हणून परवा टूरला जायचं आहे—" पोस्टमास्तर कुळकर्णी सोमणमास्तरांना सांगत होते.

"काय म्हणता?" बगीवर सील मारायला लागणारी लाख वितळायला पेटव-लेल्या मेणबत्तीवर बोट धरून आपण स्वप्नात नसल्याची खात्री करून घेत राघूनानांनी विचारले. "बट..."

"व्हॉट बट अँड व्हॉट इफ?" तारखात्यातील इंग्रजीत कुळकर्णीमास्तर गरजले. "अहो, चान्स मिळालाय मिस्टर सोमण—गो! यू मस्ट होल्ड द आपरचुनिटी बाय इट्स—हिज—हर फोरलाक!! हे पाहा, हा एर्नाक्युलम जरा कडक आहे. जरा ड्रेसबीस व्यवस्थित असू द्या. मी पी० जी० च्या ऑफिसात होतो, त्या वेळी ही बॉज जस्ट अ नॉव्हिस! टु टेल यू द ट्रूथ, रजिस्टर्ड पोस्ट पार्सल आणि रजिस्टर्ड बुकपोस्ट ॲकनॉले-जमेंट ड्यूमधला डिफरन्स मी समजावून सांगितलाय त्याला. बट लक ईज! आम्ही थांबलोय इथं ई० बी० वर. हे पोहोचले. ठीक आहे. तुमचा चार्ज द्या लोखंडेमास्तरना आणि आय ॲम रिलीव्हिंग यू फ्रॉम जस्ट नाऊ. गो अँड रिपोर्ट युवरसेल्फ इन द पी० एम० जी०ज ऑफिस जस्ट नाऊ!" शेवटले वाक्य 'सीताकांतस्मरण जयजयराम—पुंडलीकवरदा हारिविठ्ठल'च्या चालीवर कुळकर्णीमास्तरांनी उच्चारले.

एका विलक्षण उन्मादात राघूनाना बटाट्याच्या चाळीत परतले. ऐकणाऱ्या, न ऐकणाऱ्या, सगळ्या शेजाऱ्यांना त्यांनी आपल्या प्रपोज्ड टूरची कल्पना दिली. 'पुणे आणि दक्षिण विभाग' असा दौरा होता. वास्तविक नानांच्या आयुष्यात प्रवास असा हा पहिलाच. त्यांच्या मजल्यावरील प्रत्येकाला कुठेतरी गाव होते. बाबलीबाई आणि त्यांचे यजमान सोकाजीराव हवा बदलायला (समेळकाका, न्यू गजकर्ण फार्मसीचे मालक, 'हवा भरायला' असे दुष्टपणाने म्हणत) सांताक्रूझला जात, स्वतः समेळ चेऊलला, एच० मंगेशराव मंगळूरला, कोणी अक्षीला, कोणी उरणला, द्वारकानाथ गुप्ते रोह्याला, बाबूकाका खरे गुहागरला, असे नेहमी जात. पण राघूनानांनी फक्त एकदा मुंबई यापूर्वी सोडली होती. ती म्हणजे लग्नानंतर जोडप्याने मेणचवलीच्या कुळस्वामिनीला आणि पुळ्याच्या गणपतीला येतायेताना गेले होते तेव्हा!

नाना प्रवासाच्या तयारीला लागले. प्रथम जर त्यांनी काही घेतले असेल तर चार रीम कागद! शिवाय बुशकोट, तयार पँट्स, हॅट, वगैरे जवळजवळ पंचेचाळीस रुपये आयुष्यात प्रथमच त्यांनी स्वतःवर खरचले. प्रवासी कातडी बॅग घ्यायची त्यांची इच्छा प्रबळ होती; परंतु त्यांच्या पत्नीची ट्रंक होती. माहेरून त्यांच्या पत्नीने येताना आणलेली ही एकमेव वस्तू! ट्रंक उत्खननात सापडल्यासारखी वाटत होती आणि कडीकोयंडे 'कॅनॉट बी ट्रेस्ड'च्या अवस्थेत होते. बुशकोट, पँट घातलेल्या नानांना तसली ट्रंक सोबत नसावी असे वाटत होते. परंतु त्यांना ती घ्यावीच लागली. त्यात त्यांच्या मातुःश्रीने "राघोबा, त्याला एक चांगलासा सुंभ बांधून घे पक्का—" असा पोक्त सल्ला दिला. मातृभक्त राघोबांनी तो ऐकला.

ह्या साऱ्या प्रकरणात राघूनानांना काहीतरी चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते. त्यांच्या ह्या प्रवासाबद्दल कोणालाच काही कुतूहल नव्हते. शेजारच्या जोगदंडांना त्यांनी "उद्या टूरवर जातो" असे सूतोवाच करून पाहिले. पण त्या बहाद्दराने "कुठे?" एवढी दोन अक्षरे उच्चारण्याचीही तसदी न घेता शब्दकोड्यात डोके खुपसले. एच० मंगेशराव वास्तविक चांगला गृहस्थ! त्यांच्या पत्नीचे व त्यांचे गाणे



राघूनानांनी 'सौजन्यता हा उभयपक्षीय गुण आहे' ह्या पोस्टात लावलेल्या सरकारी नियमाला अनुसरून ऐकले होते. निदान त्यांना तरी आपल्या प्रपोज्ड टूरमध्ये इंट्रेस्ट असेल म्हणून राघूनाना उत्साहाने त्यांच्या खोलीत गेले. त्या वेळी ते आपल्या पत्नी वरदाबाईंना ठुमरी शिकवीत होते—'पिया गये परदेस'. परदेशी गेलेल्या प्रियकराच्या विरहाने विव्हळ झालेल्या प्रेयसीचा भाव वरदाबाईंच्या सुरापेक्षा चेहऱ्यावर अधिक दिसत होता. "उद्या मी टूरला गेलो की आमच्या घरी असंच वाटणार आहे," असे विनोदयुक्त गांभीर्याने नानांनी सुचवून पाहिले व संभाषण उघडण्याचा यत्न केला. पण एच० मंगेशराव ठुमरीतल्या परदेशात सपत्निक गेले होते. नानांनी तोंड उघडल्यावर त्यांनी डोळे वटारून त्यांना गप्प केले, आणि दीपचंदीतल्या समेवर ते आणि वरदाबाई केळ्याच्या सालीवर पडणाऱ्या वाटसरूसारखे धाडकन येऊन पडले. तात्पर्य, राघूनानांच्या प्रपोज्ड टूरमध्ये कुणालाही लक्ष घालायला सवड नव्हती—जो तो आपापल्या 'ह्या'त होता.

राघूनानांच्या प्रयाणाचा दिवस उजाडला. ती ट्रंक, प्रवासी फिरकीचा तांब्या आणि गळ्यात अडकवण्याची पिशवी असा, 'हलकी मुसाफरी करा' ह्या सरकारी इशाऱ्याला साजेसा बोजा घेऊन राघूनाना निघाले. चाळीतल्या प्रत्येक भाडेकरूचा त्यांनी शक्य तितक्या रुद्ध कंठाने निरोप घेतला. आपण जवळजवळ तीन महिने बाहेर राहणार—जरा लक्ष असू द्या, हे प्रत्येकाला त्यांनी पराकाष्ठेच्या तळमळीने बजावले. पण काही नाही. राघूनाना तीन महिनेच काय, कायमचे दिसले नसते तरी कुणाला काही वाटले असते की नाही कोण जाणे, असे त्यांना वाटले. नाही म्हणायला रवळनाथ कामतांनी मात्र (व्हॉलकार्ट ब्रदर्समधल्या) "नाना, जरा केअरफुल हं. ही पुण्याची माणसं. आमची कोकणाची आनेस्टी नाही तिथं. जपून वागा." एवढे वाक्य उच्चारले. "शेणवी असला तरी माणुसकी आहे कामतात—" असा विचार नानांच्या मनाला स्पर्शून गेला आणि गोदीला लिहायच्या पत्रात एक पत्र 'गुण जातीवर अबलंबून नाहीत' ह्या मुद्द्यावर लिहायचे त्यांनी मनातल्या मनात ठरवले.

बटाट्याच्या चाळीपुढल्या रस्त्यावर टॅक्सी उभी राहिल्यावर टॅक्सीभोवती पोरे मात्र खूप जमा झाली होती. 'टॅक्सी आणि बटाट्याच्या चाळीपुढे!' ही क्वचित घडणारी घटना होती. जाताना आपण टॅक्सीतून गेलो हे तरी किमानपक्षी कोणी पाहावे अशी एक नानांची माफक महत्त्वाकांक्षा होती. खुद्द राघूनाना आयुष्यात आज दुसऱ्यांदा टॅक्सीत बसत होते. पहिल्यांदा, त्यांच्या मातुःश्रीच्या मोतीबिंदूचे ऑपरेशन झाले होते तेव्हा तिला इस्पितळात ते टॅक्सीतून घेऊन आले होते. त्यानंतर तो योग काही आला नव्हता. टॅक्सीत बसताना त्यांनी गॅलरीतून निरोप देणाऱ्या आपल्या पत्नीकडे साश्रुदृष्टीचा क्षेप केला. नुसत्या डोळ्यांच्या वजनदार हालचालींनी "जपून जा" असे सांगणाऱ्या, पतिविरहाच्या आगामी वेदनांनी व्याकूळ झालेल्या नायिकांची वर्णने नानांनी वाचली होती; परंतु नानांचे कुटुंब साश्रूबिश्रू तर नाहीच,

परंतु वरून त्यांनी आपल्या नळावर कमावलेल्या आवाजात, "भुशकोटाची बटणं बबा वरखाली लागली आहेत. नीट लावा—मेली जमत नाहीत सोंगे, तर करावी का?" असे बजावले. चाळीतल्या इतर बायका मौज पाहायला उभ्या होत्या. त्यांनी डोळ्यांना पदर लावण्याऐवजी तोंडाला लावल्याचे नानांच्या चाणाक्ष नजरेतून सुटले नाही. टॅक्सीत नानांच्या समस्त कन्यापुत्ररत्नांनी ठाण मांडले होते. इतर कारटी कुणी सामान ठेवायच्या जागेवर, कुणी मडगार्डावर आरूढ होऊन चिडलेल्या टॅक्सीड्रायव्हरला अधिक चिडवीत होती. नानांनी आपल्या प्रेमळ मुलांचा निरोप पाठीत धपाटे घालून घेतला. सगळी पोरे पळाली. शेवटी समोरच्या दवणे टेलरचे आपल्याकडे लक्ष आहे अशी समजूत करून घेऊन त्याला "येतो—" असे उगीच सांगून नाना टॅक्सीत बसले.

"कहाँ जाना है?" वरच्या काचेच्या कप्प्यातून टोपी काढून ती चढवीत टॅक्सी-ड्रायव्हरने विचारले.

"टूर पर!" नानांना शेवटी एक श्रोता मिळाला. परंतु उत्तरातली चूक लगेच उमगून ते म्हणाले, "नही नही. व्ही० टी० पर."

आणि पोपटाच्या गळ्याकडे पाहणाऱ्या अर्जुनाच्या डोळ्यांनी दोनदोन आण्यांनी बढणाऱ्या मीटरकडे पाहत नाना व्ही० टी०ला येऊन पोहोचले. घड्याळाखाली ठरल्याप्रमाणे पट्टेवाला उभा होता. त्याने साहेब इंटरने जाणार असल्याचे वर्तमान दिले. वास्तविक साहेबाला सेकंडचा प्रवासखर्च मिळणार होता आणि नानांना 'इंटर'; परंतु साहेब आता इंटर म्हटल्यावर नाना आणि पट्टेवाला थर्ड हे त्रैराशिक सरळ होते. आणि पट्टेवाल्या अर्जुन ठकमाजीने आजवर अनेक साहेब आणि अनेक टूरी केल्या असल्यामुळे पुढील धोरण ओळखून त्याने नानांचे व आपले थर्डचे तिकीट काढले होते.

ते भव्य बोरीबंदर आणि तिथली ती प्रचंड धडपड पाहून नानांना अगदी तिथूनच गोदीला पहिले पत्र 'लोकल डिलिव्हरी'ने टाकावेसे वाटू लागले. गाडी सुटायला अवकाश होता. मुलींना पत्रे लिहिणारे थोर पिते प्रवासात पुस्तके खरेदी करतात हे त्यांनी वाचले होते. स्टॉलवरच्या सगळ्या पुस्तकांवरून दृष्टी फिरवीत नाना पुस्तकांच्या किंमती विचारू लागले. शेवटी त्यांच्या पट्टेवाल्याने 'डाव्या पायाच्या आंगठ्याचे रहस्य' हे पुस्तक घेतले आणि नानांनी 'भारत की नवरंगी नारियाँ' ही किताब व 'धनुर्धारी' घेतला. प्रवासात हिंदीचा अभ्यास करण्याची फार दिवस त्यांची इच्छा होती. 'धनुर्धारी'त वृषभ राशीचे भविष्य गेल्या आठवड्यातले होते तस्से आहे हे पाहून त्यांना वाटणारे आश्चर्य तारखेवरून नजर फिरवल्यावर मावळले. गेल्या आठवड्याचा 'धनुर्धारी' त्यांच्या गळ्यात बांधला गेला होता. त्याबद्दल त्यांनी स्टॉलवाल्याशी हिंदीत तक्रार करायचा यत्न केला, त्यावर "अजून गेलाच आठवडा चालू आहे" असे त्या स्टॉलवाल्याचे उत्तर आले. 'गोदीस पत्रा'त स्टेशनवरच्या

वर्तमानपत्रवाल्यांवर वक्रोक्तिपूर्ण लेख लिहिण्याचा निश्चय करून त्याचा सूड घ्यायचे त्यांनी ठरविले. कारण 'पिक्चर पोस्ट' नावाच्या इंग्रजी मासिकात पोस्टाबद्दल एक ओळ नव्हती आणि अगदी माफक पोशाख केलेल्या मडमांची त्यात चित्रे छापून पोस्टखात्याचा अपमानही केलेला दिसत होता. काही काही मडमा तर अगदी अर्ध्या आण्याचा एवढासा स्टँप लावलेल्या बुकपोस्टाच्या कव्हरासारख्या उघड्या दिसत होत्या. हा सर्व पुरावा पाहत असताना "सोमनमास्तर, व्हर्न्याक्युलर साहेब आले—" असे पट्टेवाल्याने सांगितले. नानांनी दचकून मागे पाहिले. नम्र स्मित करीत एर्नाक्युलमसाहेबाला त्यांनी अभिवादन केले.

"वाई आर यू लॉयट्रींग हिअर?" अशा थाटात गाडीत जागा धरा अशी अधिकारी सूचना करीत साहेब गाडीच्या दिशेने गेला.

गाडीत सामानासुमानाची व्यवस्था करून आसन स्थिर झाल्यावर नाना 'गोदीस पत्रां'ची योजना डोळ्यांपुढे आणू लागले. 'चि० सौ० कां० गोदीस अनेक आशीर्वाद' हा मायना लिहिल्यावर तो केवळ 'इकडील सर्वत्रांचें क्षेम, आपणांकडील क्षेम कळवावें' छापाच्या पत्रांचा वाटला. पोस्टात नानांनी अनेक मायने वाचले होते. अगदी 'वज्रचुडेमंडित'पासून ते 'लाडके'पर्यंत मायने, 'पूज्य तात्या' ते 'तीर्थरूपांचे चरणीं' आणि 'चि० बंडूस आशीर्वाद'पासून 'बंडूराया'पर्यंतचे मायने त्यांच्या डोळ्यांपुढे नाचले. एकाएकी त्यांना 'बाळे गोदावरी' हा मायना सुचला. आणि पत्रवाङ्मयात अमर ठरू पाहणाऱ्या 'गोदीस पत्रें' ह्यांतील पहिले पत्र थोड्याच अवधीत लिहिले गेले.

प्रिय वाचकहो, प्रत्यक्ष पत्रांपूर्वीची ही प्रस्तावना लांबली याची आम्हांस नम्र जाणीव आहे. परंतु इतिहाससंशोधकाचे मुख्य कार्य निरनिराळ्या कमिट्यांच्या सभांस जाणे व प्रस्तावना लिहिणे हेच आता राहिले आहे हे आपणांसही पटावे. येथे राघूनानांच्या चरित्रातील भाग येणे अपरिहार्य आहे. हा सगळा भाग त्यांनीच आम्हांला निवेदिला. त्यातील प्रथम पुरुष काढून तृतीय पुरुषात तो आम्ही सांगितला, इतकेच.

शेवटी प्रिय वाचकांच्या हाती आमच्या संकल्पित सोमण-दप्तर, खंड पहिला ह्यातील वानगीदाखल काही पत्रे देऊन ही प्रदीर्घ प्रस्तावना संत कवी सखदेवाच्या (खि० पू० तीन वर्षे) भावुक वाणीने संपवितो.

*इये मराठीचिये नगरीं । पत्रविद्येचा सुकाळु करी ।*
*पत्र तापत्रयु हरी । भार त्याचा पोष्टयाशीं ॥* (म्ह० पोषण करणारास)

वाचकांचा पत्रानुबंधी
**म० म० अण्णुराव शेषराव मोगलगिद्दीकर**
अध्यक्ष
पत्रेतिहाससंशोधनधाम, हलकर्णी

*सोमण दप्तर—खंड पहिला, रुमाल क्रमांक वीस, पत्र क्रमांक एक :*

बाळे गोदावरी—

तुम्हां सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन काल टॅक्सीतून निघालो तो बोरीबंदरावर सुखरूपपणे येऊन पोहोचलो. जगात कुणालाही सोडून दूर जाण्याचे दुःख फार मोठे असते. त्याला संस्कृत वाङ्मयात विरह म्हणतात. तुझ्या आजीची मनःस्थिती 'बाळ जातो दूर देशा, मन गेलें वेडावून' अशी एका थोर कवीने वर्णन केल्याप्रमाणे झाली होती. जगात आईसारखी पवित्र वस्तू नाही. 'आई थोर तुझे उपकार' म्हटले आहे ते उगीच नाही. तुझी आजी कधीकधी माझ्याशी भांडण करताना तू पाहिले असशील. पण मांजरीची नखे पिलाला लागत नाहीत. 'आई म्हणोनि कोणी' ही कविता अगर 'नीज न ये तर गीत म्हणावें' हे अंजनीगीत[1] पाठ कर. पाठांतर आवश्यक आहे. आधुनिक शिक्षणात पाठांतर नाही हे फार वाईट. आमच्या वेळी औटकी-एकोत्री असले पाढेच काय, परंतु 'हवा थंड आहे बहू बेळगावीं!' वगैरे गीतांमुळे भूगोलही तोंडपाठ असे.[2] तात्पर्य, आई या विषयावरील कविता वाच म्हणजे आईची महती तुला कळेल. जगातील सारे श्रेष्ठ पुरुष मातृभक्त होते.[3] शिवाजीमहाराज जिजाईच्या पाया पडूनच अफझुलखानाला भेटायला गेले. त्याच-प्रमाणे मीही आईला नमस्कार करून टूरला निघालो.

टॅक्सीतून दहाबारा मिनिटांत मी बोरीबंदरवर आलो. आपल्या चाळीतून बोरी-बंदरचा रस्ता गिरगाव, कांदेवाडी, गायवाडी, झावबाची वाडी, धसवाडी, मुगभाट वगैरे उजव्या-डाव्या बाजूला टाकीत चिराबाजार, धोबीतलाव, कामा हॉस्पिटल, बॉंबे मुन्सिपाल्टीचे ऑफिस, बोरीबंदर ट्रामनाका—ह्या प्रकारे बोरीबंदरला येऊन पोहोचतो. कांदेवाडी, गायवाडी, धसवाडी, वगैरे नावांचा इतिहास मनोरंजक आणि उद्बोधक आहे.

आपण राहतो त्या भागाला खेतवाडी म्हणतात. भुते-खेते हा शब्दप्रयोग तू तुझ्या प्रेमळ आजीच्या तोंडून ऐकला असशील. पूर्वी मुंबईत वसती नव्हती तेव्हा ह्या भागात खूप भुते असावीत असे विद्वानांचे मत आहे.[4] खेते म्हणजे शेते. 'असतील शिते तर जमतील भुते' ही म्हण तुला ठाऊक असेलच. मागे कोकणातून

---

१. अंजनीगीत—हे प्रथम हनुमंताची माता अंजनी हिला उद्देशून मातृभक्त मारुती गायला असेल का? (अ० शे० मो०)

२. नानांचे शैक्षणिक विषयावरील हे मत चिंत्य नाही का? (अ० शे० मो०)

३. ह्या वाक्यापुढे 'तुझ्या आईवरून जाऊ नकोस.' असे एक वाक्य होते. ते नानांनी पोस्टाची शिक्क्याची शाई वापरून खोडलेले आढळले.

४. पाहा : भूतकालीन मुंबई, ले० केंजरे—उपाध्ये.

माझे चुलतभाऊ नरूकाका सोमण आणि त्यांची बायको व मुले आपल्या घरी आठ दिवस राहिली. त्या वेळी तुझ्या प्रेमळ आईने ह्या म्हणीचा फार वेळा उपयोग केला होता. असो. पुढे शेते नाहीशी होऊन तिथे आपल्या बटाट्याच्या चाळीसारख्या इमारती उठल्या. शेते संपल्यावर तांदूळ कुठून पिकणार? आणि तांदूळ नसल्यावर भाते कुठली आणि शिते तरी कुठली? शिते संपल्यावर भुते गेली आणि आपण तिथे राहावयास आलो. आपण जिथे राहतो त्या जागेचा, प्रांताचा, देशाचा इतिहास आपल्याला ठाऊक असावयाला पाहिजे.

आता आपले आडनावच घे. आपले आडनाव 'सोमण' हे कसे आले असेल? शब्दांचा उगम आणि विकास पाहणे आवश्यक आहे. निरनिराळे शब्द कसे आले असतील? अनेक भाषांतून आपण शब्द उसने घेतो. आणि मग ते आपले म्हणून ठेवतो. तुझ्या आईच्या स्वयंपाकघरातच पाहा ना! आपण समेळकाकींची चाळणी, दादा गदऱ्यांचा आडकित्ता, जानकीकाकूंची किसणी आता आपलीच म्हणून नाही का वापरीत? आणि तीही मंडळी त्याबद्दल काही बोलत नाहीत. तसेच इतर भाषांतले शब्द आपण मराठीत घेतो त्याबद्दल कोणी बोलत नाही. परंतु इतर लोकही आपले शब्द घेतात. उदाहरणार्थ, 'पोस्ट' हाच शब्द घे. पूर्वी पोस्टाला टपाल किंवा डाक म्हणत. पुढे डाकवाले होळीदिवाळीला 'पोस्त' मागत हिंडू लागले, तेव्हा त्यांना 'पोस्तवाले' म्हणू लागले. आणि पोस्तवाले जिथे काम करतात ते पोस्त ऑफिस. इंग्रजांना 'त'चा उच्चार येत नाही. 'तुला'च्या ऐवजी 'टुला' व 'तुम्ही'ला ते 'टुमी' म्हणतात, त्याप्रमाणे 'पोस्ता'चे त्यांनी 'पोस्ट' केले.[५]

ह्यावरून आपले आडनाव सोमण हे कसे आले असेल बरे? सोमण. सो म्हणजे हिंदीत शंभर आणि मण म्हणजे मण. आपण मूळ कोकणातले. रत्नागिरी जिल्ह्यात मेणचवली नावाचे आपले मूळ गाव आहे. हे गाव व घराणे इतिहासप्रसिद्ध. भट आणि भानू घराण्यांचे मूळ पुरुष पुण्याला येताना मेणचवलीला एक रात्र राहिले होते असा उल्लेख आहे.[६] इतकेच नव्हे, तर भटांना उपरणे नव्हते ते आपल्या सोमणांच्या मूळ पुरुषाने दिले आणि भानूंच्या पगडीच्या झिरमिळ्या निसटल्या

५. श्री० राघूनानांची ही व्युत्पत्ती आम्हांस पटत नाही. पोस्ट हा शब्द टपाल ह्या शब्दावरून आला आहे. पाहा : टपाल > लपाट (वर्णविपर्यय होऊन) > पलाट (पुन्हा वर्णविपर्यय) > पआट > पओट > पोट > पोअट > पोचट > पोसट>पोस्ट>पोष्ट. प्रा० उपकरणी यांनी 'शाब्दिक औद्गम्य आणि तद्विषयक आभ्यासिक औदासीन्य' ह्या ग्रंथात 'प्रापंचिक परिभाष्य' ह्या प्रकरणात चार्चिक वैवेचन्य केले आहे त्यात 'पौष्टिक' नावाचे उपप्रकरण आहे. त्यात वरील औपपत्तिक आणि व्यौत्पत्तिक नैष्कर्ष्याप्रत ते आले आहेत. (अ० शे० मो०)

६. पाहा : सोमण-दप्तर, रु० ३, क्र० ६, खं० ३.

होत्या आणि कोक मोडली होती हे पाहून आपले पागोटे त्यांस बहाल केले. ह्यावरून सोमणांची परिस्थिती त्या वेळी चांगली असावीसे वाटते. याला कारण शंभर मण येणारे धान्य. शंभर मण धान्य ज्यांच्या घरी येते ते सोमण. ज्याप्रमाणे ज्याच्या पूर्वजांच्या घरी नऊ लाख रुपये होते ते नवलाखे, दहा मुले होती ते दशपुत्रे, सात होती ते सातपुते आणि बारा होती ते बारपुते. काहींचे मत आपले मूळ नाव 'सुमन' आणि सुमनाचे सुमण व पुढे राघूचे राबोबा होते त्याप्रमाणे सुमणाचे सोमण. उलट, काही लोक म्हणतात की, आपल्या पूर्वजांनी यज्ञात सोम पिण्याचा उच्चांक गाठला, त्यामुळे त्यांना यज्ञात नेहमी आता 'सोम न' म्हणजे सोम नाही असे सांगण्याची पाळी येत असे, त्यावरून सोमन; पुढे त्याचे सोमण झाले.

नावांप्रमाणे गावांचाही इतिहास असतो. आपल्या भारतात सात लाख लहानमोठी गावे आहेत. काही गावांत पोष्टे आहेत, काही ठिकाणी नाहीत. काही ठिकाणी तारऑफिसे आहेत. ह्या पत्रात एवढेच पुरे. आपण कोण आहोत हे कळणे आवश्यक आहे, म्हणून तुला स्थूलमानाने आपला इतिहास सांगितला. पुढल्या पत्रात माझ्या प्रवासातील गंमती लिहीन.

तुझ्या आ[७]...

तुझा
**राघूनाना**

ता० क० मी पुण्यास सुखरूप पोहोचलो असे सर्वत्रांस सांगावे.

### पत्र क्रमांक दोन :

बाळे गोदावरी—

आपल्या देशातील सर्व माणसांच्या तऱ्हा एकदम पाहावयाच्या असतील तर बोरीबंदर स्टेशन पाहावे. तू बोरीबंदर स्टेशन पाहिलेले तुला आठवते का? एकदा आपण स्वातंत्र्यदिनाचे दिवे पाह्यला गेलो होतो. त्यावेळी व्हिक्टोरियात टप उघडा टाकून बोरीबंदरापर्यंत गेलो नव्हतो का? बोरीबंदरजवळ एके काळी शेकडो

७. इथून पुढला सारा मजकूर खोडला आहे. 'आजीला नमस्कार' ही अक्षरे लागतात. आईला—म्हणजे स्वत:च्या पत्नीला—नमस्कार की आशीर्वाद, काय लिहावे, ह्या दुग्ध्यात पडल्यामुळे सर्वनाशे समुत्पन्ने ह्या न्यायाने आपल्या स्वत:च्या आईचाही नमस्कार नानांनी खोडून काढला असावा. ह्यावरून पत्रलेखकाचा धूर्तपणा दिसत नाही का? त्याबरोबर स्त्रीस्वभावाचे सूक्ष्म ज्ञानही? (अ० शे० मो०)

व्हिक्टोरिया उभ्या राहत असत म्हणून त्यास व्हिक्टोरिया टर्मिनस असेही म्हणतात. टर्मिनस शब्दाचा अर्थ तुला डिक्शनरीत मिळेल. शब्दांचे अर्थ डिक्शनरीतून पाहण्याची सवय ठेव.

बोरीबंदर स्टेशन फारच भव्य आहे. इथे अनेक प्लॅटफॉर्म आहेत. नाना देशचे नाना लोक इथे दिसतात. काही म्हातारे, काही तरुण, काही म्हाताऱ्या, काही तरुणी, सगळे जण गाडी पकडण्याच्या घाईत ! आपल्या भारतवर्षातील सारी माणसे जर अशा एका ध्येयाने प्रेरित झाली तर बोरीबंदरवरील प्रवाशांप्रमाणे जो-तो आपल्या नादात राहून दुसऱ्याच्या भानगडीत पडणार नाही. ह्या स्टेशनावर अनेक प्लॅटफॉर्म आहेत. त्यांतून आपली गाडी कुठून सुटणार हे शोधून काढणे फार अवघड असते. पण मी आणि माझ्या पट्टेवाल्याने गाडी शोधून काढली.

गाडीत खूपच गर्दी होती. एकूण आपल्या देशात लोकसंख्याच फार, त्यामुळे कुठेही गर्दीच असते.

मी ज्या डब्यात बसलो आहे, तिथे जणू अखिल भारतीयांचे संमेलनच भरले आहे. माझ्यासमोरच्या बाकावर एक मद्रासी जोडपे बसले आहे. मुंबईत तू मद्रासी पाहिले असशील. मद्रासी लोक मद्रास प्रांतातून आले. त्यांचे मुख्य अन्न भात व सारम. हे जेव्हा खात नसतात तेव्हा बोलत असतात, व बोलत नसतात तेव्हा खात असतात. ह्यांचा मुख्य व्यवसाय शॉर्टहॅंड टायपिंग. ह्या कामात त्यांचा हात धरणारे जगात कोणी नाहीत. काहीकाहींची ह्या कामातील गती विलक्षण असते. माझ्या समोरच्या मद्रासी बंधूची मी ह्या बाबतीत तारीफ केल्यावर त्याने मला बरोबरच्या पितळी भांड्यातून कॉफी दिली. कॉफी हे त्यांचे मुख्य पेय. सुप्रसिद्ध तामीळ कवी एम० पी० टी० एस० आर० मुक्तकंठय्या बाळगणपथी म्हणतो,

*हे प्रभो, मला स्वर्ग नको—तिथे कॉफी नसेल !*
*मला नंदनवन नको—तिथे दाक्षिणात्य संगीथसभा नसेल !!*
*आता तुझी इच्छाच असेल तर मला चित्रगुप्ताच्या कचेरीत नेम !!!*
*कारण तिथेच माझे सारे मद्रबंधू भेटतील !!!*

बाळे गोदावरी, केवढा हा प्रांताभिमान ! मद्रासकडल्या बायका आपल्या मराठी बायका आरशात दिसतात तशा उलट्या दिसतात; पण त्या तशा नसतात बरे ! माझ्या समोरचा मद्रासी पोण्णुस्वामी आणि त्याची सुविद्य पत्नी हिरण्याक्षीसरस्वथी ही दोघेही पाचप्पा कॉलेजमधून ग्रॅज्युएट झाली आहेत. पोण्णुस्वामीची माटुंग्याला 'पापडम मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' आहे. पोण्णुस्वामीच्या मागल्या बाजूला एक मुसलमान कुटुंब बसले आहे. मुसलमान लोक अल्लाउद्दिन खिलजीबरोबर महाराष्ट्रात आले. आपले मुसलमानांच्याबद्दल अनेक गैरसमज आहेत, विशेषतः त्यांच्या खाण्यापिण्याबद्दल. पण गोदूताई, आमच्या डब्यातला मुसलमान आणि त्याचे कुटुंब

बटाटेवडे खात होते. अर्थात बटाटेवडे खाणारा मुसलमान मीही प्रथमच पाहिल्यामुळे उकडलेल्या रताळ्याची भाजी खाणाऱ्या आणि शेळीच्या ताटात जेवणाऱ्या सर्कशीतल्या वाघाची मला आठवण झाली. कारण त्यांच्या शेजारचा गुजराथी-शेटजी त्यांना आग्रह करकरून खायला घालीत होता. आपण गैरसमजाने उगाच एकमेकांचा द्वेष करतो. वास्तविक आपणही बटाटेवडे खातो व तेही खातात. शिवाय त्या मुसलमान गृहस्थाची बायको सारखी नवऱ्याशी भांडत होती आणि तो निमूटपणे ऐकत होता, हेही साम्य पाहण्यासारखे होते असे तुला वाटत नाही का?

ह्याशिवाय डब्यात दोन शीखही होते. शीख धर्म नानकाने स्थापन केला. ह्या धर्मातील बरेचसे लोक लष्करात आहेत. जे लष्करात नाहीत ते ट्रक किंवा टॅक्सी चालवतात. बाकीचे सुतार आहेत. ह्यांपैकी काहीच न करणारे एक तर पुढारी होतात व निरनिराळी दले काढतात किंवा हार्मोनियम तयार करण्याचे दुकान काढतात, असे माझ्या गाडीतील शीखबंधूंनी मला सांगितले. त्यांच्या नावापुढे सिंग असा शब्द असतो. रणजितसिंग, बलदेवसिंग इ० इ०. (आम्हांला वाटेत रिव्हरसिंग स्टेशन दिसले. ते शीख सरदारजीच्या नावानेच बांधले आहे, असा माझ्या डब्यातील शीखबंधूंचा आग्रह होता.)

...दादरनंतर गाडी पारसिकच्या बोगद्यात शिरली. ह्या मार्गाने पारसी लोक हिंदुस्थानात आले नसतील का?—अशी एक शंका माझ्या मनाला चाटून गेली. शेजारीच एक गृहस्थ व त्यांचे मित्र येऊन बसले होते. त्यांच्या हातातील, पिशवीतील व बकोटीतील ग्रंथांवरून ते लेखक अगर बुकसेलर असावेत अशा समजुतीने मी त्यांस हा प्रश्न विचारला. त्यांनी तो बोगदा पारसी कॉंट्रॅक्टरने बांधल्यामुळे त्याचे पारसीक हे नाव पडले असावे, अगर हा बोगदा बांधणारे मजूर फार सीक पडले असावे, किंवा ह्या डोंगरात पूर्वी परीस सापडत असावा व त्याचे भाववाचकात्मक रूप पारसीक असावे, अगर पारसीक हे त्या डोंगराचे नाव असावे, असा त्यांचा अंदाज असल्याचे सांगितले. ह्या उत्तरावरून महाराष्ट्रातल्या कुठल्या तरी सखोल विद्वानाबरोबर मी बोलत आहे याची मला लगेच जाणीव झाली आणि काही वेळाने त्यांची-माझी ओळखही झाली. ह्यांचे नाव प्रोफेसर चक्रदेव. ह्यांच्याबद्दल पुढील पत्रात अधिक माहिती लिहीन.

पारसिकच्या बोगद्यानंतर कल्याण, कर्जत, वगैरे स्टेशने लागून घाट सुरू झाला. 'आला खंडाळ्याचा घाट, तेथें गाडी झाली ताठ' ही गाण्याची ओळ तू ऐकली असशील. तोच खंडाळ्याचा घाट. कर्जतला गाडीच्या मागेही इंजिन लागते. घाटात चढण असल्यामुळे एका इंजिनला गाडी ओढवत नाही म्हणून दोन इंजिने लावतात. वास्तविक ही दोन्ही इंजिने पुढेच लावली पाहिजेत. नाही तर पहिल्या इंजिनाला पुन्हा दुसऱ्या इंजिनाचा बोजा नाही का होणार?

पण हा साधा विचार आपल्या लोकांना सुचत नाही. मी हा प्रश्न तिथेच उभ्या

असलेल्या एका रेल्वेतील पोर्टरला विचारले. तो म्हणाला, "पूर्वीपासून ही अशीच रीत आहे." आपला देश किती रूढिप्रिय आहे पाहा. काही वेळाने घाटातील सुंदर वनश्री पाहत पाहत आम्ही खंडाळ्याला आलो. हे थंड हवेचे ठिकाण आहे. इथे बरेच श्रीमंत लोक थंड हवा खायला येतात. येथे स्टेशनवर फिरायला आलेली मंडळी पाहून ह्यांनी खूपच थंड हवा खाल्ली असावी असे वाटले. मीही स्टेशनवर उतरून थोडीशी थंड हवा आणि करवंदे खाल्ली. "करवंदे हा महाराष्ट्राचा मेवा" असे प्रो० चक्रदेव म्हणाले व त्यांनी एक करवंद खाल्ले. एकाहून अधिक करवंदे त्यांस पचत नाहीत, म्हणाले. इथून पुढे बराच काळोख पडत गेला. त्यामुळे पुढली वनश्री दिसली नाही. लोणावळ्यानंतर खडकी आली. पुढे शिवाजीनगर आणि मग पुणे!

साहेबांचे बोलावणे आल्यामुळे पत्र संपवतो. आधी कर्तव्य केले पाहिजे.

तुझा

**राघूनाना**

*पत्र क्रमांक तीन :*

बाळे गोदावरी—

गेल्या पत्रात मी तुला पुण्याला पोहोचलो येथपर्यंत लिहिले होते. पुण्याचे संपूर्ण वर्णन लिहिण्यापूर्वी गाडीत भेटलेल्या प्रो० चक्रदेवांसंबधी लिहिणे मला आवश्यक वाटते. महाराष्ट्रात हाताच्या बोटांवर मोजण्याइतके जे विद्वान आहेत, त्यांपैकी प्रो० चक्रदेव हे आहेत असे त्यांच्याबरोबर असलेल्या त्यांच्या शिष्याने मला सांगितले. प्रो० चक्रदेवांबद्दल असे सांगणारे कोणीतरी शिष्य नेहमी त्यांच्याबरोबर असतात, असे नंतर मला कळले. साडेचार ते पावणेपाच फूट उंचीचे, पोक आलेले व बरेचसे दात पडलेले व उरलेले पडायला आलेले हे गृहस्थ मला, का कोण जाणे, परंतु म्युनिसिपालिटीच्या सॅनिटरी खात्यात असावेत असे वाटले. कारण ते जाडजाड ग्रंथ वाचताना "घाण आहे, घाण आहे!" असे उद्गार काढीत होते. मधूनच त्यांचा शिष्य श्री० हणमंते त्यांना काहीतरी विचारीत असे व चक्रदेव त्याला "तो ना? छे—घाण आहे!" असे सांगत. सर्वत्र घाण पाहणारा सॅनिटरीखात्याशिवाय अन्यत्र कुठे दिसणार सांग बरे? त्यांच्या हातात मात्र लठ्ठलठ्ठ ग्रंथ होते. एकेका ग्रंथाची रजिस्टर्ड बुकपोस्टे करायची म्हटली, तरी पाच-पाच रुपये पोस्टेज बसले असते. मधूनमधूनच ते चार काळ्या मनुका व अर्धा बदाम खात. याशिवाय त्यांना अधिक काही पचतच नाही म्हणे. एवढेसे खाद्य न पचवू शकणाऱ्या माणसाला एवढे ज्ञान कसे पचत असेल अशी मला शंका आली. त्यातून जगातील सर्व विषयांचा त्यांचा अभ्यास आणि सर्व विषयांवर त्यांचे 'मौलिक' (हा शब्दही त्यांच्या शिष्यानेच

मला सांगितला.) विचारांनी युक्त असे वाङ्मय आहे म्हणे. केल्याने देशाटन पंडितमैत्री, सभेत संचार, इत्यादी फायदे सांगितले आहेत, त्यांपैकी पंडितमैत्री तर झाली. आता पुण्यालाच जातो आहे तेव्हा सभेत संचार होईलच.

प्रो० चक्रदेव यांनी कल्याण ते पुणे एवढ्या प्रवासात मला संगीतापासून कंपोस्ट खतापर्यंत सर्व विषयांवर मौलिक विचार सांगितले. त्यांचा शिष्य हणमंते त्यांतील प्रत्येक विधानाला पुष्टी देत होता. प्रो० चक्रदेव म्हणाले, "महाराष्ट्रातील सर्व विद्वान मूर्ख आहेत", की हणमंते म्हणे, "महामूर्ख!" आम्ही पोस्टात येणाऱ्या प्रेमपत्रा-पासून (घाबरू नकोस, बाळे गोदावरी) नॉटपेड पत्रापर्यंत प्रत्येकावर निर्विकार मनाने शिक्के हाणून पोस्टाची सुंदर तिकिटे जशी काळीवेंधळी करून टाकतो त्याप्रमाणे हिंदुस्थानातील प्रत्येक लहानथोर व्यक्तीबद्दल प्रो० चक्रदेव आपल्या मौलिक पद्धतीने बोलत होते. आमचा हा सुखसंवाद (म्हणजे संवादाचे सुख तेच घेत होते, मी आपला तोंड मिटून ऐकत होतो.) पुण्यापर्यंत अव्याहत चालला होता. डब्यातील मंडळी आळीपाळीने आपणास त्रास होतो असे दाखवीत होती; परंतु चक्रदेव प्रोफेसरांना त्याचे काहीच नव्हते.

बाळे गोदावरी, त्यांच्या मुखावाटे उडणारे ज्ञानाचे कण मी सारखा झेलत होतो. त्यांच्या मौलिक मते महाराष्ट्रात अजून महापुरुष जन्माला आला नाही. मी भीतभीत ज्ञानेश्वराचे नाव घेतले. त्यावर "हंः! रेड्याच्या तोंडून वेद वदवले म्हणून काही माणूस महापुरुष होत नाही!" असे ते म्हणाले. हणमंत्यांनी मला कानात प्रो० चक्रदेवांनी एका डुकराच्या तोंडून स्वतःची कादंबरी वदवली होती असे सांगितले. रेड्याच्या तोंडून वेद वदवण्यापेक्षा डुकराच्या तोंडून कादंबरी वदवणे किती अवघड आहे, नाही का बाळे गोदावरी? आणि पुढे ह्या कादंबरी वदणाऱ्या डुकराचा एका अस्वलीशी राक्षस की कसला विवाह झाला म्हणे! ऐकावे ते नवलच नाही का गोदूताई?

"आपणासारखा साक्षात श्रीकृष्णद्वैपायन ह्या महाराष्ट्रात असताना महाराष्ट्रात महापुरुष नाही, असे आपण कसे म्हणता?" असे त्यांस मी विनम्रभावाने विचारले. त्यावर त्यांनी दोन्ही नाकपुड्यांच्या खाली भुऱ्या कांबळीचा तुकडा कापून ठेवल्या-सारख्या आपल्या मौलिक मिश्यांतल्या मिश्यांत हसतहसत दोन मनुका आणि एक बदाम माझ्या हातावर ठेवून मला गप्प केले. बाळे गोदावरी, हा विनय पाहू म्हटले तरी हल्ली मिळत नाही.

"असा एक महापुरुष महाराष्ट्रात नुकताच होऊन गेला. परवाच तो रवी आकाशाला सोडून गेला. त्याच्या प्रेतयात्रेलादेखील पुरेशी माणसं नव्हती." शक्तीच्या मानाने येईल तितका त्वेष आणून चक्रदेव म्हणाले.

"आपण गेला असाल?"

"नाही! दुर्दैवानं त्याच दिवशी मला एका भगिनीसमाजात नृत्यस्पर्धांचा परीक्षक

म्हणून जायचं होतं. शिवाय प्रेतयात्रेला जावं लागेल ही आधी मला कल्पना नव्हती—" खिन्नपणाने चक्रदेव म्हणाले.

वाटेतल्या घाटांतील दगडादगडाचा इतिहास चक्रदेवांना ठाऊक होता. हिमालयाच्या उंचीपासून हमीदाबानूच्या वजनापर्यंत सारे आकडे त्यांना मुखोद्गत होते. त्यांची मधाची उदासीनता जावी म्हणून मी विचारले,

"समर्थांबद्दल आपलं काय मत आहे?"

"हं! नारायण ठोसर!!" असा तुच्छतापूर्ण उद्गार काढून त्यांनी एक मनूक तोंडात टाकली.

तेवढ्यात "दासबोधापेक्षाही श्रेष्ठ असा प्रो० चक्रदेवांचा 'उदासबोध' नावाचा ग्रंथ वाचून काढा" अशी हणमंतरावांनी मला शिफारस केली आणि लगेच पिशवीतून एक प्रत काढून मला दिली. त्यावर मी प्रो० चक्रदेवांची स्वाक्षरीही घेतली. पुण्याला उतरता उतरता श्री० हणमंत्यांनी माझ्याकडून पुस्तकाच्या किंमतीचे साडेतीन रुपये वसूल केले. हा ग्रंथ वाचल्यावर त्यासंबंधी तुला लिहीन. तत्पूर्वी पुण्याला उतरल्याबरोबर माझ्या मनात ज्या भावना आल्या त्या लिहितो.

पुण्याला पाय लागल्याबरोबर मला अगदी उचंबळून आले. सारा इतिहास डोळ्यांपुढे उभा राहिला—नव्हे, घोडदौड करू लागला. तो शनवारवाडा, तो गायकवाडवाडा, तो पंतांचा गोट, जिथे आपले थोर पूर्वज नांदले, त्यांच्या वास्तूंचे केव्हा एकदा दर्शन घेईन असे मला झाले. पर्वती, गुलटेकडी, वगैरे निसर्गरम्य स्थळे न पाहता डोळ्यांपुढे नाचू लागली, आणि एका अननुभूत भावनेचा संचार माझ्या अंगात झाला. क्षणभर आपण काळाच्या पोस्टल व्हॅनमध्ये बसून इतिहासाच्या डी० एल० ओ०मध्ये संचार करू लागलो आहोत असे वाटले. तेवढ्यात टांगेवाल्याने "एक स्वारी सिटीपोस्ट" म्हणताच मी टांग्यात केव्हा बसलो हेदेखील मला कळले नाही. लढाया संपल्या, पण स्वाऱ्या शिल्लक राहिल्या आहेत, बाळ. ऐतिहासिक परंपरा टिकून राहते ती अशी. मुंजाबा गेला, पण बोळ राहिले. पंतसचिव गेले, पण पिछाडी राहिली. डोळ्यांपुढून सारे शिलेदार, बारगीर घोडे उडवीत गेले. त्या सायकली नव्हत्या, ती भीमथडीची अटकेवर पाणी प्यालेली तट्टे होती. त्या तांबड्या बसगाड्या नव्हत्या, लाल झूल टाकलेले ते मस्त हत्ती होते. सोन्यामारुतीपुढून बावनखणीला डावी घालून टांगेवाला निघाला, तेव्हा आसपासच्या हॉटेलांतून ऐकू येणारी गीते ही गीते नव्हती, होनाजी आणि बाळाच्या काळातल्या बावनखणीच्या बावनही खणांतून खणखणणाऱ्या त्या लावणीच्या ललकाऱ्या होत्या! वाटे, पुढल्या बुधवार चौकाच्या नाक्यावर वाड्यावरची गुप्त मसलत आणि पंगत आटोपून लगबगीने निघालेला सखारामबापू बोकील तर भेटणार नाही ना मला? अंगावरून मोटारसायकल गेली आणि वाटले, दिल्लीचे तख्त फोडल्याची बातमी घेऊन आलेला घोडेस्वार असाच तुफान दौडत नसेल का आला? 'भवानी पेठेत खून' असा मथळा ओरडत

चाललेल्या पोऱ्याच्या हैराण आरोळ्या ऐकून वाटले, नारायणरावाच्या खुनानंतर गावात असाच गदारोळ नसेल का उठला ? मला माणसे ऐतिहासिक दिसू लागली. कुणी मिशीवाला गेल्यास तो नरवीर तानाजी वाटून त्याची घोरपड पाहू लागलो, तो त्याची बायको मागून जाताना आढळे ! समोरून एक वरात आली. (बाळे गोदावरी, पुण्यात कुठल्याही महिन्यात वरातीची मिरवणूक आढळते.) वाटले, की छत्रसालाला संकटातून सोडवून मस्तानीला घेऊन येणारा बाजीराव असाच नसेल का मिरवत आला ? पण माझे हे स्वप्न हळूहळू भंगू लागले. जिथे गाईब्राह्मणांना मुक्तहस्ताने अन्नदान चाले, तिथे 'गेस्ट हाऊस' आणि त्याचे ठळक अक्षरांतले दर दिसले. मनिऑर्डरच्या अपेक्षेने जावे आणि व्ही० पी० हाती यावी अशी अवस्था झाली. जिथे मेण्यांतून पालखीपदस्थ मिरवले तिथे बसच्या रांगा पाहिल्यावर अपुरे स्टँप लावलेले अपराधी लिफाफे ओळीने मांडून ठेवल्यासारखा भास झाला. ज्या तांबटआळीत पाचपाचशे ब्राह्मणांचा साखरभात एका वेळी शिजणारी, विराटाघरच्या मुदपाकातील पातेल्यांच्या प्रचंड आकाराची पातेली घडावीत तिथे ॲल्युमिनियमचे टिफिन-कॅरिअर पाहून "हाय, गे पुण्यनगरी ! !" असा हंबरडा फोडावा असे वाटले मला !

बाळे गोदावरी, कालाय तस्मै नमः ! आपण महाराष्ट्रीय म्हणवतो, पण आता अभिमान धरायचा कसला ? ज्या परमपवित्र, परमपुण्यशील गो० ब्रा० प्र० पा० क्ष० कु० व० छ० शिवाजीमहाराजांनी भोसल्यांच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करून पुण्याला महाराष्ट्राचीच काय पण जगाची राजधानी केले, त्या पुण्यात, माझ्या प्रिय मुली, मी भोसले कोल्ड्रिंक हाऊस पाहिले, आणि माझ्या छातीत कडकट्ट-कडकट्ट-कट्ट कट्ट-कडकट्ट अशी धडधड सुरू झाली, आणि अशा धडधडत्या अंतःकरणाने मी सिटी पोस्टाच्या आमच्या उतरण्याच्या खोलीत प्रवेश केला. एर्नाक्युलमसाहेब रास्ता पेठेत आपल्या कुणा नातलगाकडे उतरल्यामुळे त्यांच्यासाठी केलेली सोय मला उपयोगी पडली. व्यवस्था उत्तम आहे. पुणेकर चांगली सोय करतात असे मी ऐकले व वाचले होते, त्याचे प्रत्यंतर आले.

व्यथित अंतःकरणाने तुझ्या आईने दिलेली पोळी आणि बटाट्याची भाजी खाऊ लागलो. भाजी जराशी लागली होती. ती पट्टेवाल्याला दिली. गोदूताई, दानाचे पुण्य मोठे आहे.

माझी प्रकृती उत्तम आहे. इथे थंडी खूप आहे. तुझ्या आईने विणलेला स्वेटर माझ्या गळ्याखाली जात नाही; तो कानटोपीसारखा घालून मी झोपलो. पण स्वेटरपेक्षा कानटोपीनेच थंडी अधिक जाते असे तुझ्या प्रेमळ आईस सांगावे. मी मुंबईस आल्यावर ती टाके ढिले करीलच.

तुझा

**राघूनाना**

पत्र क्रमांक चार :

बाळे गोदावरी—'

गेल्या दोनतीन दिवसांत तुला पत्र लिहावयाला अजिबात फुरसत सापडली नाही. आमचा एर्नाक्युलमसाहेब फारच कडक आहे. त्याने कामाचा सपाटा चालवला आहे. त्यामुळे गेले दोन दिवस मला अगदी डोके वर काढता आले नाही. वर्तमानपत्रांतील स्थानिक आणि परस्थ कार्यक्रमांच्या नुसत्या याद्या वाचून ह्या पुणे शहरात होणाऱ्या ज्ञानोपासनेची कल्पना आली. इथे ज्ञानरवी नुसते तळपत आहेत. सहज म्हणून पाहिले, तो एका दिवशी बावीस ठिकाणी बावीस व्याख्याने होती. म्हणजे बावीस व्याख्याते, बावीस अध्यक्ष आणि एका दिवशी बावीस व्याख्यानांना ह्या पुण्यात श्रोतेही मिळू शकतात, हीच ह्या पुण्यनगरीची महती होय. शौनक व्याख्यानसत्रात 'तैत्तिरीयांतील तितिक्षा', याज्ञवल्क्य वाग्यज्ञात 'ब्राह्मणांचें यज्ञोपवीत आणि पारशांची कस्ती' ह्यांचा तौलनिक अभ्यास, बाल हनुमान मंडळात 'फॅमिली प्लॅनिंग अर्थात कुटुंबनियोजन', रास्तापेठ भगिनीमंडळात 'रायफल कशी चालवावी?', पी० डब्ल्यू० डी० पेन्शनर्स प्रोग्रेसिव्ह ग्रूपमध्ये 'ऋग्वेदकालीन ओव्हरसिअर्स', श्रीशिवाजी मराठा संघात 'मराठेशाही कोणी बुडविली?' यावर चर्चा, महाराष्ट्र क्लबाच्या मैदानावर प्रातिनिधिक भेळवाल्यांची परिषद आणि 'महाराष्ट्राचा आद्य भेळवाला कोण?' यावर रोकडोबा भेळवाले यांच्या अध्यक्षतेखाली 'परिसंवाद', इतिहाससंशोधन मंडळात 'पुण्यातले हौद पुन्हा उकरावेत का?' ह्यावर वादविवाद —असे नाना ठिकाणी वाद, चर्चा आणि व्याख्यानांचे कार्यक्रम होते. दुर्दैवाने यांपैकी कुठेही मला जाता आले नाही. ज्ञानोपासनेत थोडासा तरी आपला भाग असावा म्हणून मग शेवटी मी प्रा० चक्रदेवांचा 'उदासबोध' वाचावयाचे ठरविले.

जगात हसणे हा सर्वांत मोठा गुन्हा आहे, असे त्यांचे मत त्यांनी प्रस्तावनेच्या पहिल्या वाक्यातच लिहिले आहे.

त्यांची पहिलीच ओवी पाहा :

*विनोदें सर्व बुडालें । विनोदें सारें हारपलें*
*विनोदमात्रें नष्ट झालें । औदासिन्य जगाचें ॥*

'औदासीन्य' हाच प्राणिमात्रांच्या जीवनाचा स्थायिभाव आहे असे ते म्हणतात. "इहलोकीं खालीं पाहोनि चालावें। खालीं पाहोनि बोलावें।" असे सांगून त्यांनी उदासलक्षणे सांगितली आहेत :

*बोले तैसा चाले । त्यामाझारीं काय साधिलें?*
*एक बोले दुजें चाले । ह्या नाम उदासू ॥*

*चकोटीस बांधिजे पोथी । अपचन असावें पोटीं*
*त्यांतूनि लेखनकामाठी । निपजैल कीं ॥*
*ऐशा लेखनकामाठीला । अहंपणाचा उमाळा*
*त्यांतु नसावा जिव्हाळा । चुकोनीहि ॥*
*आपणांवांचोनि जगतीं । दुजा लेखकू नये चित्तीं*
*आपणांतचि बृहस्पति । सदा सर्वदा देखावा ॥*
*कुणीं कुणास म्हणतां चांगलें । आपुलें मत असावें निराळें*
*त्यावांचोनि तुंबळें । वादरणें न माजती ॥*
*न माजतां वादरण । कुणीं कवणा जावें शरण*
*बोलाचा घाव बोलाचें मरण । तेथें कासया भ्यावें गा ॥*
*भल्याभल्याची उडवावी पगडी । जाणत्यांची पाठ उघडी*
*दिसतां चावावें घडिघडी । पलंगडींत मत्कुण कीं ॥*
*वाघ होवोनि दृष्टि न यावें । मत्कुण होवोनि लपावें*
*चिरडितां चिरडूनि घ्यावें । चिरडिता[८] दुर्गंधी भोगतो ॥*



ह्याशिवाय काही व्यावहारिक सूत्रेही सांगितली आहेत :

*सभास्थानीं विलंबें जावें । कारणाविण खुस्पट काढावें*
*अपमानित झालों मानावें । टीकालेख साधण्या ॥*
*टीकालेखाचीं साधनें । ऐशा वृत्तीनें संपादणें*
*उदास संपादक धरणें । तदनंतर हाताशीं ॥*
*उदास-पंथी बहुत असती । त्यांची धरावी संगती*
*लेख छापोनि द्रव्य देती । हेंही नसे थोडकें ॥*
*कुठें जन संगीतीं दंग । तेथें चोरोनिया अंग*
*हळूच करावें मृदंग । कोरतां आल्यासि पहावें ॥*
*मग जन अवघा चिडतो । उदासासि हांकून देतो*
*अलगद वा फेकतो । मार्गावरी नेमका ॥*

अशी निरनिराळी सूत्रे सांगताना उदासपंथीयांचा मेळावा जमविण्याविषयी काही ओव्या आहेत :

*उदास तितुका मेळवावा । उदासधर्म वाढवावा*
*असमर्थांचा मेळावा । दिठीं पडतां संतोसू ॥*
*असंतुष्टांचें माजवावें बेट । परि संतुष्ट ठेवावा शेठ*
*ना तरी लेखनाचा 'रेट' । बघतां बघतां घसरेल बा ॥*

---

८. चिरडणारा ह्या अर्थी. (अ० शे० मो०)

प्राध्यापकांचे हे मौलिक विचार वाचता वाचता मला केव्हा झोप लागली कळले नाही. सकाळी जागा झालो, तेव्हा पहिल्या डिलिव्हरीचे पोस्टमन निघूनही गेले होते.

तुझा

राघूनाना

*पत्र क्रमांक पाच :*

बाळे गोदावरी—

आज उठलो तेव्हा प्रकृती फारच बिघडल्यासारखी झाली होती. भलभलते विचार डोक्यात थैमान घालीत होते. काय झाले काही कळेना. जो दिसेल त्याला चावावेसे वाटू लागले. समोर 'सकाळ' पडला होता त्यात काही थोर पुढाऱ्यांचे फोटो होते. ते फाडावेसे वाटू लागले. तेवढ्यात एर्नाकुलमसाहेब आला. त्याच्या पायावर लोळण घ्यावीशी वाटू लागली. श्वानवत ही असली हराम वृत्ती आपणात कशी निर्माण झाली कळेना. वरिष्ठांशी आजवर अदबीने वागलो, पण लाळ घोटली नाही. सोमणांचे इमानी रक्त नसानसांत खेळते आहे.[९]

शेवटी एकाएकी उलगडा झाला. रात्री वाचलेल्या उदासबोधाचा हा परिणाम होता. खात्रीच झाली. तांबडतोब ते पुस्तक काढून फेकून दिले. त्या पुस्तकावरून ऑटोरिक्षा गेलेला पाहिला आणि समाधान झाले. तो ऑटोरिक्षाही पुढल्या नाक्यावर कोलमडला म्हणे. बाळे गोदावरी, अपचन झालेल्या आजाऱ्यांनी लिहिलेल्या लिखाणाचा पाहिलास कसा भयंकर परिणाम होतो! स्वच्छ स्नान करून पोस्टाजवळच्या, नुकत्याच रस्त्याच्या मधून उचलून नव्या देवळात बसवलेल्या गणपतिचौकातील गणपतीचे दर्शन घेतल्यावर बरे वाटले. गणपती ही विद्येची देवता आहे. गणपतिस्तोत्रात त्याला "गणानां त्वां गणपतिर्हवामहे कविः कवीणाम्" म्हटले आहे. गणांचा पती तो गणपती. कवी हादेखील एका अर्थाने गणमात्रांचा पती म्हणजे गणपतीच नाही का? मग गणपती हा शब्द त्या अर्थाने आला असेल का?[१०]

९. पाहा : सोमण-दप्तर, रु० क्र० चार, पत्र क्र० ५. पानिपतावर पेशव्यांच्या बरोबर दासो हरि सोमण मुदपाकात होते. "रोहिला मुदपाकांत घुसला. दासो हरि बुंदी पाडीत होता त्यास जिवें मारूं गेला. देहापासून हात तुटला परंतु हातांतून झारा सुटला नाहीं. रोहिल्यास लाथेनें उडविलें तो पुऱ्यांसाठीं भिजविलेल्या कणकेच्या गोळ्यांत रुतून त्यानें त्यांतच देह ठेवला."

१०. आला असेल असा आमचा अंदाज आहे. (अ० शे० मो०)

गणपतीचे पुण्यातील महत्त्व पेशवे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्या दोघांमुळे वाढले. भक्तामुळे भगवंताला मोठेपण येते ते असे.

वास्तविक गणपतीबद्दल माझे काही 'मौलिक' (चक्रदेव कसाही असो, पण हा शब्द छान आहे.) विचार[११] आहेत. माझ्या मते, गणपती हा जगातील आद्य स्टेनोग्राफर. (ह्या शब्दाचा अर्थ डिक्शनरीत पाहा.) आदिकवी व्यासांनी सांगितले आणि गणपतीने लिहून घेतले म्हणजे तो आदिकवीचा आदी लघुलेखकच नव्हे का ? आता दुसरा पुरावा पाहा. इंग्रजीत पिटमन हा आदी लघुलेखक. पिट म्हणजे खड्डा. खड्ड्यातून म्हणजे मातीतून म्हणजे चिखलातून जन्माला आलेला माणूस. गणपतीबद्दल अशीच कथा नाही का ? शिवाय पती आणि मन किंवा मॅन हे समानार्थी शब्द आहेत. तस्मात गणपती म्हणजे आधुनिक पिटमनप्रमाणे प्राचीन आद्य लघुलेखक.

आता तिसरा पुरावा पाहा. गणपतीला गणपतिबाप्पा म्हणतात. इतर कुठल्याही देवाला बाप्पा म्हणत नाहीत. बाप्पा हे बा+आप्पा असे रूप आहे. आप्पा दाक्षिणात्य भाषेतील शब्द आहे. आपल्याकडील बहुतेक लघुलेखक दाक्षिणात्य आहेत. तेव्हा गणपती देवता मूळ दाक्षिणात्यांचीच. शिवाय ह्याला आणखी एक चौथा पुरावा आहे. मंगलमूर्ती मोरया असे आपण म्हणतो. मंगलमूर्ती हे नाव अन्य देवांना नाही. इतर देवांच्या मूर्ती काय मंगल नाहीत ? तेव्हा मंगलमूर्तीपैकी मूर्ती हे नाम विशेषनाम असावे. 'मूर्ती' हे नाव आता दाक्षिणात्यांतच आढळते. ह्या सर्व पुराव्यावरून गणपती हा भारतातील आद्य लघुलेखक आहे आणि अद्यापि चालू असलेल्या परंपरेचा पायंडा पाडणारा हा लघुलेखक दाक्षिणात्य आहे—बहुधा तो कर्नाटकातून आला असावा. ह्याशिवाय त्याची वक्रतुंड, महाकाय वगैरे विशेषणेही ह्या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत.

बाळे गोदावरी, आपल्याला प्रिय वाटणारा गणपतिबाप्पा हा कर्नाटक मार्गाने महाराष्ट्रात आला हे वाचून महाराष्ट्राविषयीचा अभिमान कमी होईल. परंतु आधुनिक पंडितांच्या शोधाप्रमाणे सारी मऱ्हाटी संस्कृतीही कर्नाटकातून आली आहे. किंबहुना, 'मऱ्हाट' हा शब्द मरु-हाट म्हणजे कानडीत झाडीमंडळ—अरण्यमय प्रदेश—असा कानडीतून निर्माण झाला आहे. जिथे आपले नावदेखील कानडी, तिथे गावाचा काय वृथाभिमान ? अशा प्रकारचे संशोधन झाले पाहिजे, म्हणजे पुष्कळ समस्या (हाही शब्द मी पुण्यातच ऐकला.) सुटतील. आणि पठाणकोटचे पठाण हे मूळ कर्नाटकातील पट्टणकुडीचे आहेत; आणि हुगळी नदी ही पूर्वी हुबळीवरून म्हणजे कर्नाटकातूनच जात होती; इतकेच काय, परंतु थर्मापिली, ट्रिव्होली, ट्रिपोली यांसारखी पाश्चात्त्य देशांतील शहरांची नावेदेखील त्रिचनापल्ली, सर्वपल्ली ह्या कर्नाटकी नावांवरूनच

११. हे विचार चिंत्य, हृद्य आणि ग्राह्य आहेत, असे आम्हांसही वाटते. (अ० शे० मो०)

घेतली गेली आहेत, अशा प्रकारचे शोध लागू लागले आहेत. पुण्याच्या हवेचाच गुण असा काही आहे, की इथे माणूस आला की इतिहासाशिवाय त्याला दुसरे सुचत नाही. इथल्या प्रत्येक व्यक्तीला इतिहास आहे. किंबहुना, इथली प्रत्येक व्यक्ती ऐतिहासिक आहे असे वाटते. इथल्या स्थळांना आणि व्यक्तींनाच इतिहास आहे असे नाही, तर वाङ्मयाच्या होऊ घातलेल्या इतिहासाचादेखील एक इतिहास होईल अशी तयारी आहे, असे टिळक रोडवरच्या एका 'श्मश्रुविनाशकेंद्र' नावाच्या सलूनमध्ये मला कळले.

परवा मी शनिवारवाडा पाहिला. हा पेशव्यांचा वाडा. पेशवाईचे गतवैभव असेही याला म्हणतात. यापूर्वी मी एवढे प्रचंड गतवैभव पाहिले नव्हते. आत 'पेशवाई चिवडा' विकणारा एक गृहस्थ दिसला. जिथे दारूगोळा उडाला तिथे फटाक्यांची दुकाने, आणि जिथे शत्रूच्या मुंड्या मुरगळल्या तिथे खुंट्यांवरील कारागिरांच्या हाती मुंड्या देऊन बसलेले स्वजन पाहिले. पेशवाईचा इतिहास मात्र वाचण्यासारखा आहे. सवडीने मी तो तुला सांगेन. सध्या ह्या वाड्याचे बुरूज फक्त उभे आहेत आणि बुरुजांना जोडणाऱ्या भिंती! त्यांतल्या एका बुरुजाला 'फुटका बुरुज' म्हणतात. हा बुरुज फुटला आहे हे खरे. पुण्यात खरे असे एवढेच नाव आहे. बाकीची अगदी नावापुरती नावे आहेत. इथल्या खुन्या मुरलीधराची मूर्ती खदिरांगारासारखी डोळे फाडून उभी असेल म्हणून पाहिले, तर मुरलीधर इतका नाजूक होता की खून काय, कुणाविरुद्ध ब्रदेखील काढायची त्याची छाती दिसली नाही. आता सारखे त्याला खुन्या, खुन्या असे टोचून बोलल्यामुळे कृतकर्माच्या पश्चात्तापाने तो तसा झाला असल्यास न कळे! उपाशी विठोबाही टुणटुणीत आहे. उंबऱ्या गणपती उंबरा सोडून अगदी रस्त्याच्या मध्यावर आला आहे. त्याच्या पुढल्या गणपति-चौकातील गणपतीचे काय झाले हे त्याने वास्तविक पाहिले आहे, पण स्वारी अजून रस्त्यावर आहे. बायक्या विष्णूही मला वाटले होते की 'लाजरिच्या रोप्पटिला'सारखी गोडगोड गाणी म्हणणाऱ्या भावगीतवाल्यासारखा असेल. पण नाही. तो चांगलाच दणकट आहे. विश्रामबागवाड्यात औषधालाही बाग नाही. दारातच मयताचे पास मिळण्याची सोय आहे. ही काय बागेच्या दारात लावायची पाटी आहे का? सांग बरे गोदूताई? स्वारगेटवर एक तरी घोडेस्वार आढळेल ह्या भावनेने गेलो, पण तिथे एस० टी० स्टँड आहे.

माणसे मात्र मुंबईच्याच माणसांसारखी आहेत. पुणेरी पगडी आणि जोडा तर एखादाही दिसला नाही. सायकली मात्र खूप आहेत. विशेष म्हणजे येथे स्त्रियाही सायकलीवरून जातात. इतक्या स्त्रिया सायकलीवरून कुठे जातात असे मी विचारले. परंतु एकालाही हे सांगता आले नाही. आमच्या देशात स्त्रियांची किती भयंकर उपेक्षा आहे? वास्तविक स्वतंत्र भारतात स्त्री, पुरुष सारखे; परंतु इथे स्त्रियांकडे पाहणारा कोणी नसावा हे दुर्दैव आहे; आणि त्यांच्याकडे सहानुभूतियुक्त कौतुकाने

पाहणाऱ्याला आमच्यासारख्या हिंदी बांधवांकडे त्याही डोळे वटारून पाहतात, ह्या कर्माला काय म्हणावे !

मुंबईला आलो म्हणजे मी तुला सायकल शिकवीन. माणसाच्या अंगात नाना कला असाव्यात.

तुझा
**राघूनाना**

*उपसंहार :*

एवंगुणविशिष्ट, श्री० राघूनाना सोमण यांचा कन्येस पाच पत्रेरूपी मधू वाचकरूपी वाङ्मयमधुकरांपुढे लेखरूपी द्रोणातून सादर करीत आहो. यापुढे नानांनी बरेच दिवस पत्रे लिहिली नाहीत. याचे कारण पुसता, त्यांनी 'गोदीचे नानांस उत्तर' काढून आमच्या हाती दिले. आजवर 'कन्येस पत्रे' सर्वांनी प्रसिद्ध केली आहेत. परंतु कन्येचे पित्यास पत्र आम्ही प्रथम प्रकाशित करतो आहो. राघूनानांची ही कन्या महाराष्ट्रातली आद्य पत्रलेखिका ठरावी.

## चि० गोदीचे तीं० नानांस उत्तर[१२] :

तीं० नाना यांस त्रीकालचरणीं मस्तक ठेवून बालके गोदावरीचा शीर सास्टांग नमस्कार विनंती विशेष. तुमचीं मोठ्ठींमोठ्ठीं पत्रें पोचलीं. एवढीं मोठीं पत्रें कां पाठवतां असें आईने विचारलें आहे. पोस्टाचीं तिकीटें आपल्याला कांही फुकट मिळत नाहीत म्हणावें. आणि खुषाली कळविण्यास काय होते. तुमचें लक्षण लहानपणापासून आसेंच, आसें आजी म्हणाली व एकदा हातींपायीं धड सुकरूप येवूं दे म्हणाली. हें आजीला न कळत मी लीहीत आहे म्हणून मला पुण्याहून येतांना एक लालभडक गंधाची बाटली तूळशीबागेंत मिळते आसें रिसबुडांची यमी ती पुण्याची आहे रहाणारी ती म्हणाली. गंधाची बाटली व आईने बुंदी पाडायचा लहानसा बेताचाच आणा म्हणावं झारा आणावयास सांगितलें आहे.

तूमची पत्रें वाचावयास वेळ लागतो. तूम्ही आल्यावर वाचून दाखवा. आम्ही सर्व खूशाल आहों. दुसऱ्या मजल्यावरच्या भीमामावशी जिन्यावरून पडल्या व त्यामुळें कठडा मोडला आहे. म्हणून दुसऱ्या मजल्यावरच्या भीमामावशीच्या एजमानांचें व चाळीच्या भय्याचें भांडण झालें. आई सौ० लिही मागे व आजी

---

१२. पत्र मुळाबरहुकूम छापले आहे. (अ० शे० मो०)

गं० भा० लिहायचं खुशाल आहेत. हें पत्र मी एकटीनें लीहलं आणि मधूनमधून आई सांगत होती. तरी गंधाची बाटली व रिबिनी वीसरू नये.

तुमची अध्याधारक
**गोदी कु०**

हे पत्र श्री० सोमणांनी हताशपणे आमच्यापुढे फेकले. ह्या हताशपणाचे कारण आम्हांला कळले नाही. त्यांचा हा अकारण आलेला हताशपणा, हे औदासीन्य जावे आणि दुरिताचे तिमिर जाऊन पत्ररूपी सूर्याने प्रकाशावे अशी इच्छा व्यक्त करून हे संपवितो.

रसिकांचा पादारविंद
**म० म० अण्णुराव शेषराव मोगलगिद्दीकर**
पत्रेतिहासमंडळ, हलकर्णी (मु० व पो०)



# ....काही वासऱ्या

'दिसामाजिं कांहीं तरी तें लिहावें' हा समर्थांनी ('माजिं'ची जीभ चांगलीच आत ओढून) केलेला मनोपदेश बटाट्याच्या चाळीतली मंडळी किती निष्ठेने पाळीत असतील याची कल्पना चाळकरी मंडळींच्या 'वासऱ्या' हाती आल्या तरच येईल. डायरीला 'वासरी' हा प्रतिशब्द निघण्याअगोदर कित्येक वर्षे नित्य वासरी लिहिण्याचा हा उपक्रम चाळीत चालू आहे. "वासरी म्हणजे मनाचा आरसा. जीवनाच्या ओसरीवर जोवर आपली पथारी पसरली आहे, तोवर नित्य ह्या आरशात आपल्या मनाचे प्रतिबिंब उमटले पाहिजे." हा आचार्य बाबा बर्व्यांचा संदेश बटाट्याच्या चाळीतल्या त्यांच्या तमाम अनुयायांनी कसोशीने पाळायचे ठरवले. आचार्य बाबांची वासरी ही कोणत्याही छापखान्यात छापलेली नाही. स्वतः हाताने शिवलेल्या वहीवर, स्वतः हाताने केलेल्या शाईने आणि स्वतः तासलेल्या बोरूने बाबा आपली वासरी लिहीत असतात. वास्तविक बाबांच्या वासरीतील तीनशे पासष्टही पृष्ठे येथे देण्याचा मोह अनावर होतो; परंतु "संयमाच्या ब्रेकशिवाय जीवनाची गाडी चालणार नाही," हे आचार्य बाबा बर्व्यांचे सूत्र ध्यानात घेणे इष्ट आहे. बाबा लिहितात :

**१ जानेवारी** : "आज वर्षाचा पहिला दिवस ! जीवनाची पंचावन्न पाने उलटली. कोणतेही पान उलटताना अमंगल विचारांची थुंकी लावून उलटावे लागले नाही, ह्याबद्दल जगन्नियंत्याला लक्ष प्रणाम...कबीरजी म्हणतात, 'मूरख, मनको लगाम डालो !' मी माझ्या मनाला लगाम घालू शकलो का ?—नाही. तुकोबांनी म्हटले आहे, 'पापाची वासना नको दावूं डोळा'—माझ्या डोळ्यांतून अजून पाप गेले नाही. एकनाथमहाराजांनी म्हटले आहे, 'एकाजनार्दनीं भोग प्रारब्धाचा'. तात्पर्य,

मन स्वच्छ हवे. आज उठल्याबरोबर नेहमीपेक्षा पंधरा मिनिटे प्रार्थना अधिक वेळ केली. प्रसन्न वाटले. पहाटे मुक्त कंठाने नरसैयाचे गीत गात होतो. शेजारच्या शांबाराव गायतोंड्यांची झोपमोड झाली. म्हणून भांडत आले. शांबारावांना क्रोध आवरला नाही. मी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. शेवटी अपशब्द बोलले, तेव्हा चि० नारू याने त्यांच्या तोंडात मारली. नारूने त्यांना मारायला नको होते. नारूच्या हिंसेचे प्रायश्चित्त म्हणून रोजच्या दीड कप गाईच्या दुधाऐवजी फक्त एकच कप पिऊन स्वल्प उपोषण केले...दहा वाजता द्राक्षे खाऊन सोडले. झोपताना सोनामुखी घेतली. अंतःशुद्धीला सोनामुखी बरी. मुले परदेशी औषधे घेतात. त्यांचे मन वळवले पाहिजे..."

**१५ जानेवारी :** "चाळीतील हिंसात्मक पद्धती आणि असत्याचरण फारच वाढत चालले आहे. मुले एकमेकांना अपशब्द बोलतात. भगिनींचे नळावर भांडण चालतेच. वास्तविक पाणी म्हणजे जीवन. ते आणणाऱ्या नळाला माझे वंदन असो. परंतु अण्णा पावश्यांच्या कुटुंबाने जाणूनबुजून आमच्या कुटुंबाच्या पायावर कळशी आपटली. प्रथम आमच्या कुटुंबाच्या हातून पाणीरूपी जीवनाने भरलेली तपेली चुकून त्यांच्या पायावर पडली. मानव स्खलनशील आहे हे तत्त्व आमच्या भगिनींना अजूनही कसे कळत नाही? कुटुंब सूडाच्या गोष्टी बोलत आहे. आवरण्याचा प्रयत्न केला पाहिजे..."

**१ एप्रिल :** "बेटकीहळ्ळी आश्रमातून आचार्य गुंड्डगुरुजींचे पत्र आले. गुंड्ड-गुरुजींनी आजन्म नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळून देशसेवा चालविली आहे. नैष्ठिक ब्रह्मचर्याची अजूनही देशाला गरज आहे. माझा थोरला पुत्र चि० नारू ह्याच्या तिसऱ्या मुलाचा आज नामकरण-संस्कार झाला. मी 'सत्यकाम जाबाल' हे नाव सुचविले होते. सूनबाईच्या पसंतीस आले नाही. तिचे मन दुखवले नाही. बालकाचे नाव 'सुरेंद्रकुमार' ठेवले. संस्कारविधी यथासांग झाला. पेढे गाईच्या दुधाचे आणले असते तर अधिक चांगले झाले असते. मंडळीच्या आग्रहास्तव फक्त पाचच खाल्ले. व्रताहून दुसऱ्यांच्या भावनांची किंमत अधिक मोठी. जोगदंडांच्या पत्नींनी बाळंतविड्याच्या ओटीत खण आणि दोन रुपये घातले. दोन्ही रुपये बद्द वाजत असल्याचे निदर्शनास आले. साऱ्या सामाजिक जीवनाला असत्याची कीड लागली आहे. ती प्रेमाने दूर केली पाहिजे. हे कार्य अनासक्त झाल्यावाचून होणार नाही. दानाची भावना वाढली पाहिजे. कुष्ठ-सेवा-मंडळाला दोन रुपयांचे संपत्तिदान केले."

**१९ मे :** "आज 'चरखाषष्ठी'निमित्त ग्रामोद्योग मंडळातील विद्यार्थ्यांसमोर वसईला हस्तोद्योगावर व्याख्यान झाले. शिक्षणपद्धतीत आमूलाग्र फरक झाला पाहिजे. पाश्चात्त्य भौतिक दृष्टिकोणाने नव्या पिढीची दृष्टी बिघडत आहे. तिला आध्यात्मिकते-कडे खेचले पाहिजे. दुपारच्या डाकेने द्वितीय पुत्र मदनमोहन ऊर्फ बाळू याचे लंडनहून पत्र आले. अजून चार वर्षे परदेशी राहणे प्राप्त आहे म्हणतो. शुगर

टेक्नॉलॉजीच्या पुढच्या अभ्यासासाठी इंग्लंडहून जर्मनीत वास्तव्य करावे लागणार. रोज गीतापाठ म्हणण्याविषयी त्याला लिहिले आहे. त्यागमूर्ती धनमलजींच्या आग्रहामुळे त्याला परदेशी जावे लागले. त्यांनी त्याला पंचवीस हजारांचे संपत्तिदान केले. त्याच्या बदली त्यांच्या साखरकारखान्यात त्याने जीवनदान करावयाचे करारपत्र केले आहे. दोघांनाही माझे आशीर्वाद. त्यागमूर्ती धनमलजी आणि मी येरवड्याच्या तुरुंगात सात दिवस बरोबर होतो..."

९ जुलई : "चि० नारूला नवी बढती मिळाली. त्याचे मासिक उत्पन्न आता पाचशेसाठ रुपये झाले. त्याबद्दल सकाळी सामुदायिक प्रार्थना केली. परमेश्वरकृपेने त्याचे हेडक्लार्क पैसे खाल्ल्याच्या आरोपावरून बडतर्फ झाले आणि चि० नारूला ती जागा अचानक मिळाली. परमेश्वराची कृपा असली म्हणजे सर्व काही चांगले होते. सकाळी हेडक्लार्क येऊन 'तुम्ही माझ्या पाठीत खंजीर मारलात' वगैरे नारूला बोलले. नारूने उत्तम मनःशांती दाखविली...कुसुमला वारंवार सांगूनही वेळीअवेळी ती प्रेमगीते म्हणते. नव्या पिढीचे कसे होणार?"

३१ डिसेंबर : "श्री० समेळकाकांची मुलगी आणि द्वारकानाथ गुप्ते यांचा मुलगा दोघेही बेपत्ता आहेत. नव्या पिढीपुढे ध्येयवाद नाही. जग भोगवादी बनत आहे. हे वाईट आहे. ईश्वर सर्वांच्या आत्म्याला शांती देवो..."

आचार्यांच्या मनाच्या आरशातून आता दृष्टी उचलून बटाट्याच्या चाळीतील साहित्यिक म्हाळसाकांत पोंबुर्पेकर यांच्या वासरीतील काही पाने पाहणे आवश्यक आहे.

७ ऑगस्ट : "आज पहाटे उठलो. गॅलरीत आलो. समोर 'ती' उभी होती. तिच्या दर्शनाने आजच्या दिवसाची शुभ सुरुवात झाली, असेच वाटले. 'क्षण एक पुरे प्रेमाचा' ह्या गोविंदाग्रजांच्या ओळी सहज ओठांशी आल्या, आणि नळाच्या दिशेने जाणाऱ्या आवडाकाकूंचा गैरसमज झाला. 'लग्न का करीत नाहीस मेल्या?' हे त्यांचे शब्द माझ्या आधीच दुभंगलेल्या काळजाचा ठाव घेऊन गेले. माझे काळीज धड आहे का? स्पंदन! स्पंदन! स्पंदन!...'ति'ने फक्त एकदा माझ्याकडे पाहिले आणि हसून आत गेली. मी खोलीत येऊन नवी कादंबरी सुरू केली, 'पहाटेपूर्वीची पहाट'...

"माझी 'करपलेली भाकर' ही ग्रामीण जीवनावरील कथा सकाळच्या डाकेने परत आली. मना, धीर सोडू नकोस. भवभूतीचीही नाटके सगळ्या कंपन्यांच्या मालकांनी परत केली होती...पण 'ती' एकदा माझ्याशी बोलेल का..."

११ सप्टेंबर : (ह्या तारखेखाली फक्त एवढेच लिहिले आहे :) "हाय!"

१७ ऑक्टोबर : "रात्रीचे नऊ वाजले आहेत. दुरून एच० मंगेशरावांचा तबला आणि वरदाबाईचे संगीत ऐकू येत आहे. शेजारच्या खोलीत द्वारकानाथ गुप्त्यांची मुले भेंड्या लावीत बसली आहेत. नटींच्या आणि चित्रपटांच्या नावांच्या भेंड्या हा

प्रकार नवीन आहे. 'नर्गिस...स...सुलोचना...ना...नास्तिक...क...क...क... कत्तल की रात...' असा आरडाओरडा ऐकू येत आहे. चार नंबरात गायतोंड्यांच्या घरात क्यारम चालला आहे. सोकाजी त्रिलोकेकर बाबलीबाईंना 'टाइम्स'मधल्या पॉपचा विनोद समजावून सांगताहेत...आणि मी?...हाय रे दुर्दैवा! 'ओढ्याची ओढ' ही पुण्याला आंबिलओढ्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली लघुकथा परत आली! माझ्या दारात पोस्टमन आला की जनोबा रेगे 'काय पोंबुर्पेकर, कितवी पोरगी परत आली?' अशी असभ्य वैयक्तिक टीका करतात. दुपारी बसून पार्श्वभूमी आणि पात्रांची नावे बदलून 'खाडीची खोड' या टायटलखाली वांद्याच्या खाडीच्या पार्श्वभूमीवर ही गोष्ट लिहून 'जटायू' मासिकाला पाठवली आहे..."

**३० नोव्हेंबर :** "उजवा हात फार दुखतो आहे. समोरचे दोन दात हालत आहेत. अण्णा पावश्यांना सरळ 'नाही' म्हणता आले असते. मारामारी करायचे कारण नव्हते. 'ति'च्या डोळ्यांतली आसवे अजून मनाला धीर देतात..."

**१२ डिसेंबर :** "आठ दिवसांपूर्वी पोंबुर्प्याला आलो. नवी कादंबरी लिहायला घेतली आहे. इथल्या वाण्याच्या दुकानात कागददेखील मिळत नाहीत. मालवणहून कागदांची पाच रिसे मागवली आहेत...कोकणच्या पार्श्वभूमीची पाहणी चालू आहे. मन अस्वस्थ आहे. 'ति'ने एक पत्रही पाठवले नाही. प्रेमाची किंमत जगाला केव्हा कळणार?...आत्महत्येचे विचार मनात येतात..."

**१७ डिसेंबर :** "निसर्गासारखे दुःख हलके करणारे औषध नाही. मालवणहून कागद आले.—कादंबरीलेखनाला भलताच जोर आला आहे...'माडांची माया' हे नाव द्यावे, की 'छपरांच्या प्रदेशात' म्हणावे, सुचत नाही...पोंबुर्प्याच्या खाडीची शोभा अवर्णनीय आहे. भाचू भाटलेकराच्या चंपीचा आवाज फारच मोहक आहे..."

**२९ डिसेंबर :** "भाचू भाटलेकराच्या चंपीला वाङ्मयाची चांगलीच आवड आहे हे पाहून मी थक्क झालो—'पोंबुर्प्याचा पंपू' दोन तासांत वाचून तिने परत केला, आणि देता देता 'शंभरावे पान उघडून बघा' असे सांगून पळाली. शंभराव्या पानावर 'प्रेमाच्या राज्यातले रहिवासी रूढीच्या पोलिसांना डरत नाहीत', या वाक्याखाली पेन्सिलीने खूण केलेली आढळली..."

**३१ डिसेंबर :** "मालवणच्या सर्कारी दवाखान्यातील पलंगावर बसून रोजनिशी लिहीत आहे...उजवा पाय आणि डावा हात प्लास्टरमध्ये घातला आहे. भाचू भाटलेकर हा माझ्या नव्या कादंबरीतला खलनायक. नव्या कादंबरीचे नाव : 'जित्याची खोड'..."

**१ जानेवारी :** "अजून सर्कारी दवाखान्यात पडून आहे...चंद्राबाई नर्सच्या हसण्यातून चांदणे सांडते..."

अण्णा पावश्यांच्या वासरीत काही अलौकिकच गोष्टी वाचायला मिळतात.

**१४ जानेवारी :** "हेडक्लार्कने डिस्पॅच-क्लार्क पोंक्ष्याला आज हग्या दम भरला. पोंक्ष्याची अशीच टांग मोडणे आवश्यक होते...वागळ्याची आणि अय्यंगारसाहेबाची बरीच जानपछान दिसते. वागळ्याला बटाटेवडा खायला घातला पाहिजे..."

**१६ जानेवारी :** "आज धोंड्या गोखले अर्धा तास उशिरा आला..."

**१९ जानेवारी :** "हेडक्लार्क हजाम आहे..."

**३० मार्च :** "अय्यंगारसाहेबाला बदलले. वागळ्याची सद्दी संपली..."

**१ एप्रिल :** "बाबा बर्व्याच्या नातवाचे बारसे झाले. निष्कारण भुर्दंड...बर्व्या चोर आहे...त्याची बायको चोर आहे...मुलगा पैसे खातो..."

**५ एप्रिल :** "आमची कार्टी तोंडाला डांबर फासणार!—त्या पोंबुर्प्याची हाडे मऊ करावी लागणार..."

**१२ जून :** "कारटा पुन्हा मॅट्रिकला नापास झाला. समेळकाकाच्या 'न्यू गजकर्ण फार्मसी'त औषधे खलायला घेता का, असे विचारल्यावर कासारडा नाही म्हणाला. शॉपइन्स्पेक्टर कुळकर्ण्याला चिथवला पाहिजे. त्रिलोकेकरशेटला केनेडी पुलाखाली पाह्यला. मी पाठीवर थाप मारल्यावर दचकला. उलट, मलाच 'इकडे कुठे?' म्हणून विचारतो. सोमण बिल्डिंगमध्ये सातपुते म्हणून स्थळ आहे. दोन्ही मुलींच्या कुंडल्या टाकून आलो आहे. दुसरीला परवा चौबळाच्या कारट्याशी बोलताना पाह्यली...रात्री एक कानफटात दिली आहे. सुधारली नाही तर त्याच्या बापाचे टाळके फोडीन... अजून शंभर दंड हाणतोय म्हणावे!..."

**२२ जून :** "दोन्ही कुंडल्या परत आल्या. एकीचीही जुळत नाही असे सांगतात. हरामखोर! मला कुंडली शिकवताहेत. नव्या मिरजकरसाहेबाला कुंडल्यांचा नाद आहे असे कळते."

**२ जुलै :** "मिरजकरसाहेबाकडे पाठवायच्या फायलीतून चुकून गेल्यासारखी कुंडली पाठवली. गनिमी कावा शिवप्रभूच्या ह्या शिष्याला पूर्ण अवगत आहे म्हणावे..."

**३ जुलै :** "मिरजकरसाहेबाचा गैरसमज झाला. 'ऑफिसात कामे करायला येता की भविष्य पाहायला?' हा प्रश्न आमच्या चाळीत विचारला असता तर उत्तर दिले असते! ऑफिसच्या टेलिफोनचा उपयोग अर्धाअर्धा तास बायकोशी बोलण्यासाठी नसतो, हे काय आम्ही सांगू शकत नाही?...

"संध्याकाळी ऑफिसमधून परतताना जिन्याखाली आमची दुसरी कार्टी आणि चौबळाचा दिवटा बोलताना पुन्हा आढळली. दोघांनाही बदडले. कार्ट्यांना शक्य तितक्या लवकर उजवले पाहिजे..."

**५ ऑगस्ट :** "ऑफिसातून छत्री चोरीला गेली. बहुधा महाद्या मानकाम्याचे कृत्य असावे. पुरावा नाही; त्यामुळे चूप बसलो...दोन देवळांत पाच्छापूरकरबुवांचे कीर्तन चांगले झाले. देवाचे छत्र डोक्यावर असल्यानंतर चिंता नाही हे पटले.

"आमच्या चिरंजीवांच्या खिशात विड्या सापडल्या. पोरे अब्रू घालवणार..."

**९ नोव्हेंबर :** "पोंबुर्प्याची हाडे मोडली. पुन्हा माझ्या पोरीच्या वाटेला जाणार नाही..."

**३१ डिसेंबर :** "समेळकाकाची रतन द्वारकानाथ गुप्त्याच्या कारस्थ्याचा हात धरून पळाली. आमच्या कारस्थ्यांना संभाळले पाहिजे..."

सोकरजी त्रिलोकेकरांची 'वासरी' मराठीत आहे हे केवळ देवनागरीसारख्या लिपीवरून वाटते. पाहा—

**५ जानेवारी :** "सालं, फिश फार कॉस्टली झालं आहे. संडेला मार्केटमदी टेरिबल क्राऊड. लेडीजना जायची सोय नाय. पण काय काय लेडीज धक्या मारतात. साली पयल्यासारखी मोरालिटी पण नाय राह्यली. हिरा कोळणीची छोकरी आता चांगली मोठी झाली..."

**२१ फेब्रुवारी :** "मटनाची क्वालिटी फार खराब होती. वाइफनी कटलेट बनवले, ते पण नाय चांगले झाले. जोगदंड साला ब्रॅम्हीन हाय, पण आठ कटलेट खाल्ले. आजचा संडे मोफत गेला. दुपारी झावबा वाडीतल्या नानाजींच्या छोकरीचं ब्रिथोटल झालं. नवेवाडीतला विजयकरचा छोकरा. बी० ए० हाय. एक्सचेंज बँकेत लागलाय. छोकरी बरी हाय! गोरी नाय एवढी, पण फिगर बरी हाय..."

**३० मार्च :** "डिसोजा रिटायर झाला. त्याला मॉजिनीत पार्टी झाली. डिसोजाची वाईफ त्याच्या मानाने यंग वाटते. आमच्या वाइफनी डिनरच्या वेळी सुपाची डिश अल्मिडासाह्यबाच्या पँटवर सांडून त्याची पँट स्पॉइल केली. (यापुढील दोन वाक्ये लिहून खोडली आहेत. परंतु पुढील अक्षरे लागतात : 'आ...च्या लेडीज...जंगली टेलि....ऑ...रेटर मिस पेरिन साडीमदी...टिफुल दि...ते...') डिसोजाने फेअरवेल स्पीच लिहून आणलं होतं. वाचताना एक कागद हरवला. त्यामुळे साला कन्फ्यूज झाला. इनवर्ड-आउटवर्ड क्लार्क फणसे याने आवाज उंच लावून श्लोक बोलला. मॉजिनीमध्ये आपण आहोत हे विसरला. साला एवरीबडी वॉज लाफिंग. फणसे इडियट आहे. मी इंग्लिशमधून स्पीच केलं. वाईफ माझा कोट खेचत होती. पण मी दाद दिली नाही. साला व्हॉट डू आय केअर?..."

**५ एप्रिल :** "डिसोजाच्या जागेवर नागरकट्टी आला. कारवारी लोकांचा भाव वधारला. मोतीराम धैर्यवानशेटला सुपरसीड करून वर गेला. मोतीराम आला असता तर आपल्याला धास्ती नव्हती. मोतीराम म्हणजे आमच्या वाइफच्या आतबायचा जावयजी!—गुड मॅन, पण साला कॉवर्ड. फायटिंग स्पिरिट नाय सालं आमच्या कम्युनिटीत..."

**९ ऑगस्ट :** "वाईफ ठाकुरद्वारला माझ्या मदर-इन-लॉकडे राहायला गेली आहे. मेट्रोची पिक्चर साली ग्रँड होती. एस्थर विलयम्स काय स्विमिंग सूटमदी पोहते.

कस्तुरीला पण ती आवडते. कस्तुरी पण गाणी काय स्वीट बोलते. (पुढली वाक्ये पुन्हा खोडली आहेत, पण अर्धवट लागतात : 'वाइफला...पंधरा दिवस...मदरच्या इल्नेस...दुसरं घरात कोण नाय...कस्तुरी...नेकलेस कॉस्टली...') ती माझ्या-आधीच येऊन बसली होती. पाठीच्या 'रो'मदी पावशेची डॉटर आणि चौबळचा छोकरा बसलेला पाह्यला. त्यांनी मोस्ट प्रॉबॅबली कस्तुरीला पाह्यलं नसेल. व्हॉट डू आय केअर? मी पावशेला वॉर्न केला. साली ड्यूटी हाय आपली. नेबर हाय. उद्या पोरीनं काय तरी मेस केली म्हणजे?—वन मस्ट डू वन्स ड्यूटी..."

**१५ सप्टेंबर :** "कस्तुरी कोठल्या तरी एका रिच मॅनबरोबर पळाली. साला दीड रुपयेवाला तर नेकलेस होता. आमच्या वाइफकडे बॉक्स होती एक फोर्टमधल्या ज्युएलरची. आमाला बनवते काय?—आमच्या वाइफला रांगोळी एक्झिबिशनमदी कन्सोलेशन प्राइज पण नाय मिळालं. साली सगळीकडे वशिलेबाजी..."

**१३ ऑक्टोबर :** "आज दसरा डे. सकाळी वाइफला घेऊन महालक्ष्मीचे टेंपलमदी गेलो.—टू मच क्राउड होता. मदीच वाईफ क्राउडमदी कोठेतरी सांडली. बिगिनिंगमदी माझं पण लक्ष नव्हतं. पण देवीला जोडीनं नमस्कार करायच्या वेळी शेजारी पाह्यलं तर दुसरीच बाई. तिचा मला वाटतं की मिस्टर कुठंतरी क्राउडमदी सांडला होता. पण शोधून काढायला टाईम कुठं होता? परत फिरताना वाईफ सापडली. मग परत जाऊन नमस्कार दोघे मिळून केला. क्राउडमदी धक्का खात परतताना ओळखीचा चेहरा दिसला. क्राऊड एवढा की मान पण फिरवायला जागा नाय. त्यातून फिरवलीच आणि कस्तुरी आपल्या शेठजीबरोबर महालक्ष्मीचे दर्शनाला गर्दीतून वाट काढताना पाह्यली. गळ्यात मी दिलेली नेकलेस घातली होती. संध्याकाळी संशयकल्लोळ ड्रामा पाह्यला..."

**३१ डिसेंबर :** "समेळकाकाची डॉटर द्वारकानाथ गुप्त्याच्या मुलग्याबरोबर इलोप झाली. गुप्त्याचा मुलगा स्मार्ट आहे..."

बटाट्याच्या चाळीत तशी एकूण सामान्यच मंडळी राहतात. आचार्य बाबा बर्व्यांचा एक अपवाद, आणि दुसरा प्राध्यापक नागूतात्या आढ्यांचा. प्रा० नागूतात्यांची विद्वत्ता चौफेर आहे. राजकारण, समाजकारण, साहित्य, संगीत-कला ह्यांवरची त्यांची मते जाहीर आहेत. त्यांचा विषय कोणता हे मात्र कुणालाच अजून नीटसे कळलेले नाही. त्यांच्या वासरीतील पाने साहजिकच त्यांच्या सखोल व्यासंगाची साक्ष पटवतील आणि साहित्यिक म्हणून त्यांचा दर्जा दाखवतील.

**१ जानेवारी :** "संध्याकाळी ५ वाजता—वाळकेश्वर महिलासंघात व्याख्यान. विषय : 'ज्ञानेश्वरी'तील रेडा.

"रात्री ९ वाजता—नवतरुण उत्साहजोपासक संघात प्रवचन. विषय : पळपुटा कोण? पहिला बाजीराव की दुसरा?"

**२ जानेवारी :** "दुपारी ३ वाजता—हिंदी प्रेमी मंडळ—वक्तव्य. विषय : राष्ट्रभाषेचा प्रश्न.

"संध्याकाळी ६ वाजता—मराठीभाषाभिमानी सभा : 'मराठीचा प्रश्न.'"

**३ जानेवारी :** "घेलचंद माठालाल कॉलेजातील मराठीचा प्रोफेसर सोनपाटके याला युनिवर्सिटीने 'वामनपंडितांची यमके' ह्या प्रबंधाबद्दल डॉक्टरेट दिली. अत्यंत थर्ड क्लास प्रबंध आहे. सोनपाटक्याला मात्र स्वर्ग दोन बोटे दूर राहिला आहे. हेड ऑफ दि डिपार्टमेंट होणार म्हणून नाचतो आहे. वास्तविक जवळजवळ निम्म्याहून अधिक प्रबंध मी लिहून दिला आहे. पण उपकार स्मरणार नाही. संध्याकाळी—कोळसा व्यापारी संघाच्या सत्यनारायणात व्याख्यान. विषय : कोळशाचा प्रश्न."

**१ मार्च :** "'एक अभ्यासू' ह्या टोपणनावाखाली सोनपाटक्याच्या प्रबंधाच्या 'हिमालय' मासिकातून चिंध्या केल्या. सोनपाटक्या नाक मुठीत धरून आला होता. 'विंध्याद्रि' मासिकातून आता 'दुसरा अभ्यासू' या नावाने उत्तर देईन."

**१ मे :** "मे-दिनानिमित्त 'सप्रेस्ड वर्कर्स यूनियन'मध्ये सकाळी ९ वाजता व्याख्यान. विषय : कामगारांचा प्रश्न. दुपारी ३ वाजता—नुकतेच परदेशाहून परत आलेले कै० शेट घेलचंद माठालाल याचे पुत्र शेठ हरकचंद घेलचंद यांचा सत्कार. मुख्य भाषण माझे आहे..."

**२ मे :** "कालचे कॉलेजमधील भाषण उत्तम झाले. विशेषतः हरकचंद आणि विक्रमादित्य यांची तुलना लोकांना फार आवडली. प्रिन्सिपॉलसाहेबांचे भाषण साफ पडले. इतर कोणाचीच भाषणे चांगली झाली नाहीत...सुटीमुळे गर्दी नव्हती..."

**२१ जून :** "अनेक खटपटीलटपटी करून सोनपाटक्या मराठी डिपार्टमेंटचा हेड झाला. नालायक लोकांची जगात सद्दी आहे. याचे दुसरे उदाहरण म्हणजे त्याच कॉलेजातला जांबावलीकर कुठली तरी अमेरिकन फाउंडेशनची स्कॉलरशिप मिळवून फ्रान्सला चालला. वास्तविक 'लाइट ट्रावल्स इन अ स्ट्रेट लाइन' हा सिद्धांत मी त्याला समजावून दिला होता. जांबावलीकराच्या सासऱ्याचा वशिला लागला म्हणतात..."

**२ सप्टेंबर :** "घे० मा० मधला संस्कृतचा प्रोफेसर पिरंगुटकर आणि बायालॉजीची डेमॉन्स्ट्रेटर मिस पिंगे यांचे इतके दिवस गाजत असलेले प्रकरण फुटले. मी त्यांच्या प्रिन्सिपॉलसाहेबांना कित्येक वेळा बोललो होतो; परंतु प्रि० साहेब अगदीच 'हा' आहे. 'कॉलेजच्या शिस्तीला धरून हे वागणे बरे नाही—पिरंगुटकरपिंग्यांना आवरा', हे मी गेल्या आठवड्यात सांगितले, तर उलट मलाच 'नागूतात्या, ह्यात असूयेचा भाग नाही ना?' असे म्हणाला. ठीक आहे. पुढल्या वर्षी माझी नेमणूक झाल्यावर सिंडिकेटच्या बाय इलेक्शनला उभा राहणार आहे म्हणावं..."

**३१ डिसेंबर :** "समेळकाकाची मुलगी द्वारकानाथ गुप्त्यांच्या मुलाचा हात धरून पळाली. हे भविष्य जनोबा रेग्याजवळ मी केव्हाच वर्तवले होते..."

खळनाथ कामत म्हणजे बटाट्याच्या चाळीतील 'पब्लिक फ्रेंड नंबर वन'! 'सर्वांमुखीं मंगल बोलवावें' हे समर्थांचे धोरण खळनाथला उत्तम जमलेले. त्याच्या वासरीतल्या पानांवरून मात्र त्याच्या मनाच्या आरशात निराळेच प्रतिबिंब दिसते.

**१ जानेवारी :** "ऑफिसातून डायरी मिळाली. विसू कुळकर्ण्याचा डोळा होता. दाद दिली नाही. पण लिहावे काय—हा प्रश्न आहे. आज सबंध दिवसात काहीच घडले नाही. नाही म्हणायला जनोबा रेगे येऊन चहा पिऊन गेला. रात्री झोपलो."

**५ फेब्रुवारी :** "सकाळी उठलो. आंघोळ केली. जेवलो. ऑफिसात गेलो. परत आलो. ट्रॅमकंडक्टर तिकीट द्यायला विसरला. रात्री परत जेवलो व झोपलो..."

**९ मार्च :** "आज आमच्या फर्मचा डायरेक्टर इंग्लंडमध्ये मेला म्हणून सुटी मिळाली. आधी कळले असते तर सकाळी धडपडत ऑफिसमध्ये जाण्याचा त्रास वाचला असता. अकरा वाजता घरी परत आलो, तेव्हा बायको दादरला तिच्या मावशीकडे गेल्याचे गुप्त्याच्या बायकोने सांगितले. मुले शाळेत गेलेली. दाराला कुलूप. चाळीत एकही पुरुष माणूस नाही. म्हणून परत ऑफिसात गेलो. शिपाई पत्ते खेळत बसले होते. त्यांतल्या एकाला उठवून पाच वाजेपर्यंत पत्ते खेळलो. रात्री झोपलो..."

**१५ ऑक्टोबर :** "सदाशिवगल्लीतले दाजी वालावलकर वारले. ऑफिसला रजेची चिठ्ठी पाठवून दिली. चौकशीनंतर हे दाजी वालावलकर निराळे असे कळले. त्यामुळे परत येऊन झोपलो. सोनापुरात गेलो नाही. तरीही बायकोने थंड पाण्याने आंघोळ करावयास लावली..."

**१६ ऑक्टोबर :** "सरदी झाली आहे म्हणून सिक-नोट पाठवली. दुपारी व रात्री झोपलो..."

**१९ ऑक्टोबर :** "रात्री एक वाजता स्वैपाकघरातली भांडी पडली. 'चोर—चोर!' म्हणून बायको ओरडली. सगळी चाळ जागी झाली; पण चोर पळाला. शेवटी प्रत्येकाने चोराची गोष्ट सांगितली. बाबलीबाय त्रिलोकेकर ह्यांच्या पायाखाली सापडून मेलेला लठ्ठ उंदीर स्वैपाकघरात सापडला. त्यावरून अण्णा पावश्यांनी प्लेगाच्या गोष्टी सांगितल्या. तीन वाजता झोपलो. सकाळी उठलो तेव्हा दुपारचा एक वाजला होता. ऑफिसात जायला फार उशीर झाला. साहेबाला चोराची गोष्ट सांगितली. साहेबांनीही मला दोन गोष्टी सांगितल्या. साहेब भला आहे. लेट मांडले नाही. चेंबूरहून बायकोच्या आत्याबायने दोन पोपया धाडल्या होत्या. एक साहेबाला दिली. त्याला लिव्हर-ट्रबल आहे. लिव्हरला पोपया चांगल्या, असे त्याला सांगितल्यावर तो खूष झाला..."

**१५ नोव्हेंबर :** "एक महिन्याची रजा घेतली. उद्या कुडाळला जाणार. आज दिवसभर झोपलो..."

**१६ डिसेंबर :** "काल कुडाळहून परत आलो. एकशेसात रुपये आठ आणे

खर्च झाले. निम्मा बोनस खलास झाला. एस० टी०त मंगेशला मांडीवर बसवून आणल्यामुळे तिकीट पडले नाही. त्यामुळे सात रुपये वाचले. मांडी दुखत आहे. सात दिवस लीव्ह एक्स्टेंड केली."

**२५ डिसेंबर :** "साहेबाला काजूगर दिले."

**३१ डिसेंबर :** "समेळकाकाची मुलगी द्वारकानाथ गुत्याच्या मुलाबरोबर पळाली. समेळकाकाची हुंड्याची काळजी मिटली. आज व उद्या सुटी. बायको आरे मिल्क कॉलनी बघू या म्हणून पाठीशी लागली आहे. बायकांना म्हशींत पाहण्यासारखे काय वाटते, देव जाणे!..."

समेळकाकाची मुलगी रतन समेळ हिच्या वासरीतली पाने फारच रम्य आहेत. तिच्यातली काही पाने एकही अक्षर कानामात्रेसह न बदलता देत आहो.

**१ जानेवारी :** "जगांत शुद्ध प्रीतीला स्तान नाही हें चाळींतले सुप्रसीद्द काद्रंबरीकार माळसाकात पोंबुरपेकर यांचें मत मला अगदी पटलें.—मधूजवळ मी आज दूपारीं जीन्याखाली बोलत असतांना त्यांच्या बाबांनी पायलें आणि त्याच्यावर ते रागावले.—खरं म्हणजे माजं त्याच्यावर व त्याचं माज्यावर शूद्द प्रेम आहे.—मधूचें मन हळूवार आहे. त्याची मत्वाकांक्षा एक अभिनयपटू सीनेमांतील हीरो व्हायची आहे. मलाहि चाळींत सर्वजण नरगीस म्हणतात. मधू डायरेक्टर होऊन मला हीराइनचीं कामें देणार आहे. फील्म लाइनमदी त्यांचे कीतीतरी दोस्त आहेत. मधू गाणं कीती छान बोलतो. तो मूजिक डायरेक्टरसुद्धा होईल. चाळींतल्या गणेशोत्सवांत आमच्या 'राणी चंपावती' नाटकांत त्याने किती छान मूजिक डायरेक्शन केलें होतें. पण जगाला कलावंताची पारक नाही. मधू म्हणतो की सर्वच कलावंतांना हालपेष्टाच काढाव्या लागतात..."

**८ जानेवारी :** "काशीनाथ नाडकर्ण्यांचा मूलगा दूष्ट आहे. त्यानेंच बहुतेक बाबांना नीनावी पत्र लीहीलं असेल. मधूने मला जिन्यांत प्रेमपत्र दीलें. कीति छान आहे. मधू कवीता पण काय लीहतो!—तुझी माझी प्रीत—चंद्राची आणि चांदणीची ...अय्या—मधू चंद्र आणि मी चांदणी ही कल्पना कीती सूंदर आहे..."

**२ मार्च :** "मधू फार वाईट आहे. चौबळांच्या कुमुदला घेऊन तो सीनेमाला गेला होता असें काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने मला सांगितलें.—काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने मला 'जादुई नग्री'चा फुकट पास दिला. पण उद्यापासून परिक्षा आहे.—मला परिक्षेला बसायला आवडत नाही. देवाने परिक्षा नीर्माण का केल्या? वाळिंबेबाई दूष्ट आहेत. वर्गात 'आता आपाला सांगा उजवायला' असं मला म्हणायला लाज वाटत नाही.—तरी बरं, केस पीकले तरी लग्नाचा पत्ता नाही स्वताःच्या..."

**५ एप्रिल :** "मधूला फील्म कंपनींत हीरोचा चान्स मिळाला. पन्नास हजार रुपये त्याला मिळणार. काशीनाथ नाडकर्ण्यांचा मूलगा म्हणतो की ही थाप आहे. मधू

पीक्चर सुरू झाले की मला शुटींग दाखवणार आहे. मला तो त्पेब्याकमधे गायचा चान्स देणार आहे. चीत्रपटांत माझं नांव रतन समेळ आसं न लावता रत्नावलीमाला आसं लावणार आहे. संध्याकाळीं हॅगीं गार्डनवर मधूबरोबर मी फीरायला गेली होती. मधू पूढल्या महिन्यांत ब्यूक गाडी घेणार आहे. इंग्लंडमद्धे आर्डर दीली आहे. हॅगीं गार्डनवरून बसमधून परत आलों. मधू पैशाचं पाकीट घरीं वीसरला. माझ्याजवळ दोन आणे होते म्हणून बरं. एकेक आण्याचें टीकीट काढून उरलेली वाट चालत आलों.—मधूच्या खीशांत दोन पैसे होते. त्याची कोथींबिर आणी मिरच्या आणल्या. दोन आण्यांत इतकीशीच मीरचीकोथींबिर कशी आली म्हणून आई रागावली. कलावंतांना मीरचीकोथींबिर आणायला सांगणारे जग दूष्ट आहे..."

**११ जून :** "मी मैयत्रिणीकडे गेली म्हणून सांगून मधूबरोबर मधूचा एक मीत्र डानसींग क्लासमधी आहे त्याच्याकडे गेली. गौरीनंदननी मला फूकट डान्स शीकवायचें कबूल केलें आहे. पूढल्या महीन्यांत ते अमेरिकेला जाणार आहेत. त्या वेळीं मला बरोबर नेणार आहेत. मी अमेरीकेला गेली म्हणजे बाबांचे डोळे उघडतील. हल्ली घरांतली सर्व मंडळी माज्याशीं दूष्टपणा करतात."

**१६ जुलयी :** "गौरीनंदनना काल पोलीसनी पकडला. क्लासला कूलूप होतें. मधू म्हणतो की गौरीनंदन क्रांतिकारक आहे म्हणून पोलीसनी पकडला. क्रांती केली तर पोलीसचें काय जातें कोण जाणे बाई. आता माझ्या डान्सचे कसं होणार ? मधूचं पिक्चर अजून सुरू झालं नाही. ष्टोरीवर वर्क चालू आहे असे मधू सांगत होता. ष्टोरीसुद्धा मधूच लीहणार आहे. जुना ष्टोरीरायटर चुकीची ष्टोरी लीहतो म्हणून कंपनीच्या डायरेक्टरनी मधूलाच ष्टोरी लिहायला सांगितली. मधू त्यांत मला साइड-हीराइनचं काम देणार. म्हणजे माझंच शुटींग जास्ती होणार..."

**१० नवेंबर :** "पुढल्या महिन्यांत पीक्चरचं शुटींग सुरू होणार. तोपर्यंत मधू एक नाटक कंपनी काढणार आहे. सूरवातीला नाटकांत काम केलं की सीनेमांत काम करणं अगदी सोप्पं. नाटकांत मात्र मला हीराइनचं काम आहे..."

**२४ नवेंबर :** "मी आणि मधू लालबागला गेली. तिथे नटवर्य माष्टर सावळा-राम मीठबावकर ह्यांच्या सांतेरीप्रसादसुबोधनाट्यमंडळाच्या नव्या नाटकाचा मुहूर्त झाला. नाटकाचं नांव 'हातांत हात' असं आहे. मधूने माझी ओळख आपली मीसेस अशी करून दिली. मला खूप लाज वाटली. मधू मिचिफस आहे. पण असं सांगावं लागतं असं मधू म्हणाला, म्हणून मी रागावली नाही. कलेसाठी प्राण दिले पाहिजेत असं मधू म्हणतो..."

**१ डीसेंबर :** "काशीनाथ नाडकर्ण्याच्या मुलग्याने बाबांना मला लालबागला पाह्यली हें सांगितलं. मी शाळेंत गेली होती म्हणून सांगितलं. दुपारीं बाबा शाळेंत गेले. मी सबंध वर्षात शाळेंत गेलीच नाही, असं वाळींबेबाईनी बाबांना सांगितलं. म्हणून रात्रीं बाबानी आणि आईनी मला उपाशी टाकून स्वैपाकघरांत कोंडलं. मी

सगळीजण झोपल्यावर दूध पिली. असल्या लोकाशी असच वागलं पायजे. बाबांच्या गजकर्णी फार्मशीच्या मलमाच्या बरण्या सैपाकघरांत होत्या. त्यांत मिर्चीची पूड कालवून ठेवली आहे..."

**१५ डीसेंबर :** "हाल्ली मला कोंडून ठेवत नाहीत. गेले पंधरा दीवस मी दोनदोन तास गोसांईबाबांचा फोटो फुडे ठेवून भक्ती केली. त्यामुळे मला चांगले फळ मिळाले. मी सीनेमांत हीराइन झाल्यावर गोसांईबाबांची चिकोडीला समाधी आहे तीथं पाचशे रुपयाची देणगी देणार आहे."

**२० डीसेंबर :** "मधूनें हळूच खिडकीतून चिठी टाकली. फूडल्या महिन्यांत नाटक होणार आहे. तालमी बंद पडल्या आहेत. लालबागला कंपनीच्या जागेंत आम्हाला राहायला जागा मिळणार आहे..."

**३० डीसेंबर :** "उद्या वांद्र्याला माज्या मावसबहिणीचे लग्न आहे. आम्ही सर्वजण जाणार. मधू रस्त्यांतून मला खूण करणार. मग मांडवांतून मी त्याबरोबर..." (पुढील सर्व मजकूर लिहून खोडलेला आहे.)

**३१ डिसेंबर :** (पान कोरे आहे.)

—३१ डिसेंबरची रतन समेळची हकीकत अन्य मंडळींच्या वासऱ्यांमधून स्पष्ट आहे. त्यामुळे ते पान कोरे राहणे साहजिकच आहे. कोऱ्या पानात तिच्या मानसिक अवस्थेचे प्रतिबिंब अधिक स्पष्ट दिसते हे सांगणे नलगे.

बटाट्याच्या चाळीतील तरुण पिढीच्या वासऱ्यांत राघूनाना सोमणांच्या बंडूची वासरी ही विशेष उद्बोधक आहे. चाळीत बंडू सोमण हा 'ध्येयवादी बंडू' या नावाने प्रसिद्ध होता. चाळीच्या सर्व सांस्कृतिक वा अन्य कार्यक्रमांत बंडूची अर्ध्या खाकी विजारीत सद्रा आणि पोट कोंबलेली किंचित 'स्थूलिश' मूर्ती अनेकांना कौतुकास्पद वाटते. बंडू देश, समाज, धर्म अशा अनेक अभिमानांनी प्रेरित आहे. त्यामुळे त्याच्या वासरीतील आत्मचिंतन पाहण्यासारखे आहे. ही वासरी म्हणजे घरी तयार केलेली कोऱ्या पानांची वहीच आहे आणि त्यात तारीख आणि महिना घालून पुढे मजकूर लिहिलेला आहे. सनांचा पत्ता नाही. पण दोनतीन वर्षांचा मजकूर एकाच वहीत असावा.

**१ जानेवारी :** "नवे वर्ष उजाडले. परंतु चाळीतील मंडळींत नवा स्वाभिमान केव्हा उजाडणार? ध्येयहीनतेमुळे आपल्या देशाचे केवढे नुकसान होत आहे! ही जुनी पिढी केव्हा सुधारणार? आमच्या तीर्थरूपांची चोवीस तास आपल्या पोष्ट-हाफिसातील साहेबाबद्दलची भाषणे बंद पडून आसिंधुसिंधुपर्यंत हिंदुबांधव पसरलेल्या आपल्या भारतवर्षाची चिंता वाहायला ते केव्हा सुरुवात करणार?—चाळीत 'जळती मशाल' नावाचे हस्तलिखित मासिक सुरू करायची माझी सूचना तरुण पिढीला पसंत पडली नाही. 'ध्येयाचा मार्ग रक्त व अश्रू यांनी भरला आहे'..."

५ फेब्रुवारी : "चाळीचा मधला चौक साफ करून तेथे सामुदायिक सूर्यनमस्कार घालायची माझी कल्पना कोणीच मान्य करीत नाही. चाळीची गच्ची चांगली होती; पण ती तर मिळत नाही. मन अस्वस्थ आहे. जोगदंडांची सुमी माझ्याकडे पाहून दात काढते. रामरक्षा म्हटली व गार पाण्याने स्नान केले. 'मन जिंकल्यावर जग जिंकता येईल'..."

९ मार्च : "रोजच्याप्रमाणे पहाटे चार वाजता उठून पळायला गेलो. चाळीतून पळताना पोर्तुगीज चर्चच्या नाक्यावर इतरही तीनचार मंडळी मागे पळत होती. लोकांच्यात पहाटे उठून पळण्याचा उत्साह वाढत आहे, म्हणून आनंद वाटला. परंतु माझ्यामागून पळणाऱ्या मंडळींनी मला वेढा दिला व मला पकडून चोर समजून ते चौकीवर गेले. मी त्यांना वस्तुस्थिती पुष्कळ समजावून सांगितली; परंतु ती त्यांना पटली नाही. शेवटी त्यांना घेऊन मी चाळीत आलो, तेथे त्यांची खात्री पटली. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्'..."

१० मार्च : "चाळीत 'युवकमंडल' माझ्या अध्यक्षतेखाली स्थापन झाले. क्रांतिकारकांशी माझा संबंध कालच्या अटकेने सिद्ध झाला. देशासाठी मी तुरुंग आणि पोलीस यांना भीक घालणार नाही. 'वाढुं दे कारागृहाच्या भिंतिची उंची किती। मन्मनाना—हिक्षिती ॥'..."

१ एप्रिल : "बाबांनी नोकरीचे जोखड शेवटी मानेवर बसवले. पोष्टात ष्टांपव्हेंडर म्हणून काम करण्यास सुरवात झाली. पत्रे लिहून देण्याचे काम करतो. त्यातूनही राष्ट्रसेवा करता येते आणि क्रांतीचे कार्यही साधते. बऱ्याच निरक्षरांच्या कार्डावर 'आसिंधुपर्यंत क्रांती करा' हे शीर्षक लिहितो. 'भ्रमानें रे आहे गिरिकुहरिं हा निद्रित हरी'..."

१ मे : "गेल्या महिन्यात दोन रुपये नुकसान झाले. ष्टांपांच्या हिशेबात काहीतरी घोटाळा झाला. कार्यकर्त्या मित्राच्या समोर तीर्थरूप मला नालायक म्हणाले हे त्यांना शोभले नाही. परक्यांच्या राजवटीत ज्यांची मस्तके गंजली आहेत त्यांनी मला नालायक म्हणावे हे लांछनास्पद आहे. मी माझ्या ध्येयापासून चळणार नाही. 'राजा कालस्य कारणम्'..."

५ जून : "घरात लग्नाची बोलणी सुरू झाली आहेत. परंतु मी दादरच्या गोण्या मारुतीपुढे ब्लेडने करंगळी कापून आजन्म अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. माझ्या प्रत्येक ध्येयाच्या आड घरातील वडील मंडळी येत आहेत. मी ऐन लग्नाच्या वेळी पळून जाईन. आजपासून दाढी करणे बंद! 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे?'..."

१० जुलै : "जोगदंडाची सुमी माझ्याकडे पाहून पुन्हापुन्हा दात काढते. काशिनाथ नाडकर्ण्यांचा मुलगा मला 'बंडूबुवा' म्हणून माझ्या दाढीची टिंगल करतो. असल्या गोष्टींना मी भीक घालणार नाही. क्रांतिकारांची चरित्रे वाचावयास

सुरुवात केली आहे. आज माझ्यामागून एक गृहस्थ सारखा पाळत ठेवून येत होता. मी हातातील पुस्तक बनियनच्या आतल्या बाजूला दडवले. आज दोनतीन दिवस हा गृहस्थ माझ्या पाळतीवर होता. पोष्टात माझ्याकडून जवळजवळ दोन रुपयांची कार्डे घेऊन गेला. मॅझिनीवरदेखील अशीच पाळत ठेवीत असत. म्हणून मी त्याला चुकवण्यासाठी खोताच्या वाडीत शिरलो. तोही माझ्यामागून आला. डावीउजवी वळणे घेऊन मी त्याला चुकवण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्याला चकवले. आज घरी यावयास उशीर झाला. खोताच्या वाडीतल्या गल्ल्या गनिमी काव्याने लढावयास उत्तम आहेत. ह्या गल्ल्या बहुधा क्षत्रियकुलावतंस गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपती श्रीशिवाजीमहाराज यांच्या तेजस्वी कारकीर्दीतच झालेल्या असाव्यात. 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें !'..."

१५ जुलै : "त्या गृहस्थाने माझ्यावर पाळत ठेवून मला कांदेवाडीच्या नाक्यावर पकडले. माझे नाव, गाव, पत्ता विचारून घेतला. नाइलाजाने सर्व सांगावे लागले. माझ्या खिशात भयंकर खुनाची कथा ('मुडद्याचें आतडें') असल्यामुळे त्याने माझी तपासणी केल्यानंतर मी क्रांतिकारक आहे हे त्याने लगेच ओळखले असते. माझे नाव, गाव, पत्ता घेण्याचे कार्य झाल्यानंतर तो मला कोपऱ्यातील एका म्लेंच्छाच्या दुकानात चहा पिण्याचा आग्रह करू लागला. परंतु मी संभाजीमहाराजांचे स्मरण करून 'तुझी मुलगी देत असशील तर यवनाच्या हातचा चहा पिईन' असे दरडावून ओरडलो, आणि 'तुम्ही माझ्या मनातली गोष्ट कशी ओळखली?' असे म्हणून त्याने मला भर गिरगावरस्त्यात मिठी मारली! मी अफझुलखानवधाचा प्रसंग डोळ्यांपुढे आणीत होतो. परंतु त्या गृहस्थाच्या डोळ्यांत आधीच पाणी आले होते. त्याने मला जवळजवळ ओढीत दोन देवळांत नेले. त्याची धार्मिक भावना पाहून त्याला क्षमा केली...रस्त्यातून मला ओढीत नेताना 'परमेश्वरा, तू धन्य आहेस! बाबांची कृपा...' असे तो बडबडत होता. दोन देवळांतल्या मूर्तींपुढे त्याने दंडवत घातला. मीही घातला. आणि म्हणाला, 'ह्या देवासमक्ष मी तुम्हांला वचन देतो बंडोपंत, मी—तुम्हांला मुलगी दिली! आता घरीच चहा प्यायला चला!' 'बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें'...!"

ह्यानंतरची 'ध्येयवादी बंडू'च्या वासरीतील फारच थोडी पाने लिहिलेली आहेत. ११ जुलैपुढे खालीलप्रमाणे नोंद आहे :

११ जुलै : "सौभाग्यवती प्रसूत होऊन पहाटे चार वाजता कन्यारत्न झाले... 'नमस्कार माझा तया रामदासा'..."

बटाट्याच्या चाळीतील भगिनीवर्गात मात्र वासरी लिहिण्याविषयी फारशी उत्सुकता आढळत नाही. त्यामुळे त्यांच्या मनांच्या आरशातल्या प्रतिबिंबाचा अंदाज येऊ शकत नाही. ज्या दोनचार वासऱ्या आढळल्या, त्यांपैकी बाबलीबाई

त्रिलोकेकरांच्या रोजनिशीत एका पानावर फक्त खालील मजकूर आढळतो :

**९ मे :** "दोन रत्तल मटण आणावयास सांगणे. ते आणल्यावर साफ करणे. मग दोन शेर कांदे चिरून मटण उकडत ठेवणे. उकडल्यावर एक शेर केशर, पाव तोळा बटाटे, तीन इंच लसूण व दोन दालचिनीचे गड्डे त्यांत कुटून घालणे. मग पाव रत्तल मीठ, दोन टेबलपून्स्फूल तांदळाचे पीठ टाकून ढवळावे. मटन शिजत नसल्यास भांड्यात एक नारळाच्या करवंटीचा तुकडा टाकावा व तो शिजवून त्याचा मऊ लगदा झाला म्हणजे मटण शिजले असे समजावे. खातेवेळी मटण काढून करवंटी ठेवण्याची काळजी घ्यावी. पावाबरोबर हा पदार्थ खाल्ल्यास पाव चांगला लागत नाही. म्हणून पाव नुसताच खावा व त्यानंतर हा पदार्थ खावा. मटणाच्या ह्या क्रुतीस 'मटणमंझील' म्हणतात..."

सौ० भागीरथीबाई नाडकर्णी यांच्या डायरीत एके ठिकाणी "पिळाची वीण... दोन उलटे, दोन सुलटे...उलट्यावर उलटे व सुलट्यावर उलटे..." एवढेच लिहिलेले आहे!

चाळीतील संगीतरत्न एच० मंगेशरावांच्या पत्नी वरदाबाई ह्यांच्या वहीत एका पानावर "एरी मैकोचैननआवतानिसदिनधरिपलचिनमिन" अशी सांकेतिक लिपीतली अक्षरे आहेत व पुढे "सापमरे सापमरे—धनी मग मरे" असाही मजकूर आहे.

सौ० सावित्रीबाई खऱ्यांच्या वासरीत दर रविवारी "एक कोट, दोन पँटी, दोन शर्ट, सहा पातळे, सहा ब्लाऊज—एकूण कपडे सतरा—पाच हातरुमाल लेडीज (फुकट)" असा मजकूर सापडतो. तर गंगामामीच्या रोजनिशीत "आज फक्त पावशेर दूध" असा मजकूर एकूण त्रेचाळीस ठिकाणी आणि दोन ठिकाणी "चक्का—अडीच शेर" अशी 'एंट्री' आहे. यापलिकडे काही नाही.

चाळीतील वृद्ध-तरुण स्त्रीपुरुषांच्या डायऱ्या आपण पाहिल्या. चौबळांच्या चंदूला भाईसाहेबांनी ऑफिसातून सोनेरी डायरी आणून दिली आहे. तिच्यावर चुकून गेल्या वर्षाच्या तारखा पडल्या आहेत. आपल्याकडील मुद्रणदोष वाढत आहेत, ही देशाच्या दृष्टीने अत्यंत हानिकारक गोष्ट आहे. चि० चं० चौबळ ह्याच्या डायरीवर पहिली फक्त सात पाने लिहिलेली आहेत.

**१ जानेवारी :** "आज वर्षाचा पहिला दिवस. गोखले सरांनी वर्गात सांगितल्या-प्रमाणे डायरी लिहिण्यास सुरुवात केली आहे. पुढल्या वर्षी एसेस्सीचा स्टडी आहे. त्यामुळे डायरी लिहिण्यास वेळ मिळणार की नाही कोण जाणे! परंतु गोखले सर सांगतात त्याप्रमाणे 'व्हेअर देअर इज अ विल देअर इज अ वे!'—ह्या तत्त्वाला अनुसरले पाहिजे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे पहाटे उठलो व अभ्यासाला बसलो. रोज एक तास तरी इंग्लिश वाचले पाहिजे. शाळा आठ तारखेला उघडणार, तोपर्यंत खूप अभ्यास होईल. खालीलप्रमाणे टाइमटेबल करीत आहे :

"सकाळी ५ ते ५-३० उठणे व शौचमुखमार्जन.
५-३० ते ५-३५ प्रार्थना.
५-३५ ते ५-४५ विश्रांती.
५-४५ ते ८ अभ्यास.
८ ते ८-३० चहा, आंघोळ वगैरे.
८-३० ते ९ विश्रांती.
९ ते ११ अभ्यास.
११ ते ११-१५ जेवण.
११-१५ ते ११-२५ विश्रांती.
११-२५ ते २-३० अभ्यास.
२-३० ते ३ विश्रांती व दुपारचा चहा.
३ ते ६-३० अभ्यास—मॅथॅमॅटिक्स.
६-३० ते ७-३० फिरणे.
७-३० ते ८ विश्रांती.
८ ते ९ अभ्यास.
९ ते ९॥ जेवण.
९॥ ते ५ झोप.

"हा कार्यक्रम उद्यापासून नियमितपणे पार पाडलाच पाहिजे. आज पिक्चर पाहण्याचा शेवटचा दिवस. 'स्वस्तिक'मध्ये 'मेरा दर्दे जिगर' लागला आहे..."

**२ जानेवारी :** "रात्री उशिरा झोपल्यामुळे सकाळी ५ वाजता उठलो नाही. साडेआठ वाजता उठलो. ८-३० ते ९ ही वेळापत्रकाप्रमाणे विश्रांतीची वेळ होती. यामुळे विश्रांती घेतली. नऊ वाजता चहा व आंघोळ हा कार्यक्रम वेळ बदलून केला. दहाच्या सुमाराला काशिनाथ नाडकर्ण्याचा दुसरा मुलगा आला. त्याने 'हत्तीच्या पोटातील हिरा' ही रहस्यकथा वाचण्याचा आग्रह केला. ती वाचताना अकरा केव्हा वाजले ते कळले नाही. अकरा ते अकरा पंधरा जेवण झाल्यावर ११-१५ ते ११-२५ विश्रांती घेण्यासाठी पडलो. रात्रीच्या जागरणामुळे झोप आली. अडीच वाजता उठलो. २॥ ते ३ ही विश्रांतीची वेळ होती. त्यामुळे विश्रांती घेतली. ३ वाजता आलजिब्र्यातील उदाहरणे सोडवण्यास घेणार होतो; परंतु माझा आलजिब्रा सुरेश मानकरने नेला आहे व जॉमेट्रीचे पुस्तक सापडत नाही. मॅथॅमॅटिक्सच्या अभ्यासाची वेळ असल्यामुळे दुसरे काही वाचणे शक्य नव्हते. म्हणून 'हत्तीच्या पोटातील हिरा' रहस्यकथा वाचली. संध्याकाळी दादरची मावशी आणि तिची पुतणी अलका आली होती. अलका एट्थमध्ये आहे. तिला पत्त्यांच्या जादू करून दाखवल्या. एकामागून एक गुलाम काढून दाखवण्याची ट्रिक शिकवली. तिची सेकंड लँग्वेज फ्रेंच आहे. आमच्या शाळेत संस्कृतशिवाय दुसरी सेकंड लँग्वेज शिकवत नाहीत. संस्कृत फार हार्ड

आहे. तुंगारे सर ऊर्फ 'जॉनी वॉकर' ह्यांना संस्कृत मुळीच शिकवता येत नाही. गोखले सर इंग्लिश फाईन शिकवतात. त्यांना मुले लॉर्ड विलिंग्डन म्हणतात हे रॉंग आहे. इंग्लिशची आथोरिटी आहेत गोखले सर!—रात्री दहा वाजता झोपलो."

**३ जानेवारी :** "सकाळी बरोबर पाच वाजता उठलो. दिवा लावला. 'इतक्या सकाळी उठून काय दिवे लावणार दिसतंय. झोपा!'—असे म्हणून भाईसाहेबांनी दिवा मालवायला लावला. म्हणून पुन्हा झोपलो. वडील मंडळींना तरुण पिढीच्या आकांक्षा कळत नाहीत. गल्लीत गोटी-ब्यॅट खेळलो. चापशीच्या दुकानातली बरणी फुटली. चापशीने गुप्त्यांच्या अरविंदला चोप दिला. चाळीतल्या सर्वांनी मिळून चापशीचा काटा काढायचा असे ठरले आहे. त्यासंबंधी दुपारी दुसऱ्या मजल्यावरील जिन्याखाली गुप्त सभा झाली. चा०च्या दु० ला आ० ला०चे ठ० आ०. रात्री ९ वाजता पुन्हा गुप्त सभा होती; परंतु जाऊ शकलो नाही. अरविंद गुप्त्याच्या बाबांना चपाशीने बरणी फोडल्याचे सांगितले. रात्री नऊ वाजता अरविंद गुप्त्याच्या बाबांनी अरविंदला खूप बडवले. हे त्यांना शोभत नाही. नवी पिढी हे अत्याचार सहन करणार नाही. रात्री दहा वाजता झोपलो..."

**४ जानेवारी :** "आज सकाळी उठलो.—'इरॉस'चे नवे पिक्चर विद्यार्थ्यांना हाफ रेटमध्ये आहे.—इंग्लिश पिक्चर पाहिल्याशिवाय इंग्लिश सुधारणार नाही. संध्याकाळच्या शोला 'इरॉस'चे पिक्चर पाहिले..."

**५ जानेवारी :** "कालचे पिक्चर मस्त होते. रायडिंग तर बेफाम होते. इंग्लिश मात्र जरा हार्ड होते. आमच्या वर्गातला पप्या पणजीकर अगदी हाय इंग्लिशसुद्धा फास्ट बोलतो. यसचा खरा उच्चार 'येप' असा आहे, असे मला पप्याने सांगितले—हेडमास्तर ऊर्फ मोरया गोसावी पिंपुटकरपेक्षा पप्याचे इंग्लिश फाईन आहे. रात्री ९ वाजता झोपलो..."

**६ जानेवारी :** "आज सकाळी उठलो. आईने भाजी आणायला पाठवले. गोखले सर भेटले होते. त्यांना माझे टाइमटेबल सांगितले. ते म्हणतात की, एक वर्ष मी असा अभ्यास केला तर एसेससीत मी शुअर फर्स्ट फाइवमध्ये येईन. उद्यापासून टाइमटेबलाप्रमाणे उठले पाहिजे. डायरी लिहिताना खूप झोप येत आहे...म्हणून थांबवतो..."

**७ जानेवारी :** "आज सुट्टीचा लास्ट डे म्हणून चाळीतल्या सर्व पोरांनी पिक्चरला जायचे ठरवले, त्यामुळे जावे लागले. काही पोरे मराठी पिक्चरला गेली व आम्ही इंग्लिश पिक्चरला गेलो. मराठी पिक्चरमध्ये दम नसतो. इंग्लिश पिक्चर फाईन होते. मला अरविंद गुप्ते पुन्हा घेऊन जाणार आहे. मी गेल्या महिन्यात त्याला 'मारी वालवास्का' दाखवली होती. नेपोलियनचे काम तर काय फाईन आहे..."

ह्यानंतर वाचण्यासारखी नसली तरी पाहण्यासारखी एक वासरी आहे ती म्हणजे कुमारी अकल्पिता फुलझेले ह्या साडेचार वर्षे वयाच्या बालिकेची. त्यातील एक जानेवारीच्या पानावर सूर्याचे चित्र आहे आणि खाली 'सूरय' अशी अक्षरे आहेत. पुढेही अधूनमधून काही चित्रे आहेत. त्यांतील कावळा, घर आणि जहाज ही चित्रे पाहून अति-नव-चित्रकलेचे, अत्याधुनिक वाङ्मयाचे—आणि एकूणच सर्व काही गोष्टींचे—सखोल नसले तरी बरेचसे खोलगट टीकाकार श्री० मच्छिंद्र भोंगे म्हणाले की, "ह्या मुलीत पिकासोची पातळी आहे. ॲरी मातीसची मखमली रेखाकृती आहे आणि ओब्रोनीबाबूंची सघनता आहे..." हा अभिप्राय खुद्द फुलझेल्यांनी, चि० कु० अकल्पिता हिच्या वडिलांनी, चाळीतल्या सर्वांना सांगितला.—चाळीतली मंडळी 'म्हणजे काय आहे?'च्या बुचकळ्यात अजूनही आहेत...चि० अकल्पितेची अतिनववासरी इतर सगळ्या वासऱ्यांना भलताच धक्का देऊन गेली आहे!



# ....काही स्त्रीगीते

आजचा काळ लोकसत्तेचा आहे. संरजामशाहीतून आज लोकशाहीत झालेल्या संक्रमणामुळे इतके दिवस हे आपले आणि हे लोकांचे असे आपण जे मानत होतो, त्यातून आता लोकांचे ते सारे काही आपले असे मानण्याचा काळ आला आहे. साहजिकच लोकवाङ्मयाच्या संशोधनाला बहर येणे स्वाभाविक आहे. भारतवर्ष हा जानपदांत असल्यामुळे जानपदवाङ्मय हेही समीकरण चूक आहे असे नाही. परंतु जानपदांत वसते तेच लोकवाङ्मय समजले जावे, आणि नगरांत वास्तविक लोकांची प्रचंड दाटी असून तेथील लोकवाङ्मय उपेक्षेने मारले जावे हे काही योग्य नाही असे आम्हांला—म्हणजे मला—वाटते.

महाराष्ट्रातील विद्वानांनी, विशेषतः विदुषींनी, तर पिठाच्या जात्यापासून ते नांगराच्या दात्यापर्यंत संशोधन करून खूपच वाङ्मय जमा करून, महाराष्ट्ररसिकांपुढे ग्रंथरूपी तबकांतून हा लोकवाङ्मयरूपी मेवा सादर केलेला आहे. कित्येक वेळेला मेव्यापेक्षा तबकच अधिक रंगदार असते, तसाही प्रकार ह्यात झाला आहे. परंतु त्यातील जिव्हाळा हा झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे ओसंडतो आहे. नागर पुरुषांनी आजवर स्त्रीगीतांना लाजवील असे नाजूक वाङ्मय लिहिले आहे. त्याबद्दल माना वेळावून, टेबलाशी ओठंगून उभे राहून बोलणारेही अपौरुषेय वाङ्मयसेवक आहेत. परंतु परवा-परवापर्यंत खुद्द मुंबई शहरात आणि खेतवाडीतील बटाट्याच्या चाळीत अशा प्रकारचे वाङ्मय विपुल आहे याची आम्हांला जाणीव नव्हती. पिकते तेथे विकत नाही हेच खरे! ह्या न्यायाने जात्यावरच्या ओव्यांनी खेडवळ बायकांपेक्षा शहरी भगिनींनाच अधिक हलवलेले आढळते आणि खेड्यांतील शेतकरी 'हवा में उडता जाये मेरा लाल दुपट्टा मलमल का' ह्या गाण्याने बैलाला आळवताना आढळतो हेही खरे!

जानपदगीतांत जो जिव्हाळा, भावनांची खळबळ, निर्मळ निर्व्याजता, आणखी असेच चारपाच वाङ्मयीन गुण ज्याप्रमाणे आढळतात, त्याप्रमाणे मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात अशा जिव्हाळ्याच्या संगीताचे सूर उमटत असतील ह्याची आम्हांला कल्पनाही नव्हती. आणि अचानक बटाट्याच्या चाळीतील सुप्रसिद्ध आणि एकमेव विदुषी डॉ० सौ० काव्यकलाबाई कोरके यांची भेट झाली नसती, तर तोही योग आला नसता. परंतु नुकतेच घसवाडीतील गणपतीत 'नागरी जीवनातील अपौरुषेय वाङ्मय' ह्या विषयावरील त्यांचे भाषण ऐकण्याचा योग आला आणि त्यामुळे अपौरुषेय वाङ्मयाचे एक नवे अंग पाहिल्याचा आनंद आम्हांला झाला. व्याख्यान संपल्यावर मी त्यांना जाऊन भेटलो आणि त्यांचे अभिनंदन केले. आणि त्यांची प्रदीर्घ मुलाखत घेण्याचा माझा मानस व्यक्त केला. सोनेरी काड्यांच्या चष्म्याचा पूल नाकाच्या मध्यावर बसवण्याचा लाडिक चाळा करीत त्यांनी मला कबुली दिली. त्यांच्याकडून पत्ता घेऊन मी दुसऱ्याच दिवशी बटाट्याच्या चाळीतील त्यांच्या बिऱ्हाडी गेलो.

त्यांनी जमवलेल्या बटाट्याच्या चाळीतील लोकगीतांसंबंधी माहिती सांगण्यापूर्वी डॉ० काव्यकलाबाई कोरके यांचा माझ्या प्रिय वाचकांना—विशेषतः भगिनींना—परिचय करून देणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रातच काय, पण साऱ्या भारतवर्षात आणि जंबुद्वीपातही लोकवाङ्मयाचा सखोल अभ्यास केलेल्या ज्या काही हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या भगिनी आहेत, त्यांत काव्यकलाबाईंचा नंबर बराच वर लागेल. (आता ही संख्या वाढते आहे आणि हातांबरोबर ह्या विदुषींची मोजदाद करायला पायांचीही मदत घ्यावी लागेल ह्याची प्रस्तुत लेखकाला नम्र जाणीव आहे.) यांचे मूळ नाव कावेरी; परंतु लग्न झाल्यावर ह्यांच्या पतींनी त्यांच्या अंगचा काव्याचा गुण पाहून त्यांचे नाव काव्यकलाबाई असे ठेवले. त्यांचे हे गुणग्राही पती श्री० मल्हार महेश्वर कोरके ऊर्फ 'मोहन मधुकर' हेही कवी आहेत. ते मुंबई महानगरपालिकेत महापौरांच्या महाकार्यालयात दरमहा दोनशे रुपये (महागाई भत्त्यासकट) पगाराच्या नोकरीवर आहेत. काव्यकलाबाई, मोहन मधुकर आणि त्यांची एकुलती एक चिमखडी स्रग्धरा ही कन्या असा त्यांचा चिमुकला आणि गोऽऽड संसार आहे. संसाराची ही सर्व जबाबदारी सांभाळून काव्यकलाबाईंनी अमेरिकेतील मिशिगनशेजारच्या उशिगन विद्यापीठाची गृहशास्त्रविभागाची, मुंबईत राहून, 'चालुक्यकालीन चुली' ह्या विषयावर डॉक्टरेटही मिळवावी ही गोष्ट आमच्या केवळ चूल आणि मूल करणाऱ्या भगिनींनी लक्षात ठेवण्यासारखी आहे. असे सतत उद्योग आणि दीर्घकालीन परिश्रम ही त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे, असे मला त्यांचे सुविद्य पती श्री० मोहन मधुकर म्हणाले.

त्यांच्या घरातील वस्तूवस्तूत काव्य आहे...किंबहुना, स्वतःच्या लग्नातील मंगलाष्टके काव्यकलाबाई आणि मोहन मधुकर यांनीच रचिली होती. ती गाण्याचाही त्यांचा

बेत होता; परंतु परंपरा आडवी आली. "परंपरेच्या नाड्या ओवूनच नवे पोशाख चढविले पाहिजेत" असे उभयतांचे मत आहे—म्हणजे काव्यकलाबाईंचे मत आहे आणि त्यांच्या मनमिळाऊ आणि सुग्रहस्थ पतींचा दुजोरा आहे. चिमुकली स्रग्धरा तर या वयातच कविता करते. तिचे चिमखडे बोल अनेक मासिकांतून आता प्रसिद्ध झाले आहेत—दरमहा प्रसिद्ध होत आहेत. तिचे चिमखडे बोल लिहिता लिहिता नाकी नव येतात, असे काहीसे मोहन मधुकर पुटपुटले. त्यांना डोळ्यांच्या जरबेने गप्प करीत काव्यकलाबाई म्हणाल्या, "एकदा गरा म्हणाली—(गरा हे स्रग्धरेचे लाडके नाव आहे.) 'मम्मी, ते बघ.' संध्याकाळची वेळ होती. गरेच्या चिमुकल्या बोटाच्या दिशेनं मी पाहिलं. आकाशातून बगळ्यांची माळ उडत होती. मी गरेला विचारलं, 'ते कोण आहेत ठाऊक आहे तुला?' तशी गरा म्हणाली, 'होऽऽ!' मी म्हटलं, 'सांग पाहू.' गरा म्हणाली, 'ते पक्षी आहेत.' मी म्हटलं, 'कुठं ग चालले आहेत ते?' गरा लगेच म्हणाली, 'आकाशातल्या चांदण्या पेटवायला चालले आहेत.' आमच्या रस्त्यावर संध्याकाळी गॅसचा दिवा पेटवताना ह्या चिमुरडीनं केव्हा पाहिलं होतं कोण जाणे!"



"फारच सुंदर कल्पना आहे!" शंकरपाळ्याचा तुकडा तोडता तोडता मी म्हणालो.

आपल्या संसाराच्या कथा सांगताना काव्यकलाबाई अगदी रंगून जातात. त्यांच्या चष्म्यामागून त्यांचे डोळे एका वात्सल्ययुक्त तेजाने लुकलुकू लागतात. त्यांच्या सावळ्या वर्णावर निराळी लकाकी येते आणि दातही चमकतात. "हे माझी सारखी थट्टा करीत असतात. म्हणतात, की तू आलीस आणि माझं कवितालेखन थांबलं. मी म्हटलं, 'साक्षात काव्यकला तुम्हांला मिळाली ना?'...मोहन, चहाला आधण आलं पाहता का?"

मोहन मधुकर चटकन उठून आत गेले आणि स्वतः चहाचे कप भरून घेऊन आले. शंकरपाळे तोडणे मला अवघड जात होते, म्हणून मी चुकून अडकित्त्याने एक शंकरपाळा कातरू लागलो.



"तुम्हांला खायला ती जड जातात ना? पाहिलंत मोहन, मी म्हटलं तुम्हांला—"

"तसं नाही." मी संकोचाने आणि सावध होऊन म्हणालो.

"आम्ही खाण्याचे पदार्थ मुद्दामच कडक ठेवतो. दातांतील शक्ती मऊ, खुसखुशीत पदार्थ खाऊन नष्ट होते."

"हो—" मोहन मधुकर म्हणाले, "भातदेखील पुरा शिजलेला नसतो आमच्याकडे."

"इतकी नको होती थट्टा करायला!" काव्यकलाबाई लाजून किंवा रागावून म्हणाल्या. त्यांचे ते लाजणे किंवा रागावणे केवळ विलोभनीय होते, असे म्हटल्यावाचून मला राहवत नाही. काव्यप्रियच नव्हे, तर साक्षात काव्य जगणाऱ्या त्या पतिपत्नींच्या सुखसंवादात मध्येच तोंड घालून मी मुख्य विषयाला सुरुवात केली.

"आपण परवाच्या भाषणात बटाट्याच्या चाळीतील स्त्री-गीतांबद्दल उल्लेख केलात, ती गीतं मला पाहायला मिळतील का?"

"अग बाई, विसरलेच की!" शेपटीवर पाय पडलेल्या मांजरीच्या चपलतेने खुर्चीवरून उठत काव्यकलाबाई म्हणाल्या आणि लगबगीने त्यांनी कपाटातून बाड काढले. अंगविस्ताराच्या मानाने त्यांची चपळाई वाखाणण्यासारखी होती.

"त्यातील काही गीतं आपण मला ऐकवाल का?"

"मला गाताबिता येत नाही हो!" विनयाने काव्यकलाबाई म्हणाल्या आणि वही उघडून हळुवार आवाजात त्यांनी गुणगुणायला सुरुवात केली. श्री० मोहन मधुकरांनी चटकन दारे-खिडक्या लावून घेतल्या.

"शेजाऱ्यांचा फार डिस्टर्बन्स होतो." अपराधी नजरेने आपल्या पत्नीकडे मोहन मधुकरांनी का पाहिले, हे मला कळले नाही.


"माहेरच्या ओढीबद्दल आपल्या मायबहिणींनी असंख्य गीतं रचली आहेत; परंतु आंब्याच्या राईतून जाणाऱ्या त्याच वाटा आणि केळीपोफळींचे बाग ही ठराविक वर्णनं त्यांत फार आली आहेत. आमच्या चाळीतील भगिनींचं हे गीत तुम्हांला खास आवडेल. आंग्रेवाडीत त्यांचं माहेर आहे. माहेर कोकणात असलं, म्हणजेच काही लोकगीत होत नाही. आंग्रेवाडीतलं माहेर म्हणजे का माहेर नव्हे?"

काव्यकलाबाईंच्या बोलण्याला आता निराळी धार आली होती. एका उपेक्षित वाङ्मयसेविकेची बाजू मांडणाऱ्या विदुषीचा तजेला त्यांच्या मुखावर आता दिसू लागला होता. किंचित पुरोगामी असलेले दोन दात किंचित अधोगामी असलेल्या ओठावर त्यांनी भावनावेगाने दाबून घेतले आणि अस्सल शहरी वातावरणात सासुरवास भोगणाऱ्या एका आर्यकन्येचा माहेरचा ओढा त्यांनी वाचलेल्या पुढील काव्यातून वाहू लागला.

"ह्या गीतातील भूमिका अशी! व्हरांड्यात एका कोपऱ्यात ठेवलेल्या कचऱ्याच्या पिंपावर बसलेल्या चिमणीला उद्देशून ही सासुरवाशीण म्हणते आहे :



*माझिया माहेरा जा रे पाखरा, माझिया माहेरा जा।*
*ट्राम आहे सोबतीला—तिची गोड ठणठण*
*वाट दाखवाया—मिळेल ग पोस्टमन..."*



"सुंदर!!" मी उद्गारलो.

आपल्या डोळ्यांतील अश्रू आवरीत काव्यकलाबाई वाचू लागल्या :

*"तांब्यांच्या हॉटेलीं गर्दी ग दाटली*
*क्याशर भाईराजा—माहेरा जा॥*

*माझ्या रे भावाची—पहिलीच खोली*
*वहिनी माझी—इंटर झाली*
*माळ्यावरी दुज्या—उडुनिया जा ॥ माझिया माहेरा जा ॥*

*अंगणांत फूटपाथ—तिथे घ्या हो घ्या विसावा*
*केळियाच्या सालीवरी—पाय जपूनिया ठेवा*
*हळूच उघडा चौच—झोप बाबांची मोलाची*
*रात्रपाळी त्यांची असे—छापखान्यांत सदाची*
*तूमची सूकन्या सासरीं हो धन्या*
*सांगा चिऊताई—साऱ्यांच्या कानीं एवढा निरोप माझा...''*

"अहाहा!!"

"शहरांतील मुलींना काय भावना नाहीत? किती घरेलू आहे पाहा दृश्य! एका कुटुंबाचं किती हृदयंगम चित्र उभं राहिलं पाहा. आणि आपल्या भावाचा तिला केवढा अभिमान! साध्यासुध्या नाही तर तांब्यांच्या आरोग्यभुवनात तो क्याशर आहे. गरीब बिचारा बाप छापखान्यातील रात्रपाळी उरकून आला आहे. त्याची झोप मोडेल ही त्या सासुरवासिनीला काळजी. तो तिथं प्रूफकरेक्टर असेल का? का कंपोझिटर? किती सूचकतेनं हा प्रश्न वाचकावरच सोडला आहे! आणखी एक मुद्दा तुमच्या ध्यानात आला का?"

"कुठला?"

"ह्यात आईचा उल्लेख नाही. म्हणजे आईवेगळी ही पोर आहे. कारुण्याला अधिकच ओलावा येत नाही का? म्हणजे चिमणीचे नाजुक पंख पाण्यानं आणखी भिजावे तसं मुळातलं कारुण्य अधिक ओलं नाही का झालं? शिवाय आधुनिक काव्यात इंग्रजी शब्द आणणाऱ्यांचं कोण कौतुक होतं! ट्राम, पोस्टमन, हॉटेल, कॅशर, फूटपाथ, नंबर, इंटर असे सात इंग्रजी शब्द ह्यात किती सहजपणानं आले आहेत! त्याची मात्र उपेक्षा!"

"अगदी सूक्ष्म अभ्यास केलेला दिसतोय आपण!"

"अभ्यासाशिवाय का हे होतं?" काव्यकलाबाईंच्या उद्गारात केवढा आत्मविश्वास होता. "शिवाय वास्तवाला किती धरून आहे हे काव्य! ह्या कवितेला मुंबईच्या चाळीचा वास आहे. वातावरणनिर्मिती हा कलेचा आत्माच नाही का? केवळ वातावरणाच्या दृष्टीनं मी आपल्याला आणखी एक लोकगीत ऐकवते... कंटाळा नाही ना आला आपल्याला?"

मी दाबलेली जांभई काव्यकलाबाईंच्या नजरेतून सुटली नाही. त्यांच्या ह्या सूक्ष्म अवलोकनाचे मला फार कौतुक वाटले.

"छे छे! रात्री मलाही रात्रपाळी होती. आमच्या मासिकाचा खास 'नागर नारी' अंक निघतोय ना?"

"खरंच!—हं, हे स्त्रीगीत ऐका. ह्यात एक नूतनविवाहित कुमारी आपल्या माहेराचं वर्णन करते आहे. उगीच सोन्याची पालखी नि रुप्याचे गोंडे असं अद्‌भुतरम्य अन्‌रिअलिस्टिक वर्णन नाही."

अन्‌रिअलिस्टिक म्हणताना त्यांच्या पुढल्या दोन दातांपैकी एक निसटल्यासारखा वाटला मला. त्यांनी चपळाईनं तो दात बसवला व वाचायला सुरुवात केली.

"हे गीत आमच्या चाळीतील अकल्पिता बोरसे ह्या भगिनीकडून मला मिळालं. त्यांचं माहेर हिंदू कॉलनीत रुइया कॉलेजजवळ आहे. अकल्पिताबाई आमच्या चाळीच्या भगिनी मंडळाच्या उपकार्यवाहिका आहेत. यंदा नागपूरच्या इंटरला बसताहेत त्या."

"असं!" मी म्हणालो.

"ह्या पाहा! ह्या फोटोतील मधल्या! ह्या आम्ही पाच जणी जिवश्चकंठश्च मैत्रिणी आहो."

जवळजवळ सगळ्याच सारख्या दिसणाऱ्या मैत्रिणींकडे एक धावती नजर मी टाकली.

"आमचं 'पाच मैतरणी' म्हणून गीत आहे—दाखवीन ते मग!"

"मग अकल्पिताबाईकडून मिळालेलं गीत वाचता ना—"

"हो. ऐका—" चष्म्याच्या काडीची मोहक हालचाल करीत काव्यकलाबाई म्हणाल्या. "ऐका—

*रुईयाच्या आसपास । आज रोषणाई केली*
*माझी मालण ग बाई । आज माहेराला आली ॥*
*शेजीबाई शेजीबाई । फार लेकी कां म्हणशी*
*जशा ष्ट्यांडावरल्या टॅक्शी । निघून जाती ॥...*

—रुइया कॉलेजजवळच टॅक्सीस्टँड आहे. तेव्हा ही उपमा कशी वातावरणातून स्फुरली, हे आपल्या ध्यानात आलं असेलच!!" मधूनच काव्यकलाबाईंनी त्या ओवीचे अंतरंग मुळजी जेठा मार्केटातील व्यापारी कापडाचा तागा उघडतात तसे उघडून दाखविले.

*"माझी थोरली शालन । तिची हिंदीची परीक्षा*
*झाली प्रबोध गुदस्तां । यंदा प्रवीणाची शिक्षा ॥*

—इथे शिक्षा हा हिंदी शब्द शिक्षण ह्या अर्थी कसा गार्टरसारखा फिट्ट बसलाय नाही?"

"हो ना—"

*"माझी दुसरी त्रिवेणी । जाते गायनक्लासांत*
*तिला हळदीचें दूध । देतें भरून ग्लासांत ॥...*

—गायनाचं शिक्षण घेणाऱ्या लाडक्या लेकीचा गळा बसू नये म्हणून तिच्या माउलीला कोण काळजी !

*माझी तिसरी मालण । झालं थाटांत म्यारेज*
*दारीं झुलते मोटर । परसांत ग ग्यारेज ॥*

मग शेजारच्या बाईंनी थट्टेनं म्हणावं—

*शेजीबाई लेकी तीन । तीन रंगांच्या रिबिनी*
*कशा थोराड बांध्याच्या । जणू भरल्या बॉबीनी ॥*

आपल्या मुलींच्या स्थूलपणावर टोमणा मारणाऱ्या शेजारणीला मग ही प्रेमळ माता काहीशी दुखावली जाऊन प्रतिटोमणा देते—

*शेजीबाई तुझी लेक । तुला वाटे ग शेलाटी*
*धुणीं घालाया वाळत । हीच वापरा कीं काठी ॥*

शेजीबाई यावर काय बोलणार ? ती चूप बसते. पण हा रुसवाफुगवा क्षणाचा. दोन ओळींचं हे भांडण—ते का टिकणार ? छे ! मालणबाई आज रोजी येणार म्हटल्यावर त्या माउलीची वैरंबिरं विसरून जातात. ती शेजीबाईकडे जाऊन सांगते—

*शेजीबाई लेक माझी । दोन दिवसांची पाहुणी*
*माझ्या थालिपीठासंगें । तुझ्या घरचं दे लोणी ॥*

—नवमासदिसांनी वाढवलेली माझ्या पोटची गोळी आज माझ्या घरी पाहुणी होऊन येणार, तेव्हा शेजीबाई, मी थालिपीठ लावते, लोणी तुम्ही द्या !! भारतीय संस्कृती ही जोडणारी आहे. तुझी चटणी—माझी भाकरी, तुझा भात—माझं वरण—हा हिशेब खेड्यात, तर तुझा पाव—माझी सुरी, आणि तुझं लोणी नि माझं थालिपीठ अशा भावनेनं पाहणारी शहरी माता ही काय भारतीय संस्कृतीत न बसणारी आहे ? पण शेजीबाईचा राग गेला नाही. आपल्या लेकीला धुणी वाळत घालायची काठी म्हटल्यावर ती घुश्शातच आहे. ती चिडून म्हणते—

*मेली लेकीला घालते । खाऊं थालिपीठ-लोणी*
*सहा आण्याचें प्याकेट । तिथें विकती इराणी ॥*

—'जा—समोरच्या इराण्याकडून पोल्सनचं पाकीट घेऊन लेकीला खायला घाल.' हे शेजीबाईचे चिडून काढलेले उद्‌गार मालणच्या आईला लागत नाहीत. ती तिची समजूत घालते : शेजीबाई, गोळाभर लोणी माझ्या लेकीसाठी मागितलं म्हणून अशा रागावू नका. उद्या तुमच्याही लेकीचं लग्न व्हायचं आहे. त्या वेळी मी तुम्हांला ह्याची सव्याज फेड करीन.

*शेजीबाई आता । मिटवा भांडण*
*तुझ्या लेकीला देईन । आरे कॉलनी आंदण ॥*

आणि मग हे भांडण मिटतं. क्षणात हसणाऱ्या आणि क्षणात रुसणाऱ्या ह्या शेजारणी म्हणजे जणू लोकलच्या सिग्नलचे दिवे. क्षणात लाल, तर क्षणात हिरवे!! आपल्या मुलीच्या आगमनासाठी आतुर झालेल्या आईचं अंतःकरण ह्यात ओतलं आहे. इकडे माहेरला जायला निघालेली मालन आपल्या चाळीतील शेजारणीचा निरोप घेते आहे. निघतानादेखील खूपशा आनंदाबरोबर तिच्या उरात लहानशी काळजी आहे. आपल्या विरहानं व्याकूळ होणाऱ्या पतीचं चित्र ती मैत्रिणीपुढं रेखाटते. तिच्या घरी रेडिओ ऐकायला दुपारच्या बायका जमतात. त्यांना ती सागते—

*शेजारच्या ग सयांनो । बंद रेडिओ ठेवावा*
*साऱ्या रातीं जागरण । त्यांना हवा ग विसावा ॥*
*दिशीं पंधराव्या सोडून । येतें माहेराच्या गावा*
*मुभा देईन तेधवा । कोकणी कार्यावळ लावा ॥*

'माहेराहून परत आल्यावर दिवसभर रेडिओ चालू ठेवा, माझं काही म्हणणं नाही'—हे किती सूचकतेनं तिनं व्यक्त केलं आहे. आणि मग ती आपल्या सख्यांचा निरोप घेऊन माहेरी जाते. माहेराप्रमाणंच चाळीच्या जीवनातील निरनिराळ्या प्रसंगांवरील लोकगीतं तर अतिशय हृदयंगम आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनात पाऊस येणं ही जशी आनंदाची घटना, त्याप्रमाणंच चाळीच्या जीवनात नळ येणं हीही नाही का? दोन्हीकडे पाण्याचीच प्रतीक्षा! 'नळ आले' ह्या विषयावर आमच्या चाळीतील बायकांनी कितीतरी गीतं रचली आहेत. एकदा 'नळ आला भाग्याचा' हे गीत नळाभोवती फेर धरून बायका तन्मयतेनं गाऊ लागल्या आणि त्या नादात पाणी भरायचं विसरल्या! यमुनेच्या काठी कृष्णाच्या नादानं गोकुळच्या गौळणी पाणी भरायचं विसरून नसत का जात? तीच तऱ्हा! नदी काय, नि नळ काय—शेवटी पाण्याचीच ओढ. हे गीत पाहा—

*नवल हें काय सखे साजणी, नळाला आलंयू गडे पाणी ॥ ध्रु० ॥*
*उचलुनि कळशी कुणी तपेली*

*कुणी बादली कुणि पातेली*
*कुणी घमेली कुणी बाटली*
*कुणी बावरी घेउनि निघते हातांमधि चाळणी*
*नळाला आलंयू गडे पाणी ॥*

*विसळा लगबग वाट्यालोट्या*
*धुवा धोतरें अन् बंड्या-पेट्या*
*बाया जमल्या छोट्या-मोठ्या*
*तिथेंचि मारुनि जेठा बसला आंघोळीला कुणी*
*नळाला आलंयू गडे पाणी ॥*

*'उठवा मेल्या धटिंगणाला —'*
*आदळित कळश्या कुणी गर्जल्या*
*कुणी तयाच्या पिढ्या मोजल्या*
*नळभूमीवर जणुं अवतरल्या साक्षात् रणरागिणी*
*नळाला आलंयू गडे पाणी ॥*

*मागत आला हळूच कोणी*
*दाढीला वाटीभर पाणी*
*शोधक त्याची नजर देखुनी*
*'निमित्त काढुनि कशास आलां इथें ?' पुसे स्वामिनी*
*नळाला आलंयू गडे पाणी ॥"*

"वा वा !" मी पुनःप्रत्ययाचा आनंद झाल्याच्या बेहोषीत उद्गारलो.

"आता मला सांगा, वाङ्मयात संघर्ष हवा, संघर्ष हवा म्हणतात हे पुरुष, विद्वान (इथे त्यांनी मोहन मधुकरांकडे बोट दाखवले), हा संघर्ष नाही तर काय? दैनंदिन जीवनातून हे काव्य निघालं आहे. अशी शेकडो गीतं आमच्या चाळीत रचली गेली आहेत. शेतावर न्याहारी घेऊन जाणारी शेतकरीण तेवढी तुम्हा लोकांना दिसते आणि ऑफिसात दुपारच्या जेवणाचा डबा नेणारा डबेवाला आल्यावर त्याला 'डबा लवकर नेऊन पोचव,' हे सांगणाऱ्या सुगृहिणीची का बरं उपेक्षा? आमच्या चाळीतील एक गृहिणी म्हणते—

*डबेवाल्या भाऊराया । डबा लौकर पोचव*
*तिथें हपीसांत पोटीं । सुरू होई कावकाव ॥*

आपल्या हपिसात काम करणाऱ्या पतीबद्दल ह्या गृहिणीला अभिमान किती! कुण्या वाटसरानं वर डोळा करून पाहिल्यावर वाटसराला मराठमोळ्या बाईनं 'जंगलात वाघिणीच्या कंथ माझा मोजी दादा' म्हणून सांगितल्याचं पुन्हापुन्हा कौतुकानं

सांगितलं जातं. आमच्या चाळीतील एक शीलवती म्हणते—

*वाटच्या रे वाटसरा । होई चालता निमूट*
*पति पायांत घालतो । मिलिटरींतला बूट*

—'तू समजलास काय ? माझ्या पतीच्या पायात चोरबाजारात घेतलेला, खिळे मारलेला मिलिटरीतला बूट आहे!' काय बाणेदारपणा हा! पतीबद्दल अभिमानाच्या खूप ओव्या आहेत.

*इकडच्या ग स्वारीची । साऱ्या हपिसांत सत्ता*
*रुपये शंभर नुसता । मिळे महागाई-भत्ता ॥*

पतीबद्दलचा हा अभिमान नावं घेण्याच्या उखाण्यांत तर पदोपदी आढळतो. त्यांत खेडवळ बायकांप्रमाणं शहरांतील बायका शेतमळ्याच्या छोट्या वातावरणात गुंतून पडत नाहीत. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे पडसादही ह्या उखाण्यांत आढळतात. आमच्या चाळीतील सार्वजनिक हळदीकुंकवात एकीनं हा उखाणा म्हटला होता—

*उंचांत उंच । राजाभाई टावर*
*गणपतरावांना भितो । आयसेनहावर ॥*

त्या बाईची कम्युनिस्ट, अमेरिकनविरोधी विचारसरणी पाहून सरलाबाई लगेच दुसरा उखाणा घेतात. त्यांची चुलत भाची एका मैत्रिणीला अमेरिकेला जाताना पोचवायला विमानतळावर गेली होती, त्यामुळं त्यांना अमेरिकेचा खूप अभिमान आहे.

*न्यूयॉर्कच्या इमारतीला । बांधले छप्पन मजले*
*वसंतरावांच्या भाषणाला । सगळे कम्युनिस्ट बुजले ॥*

ह्या आंतरराष्ट्रीय पातळीवर चाललेल्या उखाण्यांची अस्सल भारतीय धोरणाला अनुसरून रमाबाई नाडकर्ण्यांनी निराळाच उखाणा घेऊन परिपूर्तता केली.

*कुणाला रुचे मटण । तर कुणाला वरण*
*सुभाव खातात मासे । त्यांचें तिसरेंच धोरण ॥*

—आंतरराष्ट्रीय राजकारण आणि कौटुंबिक जिव्हाळा यांचा हा समन्वय प्रशंसनीय नाही का ? चाळीतील जीवनाच्या सर्व अंगांना हे काव्य स्पर्श करून गेलं आहे. शेतावरून वेळेवर परत न आलेल्या घरधन्याची वाट काय खेड्यातील बायकाच पाहतात ? आणि शहरांतील बायकांना हपिसांतून यायला त्यांच्या पतींना उशीर लागला तर का हुरहूर वाटत नाही ? खेड्यांत तसं पाहिलं तर अपघाताचं भयदेखील नाही. मुंबई-उपनगरांतल्या एका भगिनीनं ही हुरहूर किती हृद्य शब्दांत व्यक्त

केली आहे पाहा—

*सात कधींच वाजले । चहा गेला ग निवून*
*येणं कसं ग होईना । हपीसांतून अजून ॥*
*मेल्या लोकलगाड्यांना । गर्दी सदाचीच दाट*
*घरावरूनी जाईना । एकही ग बसरूट ॥*
*कशी वाटे हुरहूर । जिवा लागे माझ्या ध्यास*
*अग बाई । स्वारी आज । गेली विसरून पास ॥*
*स्वारी धांदरट भारी । हातीं लागेना धोतर*
*साडी सफेद नेसून । गेले साहेबासमोर ॥*
*कचेरींत मिळे मान । गोऱ्या साहेबासारखा*
*आणि यांनाच सलाम । करी चाळीचा गुरखा ॥*

चाळीचा गुरखा फक्त आपल्याच नवऱ्याला सलाम करतो असं सुचवून घरी आणि बाहेर सर्वत्र आपल्या पतीला कसा मान आहे हे त्या गृहिणीनं कसं चतुराईनं व्यक्त केलं आहे, नाही का?"

"अगदी खरं आहे. पण हे सगळं जमवायला आपल्याला फारच कष्ट पडले असतील नाही?" मी विचारले.


"कोणतंही कार्य एकदा हातात घेतलं की ते तडीला नेणं हे प्रत्येक माणसाचं कर्तव्य नाही का? त्रास तर आहेतच. अहो, एकएक ओवी मिळवायला एकएक दिवस गेलाय प्रत्येक वेळी! खेड्यांतील बायकांचं ठीक आहे; जात्यावर बसल्या की सुचल्या ओव्या. आमच्या शहरांतील भगिनींनी मुद्दाम जातं आणून ओव्या करण्याचे परिश्रमही केले. मुंबईच्या भगिनी खेड्यांतील भगिनींपेक्षा परिश्रम कमी करतात, असं समजण्याचं कारण नाही."

"मुळींच नाही. मी घरी बघतो ना—ते शिवणंटिपणं, भरतकाम, भगिनीमंडळ —तिथल्या चढाओढी, सहली, स्नेहसंमेलनं...एकूण बायकांना कामं खूप वाढली आहेत शहरांतल्या—"

"अर्थात! पूर्वी ठीक होतं. चूल आणि मूल. आता सगळी क्षेत्रं मोकळी झाली आहेत. त्या त्या क्षेत्रातून तुम्हांला आता शेकडो स्त्रीगीतं ऐकायला मिळतील. स्त्रियांचा जीव आता केवळ सासर-माहेरांत गुंतलेला नाही. कुणी कचेरीत, कुणी विमाएजंट, कुणी पोलिसात—अशा सर्व ठिकाणी असलेल्या स्त्रिया आपल्या वातावरणाचे पडसाद आता वाङ्मयात उमटविल्याखेरीज कशा राहतील?"

"अगदी बरोबर आहे!"

सौ० काव्यकलाबाईंचा आणि मोहन मधुकरांचा निरोप घेऊन मी निघालो. स्त्रीगीतांचे निरनिराळ्या सुरांतील पडसाद बटाट्याच्या चाळीतल्या खोली-खोलीतून निघत होते.




# ....उपास

बटाट्याच्या चाळीत लपून म्हणून काही राहत नाही! अण्णा पावशांच्या मुलींच्या कुंडल्या त्यांनी खणातून केव्हा काढल्या, गुपचूप स्वतःच्या खिशात केव्हा टाकल्या आणि सोमण बिल्डिंगमधल्या उकिड्व्यांच्या घरी केव्हा नेल्या, ही गोष्ट पावशीण-काकूंना कळायच्या आत आमच्या कुटुंबाला कळली! एच० मंगेशराव हे चाळीतले संगीतज्ञ; परंतु त्यांना कुठल्या चिजांचे अंतरे येत नाहीत हे एरवी 'गाणे संपले' एवढेच गाण्यातले कळणाऱ्या राघूनानांनादेखील ठाऊक. बाबलीबाईच्या पाटल्या गहाण पडल्याची गोष्ट गहाणखतावरची शाई वाळण्यापूर्वी सर्वांच्या तोंडी झाली. आणि रतन समेळ (न्यू गजकर्ण फार्मसीच्या समेळकाकांची मुलगी) हिने द्वारकानाथ गुप्त्यांच्या मधूला लिहिलेले प्रेमपत्र मधूच्या हातात पडण्यापूर्वी काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने गॅलरीत उभे राहून परवचा म्हणतात तसे खाडखाड म्हणून दाखवले! सगळे बहिर्जींचे वंशज नाना जातींत आणि पोटजातींत जन्मून बटाट्याच्या चाळीत वस्तीला आल्यासारखे आले आहेत. वास्तविक माझ्या उपासाचा निश्चय मी आधी माझ्या 'मना सज्जना'खेरीज 'येरा कोणा'लाही सांगितला नव्हता. पण उपासाला सुरुवात करून पुरे चार तास लोटले नाहीत तो वर्दळ सुरू झाली.

"पंत—(मला मंडळी उगीचच पंत म्हणतात. वास्तविक 'पंत' वाटावे असे माझ्यात काही नाही. चांगला टेलिफोनऑपरेटर आहे मी. हं, आता आपल्याला बूटपॅंट आवडत नाही हे खरे, पण म्हणून काय 'पंत'?) पंत, हा काय साला म्याडनेस!" अशा थाटात सोकाजी त्रिलोकेकरांनी सुरुवात केली, "तुम्हांला काय वाटतं? साला तुमचा बॉस अशी फास्ट करून लीव्ह सँक्शन करील?"

"पण माझं ऐका—" मी चार तासांच्या उपासानंतर क्षीण होत चाललेल्या माझ्या आवाजात सोकाजीनानांची समजूत घालू लागलो. पण नाही! सोकाजी मला 'सर्मन' देण्याचा चंग बांधून आले होते!

"माय गुड फ्रेंड—साले फास्टनी काय होतं?...हा तर मुळी बॉसला कन्विन्स करण्याचा वेऽच नाय! लिसन—तुमाला पायजे तर सिक नोट देतो. माझे कझिनचा साला एम० डी० हाय. यू विल गेट ॲज मच लीव—बट साला उपास काय?"



"पण माझं ऐका—"

"अरे काय ऐका? तू काय सांगणार? धिस इज हंबग!"

चारपाच तासांच्या उपासाने माझी अशक्तता कणकण वाढत होती आणि इथे सोकाजीनानांना जोर चढत होता.

"साला लिसन—तू जेवून घे बरं. साला सोन्यासारखा संडे हाय—आज फीश काय मिळाली होती. पण तू उपासबिपास नको करू!"

साधारण दीड तास त्रिलोकेकर बडबडून गेले आणि चाळीतले नाट्यभैरव कुशाभाऊ आले. त्यांनी तर 'एकच प्याल्या'तल्या 'सुधाकर, तुम्ही आमचे पाठचे भाऊ. आम्ही तुम्हांला सांगू नये; पण तुम्ही दारू सोडा!' ह्या चालीवर सुरुवात केली.

"पंत—(इथे कुशाभाऊंनी माझ्या पाठीवरून हातही फिरवला.) पंत, ऐका माझं. दोन घास खाऊन घ्या." (ह्या वाक्याने काही अत्यंत सुतकी संकेत माझ्या मनात डोकावले!)

"अहो पण—"

"पण नाही नि परंतु नाही. पंत, आपण चाळीत इतकी वर्षे राहिलो ते भावा-भावांसारखे. आमची ही आताच म्हणाली, की तुम्ही उपवास सुरू केला आहे—जेवत होतो, तसाच उठून आलो! नाही, पंत—तुम्ही जेवायचं नाही, तर कुणी? पंत, ऐका माझं. बाबा बर्व्यांच्या नारूची मुंज आठवा. वीस वर्षे होऊन गेली. पंचावन्न जिलब्या उठवल्या होत्या ना तुम्ही?" इथल्या 'तुम्ही'वर कुशाभाऊने एक हुंदका-देखील काढला. कुशाभाऊंचा तो कळवळा पाहून आमच्या कुटुंबाने आत डोळे पुसले. "ते काही नाही पंत, तुम्ही जेवलं पाहिजे—उपासानं काय होणार? अहो, जनोबा रेग्याचं बोलणं एवढं काय मनावर घेता?"

"जनोबाचा काय संबंध?"

माझे हे वाक्य पुरे व्हायच्या आतच नाटकातल्यासारखा "काय संबंध!" एवढेच शब्द उच्चारून कुशाभाऊ नाट्यभैरवाने एक प्रदीर्घ उसासा टाकला.

"कळल्या आहेत, कळल्या आहेत मला साऱ्या गोष्टी! टमरेलाची चोरी ती काय! अरे, जाताना बरोबर थोडीच न्यायची आहे आपल्याला ही चीजवस्तू? सारं इथंच टाकून जायचं आहे बरं!"—कुशाभाऊ.

"टमरेल ?"

"पंत, उजाडल्यावर टमरेल—नाही, टमरेल उजाडल्यावर कोंबडं—हां, कोंबडं झाकलं म्हणून काय उजाडायचं राहतंय थोडंच! तीन दमडीचं टमरेल ते काय आणि त्याच्या चोरीचा आळ तुमच्यावर ?"

"चोरी ?" मला काही कळेना.

"पंत, तुम्ही नका कष्ट करून घेऊ. मी जनोबापुढं शंभर टमरेलं भरून ठेवतो. वापर म्हणावं दिवसभर. पण पंत, तुम्ही हा उपासाचा नाद सोडा—ही अन्नब्रह्माची उपेक्षा आहे, पंत."

"पण कुशाभाऊ, माझं ऐकाल का ?"

"मला काही ऐकायचं नाही नि बोलायचं नाही. मला फक्त एकच पाहायचं आहे ते तुम्हांला भरपूर जेवताना. पंत, सोडा हा नाद—नाही हो, अंतःकरण पिळवटून सांगतो मी तुम्हांला. नका, पंत, नका ह्या उपासापोटी आपल्या प्रकृतीचा सत्यानाश करू!"

कुशाभाऊंना आवरणे मुश्किल झाले. शेवटी त्यांच्या गेल्याच आठवड्यात झालेल्या एका नाटकाबद्दल मी बोललो तेव्हा गाडीने रूळ बदलले. पण ते किती, अगदी थोडा वेळ, आणि गाडी पुन्हा मेनलाइनवर आली!

"नका—नका हो पंत, असं करू!"

"अहो, काय करतोय मी ?"

"कळतंय मला—तिळतीळ तुटतं माझं आतडं! पण पंत, सोडा हा अविचार!"

आता मात्र मला काय बोलावे ते सुचेना. मी डोळे मिटून स्वस्थ बसलो. नाट्य-भैरव कुशाभाऊ सुमारे पाऊण तास माझे एक अक्षरही ऐकून न घेता बडबडत होता. बाकी कुशाभाऊची ही तारीफ आहे. नाटकातदेखील उत्साहाच्या भरात त्याने स्वतःचे, स्वतःच्या नोकराचे, आणि 'पडद्यात गलबला' ही सगळी भाषणे एकट्याने केली होती. रंगभूमीच्या दुसऱ्या कोणत्याही सेवकाला टिकू म्हणून द्यायचे नाही हा त्याचा संकल्प असल्यासारखा तो वागतो. चाळीतले गडी जसे दुसऱ्या गड्याला 'टिकू' देत नाहीत त्यातलाच प्रकार! नाट्यभैरव कुशाभाऊंच्या भीमदेवी भाषणाने साऱ्या चाळीला माझ्या उपासाची वार्ता पोचली! आणि बिऱ्हाडात हळूहळू, पावले न वाजवता, मंडळी गोळा होऊ लागली. मी तोंड उघडले की सर्व जण एकमुखाने "तुम्ही बोलू नका—तुम्हांला त्रास होईल!" अशासारखे उद्गार काळजीयुक्त स्वरात काढायचे. आचार्य बाबा बर्व्यांखेरीज सर्व शेजारी जमले.

तळमजल्यावरचा किराणा-भुसार मालाचा व्यापारी शा चापशीदेखील आला! "असा कोणी अपासबापास करायला शरुवात केला म्हणजी आमाला तो लय धास्ती वाटते. आमची कच्छमदी ते एक रावळबाप्पा होता—असाच अपास करून मरून गेला. पंत आपास नाय कर तू—आमाला धास्ती वाटते!"



"बरोबर आहे—सगळ्यांनी उपास करायचं ठरवलं तर ह्याचं दुकान कसं चालणार?" काशीनाथ नाडकर्ण्यांच्या कानात जनोबा रेगे कुजबुजले. माझ्या उपासाचे एक सोडा, पण जनोबाला कुठल्याच प्रसंगाचे गांभीर्य कळत नाही!

मी स्वस्थ डोळे-मिटून पडलो होतो. बाकी त्याखेरीज मी काहीच करू शकत नव्हतो. मंडळी तऱ्हेतऱ्हेच्या मुद्रा करून माझ्याकडे पाहत होती. लहान मुले खिडक्यांच्या गजांतून आळीपाळीने डोकावत होती.

"चिंत्याचे बाबा मरणार का रे चंदू?" कुठलेसे कारटे तेवढ्यात माझ्या जिवावरदेखील उठले! परस्पर त्याच्या पाठीत कोणीतरी धपका घातल्याचे मी ऐकले.

आत येणारा प्रत्येक जण "पंतांना स्वस्थ पडू द्या—" असे सांगत होता, आणि आपण स्वतःच आमच्या खोलीत गर्दी करीत होता. माझ्या पाकिटातले सगळे 'पिवळे हत्ती' चौकशीला आलेल्या मंडळींनी संपवले होते. सुपाऱ्या लांबवल्या होत्या. तबकात फक्त 'देठ, लवंगा, साली' शिल्लक होत्या. मी काहीही बोलायला तोंड उघडले की "पंत, नका. तुम्ही स्वस्थ पडा!" असा एकमुखाने आवाज उठायचा! तेवढ्यात कुणीतरी माझ्या उशाशी उदबत्तीदेखील आणून लावली!

शेवटी अगदी कळवळून मी ओरडलो, "अहो, असं काही नाही. मी जो हा उपास सुरू केला आहे—"

"तो सोडा, पंत सोडा, सोडा!" नाट्यभैरव कुशाभाऊला नाटकात दुसऱ्याची वाक्ये तोडायची इतकी भयंकर खोड की 'भाऊबंदकी'त राघोबाचे काम करताना रामशास्त्र्याच्या पार्ट्याने 'देहान्त प्रायश्चित्ता'तला 'देहान्त' म्हटल्यावर "प्रायश्चित्तावाचून गत्यंतर नाही!" हे न्यायाधीशाचे उरलेले वाक्य आपण राघोबा आहोत हे विसरून त्याने स्वतःच म्हणून टाकले होते!

माझ्या भोवतालची गर्दी हळूहळू वाढत होती. आमचे कुटुंबदेखील वस्तादच. आत जमलेल्या बायकांना काय काय सांगत होते परमेश्वर जाणे! स्वयंपाकघरातून बाहेर पडणारी प्रत्येक बाई 'हे या महाभागाचं आता अखेरचंच दर्शन!' असा चेहरा करून माझ्याकडे पाहायची आणि बाहेर पडायची. एरवी कुठल्याही बाईने माझ्याकडे वर डोळा करून पाहिल्याचे मला आठवत नाही. उपासाचे निराळे निराळे म्हणतात ते 'तेज' इतक्या लवकर तोंडावर चढत असेल याची मला कल्पनाही नव्हती! ह्या साऱ्या जमावातून माझी सुटका करायला गजेंद्रमोक्षाच्या वेळी साक्षात श्रीविष्णू धावत आले तसे एच० मंगेशराव सोबत तबला आणि आपल्या सुस्वर पत्नी वरदाबाई यांना घेऊन आले. वरदाबाईच्या हातात तंबोरा होता.

"पंत, येकटं डिवोशनल सॉंग म्हणायचं इच्छा आहे—" अशी प्रस्तावना करून माझ्या कॉटच्या पायथ्याशी मंगेशरावांनी सपत्नीक तळ ठोकला व वरदाबाईंनी मीराबाईच्या 'तुमबिन मोरी'त तोंड घातले. वरदाबाई 'गोवरधन गिरिधारी' पर्यंत पोचल्याही नसतील, इतक्यात सोटाछाप मलमातल्या जाहिरातीत जसे 'उंदरास पाहून

मांजर' या न्यायाने रोग पळतात तसे आमचे सारे शेजारी पळाले! खोलीत फक्त मी आणि हट्टंगडी कुटुंबाचे संगीत एवढीच शिल्लक राहिलो. वरदाबाईंच्या स्वरातले आणि त्याहूनही एच० मंगेशरावांच्या तबल्यातले सामर्थ्य त्या वेळी मला खऱ्या अर्थाने प्रतीत झाले! 'खडी सभामें द्रौपधी ठाडी–राखो लाज (वरदाबाई 'राकौ लाज्ज' म्हणत होत्या) अमारी' म्हणताना वरदाबाई असा एकेक सूर लावीत होत्या आणि मंगेशराव तबल्यावर अशा काही करामती करीत होते, की एखाद्या वेळी गोवर्धनगिरिधारी माझ्या उपासाची 'खबर' घ्यायला खरोखरीच येईल की काय अशी धास्ती मला वाटायला लागली! माझ्या पोटात विलक्षण कालवाकालव सुरू झाली. (ती त्या संगीतामुळे होती की भुकेमुळे होती हे अजूनही मला उमगलेले नाही.) हट्टंगडी दंपतीचे संगीत केव्हा संपले कोण जाणे, मी जागा झालो त्या वेळी रात्रीचे साडेदहा वाजले होते.

पहिल्या दिवसाच्या उपवासात मी फक्त कॉफी, केळी, एक अंडे (उकडून), दोन संत्री, भुईमूगदाणे आणि भुईमूगदाण्यांनी पित्त होऊ नये म्हणून लिंबाचा रस, कॉफीने मला बद्धकोष्ठ होतो म्हणून दूध आणि दूध पचायला जड जाऊ नये म्हणून काळ्या मनुका आणि दोन चमचे मध एवढ्यावरच भागवले.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्याबरोबर चाळीतले एकमेव साहित्यिक म्हाळसाकांत पोंबुर्पेकर यांनी 'चाळकरी' ह्या चाळीतल्या हस्तलिखित मुखपत्राचा अंक आणून, एखाद्या राज्याच्या सनदा अर्पण कराव्या अश्या नम्रतेने माझ्या हातात दिला.

"पंत, उपोषण-विशेषांक आहे." पोंबुर्पेकर म्हणाला.

वास्तविक 'चाळकरी' दैनिकाचा साधा अंक अजून निघालाच नाही. प्रत्येक अंक हा विशेषांकच असतो. आज उपोषण-विशेषांक, कालचा स्वच्छता-विशेषांक, त्यापूर्वी चाळपुनर्रचनासमिति-विशेषांक (गच्चीपुरवणीसकट), एकदा भय्या-विशेषांक, दुसऱ्यांदा भाडे-विशेषांक, नळ-विशेषांक—असे विशेषांकावर विशेषांक काढायची ह्या पोंबुर्प्याला खोडच आहे! त्यामुळे त्याच्या उपोषण-विशेषांकाचे मला विशेष काही वाटले नाही. अंकावरील ठळक मथळा पाहून मात्र मी स्तंभित झालो :

**"चाळीय ऐक्यासाठी पंतांचे आमरण उपोषण"**

"पोंबुर्पेकर—" मी अठरा तासांच्या उपोषणानंतर शरीरात उरलेले सारे त्राण (महिन्याच्या शेवटी बिऱ्हाडातल्या फणीकरंड्याच्या पेटीपासून ते रोवळीपर्यंतच्या दिडक्या-आणेल्या एकवटून अखंड रुपया जमवतो त्याप्रमाणे) एकवटून ओरडलो. माझ्या ओरडण्याने पोंबुर्पेकर तिळमात्र हलला नाही. त्याच्या प्रत्येक अंकानंतर कोणी ना कोणी त्याच्यावर असेच ओरडतो!

"काय?" शांतपणाने तो विचारता झाला.

"कुठल्या गाढवानं सांगितलं, की मी चाळीय ऐक्यासाठी उपोषण करतो आहे म्हणून?"

"सगळे जण असंच म्हणताहेत—" पोंबुर्पेकर उद्गारला.

"मग सगळे जग गाढव आहेत!" मी म्हणालो. इंटरला मी लॉजिक घेतले होते; त्यामुळे दोन प्रमेयांतून हा सिद्धांत सटकन बाहेर पडला आणि पोंबुर्पेकर चूप झाला.

"माझा हा उपास अगदी खाजगी स्वरूपाचा आहे. त्याचा चाळीशी काय संबंध?"

"असं कसं? समेळकाका म्हणाले, की चाळीतल्या जातीयतेविरुद्ध तुम्ही हे उपासाचं शस्त्र उगारलंत!"

"समेळकाका गेला खड्ड्यात!"—मी.

"ठीक आहे. पावशे म्हणाले, की हेडक्लार्कनं तुमची लीव्ह सॅंक्शन केली नाही म्हणून कारकुनांच्या दुःखांना तोंड फोडण्यासाठी तुम्ही हा उपास सुरू केला आहे."

"पावशे गेला मसणात!"—मी.

"ठीक आहे. नाट्यभैरव कुशाभाऊ म्हणतो, की जनोबा रेग्यांनी त्यांचं टमरेल चोरण्याचा आरोप केला, म्हणून त्यांच्या मनाची शुद्धी व्हावी म्हणून तुम्ही उपास केला—"

"जनोबा गेला—" वरच्या दोन वाक्यांत खड्डा आणि मसण ह्या जागा भरल्यामुळे जनोबाला कुठे पाठवावे हे मला सुचेना! त्यामुळे जनोबा गेला "ह्यात", असे म्हणून मी सर्वनामावरच भागवले. परंतु पोंबुर्प्यावर परिणाम झाला नव्हता. रेफ्रिजरेटरमध्ये मेंदू ठेवल्यासारखा तो वागत होता.

"ठीक आहे! उद्याच्या अंकात तुमचा खुलासा प्रसिद्ध करू."

"काही गरज नाही. माझ्या उपासाशी चाळीचा काही संबंध नाही."

"मग कशाशी संबंध आहे?" पोंबुर्पेकर म्हणाला.

"माझं वजन उतरवण्याशी!"

"ऑं?"

"हो!"

"पण उपास हा समाजात आपलं वजन वाढवण्यासाठी करतात ना?"

"मला ठाऊक नाही. हे पाहा—" मी खग उघडून वजनाचे कार्ड त्याच्या डोळ्यांपुढे नाचवीत म्हटले, "वाचा!"

"आप बहुत समझदार है!" पोंबुर्पेकर वाचू लागला.

"ते काय वाचता? वजन वाचा—हे पाहा, बारा स्टोन आणि तेरा पाउंड."

"फक्त तेरा पाउंड वजन तुमचं पंत—"

"आणि 'बारा स्टोन' वाचलं ते काय? बारा गुणिले चौदा म्हणजे किती?"

"किती?" पोंबुर्पेकर.

"किती?"—मी.

"किती?"—पोंबुर्पेकर.

"किती ?"—मी.

"किती ?"—पोंबुर्पेकर.

"किती-किती काय करता ? चौदा गुणिले बारा—चौदं बारे ?"

"चौदं दाहे चाळाशे—म्हणजे चाळीस—"

"एकशे चाळीस! अधिक चौदा दुणे अठ्ठावीस, म्हणजे किती झाले ?"

"हो!"

"हो काय ?—एकशेअडुसष्ट अधिक तेरा म्हणजे एकशे एक्यायशी पाउंड!"

"कुणाचं वजन आहे हे ?" पोंबुर्पेकर तोच थंडपणा चालू ठेवून म्हणाला.

"तुझ्या बापाचं! मला दुसऱ्याची वजनं करायची आहेत काय ? हे माझं वजन आहे."

"असेल!"

"असेल नाही—आहे! आता सांग, माझ्या वजनाशी चाळीचा काय संबंध ? एकशे एक्यायशी पौंड वजन झालं माझं—ह्यातून उद्या मला मधुमेह होणार. ब्लड-प्रेशर होईल, हार्ट ट्रबल होईल! मेलो पटकन तर चाळ येणार आहे का मदतीला ?"

"का नाही येणार ?" पोंबुर्पेकर म्हणाला, "पावश्यांची आजी वारली तेव्हा—"

"बाहेर हो!" त्याच्या थंडपणाचा कळस झाला होता.

"रागावू नका पंत. पण हे तुम्ही आधी का नाही लोकांना सांगितलं ?"

"पण तुम्ही माझं ऐकाल तर ना!"

हळूहळू माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येताजाता ही माझी 'नाही ती भानगड' आहे, उगीच 'हात दाखवून अवलक्षण' आहे, 'पेललं नाही तेव्हा खाजगी झालं!' अशी वाक्ये माझ्या कानांवर येऊ लागली. पण मी कोणत्याही टीकेला भीक घालणार नव्हतो!

'एकशे एक्यायशी पौंड'! रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहिजे, ह्या विचाराने माझी झोप उडाली! झोप कमी झाली तर वजन उतरते ह्या विचाराने मला त्याचेही काही वाटत नव्हते. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही ह्यावर माझ्या धर्मपत्नीचा मात्र अजिबात विश्वास नव्हता. "घोरत तर असता रात्रभर!" अशासारखी दुरुत्तरे ती मला करीत असे.

"दोन महिन्यांत पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!" अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकांत डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये, वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटातले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी की, वजन उतरविण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला डाएटचा सल्ला

दिला. उदाहरणार्थ, सोकाजी त्रिलोकेकर—

"तुला सांगतो मी पंत, डाएट कर. साला बटाटा सोड! बटाट्याचं नाव काढू नकोस!"

"हो! म्हणजे 'कुठं राहता?' म्हणून विचारलं तर नुसतं 'चाळीत राहतो' म्हणा! 'बटाट्याची चाळ' म्हणू नका. वजन वाढेल! खीः खीः खीः!"

जनोबा रेगे ह्या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय!

पण सोकाजींनी त्याला परस्पर जामून टाकले. "ए ईडियट! साला सगळ्याच गोष्टींत जोक काय मारतोस नेमी? मी सांगतो तुला पंत—तू बटाटा सोड."

मी काय काय सोडले असता माझे वजन घटेल याची यादी बटाट्यापासून सुरू झाली.

"बटाट्याचं ठीक आहे; पण पंत, आधी भात सोडा!"—एक सल्ला.

"भातानं थोडंच लठ्ठ व्हायला होतं? आमच्या कोकणात सगळे भात खातात. कुठं आहेत लठ्ठ? तुम्ही डाळी सोडा!"—काशीनाथ नाडकर्णी.

"मुख्य म्हणजे साखर सोडा!"

"मी सांगू का? मीठ सोडा!"

"लोणी-तूप सोडा—एका आठवड्यात दहा पौंड वजन घटलं नाही तर नाव बदलीन. आमच्या हेडक्लार्कच्या वाइफचं घटलं."

"तेल आणि तळलेले पदार्थ आधी सोडा!"—बाबूकाका.

"स्मोकिंग सोडा."

"दिवसा झोपणं सोडा."

"खरं म्हणजे पत्ते खेळायचं सोडा! बसून बसून वजन वाढतं."

आणि सगळ्यात कहर म्हणजे भाईसाहेब चौबळ म्हणाले, "पंत, नोकरी सोडा!"

"काय, म्हणता काय?"

"उगीच सांगत नाही. दिवसभर खुर्चीवर बसून बसून वजन वाढत राहतं. फिरतीची नोकरी बघा!"

काही धूर्त लोकांनी मला 'मुंबई सोडा' असाही उपदेश केला. हा उपदेश माझ्या वजनाकडे पाहून केला नसून चाळीतल्या दोन खोल्यांच्या जागेकडे पाहून केला होता, हे न कळण्याइतका मी काही 'हा' नव्हतो! फक्त 'बायको सोडा' एवढे सांगणारा महाभाग भेटायचा राहिला होता. एकाने भर ट्राममध्ये मला 'धोतर सोडा' असे सांगून, तिकीट वगैरे घेतल्यावर, 'आणि पँट वापरायला सुरुवात करा म्हणजे पट्टा बांधून पोट आवळता येईल!' असा उत्तरार्ध पुरा केला होता.

मी मात्र ह्या सर्व जनांचे ऐकून मनाचे करायचे ठरविले होते. पहिला उपाय म्हणून तीनचार निरनिराळ्या काट्यांवर वजन करून पाहिले. प्रत्येक ठिकाणी

निरनिराळे वजन आले; परंतु एकशे एक्यायशीच्या खाली जायला कोणताही काटा तयार नव्हता. शेवटी रेल्वे-पार्सल-हपिसातल्या काट्यावर हुंडेकऱ्याच्या वशिल्याने मी उभा राहिलो; आणि शेरा-मणाच्या बंगाली मण, देशी मण ह्या भानगडींत माझे वजन कधी शंभर पौंडांखाली तर कधी दोनशे पौंडांवर असे बदलू लागले. तिकिटवाल्या काट्यात तर वजनाबरोबर भविष्येही बदलत होती. एका तिकिटावर मी स्वभावाने धूर्त, आपमतलबी आहे असे छापले होते, तर दुसऱ्यावर माझ्याइतका साधा माणूस 'दुनिया में क्वचितही मिलेगा' असे वार्तिक होते. एका काट्याने माझे वजन दोनशे तीन पौंड दाखवून माझ्यावर कौटुंबिक संकट कोसळणार असल्याची पूर्वसूचना दिली होती! ह्या साऱ्या प्रकारात मला फक्त चौदाचा पाढा 'चौदे सोळे चोवीसेदोन'पर्यंत येऊ लागला, एवढाच फायदा झाला. शेवटी आपले वजन हपीससमोरच्या इराण्याच्या काट्यावर करायचे ठरवून मी 'आहारपरिवर्तन' सुरू केले.

साखरेत सर्वांत अधिक क्यालरीज असतात म्हणून प्रथम बिनसाखरेचा चहा सुरू केला. पहिल्या दिवशी विशेष फरकही वाटला नाही. घरात साखरबंदी जाहीर केली. कुटुंबाला सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची सक्त ताकीद दिली. "मुलांसाठी म्हणून काय थोडं गोडाधोडाचं करायचं ते कर" एवढी सवलत ठेवली. पहिल्या दिवशीच मला फरक जाणवायला लागला. भात अजिबात वर्ज्य करणे अवघड होते, म्हणून फक्त पहिला भात आणि ताकभात ठेवून मधला भात वर्ज्य केला. नुसती उकडलेली पालेभाजी खाणे कसे जमणार हा विचार किती पोकळ होता याचा अनुभव ती खाल्ल्यावर आला. आणि नेहमीच्या भाजीत 'ही' निराळे काय करते ह्याचा अजूनही अंदाज आला नाही.

पहिला दिवस सुरळित गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला! पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्याची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. भटाने तर माझ्या 'डायट'वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार'च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. भटाने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्रावधी क्यालरीज पोटात चालल्या होत्या! त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते—म्हणजे आणखी क्यालरीज! चिवडा अस्सल 'वनस्पती'तला, त्यामुळे आणखी क्यालरीज. आणि एवढे सगळे हादडून शेवटी "भज्यांशिवाय पार्टी कसली?" या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने भटाला स्पेशल भज्यांची परत आर्डर दिली.

शेवटी मला राहवेना! भज्यांची सहावी प्लेट उडवल्यावर, मी अत्यंत केविलवाण्या स्वरात सध्या मी 'डाएट'वर असल्याचे सांगितल्यावर सर्वांनी मला वेड्यात काढले!

"अरे पंत, खाण्याचा आणि वजनाचा काय संबंध?" भिकोबा मुसळे म्हणाला. "मी बघ एकवीस गुलाबजाम खाल्ले—एवढंच काय, आपण तर आयुष्यात एक्सरसाईज नाही केला. तुझी कुंभ रास नि कुंभ लग्न आहे. नुसता वायू भक्षण करून राहिलास तरी तू असाच जाड्या राहणार! लठ्ठपणा काय आपल्या हातात आहे?"

"नॉन्सेन्स!" जगदाळे ओरडला, "रनिंग कर रोज."

"रनिंगपेक्षादेखील दोरीवरच्या उड्या मारा. बरं का पंत, माझ्या सिस्टरचं वेट चाळीस पौंड उतरलं दोरीवरच्या उड्यांनी!" कु० कमलिनी केंकरे म्हणाली.

ह्या सर्व लोकांच्या सल्ल्यांत स्वतःची पत्नी, शेजारी, चुलतभाऊ अगर मामेबहीण यांची वजने उतरल्याचे दाखले होते; स्वतःचे उदाहरण द्यायला कोणी फारसा राजी नव्हता. रनिंग आणि दोरीवरच्या उड्या ह्यांत एक 'मी पोहावे' अशीही उपसूचना येऊन फेटाळली गेली! शेवटी सर्वांच्या मते मी सकाळी रनिंग करावे आणि संध्याकाळी दोरीवरच्या उड्या माराव्यात असे ठरले आणि मी सातव्या बशीमधले भजे उचलले.

कुटुंबाचा मात्र माझ्या डाएटच्या बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता. कारण रोज काही ना काही चमत्कारिक पदार्थ माझ्या पानात पडायला लागले. एके दिवशी नुसती दोन पडवळे उकडून तिने मला खायला घातली. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा, वगैरे सडपातळ भाज्यांचा खुराक तिने चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर, वगैरे बाळसेदार मंडळींची सैपाकघरातून हकालपट्टी झाली. सकाळचा चहादेखील सुरुवातीला होता तसा राहिला नाही. बिनसाखरेचा चहा इतका कडू लागत असेल अशी यापूर्वी कधीच कल्पना आली नाही मला. ह्याविषयी विशेष चौकशी करता कुटुंबाकडून खुलासा मिळाला तो तिच्याच शब्दांत सांगणे बरे.

"म्हंजे मी आपलं मनाशी म्हटलं—बरं का (वायफळ शब्दांचे डबे जोडण्यात बायकांचा हात धरणे अशक्य आहे.), की आपलं तुमचं हे वजनाचं काढलंय तुम्ही ते—म्हंजे नीट ध्यानात घ्या बरं का मी काय म्हणत्येय ते, नाही तर उगीच डोक्यात राख घालाल! (अजून मुद्द्याला स्पर्श नाही!) हो, तुमच्या घराण्याचाच गुण आहे तो! नीट ऐकायचं नाही नि मग एकदम खेकसायचं. गेल्या वर्षी सासूबाई आल्या होत्या—"

"चहा सुरुवातीला बिनसाखरेचा असूनही कडू लागला नाही आणि आता का लागतो तेवढं सांग. उगीच वायफळ बडबड नको आहे मला!"

"हेच ते—म्हटलं ते काय उगीच?...अहो, म्हणजे सुरुवातीला मी तुम्हांला जो बिनसाखरेचा चहा दिला तो बिनसाखरेचा नव्हताच मुळी!"

"नव्हता? मग मला बिनसाखरेचा चहा म्हणून काय सांगितलंस?"

"अहो, थोडीशीच राहिली होती साखर, ती संपेपर्यंत म्हटलं घालू. काल संपली. आजपासून बिनसाखरेचा चहा केलाच की साखर न घालता!"

"म्हणजे खलास! अग, किती लाख क्यालरीज गेल्या असतील माझ्या पोटात! कसलं कमी होतंय माझं वजन? पण सांगितलं का नाहीस मला?"

"उगीच आरडाओरड नका करू. वजनाचं ते काय मेलं? होईल हळूहळू कमी! आणि कोणाचं मागून खात नाही म्हणावं आम्ही; स्वतःच कमवून खातोय म्हणावं! वाढलं तर वाढू दे वजन." मुलांना देण्यासाठी लाडू काढून बशीत ठेवीत आणि माझ्या वजनक्षय-संकल्पाला आणखी नवे सुरुंग लावीत ती उद्गारली.

"लाडू कशाला केलेस? साखर असेल त्यांत!"

"इश्श! साखरेशिवाय लाडू आमच्या नाही घराण्यात केले कुणी!"

कुटुंबाचे 'घराणे' हा एक स्वतंत्र विषय आहे. वादाच्या कुठल्याही प्रसंगी स्वतःच्या 'सदावर्ते' घराण्याचा एकदा तरी उद्धार झालाच पाहिजे असा संकल्प आहे तिचा. आणि त्याच्या तुलनेने आमचे घराणे हे कसे 'सामान्य' आहे, हे एकदा दाखवले की ती 'सुटते'!

तात्पर्य, चहा बिनसाखरेचा होता हे खरे, परंतु लाडवाच्या रूपाने काही क्यालरीज पोटात गेल्याच!

दोरीवरच्या उड्यांचा फक्त एकदा प्रयत्न केला व पहिली उडीच शेवटची ठरली! कारण आठ गुणिले दहाच्या आमच्या दिवाणखान्यात प्रथम दोरी संपूर्ण फिरवणे अवघड! एकदा डोक्यावरून दोरी पलिकडे गेली ती ड्रेसिंग टेबलावरच्या तेलांच्या व औषधांच्या बाटल्या खाली घेऊन आली! दुसऱ्यांदा अर्धवट गॅलरीत आणि अर्धवट घरात राहून दोरी फिरवली ती आचार्य बर्व्यांच्या गळ्यात! त्यांचा माझ्यावर आधीच राग होता. मी उपास करतो हे कळल्यावर चाळीतली सर्व मंडळी 'समाचारा'ला येऊन गेली. परंतु आचार्य बाबा बर्वे शेजारच्या खोलीत असूनही आले नाहीत. कारण 'उपास' हे त्यांचे खास राखीव कुरण होते.

"हा दुष्टपणा माझ्या गळ्यात दोरी अडकवून केलात हे ठीक झालं; पण तुमच्या वयाला न शोभणाऱ्या ह्या धिंगामस्तीला दुसरा कोणी माझ्यासारखा बळी पडला असता, तर तुमची धडगत नव्हती. मी तुम्हांला क्षमा करतो."

"पण...मी हे मुद्दाम केलं नाही, आचार्य! अहो, वजन कमी करायला दोरीच्या उड्या मारतोय मी."

"काही उपयोग होणार नाही!"

"का?"

"का म्हणजे? जिभेवर ताबा नाही तुमच्या. संयम हवा, मनाची एकाग्रता हवी. त्यासाठी प्रथम म्हणजे काही गोष्टी सोडाव्या लागतील!"

"आता ह्या उड्या मारायला मी लाजदेखील सोडली हे पाहता ना तुम्ही, बाबा?"

"ठीक आहे. प्रथम बोलणं सोडा!"

"बोलणं सोडू ?"

"अजिबात ! खाण्यासाठी तोंडाचा वापर कमी करायचा एवढं पाहिलं तुम्ही पंत; पण बोलण्यासाठीदेखील त्याचा वापर बंद केल्याशिवाय तुमची जीभ ताब्यात राहणार नाही."

"पण मला बोललंच पाहिजे, बाबा." मी केविलवाण्या स्वरात ओरडलो.

"का पण ? एवढा संयम नाही तुमच्यात ? मौनाचं सामर्थ्य मोठं आहे. मौन ही शक्ती आहे. मौन ही..."

उड्या मारायच्या माझ्या दोरीचे एक टोक हातात धरून बाबा एक तास 'मौनाचं महत्त्व' ह्या विषयावर बडबडत होते. शेवटी त्यांचा वाक्प्रवाह अडवून मी ओरडलो, "पण बाबा, मी बोललो नाही तर खाऊ काय ?"

"म्हणजे ? बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध काय ?"

"मी टेलिफोन-ऑपरेटर आहे बाबा. दिवसभर बोलावंच लागतं मला."

"मग कसलं वजन उतरवणार तुम्ही ?" अत्यंत कारुण्यपूर्ण कटाक्ष 'टाकुनिया बाबा गेला' ! आणि त्यांच्या गळ्यात पडलेली दोरी मघाशी मी गच्च आवळली का नाही, ह्या विचाराने मला पश्चात्ताप झाला !

मग मात्र मी चिडलो आणि निश्चय केला की बस्स. यापुढे उपास—वजन उतरेपर्यंत उपास ! मला मी काटकुळा झाल्याची स्वप्ने पडू लागली. भरल्या ताटावरून मी उठू लागलो. बिनसाखरेचा आणि बिनदुधाचाच काय, पण बिनचहाचा-देखील चहा पिऊ लागलो ! साखर पाहिली की माझ्या अंगाचा तिळपापड होऊ लागला. केवळ फळांवर मी जगू लागलो. केळी पाहिली की मला त्यांतली जीवनसत्त्वे दिसून अनादी तत्त्व सापडलेल्या ऋषिमुनींप्रमाणे अष्टसात्त्विक भाव माझ्या अंगावर दाटू लागले. लिंबाचा रस तर मला अमृतासारखा वाटू लागला. धारोष्ण दुधासाठी मी अधूनमधून अंधेरीच्या गोठ्यात जाऊ लागलो. दोरीवरच्या उड्या केवळ खालच्या मजल्यावरील मंडळींच्या 'दुष्टपणाने व आकसाने' केलेल्या तक्रारींमुळे थांबवाव्या लागल्या. दहा उड्या पाय न अडकता मारण्यापर्यंत मी पोचलो होतो. कचेरी सुटली की मी गिरगावरस्त्याने धावत येऊ लागलो. केवळ पौष्टिक आणि सात्त्विक आहार सुरू केला. जवळजवळ दहाबारा दिवस हा क्रम चालू होता. माझ्यातला फरक माझा मलाच कळत होता ! लहान मुले बी पेरले की रोप किती वाढले हे रोज उपटून पाहतात त्याप्रमाणे रोज संध्याकाळी काट्यावर वजन करावे असे वाटत होते मला. पण मी ती इच्छा दाबून धरली. बरोबर एक महिन्याने मी वजन करणार होतो. एक महिनाभर तुपाचा थेंब माझ्या पोटात जाणार नव्हता. केवळ दूध ! दुर्दैवाने रोज गाईचे धारोष्ण दूध मिळण्याची सोय नव्हती. 'गायींना चारा'वाल्या बायांकडल्या गायी इथूनतिथून सगळ्या भाकड निघाल्या. केवळ चौकशीपोटी दोन रुपयांचा चारा गायींना चारावा लागला. दोन रुपयांत सोळ दुणे बत्तीस गायींची

चौकशी केली. दोनचार वेळा त्याच त्याच गायीची चौकशी झाल्यामुळे चारावाली बाईही उखडली. पण एकूण आहारव्रत जोरात चालू ठेवले.

पंधरवडाभरात फक्त दोन वेळा साखरभात झाला—एकदा अण्णा पावश्यांकडे सत्यनारायणाला आमचे मेहूण गेले तेव्हा आणि एकदा आमच्याच घरी मी उपास सुरू केला तेव्हा हिने सत्यनारायण 'बोलून' ठेवला होता त्या दिवशी. त्याशिवाय सोकाजीने चोरून एकदा कोळंबीभात चारला व खालच्या मजल्यावरच्या भाऊजी परसटवारांनी एकदा नागपुरी वडाभात पाठविला होता. एवढे अपवाद वगळल्यास भाताला स्पर्श नाही केला. त्यामुळे मुख्यतः चरबीयुक्त द्रव्ये शरीरात कमी गेली. माझा एकूण निश्चय पाहून चाळीतल्या मंडळींचा आदर दुणावल्याचे माझ्या सूक्ष्म नजरेतून सुटत नव्हते. जी मंडळी माझी, माझ्या डाएटची आणि उपासाची चेष्टा करीत होती त्यांनीच "पंत, फरक दिसतोय हं!" अशी कबुली द्यायला सुरुवात केली.

जनोबा रेग्यांसारख्या अत्यंत कुजकट शेजाऱ्यालाही "पंत, भलतेच की हो रोडावलेत!" असे मान्य करावे लागले. मंडळींच्या प्रशस्तीने मला भीती वाटत होती ती एकाच गोष्टीची—म्हणजे मूठभर मांस वाढण्याची! पण असली तुरळक तारीफ ऐकून मी चळण्यासारखा नव्हतो.

इतक्या असामान्य मनोनिग्रह आणि जिव्हानियंत्रणानंतर कमीत कमी वीस ते पंचवीस पौंडांनी तरी माझे वजन घटलेच पाहिजे, अशी माझी खात्री होती व त्या खात्रीने मी आमच्या ऑफिससमोरच्या वजनाच्या यंत्रावर पाय ठेवला आणि आणेली टाकून तिकीट काढले. महिन्यापूर्वी ह्याच यंत्राने माझे वजन एकशेएक्यांयशी पौंड दाखवले होते. एक महिन्याचा उपास, निराहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या, इत्यादी उग्र साधना केल्यावर आज तिकिटावर वजन...

मिनिटभर माझा विश्वासच बसेना! एकशेब्याण्णव पौंड! आणि भविष्य होते: 'आप बहुत समझदार और गंभीर है!'

सुमारे सहा आणेल्या मी त्या यंत्रात टाकल्या—वजन कायम. फक्त भविष्य बदलत होते. शेवटी 'आपके जीवन में एक स्त्री आयेगी' हे वाचल्यावर मात्र मी हात आवरला.

हल्ली मी वजन आणि भविष्य ह्या दोन्ही गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे. आणि विशेषतः डाएटच्या आहारी तर या जन्मात जाणार नाही. छे, छे, वजनाचा मार्ग भलत्याच कारण्यांतून जातो.

# ....आगामी आत्मचरित्र

कधीकधी मला जीवनाबद्दल एकाएकी अती गंभीरपणाने विचार करायचा झटका येतो आणि आता हळूहळू आत्मचरित्राला हात घातला पाहिजे असे वाटू लागते. ते ज्ञानेश्वर-तुकाराम...ते त्यांचे रात्रंदिन युद्धाचे प्रसंग...तो अंतरिंचा ज्ञानदिवा...ते भगवंताचे अधिष्ठान—सारी मंडळी डोक्याला टापशी बांधून गंभीर सुतकी चेहरे करून माझ्या मनाच्या दाराशी घुटमळायला लागतात. हर हर! चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या प्रवासानंतर मिळालेल्या मानवदेहाचे आपण हे काय केले असे वाटून, एरवी माझी अंतःकरणाच्या अडगळीत पडलेली सदसद्विवेकबुद्धी हरवलेल्या बटणासारखी अचानक 'सापडते' आणि मी अंतर्मुख बनतो. हमखास झोपेची औषधे म्हणून वापरलेल्या 'विवेकानंद', 'गीतारहस्य', 'ज्ञानेश्वरी', 'तुकोबाची गाथा', 'सॉक्रेटिसाचे चरित्र', वगैरे ग्रंथांवरची धूळ झटकली जाते. सारे आयुष्य शेणाच्या जमिनीसारखे पुन्हा एकदा स्वच्छ सारवावे असे वाटू लागते. आणि माझ्या आयुष्यातला हा अंतर्मुखतेचा काळ सुरू होतो. माझा आवाज सर्वोदयवाल्या आचार्यांसारखा मऊमऊ होतो. समोरच्या चाळीतल्या खोलीच्या खिडकीमागली हालचाल नेहमीप्रमाणे मी न्याहाळीत नाही. कोपऱ्यात पडलेल्या विड्यांच्या थोटकांकडे पाहून, ज्या मुखातून हरिनाम निघावे म्हणून त्याने (इथे माझी नजर वर जाते) हा नरदेह दिला त्याचे मी धुराडे केल्याची जिवाला खंत वाटू लागते. त्या नादात मी माझ्या सहधर्मचारिणीने (अशा वेळी तिला 'बायको' म्हणणे मला रुचत नाही. 'धर्मे–अर्थे–कामे'पैकी शेवटी शेवटी 'धर्मे–धर्मे–धर्मे' हेच खरे, असे मला वाटू लागते.) मला बाजारातून ज्या-ज्या वस्तू आणायला सांगितलेल्या असतात त्या मी आनंदाने आणतो. श्रमांतले सौंदर्य मला एकाएकी दिसू लागते.

गोड्या तेलाची बाटली भरून मी चक्क कोटात अडकवून घेऊन येतो. माझ्या डोळ्यांपुढे त्या वेळी स्वतःची वळकटी खांद्यावर घेऊन येणारे सानेगुरुजी असतात. एरवी मी कोथिंबिरीची जुडीदेखील चोरट्या दारूसारखी (ही उपमा आता अनेकांना सहज कळावी.) कोटात लपवून आणतो. श्रमांतील हे सौंदर्य मला अशा वेळी इतके पटू लागते की "पाटीला हात लावाल का?" असे विचारणारी कुणी भाजीवाली वा मोळीवाली हुडकून काढून मी हात लावतो. (महादेव गोविंद रानड्यांची ती कथा सुज्ञांस परिचित आहेच!) अशा वेळी लोकांच्या नजरेतील विष मला दिसते; पण माझ्या डोळ्यांतील पावित्र्याची चमक त्यांना आढळत नाही. (तरी बरे, माझा एकच डोळा धड आहे; पण त्या डोळ्याकडेदेखील लोक वाकड्या डोळ्याने पाहतात.) नरजन्माला येऊन त्यांची काय ही अधोगती! साऱ्या भारतीय संस्कृतीचा अर्क पिऊन मी अशा वेळी बेहोष झालेला असतो.

'भारतीय संस्कृती'...अहाहा! ह्या दोन शब्दांत केवढे ब्रह्मांड साठले आहे! ती गंगा...ती यमुना...त्या एकूण सगळ्याच लोकमाता...ती धारातीर्थे...ते गोपुरांचे प्रदेश...त्या अवीट लोककथा...ते लोकवाङ्मय...त्या अपौरुषेय ओव्या!...माझ्या डोळ्यांपुढे माझे बाळपण येते. माझ्या बाळपणी झालेल्या संस्कारांची सारी आठवण पार बुजून गेली आहे याची मला अती खंत वाटू लागते. मुंबईतल्या सुप्रसिद्ध बटाट्याच्या चाळीत माझा जन्म झाला ह्याच्या आता मला वेदना होतात. 'चाळ' हे काय चरित्रनायकाचा जन्म होण्याचे स्थळ आहे? उद्या सुप्रसिद्ध नाटककार, कवी, कथाकार हणमंतराव दशपुत्रे तथा कवी 'दशकुमार' ह्यांचे जन्मस्थळ दाखवणाऱ्या महाराष्ट्रशारदेच्या उपासकाला बटाट्याच्या चाळीतली जिन्याजवळील ती अंधारी खोली का पाहावी लागणार? त्यापेक्षा एखाद्या खेड्यात जन्माला आलो असतो तर? मला ती जात्याची घरघर, त्या ओव्या...(मी जरी त्या प्रत्यक्ष कधी ऐकल्या नाहीत, तरी आमच्या पूर्वजांनी त्या ऐकल्या असतीलच की नाही? रक्तातून आलेले संस्कार कुठे जातात?) मी ओव्या आठवण्याचा खूप प्रयत्न करतो. परंतु आमच्या जन्मा-अगोदर बऱ्याच वर्षांपूर्वी त्या आमच्या पूर्वजांच्या रक्तातूनही नाहीशा झालेल्या असाव्यात. पवित्र संस्कारांच्या आठवणींची स्टेशने फिरवून फिरवून मनाचा काटा थबकतो; पण ओव्यांचे स्टेशन लागत नाही. बाळपणी ऐकलेले 'कांदीबटाटीयेऽ', 'नव्येअकाळ', 'विविद्रुत्ये'—ह्यांचीच खडखड ऐकू येते. मी माझ्या बाळपणाच्या कठड्यावर उत्साही विदुषींनी जमविलेल्या ओव्यांची फुले चिकटवून, स्वतःच्या बाल्याला संस्कारांच्या वेलीच्या कुंपणाची शोभा आणण्याचा प्रयत्न करतो. माझ्या आत्मचरित्रात माझे बाळपण असे सुरू होते :

"अहाहाहा! (आतापर्यंत 'अहाहा'मधील हाहा दोनदाच आहे; आता तीनदा आला. ह्यावरून चतुर वाचकांस माझ्या अंतःकरणाच्या पिळाची कल्पना येईल. वाङ्मयातील मार्मिकता हीच!) काय ती ओव्यांची रत्नभांडारे! आपल्या माय-

माउल्यांनी जतन करून ठेवलेले हे सांस्कृतिक धन...(यापुढील वाक्य संस्कृतीच्या नावाने हुंदके-उसासे टाकणाऱ्या कोणत्याही साहित्यिकाच्या पुस्तकात सापडेल.)

"...उदाहरणार्थ, हीच ओवी पाहा. (वास्तविक इथे 'माझी आई ही ओवी जात्यावर किती गोऽऽड गात असे' असे लिहिण्याचा मोह अनावर आहे. परंतु आमच्या चाळीच्या तळमजल्यावरच पिठाची चक्की होती. माझ्या परमपूज्य मातोश्रीला आपला हणम्या वाईट लिहितो एवढेच ठाऊक आहे; तो खोटेही लिहितो हे कळल्यास तिला दुःख होईल. म्हणून आवरतो. ओवीसाठी शेजारणीला मदतीला घ्यायला हरकत नाही.)...अहाहाहाहा! ('हा' वाढला इथे चतुर वाचकांचे लक्ष असू दे.) आमच्या शेजारच्या सखूबाई पहाटे जात्यावर किती गोड ओव्या गायच्या! त्या सुरावर मी जागा होत असे. (इथे माझे नेहमीचे दुष्ट मन म्हणते, ती बाई सकाळी नऊ वाजता कशाला मरायला ओव्या गाईल? पण नाही, माझ्या नेहमीच्या मना, शांत हो. आज माझ्या सात्त्विकतेला पूर आला आहे. त्याला खरेपणाचा बांध घालू नकोस.) सखूबाई गायच्या :

*दुडूदुडू दुडूदुडू । अंगणांत रांगे बाळ*
*खुळूखुळू खुळूखुळू । कुंपणांत खेळे फूल ॥*
*वाटसरूंनो वाटेच्या । दारीं करूं नका गर्दी*
*दृष्ट लागेल बाळाला । त्याला व्हायची ग सर्दी ॥*

(ह्या ओव्या कु० चंपूबाई चामखिळे यांच्या 'स्त्रीधन' या संग्रहातून घेतल्या आहेत.)

"अहाहाहाहाहा! अपौरुषेय अंतःकरणाचा केवढा प्रचंड उमाळा हा! आईच्या भावनांचा हा गोकाक आहे, गिरसप्पा आहे. नायगारासारखा हा 'मायगारा'चा प्रचंड स्रोत आहे...अशा मातांनी भारतीय संस्कृतीला पोसले...जोपासले...वाढवले ...न्हाऊ घातले...माखू घातले...तीट लावली...(इथे पुन्हा माझे ते दुष्ट मन, देवी टोचल्या, परिपाठाचा काढा दिला, संध्याकाळी "परवचा म्हटल्याशिवाय गिळायला मिळणार नाही कारट्या!" म्हटले, वगैरे संस्कृतिहीन सत्याच्या आठवणी करून देऊ लागले आहे. आत्मचरित्रातदेखील सत्य सांगू इच्छिणाऱ्या माझ्या दुष्ट दुष्ट मना, शांत हो!)...अंगडे घातले...टोपडे घातले...करगोटा बांधला...

*दूर देशींच्या कावळ्या । नको करूं कावकाव*
*पाळण्यांत बाळ झोपे । दूध प्यालें अर्धा पाव ॥*

(पाहा : स्त्रीधन)

"बालक शेरभर दूध प्याले तरी मातेला ते अर्धापावच प्याले असे वाटणार. असल्या काव्यापुढे सारे आधुनिक कवी ठार मारावेसे वाटतात. (एक तेवढा

'काव्यपुजारी' कवी सोडून. त्याचे काव्य बरे आहे म्हणून नव्हे; त्याने माझे पाच रुपये द्यायचे आहेत. शीः शीः ! कशाला ही आठवण ? कुणी पाहत नाही असे पाहून श्रीनिवास हॉटेलवाल्याकडे मी छक्का लावायला गेलो, तिथे नेमका लेकाचा हजर ! अट्टल जुगारी आहे हा लुच्चा. स्वतःला साहित्यिक म्हणवतो, पण चारित्र्य काय ? शीः शीः शीः ! आकडेदेखील दुसऱ्याच्या पैशावर लावतो. त्याच्या तिरीने त्याला भाव दिला; पण माझे पैसे परत करायची बुद्धी नाही...थूः थूः ! असल्या आठवणींनी संस्कृतीची धार्मिक धुंद उतरते. नीतीची नशा नाहीशी होते. ह्या 'काव्यपुजाऱ्या'च्या आठवणींनी माझे हे नेहमी असे होते. माझ्या साऱ्या नाटकांच्या कल्पना मी इंग्रजी नाटकांतून चोरल्या म्हणून तो ओरडत सुटतो. तरी बरे, चार वेळा दमणला माझ्या खर्चाने मी त्याला नेला आहे. माझे 'नवटाक' हे दारूबाज लेखकाच्या जीवनावरचे नाटक ह्याच 'काव्यपुजारी' ऊर्फ रंगनाथ महात्याच्या जीवनावरून लिहून मी मराठी वाङ्मयात त्याला अमर केले. आणि ह्या पाजी इसमाने आपले 'मद्यमद' हे भिकार खंडकाव्य मला अर्पण करून मला ठार केले ! सात्त्विकांच्या भट्टीची अख्खी पहिली धार पोटात गेली तरी नुसत्या ह्या महात्याच्या नावाच्या आठवणीने ती धुंदी झटक्यात उतरते. महाभयंकर इसम आहे हा रंगो महात्या !)...कुठे ती जात्याची घरघर...आणि कुठे आजच्या कविता ! उंदीर काय ? पिंप काय ? पिस्टन काय ? मांसल काय ?—माती काय नि मस्ती काय ?...हरहर ! नरदेहाची मुन्सिपाल्टी केलेल्या ह्या कवींना देहांताखेरीज शासन नाही !"

माझ्या बाळपणी मी मुंबईसारख्या बकाल शहरात—त्यातून बटाट्याच्या चाळीत—वाढल्यामुळे तो नदीचा काठ, ते देऊळ, तो सनई-चौघडा, ते स्तोत्रपठण—यातले काही म्हटल्या काही माझ्या वाट्याला आले नाही, याचे मला अत्यंत दुःख होते. आत्मचरित्रात ह्या पार्श्वभूम्यांच्या अभावी माझ्या संस्कृतिमय मनाचे वाचकांना दर्शन कसे व्हावे याची मनाला खंत लागून राहते. शेवटी माझ्या सात्त्विकतेच्या 'मूड'मध्ये मी माझ्या इष्टमित्रांची ऐकीव बाळपणे माझ्या नावावर, लहानपणी एकमेकांच्या लंगोट्या नेसतात तशी, जमा करून मनातल्या मनात माझे बाळपण रचतो.

"...तो नदीकाठ...ते नदीतले डुंबणे...त्या पाणोठ्यावर आलेल्या नवोढा... त्या बालमैत्रिणी...माहेरवासिनींच्या त्या चतुर चेष्टा...." (ठिकठिकाणांहून हे म्याटर मी गोळा करून ठेवले आहे. योग्य वेळी माझ्या आत्मचरित्रात ते येईलच !)

खरोखर खेड्यात जन्माला आल्याशिवाय आत्मचरित्राला रंगच येत नाही. आणि तेही अठरा विश्वे दारिद्र्य असलेल्या कुटुंबात ! दुर्दैवाने माझे बाळपण भलत्याच आरामात गेले. आगामी आत्मचरित्रात नमूद करण्यासारखा एकही दारुण प्रसंग घडला नाही. जवळजवळ सारे कुटुंब अजून टिकून आहे. 'हृदयद्रावक' म्हणावा असा एकही किस्सा नाही म्हणजे आत्मचरित्र कसले ? म्हणून सोयीसाठी माझ्यावर अतोनात प्रेम करणारी एक मावशी तयार करून तिला मी अपघातात मारायचे

ठरवले आहे. व्यवहारात 'माय मरो पण मावशी जगो' अशी म्हण आहे. मराठी साहित्याच्या अभिवृद्धीसाठी मला जिवंत असलेली 'माय' जिवंतच ठेवून मावशी मारावी लागत आहे याची नम्र जाणीव आहे. परंतु राष्ट्रासाठी खऱ्याखुऱ्या लोकांनी प्राण दिले! मायबोलीच्या उद्धारासाठी नसलेली मावशी रोमहर्षक प्रसंगात 'आटपून' टाकली म्हणून तिचे काय बिघडणार आहे? शिवाय व्यवहार, सत्य आणि आत्मचरित्र यांचा अर्थाअर्थी तसा काय संबंध असतो? तात्पर्य, माझ्या आगामी आत्मचरित्रात मी माझी मावशी कशी मेली याचे हृदयंगम वर्णन करायचे योजिले आहे, आणि त्यासाठी आमच्या खेड्यातून आमच्या आत्याच्या खेड्याला (वास्तविक आत्या राहते खोताच्या वाडीत.) आतेबहिणीच्या लग्नासाठी मी वयाच्या सहाव्या वर्षी बैलगाडीचा प्रवास आखला आहे. आत्मचरित्रात एकदा तरी बैल-गाडीचा प्रवास हवाच.

"...पहाटेची ती शांत वेळ! शुक्र मावळत (की उगवत? खात्री नाही...हा तपशील नंतर दुरुस्त करीन मी!) होता. आमची आत्या त्या वेळी खुरोंडीला राहत होती. त्या वेळी तिचे यजमान तिथे देवी-डॉक्टर होते..." ('खुरोंडी' हे माझ्या दृष्टीने कोकणातील सर्वांत अधिक रम्य ठिकाण होणार आहे. कारण साने-गुरुजी-खांडेकरांपासून तो पेंडसे-गो० नी० दांडेकरांपर्यंत सगळ्यांच्या गावांतले माड, घाट्या, पोफळी, घुसळेश्वर-रवळनाथादी मंदिरांचे कळस, पाटाचे पाणी, घाटीवरून उतरणाऱ्या बैलगाड्या, पाखरांच्या किलबिलाटाला जबाब देणाऱ्या मोटा, जे जे काही हाताला लागेल ते ते सारे उचलून आणून मी ह्या माझ्या आत्मचरित्राच्या सोयीसाठी भाट्याच्या खाडीशेजारी बसवून, ह्या खुरोंडी गावाच्या पूर्वेकडून एका नदीलाही वाहायला लावणार आहे. इतकेच काय, पण 'दुर्वांच्या आजी'सारखी एक 'तुळशीची मामी' आणि 'दादा खोता'सारखा 'काका खोत' वगैरे मंडळीदेखील फेरवसाहत-मंत्र्यांच्या थाटात तिकडून उचलून इकडे आणून ठेवली आहेत. तपशिलांत काही ठिकाणी गोंधळ झाला आहे. पण हा दोष माझा नसून कोकणच्या पार्श्वभूमीवर लिहिणाऱ्या मूळ लेखकांचाच आहे, हे मी नम्रपणे माझ्या आगामी टीकाकारांना सुचवून ठेवतो. थोडक्यात 'मावशीच्या मृत्यू'ची कोकणच्या पार्श्वभूमीवर मी जय्यत तयारी करून ठेवली आहे. मुद्दा फक्त तिला दरोडेखोरांकडून ठार मारायची, की फोंडाघाटातून तिची बैलगाडी उलटून तिला दरीत टाकायची, हा आहे. पण यथावकाश तो तिढा सुटेल.)

एकूण माझ्या आत्मचरित्रातील 'चरित्रनायकाचे बाळपण' ह्या पहिल्या प्रकरणा-तील अनेक अडचणी मी हळूहळू सोडवीत आणल्या आहेत. ज्योतिषशास्त्रावर माझा संपूर्ण विश्वास आहे. त्यामुळे पहिल्या पानावरच माझी कुंडली आणि हाताचा ठसा मी छापणार आहे. माझ्या आणि लोकमान्य टिळकांच्या कुंडलीत लोकांना साम्य आढळेल; परंतु तो केवळ योगायोग आहे.

माझा जन्म खुद्द मुंबई शहरात बटाट्याच्या चाळीत झाला असला तरी आत्म-चरित्राच्या सोयीसाठी मी तो खेड्यात नेला. परंतु अडचण, पूर्वजांचे काय करायचे ही येते. आमच्या पूर्वजांच्या पिढ्यांचा जेथपर्यंत तपास लागतो तेथपर्यंत एकजात बेटे 'माझी आगबोट कंपनी'त कारकून! एकाच्याही जीवनात एकही नाट्यप्रसंग नाही. नाही म्हणायला, एक काळ असा होता की, कै० मल्हार दादोबा दशपुत्रे (पणजोबा), कै० खंडो मल्हार दशपुत्रे (आजोबा) आणि बळवंत खंडो दशपुत्रे (पेन्शनर तीर्थरूप) ह्या तिन्ही पिढ्या 'माझी आगबोट कंपनी'च्या बुकिंग हपिसात एकाच वेळी नोकरी करीत होत्या. 'माझी आगबोट कंपनी'च्या तिकीट विकायच्या तीन खिडक्यांत एके वेळी जी तीन मुंडकी दिसायची ती दशपुत्रे घराण्यातील तीन पिढ्यांची होती. आणि त्यानंतर त्यांतील पणजोबांची खिडकी आमच्या तीर्थरूपांच्या काकांनी घेतली आणि आजोबांची चरित्रनायकाने.—यापेक्षा आमच्या पूर्वजांच्या आणि त्यांच्या वंशजांच्या चरित्रांत ऐतिहासिक नाट्य काही नाही! पेशवाईत आमचे पूर्वज कुठे राहत होते याचा पत्ता लागत नाही. दशपुत्रे मूळ कुठल्या गावचे हे कळले नाही तरी प्रत्येक वंशज मात्र आपल्या आडनावाशी कमाल आणि किमान इमान राखून आहे. बटाट्याच्या चाळीतल्या या दोन खोल्यांत, गेला बाजार दीडशे दशपुत्रे अपत्यांनी जगाच्या रंगभूमीवरील पहिली 'एंट्री' घेतली आहे. हेच जास्तीत जास्त नाट्य. त्यामुळे केवळ खुरोंडीच्या आत्याच्या मुलीच्या लग्नात मावशीला ठार मारून भागण्यासारखे नाही. आणखीही सातआठ घटना हव्यात. प्लेगात गावाबाहेर झोपड्या बांधून राहण्याचे कलम जोडावे असा इरादा आहे. वास्तविक मुंबईस इतका चांगला प्लेग येऊन गेला, पण बटाट्याच्या चाळीतला ढेकूणदेखील मेला नाही. इतकी चाळीतली माणसे टणक! प्लेगच्या पिसवांना चाळीचा पत्ताच सापडला नाही. बटाट्याच्या चाळीचा पत्ता लावीत यमदूत आले तरी वाटेत त्यांना एखादा पोस्टमन मारून त्याच्या आत्म्याला विचारीत चाळ शोधावी लागत असेल, तिथे नव्यानेच मुंबईत आलेल्या प्लेगच्या पिसवांना काय चाळ सापडते? आज त्या चाळीचे नाव झाले हे केवळ चरित्रनायकाच्या तेथील दीर्घ वास्तव्यामुळे, हा भाग अलाहिदा! तात्पर्य, बालपणी प्लेग नाही म्हणजे माळावरच्या झोपड्यांत राहण्याची गंमत नाही. घरात विजेचा दिवा असल्याने म्युनिसिपालिटीच्या कंदिलाखाली शिकण्याचा प्रसंग नाही... माझ्या आगामी आत्मचरित्रात अडचण कुठे असेल तर माझे बालपण रंगविण्याची! तरीही मी त्यात रंग भरण्यासाठी काही योजना आखल्या आहेत. त्यांपैकी एक म्हणजे, खेड्यातून मुंबईस पळून जाण्याची. चरित्रनायकाने आयुष्यात एकदा तरी कुठून तरी कुठे तरी पळून हे गेलेच पाहिजे, नाही तर कुठून तरी कुणाला तरी पळवले पाहिजे. दुसरी गोष्ट प्रत्यक्षात करणे जितके सोपे तितके लख्खपणाने ते लिहिणे सोपे नाही. स्वतःच्या चरित्रावरील डागांनाही सुंदरींच्या गालांवरील तिळाची शोभा यावी ही दक्षता घेणे आत्मचरित्रात अत्यावश्यक असते. मी आत्मचरित्रात

असली माफक पापे लिहिणार आहे. तसा मी अत्यंत पापभीरू आहे. तीनचार पिढ्या तरी कारकुनाचे इमानी रक्त आमच्या नसानसांतून वाहत आहे. 'सिक लीव्ह'ची खोटी चिठ्ठी पाठवणे हे आमच्या आयुष्यांतले सगळ्यांत मोठे पाप. परंतु बाळपणाच्या खात्यावर आपले एक उगीच 'मी चोर कसा झालो ?' हे उपप्रकरण टाकून, एक पावली मी स्वतःला चोरायला लावणार आहे. लहानपणी असली चोरी केल्याशिवाय प्रौढपणीच्या थोरवीला उजाळा मिळत नाही. त्यासाठी मी माझे बाळपण जिथे जाणार आहे त्या खेड्यात एक काल्पनिक हॉटेल उघडून त्या चोरलेल्या पावलीची भजी खाणार आहे. नंतरच्या आयुष्यात मी बटाट्याच्या चाळीतल्या गणपति-उत्सवाच्या व्याख्यानात समोरच्या चाळकऱ्यांच्या आकसामुळे व खोडसाळपणामुळे भजी खाल्ली. प्रत्यक्ष स्टेजवर भजी आली नाहीत; केवळ 'भजी मारा!'च्या घोषणा झाल्या; परंतु 'माझ्यावरील प्राणघातक हल्ला' ह्या शब्दांत, माझ्या आत्मचरित्रातील 'मी हुतात्मा कसा झालो (असतो) ?' ह्या प्रकरणात मी त्या प्रसंगाचे रोमहर्षक वर्णन करायचे ठरविले आहे :

"...तो प्रसंग मला अजून आठवतो. 'संस्कृती आणि जानवे' ह्या विषयावर माझे बटाट्याच्या चाळीतल्या गणेशोत्सवात भाषण होते. ते दिवस मोहनदास करमचंद गांधी ह्या गुजराती पुढाऱ्याने चालवलेल्या सबगोलंकारी चळवळीचे होते. पण मी काही कच्च्या गुरूचा चेला नव्हतो. ब्रह्मतेजापुढे वाणिजनाचा काय प्रभाव पडणार होता ? माझ्यामागे मनू होता, याज्ञवल्क्य होता, पराशर होता, अत्री होता, वसिष्ठ होता. त्यांच्यामागे साडेतीन केशरी देशसेविका होत्या आणि एक शेळी होती. (मी एकदा वक्रोक्तीचा आश्रय घेतला की शिवरामपंत परांजप्याला ऐकत नाही!) माझ्या व्याख्यानाला तुडुंब गर्दी होती. कमीत कमी दहा हजार तरी लोक असावेत! (खरे म्हणजे त्यानंतर चाळीतल्या बायकांचे 'एकेकीचे यजमान' हे नाटक आणि सौ० धनबाय धुरंधरांचा एच्च० मंगेशरावांच्या ऑर्केस्ट्राच्या साथीवर 'समयांचा नाच' होता.)...माझ्या भाषणाला अचाट रंग भरला होता. पहिल्या दहा वाक्यांत मी सत्याग्रहाची अशी रेवडी उडवली की ज्याचे नाव ते! चरख्यावरील सूत आणि जानव्याचे सूत, माझी 'चर' आणि 'खा' ही कोटी, पंचगव्य आणि शेळीचे दूध यांची मी केलेली बिनतोड तुलना ऐकून आणि 'सनातनधर्माला वाचवा' ही माझी नारायण पेशव्याच्या (ध चा मा 'फेम') सुरात फोडलेली आरोळी ऐकून जनता खवळली. आणि इतक्यात पंधरा मुसलमान सुरे घेऊन हिंडताना मी विंगेत पाहिले. माझा चेव वाढला. मी त्या मुसलमानांना आव्हान दिले. पंचवीसच्या पंचवीस मुसलमान विंगमध्ये गर्दी करून उभे राहिले. मी डगमगलो नाही. एका हाताने पगडी घट्ट दाबून धरून मी माझे भाषण चालू ठेवले. आज माझ्या वक्तृत्वाला विलक्षण धार आली होती. माझा मृत्यू मी विंगेत पाहत होतो. पन्नास मुसलमान आणि मी एकटा...ढगांच्या गर्दीत मधूनच डोकावणाऱ्या एकमेवाद्वितीयम अशा तेजोभास्करासारखा वक्तृत्व-

तेजाने मी त्या गर्दीत तळपत होतो. बाहेर लोक 'आवरा—आवरा!' असा आरडा-ओरडा करीत होते. मी ऐकले नाही. इतक्यात सुरा घेऊन एक मुसलमान चक्क माझ्या अंगावर आला. माझ्या छातीवर त्याने वार केला. मी कोलमडून खाली पडलो. माझी पगडी, चष्मा उडाला. धोतर अत्यंत अवघड जागी फाटले. मी हुतात्मा होण्याच्या बेतात होतो, इतक्यात एकच मुसलमान माझ्या जवळ आहे आणि इतर मुसलमान लाजून—होय, अगदी साक्षात लाजून—बाजूला उभे आहेत, असे मला दिसले. त्या मुसलमानाचा आवाज अतिपरिचित वाटला. मी नीट त्याला न्याहाळून पा—हि—ले! 'एकेकीचे यजमान' ह्या दंग्याच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या नाटकात आमची 'ही' आणि इतर दहा बायका दंगेखोर मुसलमानांचे पार्ट करणार होत्या. कुटुंबाने लावलेल्या दाढीमिशांतून, भरगच्च जंगलातून सफेद मशिदीचे मिनार दिसावे तसे, पुढे आलेले चार नित्यपरिचित दात मी लगेच ओळखले..."

आत्मचरित्राच्या सोयीसाठी तरी त्या वेळी माझ्यावर खऱ्या मुसलमानाने हल्ला—थोडासा तरी हल्ला—करायला हवा होता, असे मला अजूनही वाटते. कारण हा हल्ला अधिक प्राणघातकी होता. परंतु माझ्या आगामी आत्मचरित्रात मी ह्या प्राणघातक हल्ल्यात नाटकी मुसलमानांना खऱ्या मुसलमानांचेच स्वरूप द्यावयाचे योजले आहे. आमच्या आयुष्यातला हा एकुलता एक धैर्याचा प्रसंग. तोही गाळला तर बाकी उरतात मालाडच्या बंगल्यात रामराव विजयकर आणि नॉर्मन डिसिल्वाने 'ॲरेंज' केलेली 'वीकेंड पिकनिके'. पण त्यांतले मला मालाडच्या रामरावच्या बंगल्यापर्यंत जाऊन पोहोचलेले आणि नॉर्म्या डिसिल्वाने खोके खोलून बाटल्या उघडलेले तेवढे आठवते. शनिवारी साडेसातपासून सोमवारी सकाळपर्यंत काय झाले हे—का कोण जाणे—आठवतच नाही!

तारुण्यातला सगळ्यांत मोठा बाका प्रसंग म्हणजे मला कविता करण्याचा छंद लागला तो. वास्तविक शाळेत माझी आवाजी आणि कविता म्हणताना होणारे चेहरे पाहून मराठीतल्या यच्चयावत कविता विनोदी आहेत असा बाहेरून ऐकणाऱ्याचा समज झाला असता. त्यामुळे माझे सर्व शिक्षक वर्षाच्या सुरुवातीला माझी एखादी कविता ऐकून वर्षभर मला कविता पाठ येतात हे गृहीत धरून मार्क देत असत.

परंतु—"अहाहा...मला तो प्रसंग आठवतो. मी पाचवीत आलो आणि नर्मदा नेने माझ्या वर्गात आली. वयाच्या चौदाव्या वर्षी मी 'नर्मदापर्यटन' नावाची अपन्हुतिवजा कविता (वास्तविक त्यात वजा फक्त काव्य होते, हे मला ते माझे दुष्ट मन सांगू लागले आहे!) लिहिली. 'ने ने गे अयि नर्मदे पदिं तुझ्या दे दे मला सद्गती' अशी त्या शार्दूलविक्रीडिताची सुरुवात होती. वृत्त, यमक, अक्षर आणि गणमात्रांच्या हिशेबात थोडासा घोटाळा झाला होता. परंतु त्या 'शार्दूलविक्रीडिता'तील शार्दूलाची आयाळ कुरतडल्यासारखी व ते विक्रीडित लंगड्या शार्दूलाने केल्यासारखे वाटते, ही तत्कालीन टीकाकारांची टीका मात्र पूर्वग्रहदूषित, असभ्य आणि वैयक्तिक

होती. त्या टीकेमुळे चिडून मी 'नको करूं गुड्गाट। डांसा नको करूं गुड्गाट। उघडी केली मच्छरदाणी। उघडी केली पाठ ॥' ही कविता लिहून टीकाकारांची तोंडे बंद केली होती. माझी 'नर्मदापर्यटन' ही कविता तळमजल्यावरील दाजी समेळांच्या (नाना समेळ, 'न्यू गजकर्ण फार्मसी'चे चालू मालक, यांचे पितामह) 'नव-कासार-कौशल्य' मासिकात छापून आली. माझ्या ह्या पहिल्या कवितेवर बऱ्याच थोर कवींची छाप होती. इतकेच काय, पण त्यातील काही ओळीच्या ओळी वामन पंडितांनी लिहिल्या आहेत असा भास होत होता...मला ती पहिली कविता (आणि नर्मदा नेनेही) अजून आठवते. अहाहा!...पहिली कविता...तो साराच एकूण पहिले-पणातला आनंद···" इ० इ०... (हे मी आत्मचरित्रात संपूर्णपणे लिहीनच.)

कविता करणाऱ्या इतर चरित्रनायकांत आणि माझ्यात फरक एवढाच की, इतरांच्या पहिल्या कविता साभार परत आल्या. माझी पहिली कविता छापली गेली, आणि इतर...जाऊ दे!

माझ्या आगामी आत्मचरित्रात आणखी एक अडचण आहे, ती प्रेमभंगाची. प्रेमभंगाच्या झिरझिरीत आठवणींनी आत्मचरित्राला एक निराळा लुत्फ येतो. पण तिथेही आमच्या पदरी दारुण निराशा आल्यामुळे त्या प्रकरणात मी 'चारित्र्य, शील, एकपत्नीव्रत' इत्यादी गोष्टींना प्राधान्य द्यायचे ठरविले आहे.

एकाच पत्नीबरोबर आयुष्य कंठणे ह्याला 'व्रत' का म्हणतात हे मी विस्ताराने लिहिणार आहे. वास्तविक स्वतःच्या चरित्रात एक तरी गोड अपघात असावा अशी माझी खूप इच्छा होती. पण नाही—तो योगच नाही.

माझ्या साहित्यसेवेतील स्मृती मात्र मी खूप रंगवून लिहायचे ठरविले आहे. मी माझ्या आयुष्यात लेजरबुकापासून ते आमचे हेडक्लार्क जनुभाऊ अभ्यंकर यांच्या चि० सौ० कां० (त्या वेळी) यमू हिच्या विवाहाप्रीत्यर्थ केलेल्या मंगलाष्टकांपर्यंत चौफेर लिहिले. चि० यमू ही सहस्रबुद्धे घराण्यात दिली होती. शार्दूलविक्रीडितात मी 'सहस्रबुद्धे' ही अक्षरे होल्डॉलमध्ये विसरून राहिलेली उशी नंतर खुपसतात तशी खुपसली होती. स्वतंत्रपणे छापलेल्या अशा माझ्या दोनच कविता : पहिली समेळांच्या 'नव-कासारकौशल्या'तली आणि दुसरी ही मंगलाष्टके. ही तर सोनेरी अक्षरांत, स्वतंत्र गुलाबी कागदावर. (शिवाय दोन्ही बाजूंना वर आणि वधू यांच्या फोटोचा ब्लॉक होता. त्यात वधू-वरांच्या नावांची उलटापालट होऊन वधूच्या फोटोखाली वराचे नाव व वराखाली वधूचे नाव झाले होते. परंतु ब्लॉकमेकर आणि चि० यमूचे सौंदर्य ह्या दोन्ही गोष्टींच्या कृपेने एकाही पाहुण्याच्या लक्षात ही चूक आली नाही.) मला त्या मंगलाष्टकांतील काही ओळी आठवतात :

*"हातीं हार धरूनि ही पुढति ये अभ्यंकरांची सुता*
*ठाके तो बोहल्यावरी वर पहा सऽहस्रबुद्धे अ० ता०* (अनंत तातोबा)

*आली हीच सुमंगलाच सुघटी पटकन् धरा अक्षता*
*फेका सावरुनी जधीं श्रवणि ये कुर्यात् सदा मंगलम् ॥"*

सौ० यमुनेच्या लग्नानंतर जनुभाऊंनी मला एक महिना 'लीव्ह विथ पे' सँक्शन केली होती. कवितेवर कवींनी स्तुती मिळवली असेल; सुटी मिळवणारा मात्र मी महाराष्ट्रातला आद्यकवी आहे हे आत्मचरित्रात नमूद करणार आहे. त्याशिवाय 'डिमेलो डिसमिस झाल्यावर', 'जन हो हेच दिवस ते गोवे पाहण्याचे। माझी आगबोट कंपनीप्रत आश्रय देण्याचे।' ह्या कविता तर त्या काळी लोकांना मुखोद्गत होत्या. विशेषतः 'डिमेलो डिसमिस झाल्यावर' हे काव्य मिल्टनच्या स्वर्गच्युतीच्या तोडीचे आहे असे मला वाटते. महाराष्ट्रात इतके सुंदर शोकगीत माझ्या आधी आणि नंतर लिहिले गेले नाही आणि जाणार नाही.

*"हा काय वखत हो आला*
*डिमेलो डिसमिस् कां झाला—"*

ह्या सवालातच मी लोकांची मने जिंकली होती. खुद्द डिमेलोने त्या गाण्याला इंग्रजी संगीतातील चाल लावली होती. पुढे ख्रिस्ती प्रेतयात्रेत तीच चाल मी बँडवर ऐकली. पाश्चात्त्य सुरांवर गायिलेले हे पहिले मराठी शोकगीत!

माझ्या नाटकातील तर ओळीन ओळी बटाट्याच्या चाळीतल्या कुठल्याही नंबरातून ऐकू येतील. एकदा बाबलीबाई आपले पती सोकरजी यांच्यावर त्यांनी 'गोडी बटाटी अळणी झाली' असे म्हटल्यामुळे संतापून, गृहत्याग करून बटाट्याच्या चाळीतून झावबाच्या काळ्या रामापर्यंत गेल्या होत्या. सोकरजींनी केवळ माझ्या 'कुंपणावरून' (तीन अंकी सामाजिक) नाटकातल्या नायकाच्या भाषणातील दोन ओळी भाई जीवनजी लेनच्या नाक्यावरून उच्च स्वरात म्हटल्या, "पुरुष हा क्षणाचा पती असला तरी अनंत काळचा पतित आहे!" त्या वाक्याचा प्रभाव एवढा प्रचंड झाला की इतका केविलवाणा आणि समंजस पती पाहून बाबलीबाय तर सोकरजींच्या मागून परतल्याच, पण आणखी सातआठ बायका त्यांचा हात धरून चाळीपर्यंत येऊ लागल्या. स्त्रियांच्या काळजाला हात घालणारे वाङ्मय अनेकांनी लिहिले; परंतु स्त्रियांच्या हातांत हात घालायची संधी देणारे वाङ्मय प्रस्तुत चरित्रनायकाखेरीज कोणी लिहिले आहे काय?

"कारकुनी काळजाच्या कर्मदरिद्री कोठडीत काळाकुट्ट काळोख असला तरी तेथे तुझ्या तीव्र प्रीतीचा तवा सतत तापलेला आहे." (कै० गडकऱ्यांच्या नाटकातही असली शैली आढळते. प्रस्तुत वाक्य माझ्या 'कारकुनाचे काळीज' तथा 'सशाची पिल्ले' ह्या नाटकात आढळेल.)

याखेरीज माझ्या सार्वजनिक चळवळींचा वृत्तांत देण्यासाठी मला स्वतंत्र आत्म-चरित्र लिहावे लागेल. चाळीचा मी अजातशत्रू पुढारी आहे. रंगो महाल्यासारखे

काही शत्रू आहेत मला; पण त्यांच्या मी केव्हाच फाडून चिंध्या केल्या. बटाट्याच्या चाळीत मीच सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक चळवळी केल्या. विशेषतः अंत्यविधीसारख्या प्रसंगांना मी आधी हजर असतो. खुंटीवर टोपी व पगडी यांच्या शेजारी माझी एक टापशी सदैव अडकवलेली असते. चाळीतल्या जिन्यांना माझ्यामुळे दिवे आले. 'श्रमदान-सप्ताहा'त मी एकट्याने चाळीला व्हाइटवॉश केला. चाळीच्या मूळ रंगावर तो चढला नाही, आणि मी चाळ रंगवली आहे हे चाळीकडे पाहण्यापेक्षा माझ्याकडे पाहून लोकांना कळत असे, हा दोष माझा नव्हे. आमच्या गल्लीचे नाव वाघूळगल्ली होते. ते बदलून त्या रस्त्याचे नाव मी 'तटस्थ पथ' असे ठेवले, असेही मी आत्मचरित्रात लिहिणार आहे. समोरच्या चाळकऱ्यांशी भांडण्यासाठी मी चाळीचे हस्तलिखित साप्ताहिक 'बुभुःकार' काढले. दर शनिवारी हळूच त्यांच्या चाळीच्या जिन्यात मी एक अंक टाकून येत असे. त्या चाळीतल्या लोकांनी आमच्या चाळीच्या मालकीच्या गटारात अंड्यांची टरफले आणि माशांचे काटे-खवले टाकले होते. मी वर्गणी गोळा करून आमच्या चाळकऱ्यांचे सहभोजन घडवून त्या उष्ट्या पत्रावळी त्यांच्या चाळीच्या दारात माझ्या हाताने टाकून आलो होतो. ए० आर० पी०च्या काळात अपरात्री हिंडून त्यांच्या चाळीत लागलेले दिवे मी जाऊन विझवायला लावले आहेत. (ती माझी सवय अजून जात नाही. आणि 'ही' म्हणते, मी वेळीअवेळी दुसऱ्याच्या चाळीतल्या खिडक्यांवर नजर ठेवून असतो. 'जो लोककल्याण, साधावया जाण, घेई करीं प्राण, त्या सौख्य कैचें?')

"राष्ट्रीय चळवळीशी माझा पूर्वीपासून मतभेद होता. त्यामुळे मी राजकारणात पडलो नाही. त्यातून लोकमान्य गेल्यानंतर तर मला राजकारणात पडावेसे वाटलेच नाही! लोकमान्यांचा तो मृत्युदिन मला आठवतो. वास्तविक हॅमिल्टनसाहेबाला संशय येऊ नये म्हणून मी त्या दिवशी कचेरीत गेलो होतो...(माझ्या दुष्ट मना,...चूप! ...बाकीचे कारकून टिळकांच्या प्यूनरलला जाऊन देशद्रोह करीत आहेत, हे तूच साहेबाला सांगितलेस याची जाणीव आता करून देऊ नकोस! तू कितीही ओरडत राहा. माझ्या पुस्तकात मी तो प्रसंग असाच लिहिणार...)

"लोकमान्य गेले...सरदारगृहावर रात्री दोन वाजल्यापासून अन्नपाणी न घेता मी उभा होतो. (तिथे हजारो लोक होते म्हणतात! मी होतो की नव्हतो हे सांगणारा आज तरी कोण आहे?)...मनातल्या मनात मी प्रार्थना करीत होतो, ...'देवा, माझं आयुष्य लोकमान्यांना दे'...देवाने ते ऐकले नाही. (माझ्या माझ्याशीच इमान न राखणाऱ्या मना, माझा आत्मा लोकमान्यांच्या कुडीत शिरला असता तर त्यांचे काय झाले असते हा विचार आणवून देण्याची तुला काय गरज?) शेवटी बाळ गंगाधर आमच्यातून गेले. पंधरा दिवस मी सुन्न होतो...चौपाटीवर मावळत्या सूर्यनारायणाला साक्षी ठेवून (साक्षीला नेहमी मावळता सूर्यनारायणच का घेतात हे अजून मला न उलगडलेले कोडे आहे!) मी शपथ घेतली : बस्स—

आजपासून राजकारण बंद. केवळ धर्मकारण. अजूनही गीतारहस्याची चार तरी पानं वाचल्याशिवाय मला झोपच येत नाही..."

माझ्या आत्मचरित्रात सगळ्यात मोठी अडचण 'माझे सांसारिक जीवन' ह्या प्रकरणाची आहे. कारण उभ्या बटाट्याच्या चाळीला आमचे सुख विदित आहे. तरीही तिचा मी 'माझी सुविद्य आणि मनमिळाऊ पत्नी' असा गृह्यसंस्कारी उल्लेख करायचे ठरविले आहे. "माझ्या सुखी जीवनाचे आणि यशाचे सारे श्रेय माझ्या सुविद्य पत्नीलाच आहे." (इथे तिचे नाव भागीरथी हे 'सुविद्य' ह्या विशेषणाला साजेसे नाही, ह्याची मला नम्र जाणीव आहे. म्हणून ते नाव गुलदस्तात ठेवून विशेषण आणि सामान्यनाम एवढ्यावरच भागवणार आहे.)

अपत्यांबद्दल लिहायची सोयच नाही! थोरली इंदी. तिच्या जन्माबद्दल लिहायचे म्हणजे तिचे खरे वय फुटायची भीती. गेली दहा वर्षे कुंडल्या बदलीत, एम० एस० एम० रेल्वेच्या इंडिकेटरवर जसे सदैव बारावर काटे ठेवलेले असतात, त्याप्रमाणे लग्नाच्या बाजारात चि० कु० इंदीच्या वयाचा काटा सदैव सोळावर थांबला आहे. बरे, इंदी सर्वांत थोरली सोळा वर्षांची समजायची, तर त्याखालील भावंडांच्या वयाला काट मारता मारता काही अपत्यांना वयच राहत नाही. अगर राहिल्यास बीजगणितातील 'क्ष'सारखे, मायनस दोन, अडीच असे राहते.

केवळ इंदीचे लग्न ठरण्याच्या अडचणीमुळे मी अपत्यांचे वात्सल्यमय प्रकरण 'माझ्या घरातली हसरी फुलबाग' असे घाऊक नाव देऊन तपशिलात न शिरता आवरणार आहे.

माझ्या आत्मचरित्रातले शेवटले प्रकरण मात्र आधी लिहून तयार आहे. महाराष्ट्रातल्या साऱ्या संतांनी इथे मला कायमचे ऋणी करून ठेवले आहे. ते प्रकरण इतके रसाळ झाले आहे की माझे आगामी आत्मचरित्र उर्दू पद्धतीने वाचायला सुरवात करणाऱ्याला, आपण विनोबा भावे, तुकडोजीमहाराज किंवा पांगारकर यांपैकी कोणाचे तरी चरित्र वाचणार आहोत असा भास व्हावा! हे प्रकरण लिहिताना मी ठायीठायी सद्गदित झालो आहे. आजवर मी संतवाणीचा आधार घेऊनच जगलो आहे. रविवारच्या पार्टीत कोणी 'लास' झाल्यास त्याच्या सहीने मी त्याची सिकनोट पोहोचवली आहे. 'एकमेकां करूं साहाय्य' तत्त्वाचा असा अवलंब कलियुगात कोणी केला आहे? चळवळीच्या सामर्थ्याला भगवंताचे अधिष्ठान हवे म्हणून बटाट्याच्या चाळीत मी गणेशोत्सव सुरू केला. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदूं ऐसे' असे तुकोबा म्हणतात. मी हॅमिल्टन-साहेबापुढे वितळलेल्या मेणाहून मऊ असे, तर हुसेन पट्टेवाल्याला मी जमदग्नी वाटायचा! हे माझे, हे परक्याचे, ही भावना तर कधीही न बाळगता, कुणाच्याही डब्यातील टिफिनवर दुपार काढायला मी संकोच केला नाही. माझ्या हातून घडलेल्या पापांचीही मी प्रांजळ कबुली ह्या प्रकरणात दिली आहे. डिमेलोच्या

डब्यातून चोरून खाल्लेले मटण, द्वारकानाथ गुप्त्याच्या (रॅली बदर्स) मुलीच्या लग्नात घरून नुसती 'चि० सौ० कां० कु० कुमुद ईस सप्रेम भेट—दशपुत्रे यांजकडून' एवढी चिठ्ठी पोस्टाच्या तिकिटासारखी एका बाजूला डिंक लावून नेली आणि कोणा बिचाऱ्याने दिलेल्या रेडिओ-सेटवर हळूच कशी चिकटवली आणि रिटायर होईपर्यंत द्वारकानाथ गुप्त्याला ओशाळा कसा करून ठेवला, ह्या साऱ्याचा कबुलीजबाब मी दिला आहे. ठाकुरद्वार ते बोरीबंदरचा दैनिक ट्रामचा प्रवास महिन्यातून एकदा काढलेले तिकीट अंगठीत घालून मी महिनाभर एका आण्यात कसा करीत आलो आहे, हेही मी लिहिले होते. परंतु आमच्या चाळीतला साऱ्यांचा अरविंद (यंदा दुसऱ्या एलेल्बीला दुसऱ्यांदा नापास झाला.) म्हणाला की, ट्रामकंपनी नुकसानभरपाईची फिर्याद करील. केवळ ह्या कायदेशीर अडचणीमुळे ते सत्य तेवढे मी दडपले. पण अन्यत्र वाक्यावाक्याला तुकाराम उभा आहे. परिच्छेदापरिच्छेदात ज्ञानदेव ओव्या घेऊन हजर आहेत. पानापानात समर्थ आहेत.

एकूण माझ्या आगामी आत्मचरित्रातील 'चरित्रनायकाचे बाळपण' हे पहिले, आणि 'चरित्रनायकाची योग्यता' हे शेवटले, अशी दोन प्रकरणे तयार आहेत. मधला मजकूर भरायचा आहे. तो कसाही भरला तरी चालेल ह्याची मला खात्री आहे. कारण अनेकांची चरित्रे मी चांगली जवळून पाहिली आहेत आणि त्यांनीच लिहिलेली आत्मचरित्रे वाचली आहेत. कबीर म्हणतो, 'जीवन हा मेळा आहे.' माझ्या आत्मचरित्रातील शेवटले वाक्य तर वैश्विक वाङ्मयात अमर होईल :

"जीवनाचा मेळा भाऊमहाराजाच्या बोळासारखा आहे. त्यात माणूस कुठूनही कुठेही शिरला तरी शेवटी व्यवहाराच्या मंडईत आपला गाळा कुठला हे हुडकीतच तो जागेवर येतो."



# ....भ्रमण-मंडळ

"साला ट्रॅव्हल—ट्रॅव्हल—यू मस्ट ट्रॅव्हल!"

सोकाजी त्रिलोकेकर भेळेचा पाचवा बकाणा भरता भरता चौपाटीवरच्या मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून म्हणाले.

"पण 'ट्रॅव्हल व्हेन यू मस्ट' असा बोर्ड आहे." कोचरेकरमास्तरांनी कुरमुऱ्यांतून डाळ शोधीत शंका काढली.

बटाट्याच्या चाळीत कोचरेकरमास्तरांचा सावध सज्जन म्हणून लौकिक आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी महिनाभर आधी छत्री घेऊन ते बाहेर पडतात आणि संपल्यानंतरदेखील महिनाभर जवळ बाळगतात. इतकेच नव्हे, तर थंडीच्या आधीच गळ्याला मफ्लर बांधून तो मार्चपर्यंत टिकवतात. म्युनिसिपालिटीच्या मराठी मुलींच्या शाळेतले जवळजवळ सगळे नंबर त्यांनी आलटूनपालटून शिकविले आहेत. तास वाजवणाऱ्या शिपायाच्या अगोदर शाळेत हजर राहणारा आणि इन्स्पेक्टर हा हारून अल-रशिदाचा शिक्षणखात्यात उपटलेला वारस आहे असे समजून रोज हजेरीपट भरणारा, नियमित दाढी करणारा आणि वर्गातल्या सगळ्या मुलांची नखे नीट कापली आहेत की नाहीत हे पाहणारा हा शिक्षणपेशाचा एकमेव जागरूक प्रतिनिधी आहे. रस्त्याच्या उजव्या बाजूने कधी चालला नाही. ट्राम-कंडक्टरची नजर वळली नाही तर टाळ्या वाजवून, हाका मारून, प्रसंगी आपल्या बाकावरून त्याच्या नाकापर्यंत जाऊन त्यांनी तिकीट घेतले आहे. त्यामुळे त्रिलोकेकरांनी प्रवास केलाच पाहिजे असे विधान केल्याबरोबर कोचरेकरमास्तरांनी सरकारी शंका काढली की रेल्वेचा प्रवास अगत्याचा असेल तरच करा असा कायदा आहे ना?

"साला ईडियट!" त्रिलोकेकर, हेडक्लार्क व साहेब यांच्या पाठीवर व इतर

कोणाच्याही तोंडावर 'साला ईडियट' म्हणतात. "ए कोचरेकरमास्तर, तू म्हणजे अन्नंगच आहेस. ट्रॅव्हल व्हेन यू मस्ट वार टाइममदी होतं. आता उलट गव्हमेंट इज साला एन्करेजिंग ट्रॅव्हल! बस्स! नाडकर्णी, आपल्याला ट्रॅव्हल केलाच पाहिजे."

"मग चला वेंगुर्ल्याला. दिवाळीत फीश काय येतं वेंगुर्ल्याला! काय समजलेत? माझ्या फादरइन्लॉची वाडी आहे वेंगुर्ल्याला—"

"अहो, वेंगुर्ल्याला काय आहे पाहण्यासारखं? कुठेतरी इतिहासप्रसिद्ध स्थळाला जाऊ—सिंहगड, लोहगड, पन्हाळा..."

बाबूकाकांनी भेळ खाण्याखेरीज इतर कोणत्याही कार्याला तोंड उघडायचे नाही असा केलेला निश्चय मोडला. बाबूकाका खरे बटाट्याच्या चाळीतले इतिहाससंशोधक! ते वर्तमानात वावरायला नाकबूल असतात. मुंबईत दोन मजल्यांच्या बसेस फिरायला लागल्या तरी घोड्याच्या ट्रामच्या काळात ते राहू इच्छितात.

"बस्स—खऱ्या, तूसुद्धा ईडियटच आहेस! आता सालं हिस्ट्रीत आम्हांला काय इंटरेस्ट?"—त्रिलोकेकर.

"नाही, पण—इतिहास हा भावी पिढीला मार्गदर्शन करतो." कोचरेकरमास्तरांच्यातला गुरुजी जागा झाला आणि तिसरीच्या 'सुबोध पेशवाई' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतले वाक्य त्यांनी म्हणून टाकले.

"ऑल राइट! कुठंही चला—पण वी मस्ट साला ट्रॅव्हल! आपलं काय सालं लाइफ आहे? सकाळी उठायचं ते ऑफिस नि मग घर. घर आणि ऑफिस—आपण पण साले ईडियटच होऊन गेलो!"

चौपाटीवरच्या त्या चर्चेतून बटाट्याच्या चाळीतल्या भ्रमणमंडळाची स्थापना झाली. सुरुवातीला बऱ्याच मंडळींनी उत्साह दाखवला. प्रथम काश्मिरला जायची कल्पना निघाली. तिथून दिल्ली–आग्रा–मथुरा–रामेश्वर–द्वारका—असाही पर्याय निघाला. आणि शेवटी स्थळांच्या यादीप्रमाणे भ्रमणमंडळाची सभासदसंख्या घटत घटत त्रिलोकेकरशेट, कोचरेकरमास्तर, काशीनाथ नाडकर्णी आणि बाबूकाका खरे हे चारच सभासद शिल्लक राहिले आणि मंडळाचा पहिला कार्यक्रम म्हणून पुण्याला जायचे ठरले. कोचरेकरमास्तरांना दिवाळीची सुटी लागत होती आणि त्रिलोकेकर, नाडकर्णी आणि बाबूकाका यांच्या चार-चार दिवसांच्या रजा सुदैवाने मंजूर झाल्या.

ह्यांपैकी प्रवासाचा अनुभव कोणालाच फारसा नव्हता. त्रिलोकेकरशेट झावबाच्या वाडीतून खेतवाडीत राहायला गेले हा पहिला प्रवास. एकदा चेण्याला ब्रदरइन्लॉच्या कझिनच्या बंगल्यावर वीकएंड ट्रिपला गेले हा दुसरा प्रवास. सांस्कृतिक सप्ताहात बोरिवलीला झाडे आणायला गेले तो तिसरा प्रवास, आणि दसऱ्याला महालक्ष्मीच्या देवळात जायचे हा चौथा प्रवास! नाही तर रोजचा ऑफिसचा प्रवास हाच खरा! कोचरेकरमास्तर मात्र मुलांच्या सहलींसाठी कान्हेरी लेणी, आरे दुग्धकेंद्र, जुहू आणि वसईचा किल्ला येथपर्यंत जाऊन आले होते. बाबूकाका खरे जरी प्रत्यक्ष प्रवासात गेले

नाहीत तरी कागदोपत्री त्यांना प्रवासाचा खूप अनुभव होता. भरतपूरच्या किल्ल्याला चिखल किती लागला येथपासून पन्हाळ्याच्या पावनखिंडीच्या लांबीरुंदीपर्यंत त्यांना इत्थंभूत माहिती आहे असा चाळीत गवगवा होता.

त्रिलोकेकर, बाबूकाका आणि कोचरेकरगुरुजी यांच्यापेक्षा काशीनाथ नाडकर्ण्यांना जरा अधिक माहिती होती. कारण ते दरवर्षी नेमाने कोकणात जात असत. परंतु समुद्रमार्गाची त्यांना सवय!

"मी—काय समजलेत?—वरच्या वाटेनी कधी चुकून येत नाही..."

"वरच्या वाटेनं म्हणजे?" कोचरेकरगुरुजींची विद्यार्थीवृत्ती अजून टिकून आहे.

"अहो, म्हणजे घाटावरून—बेळगाव-कोल्हापूरच्या वाटेनी. बोटी बंद झाल्या की तिकडसून यावं लागतं. काय समजलेत? पण घाटी हमाल म्हणजे एक नंबरचे डांबीस—मी एकदा आलो होतो कोल्हापूरवरून. नुसता फणस गाडीत चढवायचे आठ आणे मागितले हमालानी. मी म्हटलं, शोभत नाय तुला. अहो, दारचा फणस माझ्या! फुकटात आणलेला. त्याची हमाली मी आठ आणे देऊ? म्हटलं, कापीन आणि वाटीन सगळ्यांना हितल्या हितं—काय समजलेत? कोकणात असली ड्याम-फुलगिरी करणार नाय आमचा हमाल. पडावापर्यंत बोजे एक आण्यात चढवणार आणि हा म्हणतो प्लाटफार्मापर्यंत आणे किती? आठ! आणि गाडीत चढवायचे वर चार आणे! मेल्या मर म्हटलं मी. हो—स्वत्ता डोक्यावर घेतला फणस आणि चढलो गाडीत. अहो, दारचा फणस माझ्या. हमाली का म्हणून देईन?"

"बरोबर आहे—" बाबूकाका खऱ्यांना काशीनाथ नाडकर्ण्यांचा युक्तिवाद शंभर टक्के पटला. "प्रवासात मात्र हमालांपासून सावध राहिलं पाहिजे."

"आणि खिसेकापूंपासून!" अर्थात हे वाक्य कोचरेकरमास्तरांखेरीज इतरांना सुचणे शक्य नव्हते. "नाही, म्हणजे रेल्वेच्या डब्यात ठिकठिकाणी लिहिलेलं असतं. आणि कारणाशिवाय साखळी ओढली तर पन्नास रुपये दंड होतो."

"पण मास्तर, साखळी ओढायला जाईल कोण कशाला? तुम्ही फारच भित्रे बुवा!"—काशीनाथ नाडकर्णी.

"नाही—पण असं असतं डब्यात लिहिलेलं. आणि आगगाडीतून हातही बाहेर काढायचा नसतो. रेल्वे जिम्मेदारी घेत नाही हात मोडला तर." कोचरेकरगुरुजी धोक्याच्या सूचना देऊ लागले.

"त्याचं काही विशेष नाही. डब्यातून आपण कशाला हात काढणार? काय हो त्रिलोकेकरशेट?"—काशीनाथ नाडकर्णी.

"साला ईडियटच आहेस तू कोचऱ्या! कदी आपल्याला प्लॅटफॉर्मवरून काय लोणावळ्याला चिक्की, कर्जतला चिवडाबिवडा घेण्याचं काम लागलं, तर खिडकीतून हात बाहेर काढायचा—"

"पण बाकी खिडकीतून हात बाहेर काढणं डेंजरसच हां—माझे काका..."

बाबूकाका खऱ्यांनी आपल्या काकांच्या हातावर आगगाडीतली खिडकी एकोणिसशे दोनच्या डिसेंबर महिन्यात पडल्याची हकीकत सांगितली. "सुदैवानं हात बचावला—आणि खिडकी मोडली—म्हणून बरं. काका म्हणजे पहिलवान गडी आमचा. अहो, कृष्णाकाठचं पाणी ते! दिल्ली दरवाजा पडला असता तर बोट मोडलं नसतं त्यांचं! ते काय आगगाडीच्या खिडकीला भीक घालताहेत?"

काही वेळ थांबून बाबूकाकांच्या काकांचा इतिहास मंडळींना ऐकावा लागला.

बटाट्याच्या चाळीच्या भ्रमणमंडळाचे हे चार सभासद ज्या दिवशी पुण्याच्या प्रवासाला निघाले तो दिवस सोन्याच्या अक्षरांत लिहिणे महागात लागले असते तरी कसल्या तरी अक्षरांत लिहिणे अत्यावश्यक होते. ह्या दिवसासाठी गेले दोन महिने अट्टाहास केला होता. त्रिलोकेकरशेटचा उत्साह तर पँटवरच्या पट्ट्याला न जुमानणाऱ्या त्यांच्या वंशपरंपरागत पोटासारखा ओसंडत होता. त्या नादात त्यांनी बाबलीबायखेरीज सर्वांना ईडियट म्हणून घेतले होते. काशीनाथ नाडकर्णी आणि त्रिलोकेकर यांनी हॅट्स घातल्या होत्या. त्रिलोकेकरांची फेल्ट हॅट होती. स्टाफच्या क्रिकेट मॅचला ते वर्षातून एकदा ती हॅट घालतात. काशीनाथ नाडकर्ण्यांनी नवी हॅट घेतली होती आणि तिचा पट्टा हनुवटीवरून ओढला होता. पँटच्या पट्ट्याला त्यांनी—कुणी त्यांना सांगितले कोण जाणे—पण चाकू लावला होता. बाबूकाका खरे मात्र नेहरूशर्ट, जाकीट आणि गळ्यात दोन्ही बाजूंना पिशव्या लटकावून उभे होते. त्यांनी डोक्याला काळी गोल टोपी घालून ट्रॅम-कंडक्टरच्या कपाळावर येणाऱ्या दिव्याच्या शेडसारखे पोस्टकार्ड त्या टोपीत खुपसून गंमत आणली होती. आणि कोचरेकरमास्तर...

...खाकी अर्ध्याहून कमी तुमान—तिला जिथेजिथे म्हणून खिसे करणे शक्य आहे तिथेतिथे खिसे—प्रत्येक खिशात काही ना काही तरी कोंबलेले; कंबरेच्या पट्ट्याला शिटी, दोरी, चाकू; उजव्या खिशात चमचे, डाव्या खिशात ब्याटरी; खाकी शर्टच्या उजव्या खिशात डायरी, सातआठ पेन्सिली आणि लिंबू, मागल्या खिशात पत्त्यांचा क्याट; गळयात पाण्याची पिशवी; दुसऱ्या खांद्यावरून बॉक्स क्यामेऱ्याचा पट्टा; पाठीवरच्या हॅवरसॅकमध्ये सतरंजी; हातात वळकटी; पायात ब्राऊन कॅनवासचे बूट, पोटरीवर ट्रॅफिक-पोलीस बांधतात तशा पट्ट्या; गळ्यात मफलर, आणि लाठीला पुरीभाजीचा डबा बांधून 'या जाण्यासी परत न येणे—' असा चेहरा करून उभे राहून "छत्री घ्यायची राह्यली!" म्हणून कुरकुरत होते. वडील बंधूंची मेसापोटेमियाच्या लढाईत मिळालेली हॅट त्यांच्या डोक्यालाच काय पण जवळजवळ हनुवटीपर्यंतच्या पुऱ्या चेहऱ्याला बसत होती. हे झाले जंगम सदरात मोडणारे सामान. त्याशिवाय ट्रंका, वळकट्या, काशीनाथ नाडकर्ण्यांचा पेटारा, वगैरे स्थावर मालमत्ता होतीच.

काशीनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने व्हिक्टोरिया आणली. त्यात प्रथम कशा रीतीने सामान चढवता येईल याचा सार्वजनिक विचार झाला.

"आधी ट्रंका न् पेटारे चढवा."—एक सूचना.

"छे, आधी तुम्ही बसून घ्या."—दुसरी सूचना.

"असं करा. आधी कोचरेकरमास्तर, तुम्ही चढा—"

"नको, त्रिलोकेकरशेट, तुम्ही चढा टिफिन-कॅरियर घेऊन—"

"त्यापेक्षा बाबूकाकांना बसू द्या—"

"बाबूकाका, गळ्यातली पिशवी काढा—"

"नाडकर्णी, हॅटचा पट्टा घट्ट करा—"

"कोचरेकरमास्तर, पाण्याची पिशवी गळते तुमची—"

अशा काही प्रामाणिक सूचनांचा तडाखा चालू असताना गॅलरीतून "अगबाई! कोचरेकरमास्तर का ते? मला वाटलं, समोरच्या चाळीतला गुरखाच आहे—" "त्रिलोकेकरीण बघ कशी पुढं पुढं करतेय!"—असले उद्गार काढण्याचे कार्य भगिनींनी स्वीकारले होते. आणि एकूण हा काहीतरी नकलांचा कार्यक्रम चाललाय अशा आनंदाने मुले खिदळत होती. शेवटी सामान आणि त्यामागून प्रवासी मंडळी चढली. कोचरेकरगुरुजींना व्हिक्टोरियावाल्याने आपल्या शेजारी घेतले. वर चढताना त्यांची अर्धी विजार दिव्यात अडकून एकदोन मिनिटे खोटी झाली. परंतु ह्या सर्व गडबडीत उत्साह होता. व्हिक्टोरियावाल्याने चाबूक हाणला तो प्रथम त्रिलोकेकरांना शेकहँड करायला आलेल्या त्यांच्या ब्रदरइन्लॉच्या कानसुलाशी सलगी करून नंतर घोड्याच्या पाठीवर बसला. एक जोरदार गचका बसला—सर्व मंडळी व्हिक्टोरियात सामानासकट चपखल बसली.

कोचरेकरमास्तरांनी वर बसल्यावर डायरी काढून 'निघण्याची वेळ : तीन वाजून दोन मिनिटांनी' असे त्यात टिपले. व्हिक्टोरिया चारी अंगांनी डगडगत होती. त्यामुळे एवढी चार अक्षरे टिपण्यात त्यांची एक पेन्सिल खर्ची पडली. रस्त्यातल्या खड्ड्याने नेमका असा धक्का दिला की, हातातली पेन्सिल उडाली. आता घोडाही रंगात आला होता, त्यामुळे गाडी थांबवून पेन्सिल शोधणे शक्य नव्हते.

गाडीच्या वाढत्या वेगाबरोबर 'प्रवासीपणाचे स्पिरीट' कोचरेकरगुरुजींच्या अंगात खेळू लागले. 'ज्ञानसंपादन हे प्रवासाचे मुख्य ध्येय' हे वाक्य चौथीच्या धड्यात त्यांनी अनेक वेळा शिकवले होते. त्यांनी व्हिक्टोरियावाल्याशी आपला सुखसंवाद सुरू केला.

"केव्हापासून व्हिक्टोरिया चालवता आपण?"

"अबे हाट!" व्हिक्टोरियावाला गरजला. ह्या अनपेक्षित उत्तरामुळे कोचरेकरमास्तरही दचकले. परंतु दुसऱ्याच क्षणी हे उद्गार समोरच्या नाठाळ हातगाडीवाल्याला उद्देशून होते हे त्यांच्या ध्यानात येऊन त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

"रस्त्यातून चालावं कसं ही साधी गोष्ट कळत नाही आपल्या पादचाऱ्यांना." व्हिक्टोरियावाल्याची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करीत कोचरेकरमास्तर म्हणाले. इतक्या उंच जागेवर बसण्याचा त्यांच्या आयुष्यात हा पहिलाच प्रसंग होता.

मागल्या बाजूला सामानाच्या ढिगात त्यांच्या सहकारी प्रवासी बंधूंचे केवळ सामानाला टेकू देऊन राहणे एवढेच प्रयत्न चालू होते.

कोचरेकरमास्तरांनी पुन्हा एकदा ज्ञानसंपादनाचा प्रयत्न केला,

"घोड्याचे भाव काय आहेत हो हल्ली?"

"एऽएऽऽ—पगडीवाला—"

'व्हिक्टोरिया चालवायला मनाची अत्यंत एकाग्रता लागते' हे वाक्य अखेर कोचरेकरमास्तरांनी आपल्या मनात नोंदवले.

अर्धाएक तास ढचमळत चारी प्रवासी आणि त्यांचे सामान बोरीबंदर स्टेशनाच्या समोर येऊन थबकले. आणि लाल डगलेवाल्या हमालांनी सोने लुटल्यासारखे सामान बाहेर काढायला सुरुवात केली. त्यात एकाने पेटाऱ्याबरोबर बाबूकाकांनाही बाहेर ओढून काढले.

"साले ईडियट!" त्रिलोकेकरशेट हमालांच्या अंगावर चाळीसएक वेळा खेकसले. मधल्या हिंदकळ्यांत बाबलीबायनी करून दिलेला 'गोडी बटाटी'चा रस्सा त्यांच्या पँटवर आणि बाबूकाकांच्या धोतरावर सांडला होता. एका हमालाने तेवढ्यात टिफीन कॅरियर खसकन ओढला आणि उरलेला रस्सा, उकडलेली अंडी, पुलाव आणि टोमॅटो खाऊन रस्ता तृप्त झाला.

"साले ईडियट—" मुंडी कापलेल्या कोंबडीसारखे त्रिलोकेकरांनी थैमान सुरू केले. तेवढ्यात प्रवासी मंडळीचे खजिनदार बाबूकाका खरे यांना व्हिक्टोरियावाल्या-कडे दहा रुपये सुटे नसल्याचे शुभवर्तमान कळले.

"तरी तुला मी सांगत होतो चेंज घे म्हणून—साला ईडियट! ट्रॅव्हलमदी चेंज पाहिजे. थांब...माझ्या पॉकेटमदी—हे बघ, वन ट्वेल्व्ह आहेत. नाडकर्णी, तुझ्याकडे किती हायत?"

काशीनाथ नाडकर्ण्यांनी पँटच्या पट्ट्याची ओढाताण करून आत खोचलेला सदरा बाहेर काढला. मग सदरा वर करून आतल्या बनियनच्या चोरखिशातून आठ-आठ आण्यांची चार नाणी काढून दोन रुपये जमवले. कोचरेकरमास्तरांनी आपली मेसापोटेमिया हॅट उलटी करून आतल्या चामड्याच्या पट्टीत दडवलेल्या एक रुपयाच्या नोटा काढल्या.

"किती पैशे देयाचे त्याला?"—त्रिलोकेकर.

"चार रुपये बारा आणे—"

"बाबूकाका, दे ना तुझी नोट—सिली साला!"

सुट्या पैशांची जमवाजमव चालू असताना प्रवासी मंडळींची मजा पाहायला दहा-पाच माणसेही जमली होती. शेवटी चार रुपये बारा आणे व्हिक्टोरियावाल्याच्या हातात टिकवले.

"चार रुपये आठच आणे ठरले होते साहेब—" व्हिक्टोरियावाला म्हणाला

आणि आपल्या प्रवासाला हा सत्ययुगातला व्हिक्टोरियावाला कुठून लाभला ह्या आश्चर्याने आणि आनंदाने त्रिलोकेकर वंडरस्ट्रक झाले, बाबूकाका थक्क झाले, काशीनाथ नाडकर्ण्यांची तो "मालवणचा असला पाहिजे—घाटावरचा नक्कीच नाय—काय समजलेत—" ही खात्री झाली, आणि कोचरेकरगुरुजींना तर गहिवर आला.

"पाह्यलंत ? प्रवासात कसे नवे अनुभव येतात ! अहो, माणुसकी नाही म्हणतात ना, ही घ्या माणुसकी. चार आण्यांसाठी खोटं नाही बोलला तो. खरंच, त्याचं नाव आणि नंबर टिपून घ्यायला हवा होता. असल्या सज्जन आणि प्रामाणिक माणसाचं जाहीर कौतुक व्हायला पाहिजे." भरल्या अंतःकरणाने गुरुजी म्हणाले.

"चला, सामान—सामान—कुठं—" काशीनाथ नाडकर्णी ओरडले. सुट्या पैशांची सोय होईपर्यंत हमाल सामान घेऊन बेपत्ता झाले होते. शेवटी पंधरावीस मिनिटांच्या शोधानंतर हमाल सापडले. हमाल शोधायला काशीनाथ नाडकर्ण्यांचा पेटारा उपयोगी पडला. असला पेटारा त्यापूर्वी इतरांनी सोडाच, पण हमालांनीही पाहिला नव्हता. पूर्वी जादूगार आपल्या हंडीबागाला झोपवायला असला पेटारा वापरीत. आग्र्याहून शिवाजीम्हाराज पळाले ते असल्याच बुरडी पेटाऱ्यातून, असे बाबूकाकांचे मत होते. हमाल सापडल्याच्या आनंदात मंडळी पुढे निघाली आणि—

"घात झाला..." असे म्हणून बाबूकाका मटकन तिकिट-कलेक्टरच्या दारातच खाली बसले.

"अरे, काय झालं ? ईडियट साला ! तिकिटी विसरला काय साला ? दोन तास क्यूमदी उभा राहून रिझर्व केल्या तिकिटी..."

"दोन नाही—अडीच तास उभा होतो मी रांगेत." कोचरेकरमास्तरांचा धीरच सुटला होता. अजून ते प्लॅटफॉर्ममध्ये शिरलेही नव्हते. पण कसलाही युनिफॉर्म घातलेल्या कोणत्याही इसमाला पाहिले की कोचरेकरमास्तरांची छाती धडधडायला लागते.

"अहो, तिकिटं नाहीत. तिकिटं ही आहेत—" बाबूकाकांचा चेहरा अगदी दीन पतित अन्यायी झाला होता.

"तिकिटी आहेत, तर मग घात कसला झाला ?" त्रिलोकेकर.

"व्हिक्टोरिया—"

"व्हिक्टोरिया ? सामान विसरला ?"

"छे हो. दहा रुपयांची नोट त्याला दिली होती. तो सुटे नाही म्हणाला—पण नोट त्याच्याजवळ राहिली. वर त्याला साडेचार रुपये मोजले—"

"म्हणजे साडेचौदा रुपयाला व्हिक्टोरिया पडली. साला ईडियट...पण तू नोट परत कशी नाय घेतली ?"

"त्याच्याकडून चार आणे परत घेतले, त्यात नोट घ्यायचं राहिलं."

"बघ बघ—साला नाडकर्णी, हे तुमचे कोकणातले लोक..."

"तो कोकणचा असणंच शक्य नाही, काय समजलेत? अहो, कोकणात घोडागाडी चालवायला शिकणार कुठं तो? आमच्या कोकणात सगळे बैऽऽल! तिकडे म्हणजे धमण्या—"

"मिस्टर, बाजूला व्हा—" तिकिट-कलेक्टर गरजला. ह्या गडबडीत पुन्हा एकदा हमाल हरवले आणि प्रवासी मंडळींनी काशीनाथ नाडकर्ण्यांच्या पेटाऱ्यामुळे पुन्हा त्यांना शोधून काढले.

"ए—वाटेल तिथं सामान नको टाकू. रिझर्वेशन आहे आमचं—हा बघ—"

"पण हा सेकंड क्लास नाही ना? नीट बघा."—कोचरेकरगुरुजी!

"पण दहा रुपये तुम्ही व्हिक्टोरियावाल्याला दिलेत ते विसरलात कसे तुम्ही?" —मागल्या आघाडीवर काशीनाथ नाडकर्ण्यांचा आणि बाबूकाकांचा संवाद.

"अहो, हे पाहा—" धोतर दाखवीत बाबूकाका म्हणाले.

"रस्सा सांडलाय तो—त्याचा दहा रुपयांशी काय संबंध?"

"अहो—निम्मा रस्सा माझ्या धोतरात गेलाय. केव्हा एकदा धोतर बदलतो असं झालंय मला. सुचत नाही आहे काही. काय मिरच्या घालतात हे लोक रश्शात—"

"म्हणजे हळूच चाटलाबिटलात की काय तुम्ही?"

"अहो, चाटता काय? झोंबतोय ना मांडीला—"

आता मात्र बाबूकाकांचा चेहरा केविलवाणेपणाची शीव सोडून रडकुंडीच्या राज्यात शिरला होता. आघाडीला कोचरेकरमास्तर आणि त्रिलोकेकर रिझर्व थर्ड क्लासची पाहणी करीत होते. प्लॅटफॉर्मवर शुकशुकाट होता. निळ्या कपड्यांतले पोर्टर प्रत्येक डब्याखाली हातोडी मारून काहीतरी तपाशीत होते. बाकांवर काही मंडळी झोपली होती. एका प्रवासी कुटुंबाने चांगली पंधरा जणांची गोल पंगत घातली होती. भिकारी मंडळीचादेखील आत येण्याचा टाईम झाला नव्हता. गाडीला तब्बल दोन तास अवकाश होता. कुठल्या तरी गाडीच्या शंटिंगची शिटी झाली तरी कोचरेकरमास्तर आपल्याच गाडीची शिटी झाल्यासारखे दचकायचे आणि इतरांना घाई करायचे. शेवटी एक थर्डक्लासचा रिझर्व्हड डबा सापडला. बाबूकाकांनी रिझर्वेशनची तिकिटे काढली. आता प्रश्न होता सीट नंबर कुठला हा! कारण तिकिटांवर अनेक नंबर होते. शेवटी हमालांनी नंबर शोधून दिले. प्रत्येकाने आपापले तिकीट घेऊन जपून ठेवले. कोचरेकरमास्तर दर तीन मिनिटांनी तिकीट तपासत होते. पेटारे, ट्रंका वगैरे वस्तूंची मोजदाद झाली. एकूण चौघांत मिळून अंगावर वागवण्याच्या आणि हमालांवर सोपवण्याच्या वस्तू मिळून एकोणीस डाग झाले. हे डाग एकोणीस आहेत यावर एकमत नव्हते. कारण त्रिलोकेकरशेटनी मोजले त्या वेळी ते बावीस भरले. बाबूकाकांनी मोजले त्या वेळी साडेचौदा भरले. परंतु हा आकडा व्हिक्टोरियावाल्याला गेलेल्या पैशाचा जो परिणाम त्यांच्या डोक्यात घर करून बसला होता त्यामुळे आला होता. कारण कोचरेकरमास्तरांची अर्धी पॅंट सोडली तर अर्धी अशी दुसरी कोणतीच वस्तू

त्या सगळ्या सामानात नव्हती. काशीनाथ नाडकर्ण्यांच्या गिनतीत तर एकतीस वस्तू भरल्या—परंतु त्यांत त्यांनी हॅट्स (नाडकर्ण्यांच्या भाषेत 'ह्याटी'), कमरेचे कातडी पट्टे, घड्याळे, वगैरे 'परचूटण' वस्तूही मोजल्या होत्या. शेवटी त्रिलोकेकरशेटनी सर्वांना गप्प राहायला सांगून डाग मोजले ते 'ट्वेंटीसेवन' निघाले आणि पुन्हा घोटाळा झाला. मग मात्र कोचरेकरमास्तर खिशातून खडू काढून पुढे सरसावले.

"खिशात खडू कशाला घेतला कोचरेकर?"

"अहो, इतिहासप्रसिद्ध स्थळं पाहणार आपण, तिथं आपली नावं लिहायला म्हणून घेतला—" असे म्हणून खडूने प्रत्येक वस्तूवर आकडे घालून शेवटी एकोणीस डाग आहेत हे सर्वानुमते ठरले.

डब्यात शुकशुकाट होता.

"साली ट्रॅव्हलची हॅबिटच नाय आमच्या देशात—" त्रिलोकेकर डोक्यावरची हॅट काढून वरच्या फळीवर ठेवीत म्हणाले.

"आरामात जाऊ. पण आज गर्दी कशी नाय?" काशीनाथ नाडकर्ण्यांनी शंका काढली.

"थांबा—" अनेक खिशांपैकी एका खिशात हात घालून पंचांग काढीत कोचरेकर-मास्तर उद्‌गारले.

"पंचांगही घेतलंय बरोबर? अहो, पुण्यात काय मुलगी बघायला चाललो आहोत आपण—" काशीनाथ नाडकर्ण्यांनी बंडलातून 'लाल धागा' काढून पेटवली.

"असं नाही. पण मला असते संकष्टी. चंद्रोदय झाल्याशिवाय जेवण नाही करता येत. तेव्हा चंद्रोदय बघायला पंचांग घेतलं." कोचरेकरांनी पंचांग का आणले याचे कारण सांगितले. "आज आहे अमावास्या—"

"अमावास्या!" बाबूकाका खिडकी वर करण्याचा प्रयत्न थांबवून ओरडले.

"हो, अमावास्या आज चार वाजेपर्यंत आहे. सव्वाचार वाजता प्रतिपदा सुरू होते. आपली गाडी सुटते पाच पस्तीसला. म्हणजे अमावास्या संपलेली असते त्या वेळी."

"पण घराहून निघालो तो मुहूर्त धरायचा की गाडी सुटण्याचा?" बाबूकाकांनी मौलिक शंका काढली.

"मी गाडी सुटण्याचा धरला. अमावास्येची बाधा नाही."

"काय बाधा नाही? दहा रुपयाला फटका बसला विक्टोरियाचा." त्रिलोकेकर गरजले.

पुन्हा व्हिक्टोरियाचा विषय निघाल्यामुळे बाबूकाका खरे जरा अस्वस्थ झाले. तेवढ्यात कोचरेकरमास्तर आपल्या जागेवरून उठून जाऊ लागले.

"तुम्ही कुठे निघालेत?" काशीनाथ नाडकर्ण्यांनी विचारले.

"नाही—डब्यात अजून कोणीच आलं नाही—कदाचित फर्स्ट-क्लासचा डबा असायचा. बाहेर पुन्हा एकदा बघून येतो थर्ड-क्लासच आहे की नाही ते—"

"त्याला बाहेर कशाला जातोस? ईडियट साला! ह्या असल्या ब्राका असतात काय फर्स्ट-क्लासला? साला तुझा ग्रांडफादर बसला होता का कदी फर्स्टमदी?"

"तसं नाही, पण आता पाच वाजून गेले. अजून डब्यात कसं नाही कोणी येत?" कोचरेकरांनी शंका काढली.

"अहो, आज अमावास्या आहे ना?—आज मुद्दाम कोण निघेल प्रवासाला? आपणदेखील आज निघता नये होतं." काशीनाथ नाडकर्णी कुरकुरले.

"हॅट! आपला फेथ नाय असल्या गोष्टीवर." त्रिलोकेकर म्हणाले, "अरे, इंग्लिश लोक तर गटारी आमोशेलासुद्धा ट्रॅव्हल करतात. आमचा इंगल्टन सायब होता—जनरल मॅनेजर—तो इंग्लंडला गेला तर साला सर्वपित्री आमोशेच्या दिवशी. कायसुद्धा झालं नाय त्याला. आपल्याच देशात एकदम कंट्री लोक साले."

इतक्यात काशीनाथ नाडकर्णी पेटारा शोधू लागले.

"ते सामान कशाला हलवता काशीनाथशेट—पुन्हा हमाल नाय येणार ते नीट ठेवायला. अरे, पण साला त्या हमाल लोकांनी पैसे नाय घेतले आपल्याकडून. विसरले वाटतं?"

"बोलू नका. अहो, जगात देव आहे. आपली दहा रुपये नुकसानी झाली होती ना, हे तीन रुपये भरून निघाले—" हे वाक्य संपेपर्यंत "शेठ, आमचे पैसे देऊन टाका ना—" हे वाक्य सर्वांच्या कानांवर पडले. "अगदी शंभर वर्षं आयुष्य आहे मेल्यांना."

"किती पैसे?" बाबूकाका, ट्रेझरर, भ्रमणमंडळ, बटाट्याची चाळ, यांनी ऑफिशियल कॅपॅसिटीत हमालांना प्रश्न टाकला.

"आता समजून द्या ना साहेब—"

"इतका वेळ कुठं नाहीसे झाला होता रे? आणि गाडी सुटली असती तर?"

"गाडी कशी सुटेल? अजून दोन तास टायम हाय!"

"दोन तास?" कोचरेकरमास्तर आश्चर्याने स्वतःच्या खिशातून घड्याळ काढीत म्हणाले. घड्याळात पाच वाजून पंचवीस मिनिटे झाली होती. त्यांनी आपल्या घड्याळाला पुन्हा किल्ली दिली. त्रिलोकेकरांच्याही घड्याळात जवळजवळ तितकेच वाजले होते. काशीनाथ नाडकर्ण्यांचे घड्याळ एक तास मागे होते आणि बाबूकाकांचे ट्रंकेत राहिले होते. त्यांच्या कुटुंबाने प्रवासात घड्याळ हाताला बांधू नका, ट्रंकेत ठेवा नीट, म्हणून बजावले होते.

"पाच पस्तीसला सुटते ना गाडी?"

"ती ही नाय साहेब—ती दहा नंबरची—सत्रा डाउन!"

"सत्रा डाउन?"

"हां, पुना म्येल. ही तर कलकत्ता हाय. हिचा डिपाचर आठला हाय."

आता मात्र भ्रमणमंडळाचा धीर सुटला. त्रिलोकेकर संतापाने थरथरू लागले.

कोचरेकरमास्तरांनी फक्त हंबरडा फोडायचा शिल्लक ठेवला आणि बाबूकाका सर्व शक्ती एकवटून ओरडले,

"मग ड्यांबीस! ह्या गाडीत का सामान ठेवलं आमचं?"

"आता आमाला का ठावकी तुमाला कंच्या गाडीला जायचं त्ये? हमाली द्या साहेब—"

"आधी हे सामान उचलून पुण्याच्या गाडीत टाका."

"त्याची वायली हमाली बसल शेट—"

"का म्हणून? देणार नाही. साले ईडियट!"

"म राह्यलं! ह्या हमालीचे पैसे द्या." चारी हमाल कोरसात ओरडले.

"पण मग हे सामान तिथं नेऊन कोण ठेवील?"

"आम्ही ठेवतो की. पण तीन रुपये द्या आन त्या गाडीत ठेवायचे तीन रुपये द्या. पाच मिनिटांत पूना म्येल सुटल साहेब—"

"मी स्टेशनमास्तराकडे कंप्लेंट करीन."

"ती गाडी चुकल साहेब तुमची. सहा रुपये टाका. चला चटाचटा. तीबी गाडी हुकल."

"सहा रुपये?" कोचरेकरांच्या तोंडाला सचैल स्नान केल्याइतका घाम फुटला होता.

"तीन रुपये पैले, आन त्या गाडीत ठेवायचे तीन—साहेब, पयली घंटा झाली."

"ही शुद्ध लुटालूट आहे!" याहून अधिक संतापदर्शक शब्दांचा कोचरेकर-मास्तरांजवळ संग्रहच नव्हता. शेवटी होय-नाही करता करता पाच रुपयांवर सौदा तुटला. हमालांनी पाचाची नोट आधी घेतली आणि सामानाला हात घातला.

"बाबूकाका, पाचाची नोट दिली ना? नाही तर द्या पुन्हा धा रुपये—साली लाठी कशाला आणली रे कोचऱ्या?—धा वेळा कपाळात बसली माज्या. ईडियट साला!"

आता गाडीला फक्त तीन मिनिटांचा अवकाश होता. गाडीत शिरायला तसूभर जागा नव्हती. तेवढ्यात काशीनाथ नाडकर्ण्यांचा पेटारा इंजिनापासून गार्डाच्या डब्यापर्यंत हमालांनी चार वेळा नाचवला. त्यांच्या मागून त्रिलोकेकरशेट टिफिन-कॅरियर आणि छोटी बॅग घेऊन, बाबूकाका पिशव्या सांभाळीत, काशीनाथ नाडकर्णी स्वतःला सावरीत आणि कोचरेकरमास्तर पायाच्या पट्ट्या सुटलेल्या अवस्थेत लाठीवर असंख्य जिनसा टांगून धावत होते. शेवटी महत्प्रयासाने सामान आणि भ्रमणमंडळाचे सन्माननीय सभासद एका डब्यात शिरले. गर्दीचा वाढता जोर होता. त्यामुळे कोचरेकरमास्तर आणि त्रिलोकेकर हे एकमेकांच्या पाठीला पाठ लावून उभे आहेत हे दोघांच्याही ध्यानात आले नाही, आणि दोघांनाही आपल्यांतला कुणीतरी एक बोरीबंदरावर राहिला असे पारसिकच्या बोगद्यातून गाडी बाहेर पडेपर्यंत वाटत होते.

अधूनमधून काशीनाथ नाडकर्ण्यांचा एखादा अवयव दिसे. त्याच्या अस्सल तेलिया वर्णावरून हा हात अगर ही मान काशीनाथ नाडकर्ण्यांचीच असा बाकीचे अंदाज बांधीत. बाबूकाका एक पठाण आणि एक मारवाडी यांच्या कात्रीत सापडले होते. पारसिकचा बोगदा गेल्यावर अंधारात काय गफलत झाली कोण जाणे, परंतु मंडळींना थोडेथोडे सरकायला मिळाले. सोकाजी त्रिलोकेकर आणि कोचरेकरमास्तर अगदी नाकाला नाक लावून भिडले आणि बाबूकाकांना आपला उजवा पाय जरासा हलवता आला.

"बाबूकाका, ही अमवास्या तुमची—ईडियट साला!"

"पण आपली ह्या गाडीत रिझर्व्ड जागा आहे—"

"पण कुठं!"

"आता त्या डब्यापर्यंत पोचणार कसे?"

"म्हणजे कोकणात चांगला चौसोपी वाडा असून बटाट्याच्या चाळीत राहल्या-सारखं आहे—काय समजलेत?"—काशीनाथ नाडकर्णी.

"पुणं केव्हा येणार?"—कोचरेकरमास्तर.

"अहो, आता ठाणं गेलं. एवढ्यात पुणं कुठलं?"

काही वेळाने कल्याण आले. बाबूकाकांना कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची आठवण झाली. सोकाजी त्रिलोकेकरांनी कुठलासा डोंगर दाखवून तिथे हाजी मलंगाची समाधी असल्याचा वृत्तांत सांगितला. काशीनाथ नाडकर्ण्यांना केव्हापासून तहान लागली होती. त्यांच्या खिडकीसमोर चहावाला आला आणि कोचरेकरमास्तरांनी शेजारच्या मावळ्याशी दोस्ती केली.

"कुठं पुण्याला चाललात का?"

"आपुन कुटं चालला?" कोणत्याही प्रश्नाला सरळ उत्तर द्यायचं नाही ह्या शेतकरीधर्माला जागून त्याने उलट प्रश्न केला.

"पुण्याला. तुम्ही?"

"आम्ही लोणावळ्याला. तिथं गाडी बदलून तळेगावाला जायाचं."

"तळेगावाला असता वाटतं आपण?"

"नाही." कुठे असतो हे उत्तर नाही.

"मग?"

"दुसरंच गाव हाय!"

"कोणतं?"

"ढोरवाडी—म्हंजी ही पिराची ढोरवाडी नव्हं. ती आली अंदाऱ्या मावळाच्या अंगाला. आमची फकिराची ढोरवाडी."

"दोन ढोरवाड्या आहेत वाटतं?"

"तीन! येक पिराची, येक फकिराची, आन एक जंगमाची ढोरवाडी हाय. ती पार खाल्ल्या अंगाला हाय."

"खाल्ल्या अंगा"चे कोडे कोचरेकरांना उमगले नाही. परंतु "अस्सं!" असे म्हणून जंगमाची ढोरवाडी कुठे आहे हे आपल्या नेमके लक्षात आल्याचा त्यांनी चेहरा केला.

"आपुन काय ब्यांडात असता का पोलिसात?" कोचरेकरमास्तरांच्या 'ड्रेसा'कडे दृष्टी टाकीत शेतकरीदादांनी सवाल केला.

"नाही, शिक्षक आहे मी."

"म्हंजी मास्तुर! पुन्याच्या साळंत?"

"नाही, मुंबईच्या."

"हा—मोठी असल साळा! आमच्या गावाला गुदस्तसाली झाली साळा, पर मास्तर लय द्वाड हाय. च्यायचं खुटायवढं कारटं धाडलंय मास्तर करून. काय पोरं हाकनार?"

असे म्हणून बसल्या ठिकाणाहून पचाकून मास्तराच्या निषेधार्थ त्याने एक तंबाखूची पिंक खिडकीबाहेर तोंड काढून टाकली. 'पोरं हाकणं', 'खुटाएवढं कारटं' वगैरे शब्दप्रयोग कोचरेकरमास्तरांना तांदळांतल्या खड्यांसारखे लागत होते. प्रवासात पंडितमैत्री होते अशा अर्थाचा श्लोक त्यांनी पाठ केला होता. त्यांच्या वाट्याला मात्र हा शिक्षकांविषयी एकेरी उल्लेख करणारा इसम आला होता. परंतु पुण्यात 'पंडित' नक्की भेटतील ह्या आशेवर ते तग धरून काशीनाथ नाडकर्ण्यांच्या पेटाऱ्यावर बसले होते.

"आपण ढोरवाडीला काय करता?"

"शेती हाय आमची!"

विचारलेल्या प्रश्नाला सरळ असे हे पहिलेच उत्तर मिळाल्याचा कोचरेकर-मास्तरांना माफक आनंद झाला!

"जपानी भातशेतीविषयी आपलं काय मत आहे?" ज्ञानार्जनाचा आणखी एक प्रयत्न कोचरेकरमास्तरांनी केला.

"जपानी?"

"आपल्या देशात सध्या जो प्रयोग चालला आहे जपानी भातशेतीचा—"

"खुळ्याचा कारभार आहे समदा. त्यो आमचा पुत्न्या कुठं शेती कालिजात शिकून शाणा झालाय, त्यानं चालविलंय काय तरी श्येतावर ह्यो जपानी खुळच्येटपणा—"

"पण आपण नवीन नवीन प्रयोग केल्याशिवाय प्रगती होणार कशी? प्रयोग हा प्रगतीचा पिता आहे." वर्गातल्या भिंतींवर लिहिलेल्या अनेक वाक्यांपैकी एक वाक्य कोचरेकरमास्तर म्हणाले.

"घ्या!" कोचरेकरमास्तरांच्या प्रश्नाला चोळलेली तंबाखू हे उत्तर मिळाले.

"नाही. तंबाखू खात नाही मी."

"आमच्या साळंतला मास्तुर सारका इड्या फुंकीत बसतो. नकायवढं मास्तुर—थूत्!"

म्हातारबुवांची गाडी पुन्हापुन्हा शिक्षकाच्या पवित्र व्यवसायाचा पिंकयुक्त धिक्कार करण्यावर येत होती आणि कोचरेकरमास्तर कासावीस होत होते. त्या मानाने काशीनाथ नाडकर्णी आरामात होते—कर्जतच्या आसपास त्यांना डुलकी लागली होती. त्रिलोकेकरांनी कर्जतची वाट पाहून नेरळलाच चिवडा घेतला होता. आणि बाबूकाका कधी मारवाड्याचे वजन अंगावर घेत होते तर कधी पठाणाचे!

घाटात मात्र भ्रमणमंडळाने आळीपाळीने सृष्टिसौंदर्य पाहून घेतले. त्रिलोकेकर तर आनंदाने 'आला खंडाळ्याचा घाट, तेथे गाडी झाली ताठ' हे गाणे 'बोलू' लागले. आता हवाही बरीच थंड झाली होती. आणि कोचरेकरमास्तर मफलर शोधण्याची धडपड करू लागले. त्यांच्या ट्रंकेवर त्रिलोकेकरशेट आता अत्यंत आरामात बसून कर्जतला पुन्हा घेतलेला चिवडा खात होते. काशीनाथ नाडकर्ण्यांनी खंडाळ्याच्या घाटाला आंबोली अगर फोंडा घाटाची सर नाही हे ठरवून पुन्हा एकदा डोळे मिटले होते. काशीनाथ नाडकर्णी हे इच्छामरणी भीष्मासारखे इच्छाशयनी होते. बसस्टॉपवर तिष्ठत उभे राहावे लागते हे त्यांना कधीच पटले नाही. उभ्या-उभ्या, बसल्या-बसल्या, 'अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां' त्यांना केव्हाही झोप येत असे. त्यामुळे ह्याच प्रवासाचा काय, जीवनाच्या एकूणच प्रवासाचा त्यांना फारसा ताप कधी झाला नाही. बाबूकाका खरे आता काळोखात दिसणारे डोंगराचे आकार पाहून लोहगड, राजमाची, पन्हाळगड, विशाळगड, सिंहगड, अशी आठवतील त्या किल्ल्यांची नावे मनातल्या मनात पुटपुटून स्वतःचे ऐतिहासिक समाधान मानून घेत होते.

लोणावळ्याहून गाडी भरधाव सुटली. मध्ये जी दोनतीन स्टेशने गेली त्यांची नावे अनेक सहप्रवाशांनी आलटूनपालटून 'देहूरोड' अशी सांगितली. त्यामुळे ढोरवाडी-प्रमाणे 'देहूरोड' नावाचीदेखील तीन गावे असावी असा कोचरेकरमास्तरांनी कयास बांधला. आता बरीच थंडी पडली होती.

"साला स्वेटर देत होती वाइफ तर मी नाय म्हटलं—मी तरी ईडियटच आहे साला."

त्रिलोकेकर कुडकुडत आत्मनिर्भर्त्सना करू लागले. मारवाडी आणि पठाण यांच्या मध्यभागी बाबूकाका असल्यामुळे त्यांच्यापर्यंत थंडी पोहोचत नव्हती. कोचरेकर-मास्तरांचे दात वाजू लागले होते. काशीनाथ नाडकर्णी मात्र आता मंद्रसप्तकात घोरूही लागले होते. काशीनाथ नाडकर्ण्यांची घोरण्याची एक स्वतंत्र शैली आहे. प्रत्येक आवर्तनानंतर ते तोंडातून 'फूस' अशी इंजिनातून वाफ सोडल्यासारखी हवा सोडतात. त्याखेरीज ताना, पलटे, छोटछोट्या हरकती अत्यंत सहजतेने त्यांच्या नाकातोंडातून जात असतात. आणि चेहऱ्यावर एक अलौलिक तृप्तीचा भाव असतो. काही जणांना मिटक्या मारीत खायची सवय असते त्याप्रमाणे काशीनाथ नाडकर्णी मिटक्या मारीत झोपतात.

खडकी आली. बाबूकाका खऱ्यांची पठाण आणि मारवाड्याच्या जाचातून मुक्तता झाली आणि त्यांना आपले सर्व अवयव हलवता येऊ लागले. येथपावेतो भ्रमण-मंडळाचे सभासद दारात बसले होते. त्यामुळे बाहेर पडू इच्छिणाऱ्या सहप्रवाशांच्या पदस्पर्शाचा आणि शापवाणीचाही लाभ झाला.

"अहो, वाटेत काय बसला—", "शी: ! माणसं आहेत की डुकरं !" अशां-सारखे उद्गार हे कोणाला उद्देशून आहेत कोण जाणे, अशा थाटात 'सभासदां'नी ऐकून दुर्लक्ष केले. कोचरेकरमास्तरांच्या मेसापोटेमिया हॅटवर एका पाशिंदराने खोखोच्या भोज्यावर हात ठेवल्यासारखा टेकू घेतला होता. त्यामुळे ते पार चेपून बसले होते. सोकाजींनी मात्र तेवढ्यातच एक रिकामी जागा पटकावली होती. आणि बोरीबंदरपासून आपण तिथेच बसून आलो होतो अशा थाटात ते बसले होते.

शिवाजीनगरला निम्मा डबा रिकामा झाला. आणि बाबूकाका खरे आणि कोचरे-करमास्तर आता पाय ताणून बसले. काशीनाथ नाडकर्ण्यांनाही जाग आली—आणि सवयीप्रमाणे ते ओरडले, "चा झालो काय गो ?"

"साला ईडियट—घरी आहे असं वाटलं का तुला ? ऊठ. साला पूना आला." त्रिलोकेकरशेट खुषीत आले होते.

शिवाजीनगरनंतर पुणे एकदम कधीच येत नाही. मध्यंतरी गाडी थांबते. सिग्नल नसतो अगर 'राइट्टायम'च्या अगोदर आलेली असते. त्याप्रमाणे गाडी थांबली.

"पुणं आलं ?" कोचरेकरमास्तर तिकीट हातात घट्ट धरून विचारू लागले.

"छे, मध्येच थांबली गाडी."

"हं. आपला प्रोग्राम बोला. बाबूकाका—"

"कोचरेकरमास्तरांच्या वहीत लिहिला आहे."

कोचरेकरमास्तरांनी डायरी काढली. "हं, सकाळी पाच वाजता उठून—"

"पाच वाजता ? साला ईडियट ! आपल्याला काय पुण्याचे रस्ते झाडायचे आहेत ?"

"पण पर्वतीवरून सूर्योदय पाह्यचा आहे."

"मग थोड्या उसरानं पाहू. साला, पाच वाजता उठून कशाला पाह्यला हवा ? काय नाडकर्णी —"

"अहो, भलतंच काय ? आठच्या सुमारास जाऊ सूर्य बघायला. पुण्याचा सूर्य काय मुंबईच्या सूर्यापेक्षा वेगळा आहे काय हो कोचरेकरमास्तर ?"

"मी सूर्योदय म्हणत होतो."

"ह्यः ! अहो, चौपाटीवर पन्नास वेळा सूर्य बुडताना पाह्यलाय मी. त्याच्या उलट केलं म्हणजे सूर्योदय ! काय त्रिलोकेकरशेट ?"—नाडकर्णी.

"करेक्ट ! सूर्योदय खोडून टाक कोचरेकर."

"पण पर्वती पाहू या. पेशव्यांचं देऊळ आहे ते. जागृत होतं म्हणे एके काळी. पुढं वाचा." बाबूकाकांनी सूचना केली.

"पुढं वाच."

"हं, सकाळी पाच वाजता उठून—"

"ते राइट ऑफ करून टाक. नुसता पर्वतीचा सूर्योदय ॲट अवर अर्लिएस्ट कन्वीनियन्स पाहणं एवढं लिही. साली गाडी का थांबली?"

"कोण जाणे. भूक लागली हो." काशीनाथ नाडकर्ण्यांना निद्रेनंतर निसर्गधर्मा-प्रमाणे आहार सुचला.

"थांब. कोचरेकर, पुढं वाचा ना प्रोग्राम—"

"हं. उठून पर्वती पाहणे."

"साला उठून खोड. साला ड्राफ्टिंग पण कळत नाय!"

"ठीक आहे." पेन्सिलीने 'उठून' ही अक्षरे खोडीत कोचरेकर वाचू लागले, "हं—पाहणे!"

"काय पाहणे—"

"अरेच्या—पर्वतीही चुकून खोडली मी. ठीक आहे. नंतर शनवारवाडा पाहणे—"

"शनवारवाड्यात काय पाह्यचंय? आमच्या मालवणचा सिंधुदुर्ग पाह्यलाय तुम्ही त्रिलोकेकर? असा किल्ला जगात नाय म्हणतात."

"गप्प रे! हं. शनवारवाडा—काय आहे तिथं?"—त्रिलोकेकर.

"नारायणराव पेशव्याचा खून झाला होता तिथं!"—बाबूकाका.

"केव्हा?"—त्रिलोकेकरांची शंका.

"पेशवाईत. म्हणजे काय झालं—नारायणराव पेशव्यांनी साखरभात खाल्ला होता—"

"म्हणून खून केला? काय साले पुण्याचे लोक—साखरभात खाल्ला तर ह्यांच्या बापाचं काय गेलं?"—त्रिलोकेकर.

"तसं नाही. आनंदीबाईंनी धचा मा केला..."

"काय केला?"

"धचा मा! म्हणजे 'धरा' असं होतं ते 'मारा' असं केलं—"

"हॅट! मग ड्राफ्टिंग बदललं म्हणून सरळ सांग ना—ईडियट साला!"

"नीट ऐका! राघोबाचे गारदी नारायणरावामागं लागले आणि तो 'काका, मला वाचवा' म्हणून ओरडला—" बाबूकाका "काका, मला वाचवा" म्हणून एवढ्या जोरात ओरडले की डब्यातले उरलेसुरले लोक घाबरून उभे राहिले. आपला आवेश लक्षात आल्यावर बाबूकाका भयंकर ओशाळले.

"ए, ओरडतो काय! ईडियट साला. कोचरेकर, वाच ना."

"शनवारवाडा पाहून झाला की महादजी शिंद्याची छत्री पाह्यची."

"छत्री? छत्रीत काय पाह्यचं? साला ईडियट! मग महादजी शिंदेची छत्री बघायची

तर मग रेनकोट पण असेल कोणाचा तरी. हॅः! छत्री नको. वेस्ट ऑफ टाइम—"

"ठीक आहे, छत्री खोडतो. पण आमचे मेहेंदळेमास्तर म्हणत होते, पाहण्यासारखी आहे.—हं, त्यानंतर चतुर्शिंगीचं देऊळ, चित्रशाळा प्रेस—"

"प्रेस? अहो, मुंबईहून पुण्याला काय छापखाना बघायला आलो आपण इतके पैसे खर्चून? कमाल आहे हं तुमची कोचरेकरमास्तऽर—" नाडकर्णी म्हणाले.

"थांब. पुढं वाच ना भरभर."

"मंडई."

"काय?"

मंडई. इथं भाजीपाला उत्तम मिळतो व इथं रे इंडस्ट्रियल म्यूजिअम आहे. तिथूनच जवळ तुळशीबागेचं देऊळ असून तेथे लाकडी खेळणी व फणीकरंड्याच्या पेट्या मिळतात."

"तुला काय ठाऊक?"

"मी हे 'पुणें शहरवर्णन' पुस्तकातून लिहून काढलं आहे—मुळा-मुठा नदीचा संगम प्रेक्षणीय असून तेथे इंजिनियरिंग कॉलेज आहे." गुरुजी पुढे वाचू लागले.

"कॉलेजात काय बघायचं हो सोकाजीनाना? मास्तर, नुसता संगम बघू!"

"सालं संगमात तरी काय बघायचं? ज्यांनी साली चौपाटी पाह्यली त्याला दुसरं पाणी बगून काय इंट्रेस वाटणार? आलराइट—पुढं. साली गाडी का नाही हल्त?"

"सिग्नल नसावा बहुधा. पुढं वाचू का?" कोचरेकरमास्तरांनी नम्रतेने 'सभासदां'ना विचारले.

"वाच! पण साला अजून तर पुण्यात काही वर्थ सीइंग आहे असं वाटत नाही मला—त्यापेक्षा मी म्हणत होतो, माझ्या कझिनच्या ब्रदरइन्लॉचा मालाडला बंगला हाय, तिथं गेल्हो असतो तर मजा आली असती. साले साखरभात खाल्ला म्हणून खून करतात—ईडियट साले!"

"कोकणात तुम्हांला असलं काही दिसणार नाही. कोंबडी खाल्ली तरी कोणी विचारत नाही का खाल्लीस म्हणून. आणि थंडीही नाही असली कोकणात."

"त्यापेक्षा आपण सरळ सिंहगडावर जाऊ."

"नको. मला डोंगर चढायची परमिशन नाय डॉक्टरची. हार्टट्रबल आहे मला पाठीत!" नाडकर्णी स्वतःची पाठ चेपीत म्हणाले.

"मग दोन दिवस पुण्यात बघायचं काय?"

"खरंच, पण उतरायचं कुठं आपण?"

"काय हो मास्तर?"

"राजेशाही हॉटेल. सहा रुपये रोज जेवूनखाऊन. एकदा उतरून पाहा व खात्री करा." कोचरेकरगुरुजींनी झटकन यादी वाचायला सुरुवात केली.

"सहा रुपये रोज. म्हणजे सहा चोक चोवीस—म्हणजे दोन दिवसांचे अठ्ठेचाळीस रुपये."—नाडकर्णी.

"पण सगळ्यांत स्वस्त हीच खाणावळ आहे. थंड पाणी फुकट आहे. गरम पाणी बादली दोन आणे."

"थंड पाण्यानी आंघोळ केली थंडीत तर निमोनिया शुअर! म्हणजे बे चोक आठ आणे वाढले."—नाडकर्णी.

"माझा पुतण्या राहतो पुण्यात दूरचा. पण त्याचा पत्ता राहिला घ्यायचा." बाबूकाकांनी उपसूचना आणण्याचा प्रयत्न केला.

"पण त्याचा पत्ता नाय तर सापडणार कसा—"

"पण पुण्यात पुष्कळ वर्षं राहतो तो..."

"अरे, पण पुण्याची वस्ती असेल कमीत कमी दोनतीन लाख—"

"थांबा. पुणे शहराची लोकवस्ती खडकी हद्द धरून सहा लाख बावीस हजार सातशे तीस आहे—"

"आता ह्यांत तुझा पुतण्या कसा सापडेल?"

"विचारू आपण!"

"अरे, पण तुझा पुतण्या म्हणजे काय नारायणराव पेशवे आहे तुझ्याकडे 'काका—काका—माझ्या बरी उतरा' म्हणून धावत यायला? ईडियट साला!"

"मग अठ्ठेचाळिसाच्या खाली नुसता उतरायचा खर्च नाही जात. आणि हे नुसतं शनिवारवाडा आणि तुळशीबाग बघायला. अठ्ठेचाळीस रुपयांत फिनलेची चार धोतरं येतील."

"आणि मुंबईत राणीचा बाग बघितल्यावर तुळशीबागेत काय बघायचं? हे सालं तुम्ही आधी ठरवलं का नाय?"

"पण तुम्हीसुद्धा भ्रमणमंडळाचे सभासद आहात."

बाबूकाका थोडेसे रागावले. पुण्याबद्दल त्यांना अत्यादर होता. जिथे शाहिस्तेखानाची बोटे कापली, त्या पुण्याबद्दल सोकाजी त्रिलोकेकरांनी अनुदार उद्गार काढावे हे त्यांना पटेना.

"अठ्ठेचाळीस रुपये नुसते दोन दिवस राह्यचे—शिवाय टांगा आहे—"

"पुण्याचे टांगेवाले म्हणजे कोकणच्या धमणीवाल्यांसारखे इमानी नाहीत पुन्हा त्यातून बाबूकाका त्यांना दहाची नोट देणार!"

आता मात्र बाबूकाका भयंकर संतापले.

"मी भरून देईन दहा रुपये—मी मंडळाच्या खजिनदारपदाचा राजिनामा देतो. हे घ्या पैशाचं पाकीट—ऑं!! काकाऽऽ मला वाचवा—काकाऽऽ मला वाचवा!"

बाबूकाका खरे गुरासारखे ओरडू लागले. डब्यातील मंडळी जमा झाली. बाबूकाकांनी खिशात हात घातला तो सरळ मांडीपर्यंत गेला. ज्या पुण्यात शाहिस्तेखानाची बोटे कापली त्याच पुण्याच्या वाटेवर त्यांचा खिसा कापून भ्रमणमंडळाचे पाकीट उडवले होते.

"खिसा कापला?"

"आता?" एवढेच शब्द उद्गारून कोचरेकरमास्तर कसेसेच करू लागले.

"साला ईडियट, साखळी ओढा—"

"पण गाडी थांबली असताना साखळी कशाला ओढायची? पण बाबूकाका, कोणी कापला खिसा तुमचा?" नाडकर्णी विचारते झाले.

"आता मला काय ठाऊक?"

कोचरेकर भानावर येऊन नुसतेच "आता—आता—?" करू लागले. गाडी एकदाची हलली आणि पुण्याला पोहोचली.

मंडळाच्या सभासदांनी पेटाऱ्याच्या कप्प्यांतून, हॅटच्या आतल्या कातडी पट्ट्यांतून, वगैरे जमवाजमव करून परतीच्या तिकिटांचे पैसे जमवले. हे कार्य चालू असताना त्रिलोकेकर तोंडाने मराठी, हिंदी, गुजराती आणि इंग्लिश अशा चौभाषिक शिव्यांची लाखोली वाहत होते.

"पण आता?" कोचरेकरगुरुजींनी पुन्हा सवाल केला.

"आता काय? आता बघा पुण्याचा प्लॅटफॉर्म—ईडियट साला. आता रात्रीच्या गाडीला परत—आणा पैसे. किती झाले—हं, बरोबर तिकिटीचे पैसे आहेत..."

"पण व्हिक्टोरिया—"

"व्हिक्टोरिया घेऊन घरीच जायचं आहे ना! बाबूकाका देईल घरातून पैसे आणून! साला ट्राव्हल करतो! तुझ्या ग्रांडफादरनी केला होता का ट्राव्हल? आता खा साखरभात आणि न्हा पुण्यात!"

पैसे जमवून त्रिलोकेकर बाहेर तिकिटे आणण्यासाठी गेला, आणि एकोणीस डाग भोवती ठेवून रात्रीच्या गाडीची वाट पाहत मंडळाचे उरलेले तीन सभासद त्याची वाट पाहत बसले.

त्याच वेळी खडकीच्या हॉटेलात एक पठाण आणि एक मारवाडी आपापल्या मिश्या आणि पागोटी उतरवून दिवसाची कमाई मोजीत होते. "शंकर, आमोशेचा म्हुरुत मस्त लागला—यकशेचाळीस रुपये निघाले पाकिटात." पठाणाने मारवाड्याला सांगितले.

दुसऱ्या दिवशी बटाट्याच्या चाळीत मात्र पुण्यात एकाएकी भयंकर प्लेग सुरू झाल्याची अफवा पसरली.

"साला प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडलो तर साले उंदीर—सगळीकडे—काय नाडकर्णी—"

"हो—उंदीर—" नाडकर्ण्यांनी साक्ष दिली.

"अखेरपेशवाईत असा प्लेग एकदा झाला होता असं म्हणतात..." बाबूकाका खरे जोगदंडांना सांगत होते.

आणि कोचरेकरमास्तर मात्र पुण्याला भयंकर थंडी असते, ह्यापलिकडे एक अक्षर बोलत नव्हते.



# ....संगीतिका

**प्रास्ताविक :** मनुष्य हा प्रयोगशील आहे. आणि तो प्रयोगशील आहे म्हणून स्खलनशीलही आहे. त्यातल्या त्यात स्खलनशीलतेची अधिकात अधिक शक्यता नाटकात आहे. कारण नाटक हे जगाच्या अंतापर्यंत प्रयोगावस्थेतच राहणार आहे. आजवर झाले ते नाट्यप्रयोग आणि पुढे होत राहतील तेही नाट्यप्रयोगच. हा समास प्रत्येकाने आपापल्या सोयीप्रमाणे सोडवायला हरकत नाही. नाट्याचे प्रयोग किंवा नाट्यात प्रयोग असा अनुक्रमे षष्ठी अगर सप्तमी तत्पुरुष, दोन्ही प्रकारांनी सोडवावा. कदाचित तो बहुव्रीही, द्वंद्व, द्विगू, कर्मधारय किंवा अलुक समास म्हणूनही सोडवावा. कारण प्रास्ताविकाच्या प्रारंभी मनुष्य हा प्रयोगशील आहे असे म्हणून ठेवलेलेच आहे. नाट्याप्रमाणेच आज संगीतातही नवेनवे प्रयोग होत आहेत. प्रस्तुत संगीतकात नाट्य आणि संगीत ह्या दोन्ही बाबतींतला प्रयोग करावयाचा नम्र मानस आहे.

आजवर 'संगीतिका' झाल्या त्यांत आणि ह्यात काय फरक आहे असा प्रश्न साहजिकच कुणी विचारील. त्याचे विचारणेही योग्य आहे. स्थूलमानाने फरक इतकाच की आजवरच्या संगीतिका ह्या 'भव्य भूतकाला'तील महाभागांच्या जीवनपटातील रेशमी आणि जरतारी धाग्यांची गुंफण बांधून गेल्या. हे संगीतक आजच्या जीवना-विषयी आहे. कथासूत्र रेशमी तंतूंचे नसून साध्या पुडीच्या सुताचे आहे. तितकेच मळकट आणि तितकेच पुचाट!

परंतु पुडीच्या सुतासारखे का असेना, शेवटी कुण्या मानव-कुडीतल्या प्राण्याचेच ते जीवनसूत्र आहे ना? मग ते केवळ आजचे आहे म्हणून का उपेक्षावे?

दमयंतीने प्रथम नळाला पाहिले त्या वेळी तिची नाजूक धडधड निराळी आणि

अण्णा पावश्यांच्या प्रभीने बाबा बर्व्यांच्या भाच्याला प्रथम नळावर पाहिले तर ती धडधड निराळी, हा धडधडीत अन्याय का? राजकन्येचे हृदय आणि पावश्यांच्या प्रभीचे हृदय यांत असा फरक का मानावा? नळ 'राजा' असेल आणि बाबा बर्व्यांचा भाचा ए० जी०च्या हपिसात असेल, पण कली शिरायचाच झाला तर बाबा बर्व्यांच्या भाच्याच्या फाटक्या मोज्यातून शिरणार नाही असे थोडेच आहे? धर्मराज खेळला की ते 'द्यूत' आणि समेळकाका लावतात तो 'आकडा' हा पंक्तिप्रपंच का? गुप्त्यांची कुमुद उभी राहिली की ग्यालरी आणि उर्वशीचा तेवढा 'सौध'! शकुंतला दुष्यंताला पाहून तेवढी 'मोहित' झाली आणि नाडकर्ण्यांची विजू मात्र जगू गायतोंड्याच्या 'मागे' लागली काय?—हा शुद्ध अन्याय आहे. गिरिशिखरावरील प्रासादाइतकेच चाळ-गॅलरी-ग्यारेजला जीवनात महत्त्व आहे. केवळ जुनेपणाच्या भांडवलावरच उभे राहण्याचे व कवितांचे विषय होण्याचे दिवस गेले. नवरस प्राचीन जीवनात प्रकटला तसाच अर्वाचीन जीवनातही आहे. शिवाय आजचे अर्वाचीन उद्याचे प्राचीन आहे. न जाणो, बटाट्याच्या चाळीचे विधियोगाने 'मोहेंजोदारो' झाले (देव करो आणि तसे न होवो.) तर तेवीस नंबरातील जनोबा रेग्यांच्या घरच्या 'आडकित्या'ला, द्वारकानाथ गुप्त्यांच्या 'वाटरमन' पेनला, एच० मंगेशरावांच्या तबल्याच्या हातोडीला, 'लोको' हपिसातल्या बाबूकाका खऱ्यांच्या (चाळीतले इतिहाससंशोधक) बरातल्या सोवळ्यात बांधलेल्या लोणच्यांच्या बरण्यांना, बाबा बर्व्यांच्या कोकणी पायतणांना आणि अण्णा पावश्यांच्या डिस्पोजल्समध्ये घेतलेल्या पाण्याच्या गळ्यात अडकवण्याच्या वॉटरबॉटलला काय भाव येईल! इथून पाच हजार वर्षांनंतर कुशाभाऊंची 'बादली' ही विसाव्या शतकातील 'विशिष्ट आकृती'चे पात्र म्हणून कौतुकालयात ठेवता येईल आणि आज जी फुटकी बादली किंवा त्रिलोकेकरशेटची पगडी कुणी दोन आण्याला उचलायला तयार नाहीत, त्या गोष्टी पंचविसाव्या शतकातले लोक दोन-दोन आण्यांचे तिकीट काढून पाहायला येतील. जंब्या ठोसराच्या लोटीवर 'ठोसरकालीन लोटी' हा प्रबंध लिहिला जाईल. तात्पर्य, ही मंडळी वाटतात तितकी सस्त्यातली नाहीत.

महाकाव्याचा विषय व्हायला काय असावे लागते ह्याची मराठीतील एका विद्वान प्राध्यापकाने यादी दिली आहे. त्यात त्याने अश्व, रथ, धनुष्यबाण, ऋतूंची वर्णने, उद्याने, द्यूत—अशी एक तपशीलवार यादी दिली आहे. ह्या जीवनातही अश्व आहेत—ते व्हिक्टोरियाला जोडले आहेत हा मामुली फरक आम्ही मानतो. तिथे द्यूत होते, इथे जंब्याच्या खोलीत 'गांजा'चा डाव चालतो—आता तो ब्रह्मचारीच आहे, तेव्हा युधिष्ठिराचा आखरी 'पण' लावू शकत नाही हे मान्य! चाळीत धनुष्यदेखील आहे. आवडाक्का त्याच्यावर वातीचा कापूस पिंजतात. तळमजल्यावरच्या धूतवस्त्रेश्वर लॉंड्रीचे मालक बाबूराव साखरपेकर पातळांचेच काय परंतु गंजिफ्रांचे-देखील वस्त्रहरण करून दुःशासनावर ताग करतात. शिकारीची वर्णने करू म्हटल्यास

वाघसिंहाच्या शिकारीच्याच उत्साहाने इथे मूषक-मत्कुण-मच्छरांची शिकारही होते हे नमूद करणे इष्ट आहे. वरच्या मजल्यावरून सांडपाण्याची बादली रिकामी करून पर्जन्यास्त्र सोडले की संध्याकाळी खालची मंडळी चौकात शेगड्या फुलवायला ठेवून धूम्रास्त्र सोडतात.

वरील विवेचनावरून (ह्यातील मौलिक आणि तौलनिक चिकित्सा गरजूंनी ध्यानात घ्यावी.) नवरसात्मक काव्यच काय परंतु महाकाव्य व्हावे अशी कच्ची सामग्री बटाट्याच्या चाळीत आहे हे साऱ्या रसिकांच्या ध्यानात येईल. असले महाकाव्य लिहिण्याचा आमचा मानस आहे. योग्य समय प्राप्त होताच तेही कार्य सिद्धीस जाईल. तूर्त वानगी म्हणून संगीतक लिहिले आहे.

**सूत्रधार :** रसिका, संगीतक हें नवें
नवे सूर अन् नवीन गायक
नव्या नायिका नवें कथानक
इथे न गिरिवर
नदी न सागर
नाही उपवन नाहि सरोवर
सौध न शिखरें गिरि ना गव्हर
राजसुतांचीं हीं नच गीतें
सामान्यांचीं हीं निःश्वसितें
जीवन न्यारें इथे स्पंदतें
मला ठाउकें—रसिकवरा तुज गीत असें हें हवें
रसिका, संगीतक हें नवें

*(चाल बदलून)* जरा द्या कान
जरा द्या ध्यान
जरा जपून पुढती चला
शिरा इथून् पुढच्या आळिला—

*[ह्यानंतर सकाळी रोलेक्स-घडीला जे वाद्यसंगीत वाजते त्यातला एखादा राग वाजवला जातो, व त्या सुराने सावध होऊन कुणीतरी गाफील सनातनी म्हणतो—]*

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला—

**सूत्रधार :** *(ती भूपाळी थोपवीत)*—थांब, गायका थांब!
ही इथे पहाट न फुटे गात भूपाळी
रखडत येते घेऊनि संगें दुधवाला गवळी—

**भय्यांचे समूहगीत :** *(हे गीत गाताना डोळ्यांतल्या न उडालेल्या झोपेचा भाव गळ्यांत दिसावा.)*

भय्या धीरे धीरे चाले
कावड डुगुडुगु हाले
दार ठोठावीत बोले
बाई दूध—बाई दोध—बाई—दोऽऽऽध !

**सूत्रधार :** ह्या इथे उगवता सूर्य दिसे ना कोणा—
ही ट्राम चालली पहिली बडवीत घाट घणघणा
कोंबडा इथे ना कधी देतसे बांग
हा पेपरवाला पोऱ्या आणी जाग

*[पेपरवाल्या पोऱ्याच्या ललकाऱ्या.]*

...मग जाग जगावर येते
घरिंघरीं घरघरे स्टोव्ह
कुणि आधण त्यावर ठेवी
कुणि जाइ आणण्या पाव
कुणि रात्रींच्या स्वप्नांची
करि व्यर्थ मनांत उजळणी
कुणि चिंतेच्या चित्रांचीं
फेकितसे पानें पिसुनी

*[आवाज बदलून]* रसिका, इथेच थोडा थांब
इथून नाही चालायाचें
अंतर आता लांब—
—त्या तिथे चाळ बटाट्याची
वस्ती साठ बिऱ्हाडांची
साठ घरांचें इवलालें जग
(साठ परंतू साठ खास नग)
डॉक्टर कोणी येथे हौशी
कुणी अजागळ कोणि मिजासी
आस्तिक कोणी नास्तिक कोणी
कुणी प्यार पंछी—
उजवे कांही डावे कांही
कुणी बापुडा तटस्थ राही
धर्मवीर धगधगीत कोणी

कोणी पद्य रची
(खास जात त्याची)
—वस्ती साठ बिऱ्हाडांची

*[चाळीतल्या एका खोलीतून गुणगुणणे ऐकू येते :]*

झुळूझुळू झुळूझुळू झुरतो झरा ग बाई

**सूत्रधार :** एकलेंस का रसिका याचें मंजुळ गुणगुणणें
कविराज बसे ठोकित अक्षर घडविण्यास गाणें
नांव तयाचें रंगो विठ्ठल
कविता करण्यामाजीं अट्टल
नळाजवळच्या राहुनि खोलिंत पाही झुलुझुलु झरा
कवीची असली न्यारी तऱ्हा.

*[गुणगुणणे अधिक मोठे होते :]*

झुळूझुळू झुळूझुळू झुरतो झरा ग बाई
ससस—सरा ग बाई
तुतुतु—तुरा ग बाई
जजज—जरा ग बाई
बबब—बरा ग बाई
खखख—खरा ग बाई

**सूत्रधार :** *(अत्यंत दुष्टपणाने)*
खराखरा खाजवुनी कितिदा माथा
कशीबशी जोडितसे अक्षरकंथा

**कवी :** *(अत्यंत मोठ्या समाधानाच्या स्वरात)*
सुटलों ! जमलें यमक अखेर !
धाडुनि देतों नवीन कविता
नवीन अंकासाठी
चला—उठा हं, ऐकलेंस का
घोरत पडशिल किती? आला दिन माथ्यावरती.

**सूत्रधार :** कविपत्नीच्या डोळ्यापुढलें स्वप्न गुलाबी पुसे
दिवसभराच्या उसाभरीचें चित्र लावितें पिसें

**कवी :** ऐकशील का गे माझें झुळझुळीत गीत—

**ती :** द्या तें घालतें चुलींत—

**कवी :** हाय दैवा ! काय गति ही अरसिका किति ही पहा

**ती :** पेटवीतें बाड होइल बादलीभरूनी चहा

**कवी :** *(सात्त्विक व साहित्यिक संतापाने)*
खबर्दार जर भलतेंसलतें बोलशील तर पहा
साहित्याच्या फत्तेपुरचा मी तर बादशहा—

**ती :** ओसाडीच्या मुलखाचें हो तुम्हां राज्य आंदण

**कवी :** असेंच का गे चालायाचें अपुलें हें भांडण ?
तुला न ठाउक रसिकवरांच्या मी कंठांतिल लाल

**ती :** काय तया मेल्यांना ठाउक कविपत्नीचे हाल !
झुळुझुळु झुळुझुळु झरा वाहतो—शब्दांचा खेळ
तासतासभर नसे नळाचा पाण्याशीं मेळ !

**कवी :** थांब थोडी ऐक सखये काव्यपंक्ती मम नवी
भावना मीं त्यांत भरली ठेचुनी तुज जी हवी

**ती :** ठेचतां कां भावनांना ? ठेचुनी टाका मला !

**कवी :** छे—प्रिये—हें काय हें ? छेः ! कठिण झाला मामला.

**ती :** भावना अन् कल्पना मज कांहिही आता नको
पाप साता जन्मिचें म्हणुनीच तुमची बायको.

**सूत्रधार :** *(अगदी वेळेवर)* रसिका, घेइं काढता पाय !
पतिपत्नींच्या रणसंग्रामीं तुझें नि माझें काय ?
महिषासुरमर्दिनी युगांतिल नव्या चालली कुणी
घेउनि घागर नळाकडे बघ आणाया पाणी—

*[अंतराळातून सूर येतात :]* नदीच्या ग आजूबाजू
कुणी वाजवीतो शीळ
उभा माझा पैलतीरीं
सखा घननीळ—बाई सखा घननीळ...

**सूत्रधार :** *(संतापून)* पुराणकविंनो, जरा आवरा
विटलेली वाणी—
पार पळालें इथे नळाच्या तोंडांतिल पाणी

*[आभिनयगीत] :* दणदणत चरण ये

खणखणत वदन ये
तोंड फेकीत ये, ये नळाला.
वाम करिं बादली
कळशि कशि आदळी
हादरित चाळिचा पूर्ण मजला!
"दूर व्हा मावशी,
कळशि भरुं द्या कशी!"
देत जाई ढुशी—भीति सकळां—
जलभरणस्थान तें
समरभू भासते
कडकडुनि वीज जणु मेघ फुटला!
कळशि कन्येस दे
कविकरीं बादली
घागरी कटिवरी—ये घराला—

*[रणवाद्यांचा गजर—भेरी, कर्णे, इत्यादी वाजतात.]*

**नळावरची एक बाई** : चला आटपा गंगूबाई
आम्हांलाही आहे घाई

**दुसरी** : नका दाखवूं नस्ता तोरा
'सुप्रिंटेण' जर असेल नवरा
ब्लाक चांगला शोधा दुसरा

**तिसरी** : टळा एकदा चाळीमधुनी—

**चौथी** : तुला चांगली हिंदु कालनी
पेशल् खोल्या पेशल् न्हाणी
थाटा अन्य बिऱ्हाड—

**पहिली बाई** : जिभेला नाहिंच का हो हाड!

**सूत्रधार** : रसिका, तुझें न येथे काम!
अणुयुद्धाहुनि घोर असा नित्याचा नळसंग्राम
गृहिणी सचिव सखी एकांतीं
ललितकलांतिल प्रिय शिष्या ती
कविकुलगुरुच्या विसरा पंक्ती
कालप्रवाहीं वाहुनि गेला त्या युवतींचा ग्राम
तुझें न येथे काम—

*[वातावरणातून पुन्हा आवाज :]* कराग्रे वसते लक्ष्मीः
करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविंद
प्रभाते करदर्शनम् ॥
मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें—

**सूत्रधार :** *(त्या आवाजावर आवाज काढून)*
कोण तूं? कवण्या देशीं
गाशी श्लोक असा कसा
असमर्थ इथे सारे—समर्थ कुणिही नसे.
उदास जीवनीं ह्यांच्या दासबोध नको तुझा
रामदास इथे नाही, ट्रामदास समस्त हे—

**दुरून अण्णांचा आवाज :** सामर्थ्य आहे बडबडीचें
जो जो भकेल तयाचें ।
परंतु तेथे दिडक्यांचें
अधिष्ठान पाहिजे ॥

**कोपऱ्यातून काका जोगदंड :** वशिल्याने होत आहे रे
आधी वशिलाच पाहिजे ॥

**तारेवर पंचा वाळत टाकत द्वारकानाथ गुप्ते :**
मना सज्जना ट्रामपंथेंचि जावें
तरी वाचतो एक आणा स्वभावें ।
'बशी'ला फुकाचे कशा दोन आणे
उशीरा सदाचें हपीसांत जाणें ॥

**कारकुनांचा कोरस :** गणाधीश जो ईश ह्या कार्कुनांचा
तयामागुती नाच बापा सदाचा ।
नमूं चारदा मूळ चप्रासि साचा
हजेरी हळू आणितो बीनवाचा ॥

**सूत्रधार :** रसिका, इतुका बोध पुरे
जळतां जळतां येथे जीवन
निघे काजळी तें ज्ञानांजन
काव्यशास्त्र, साहित्य यापुढे शब्दांचे भवरे
पळापळाने दिवस वाढतां

सारें थंडावतें
मागुनी रामराज्य येतें.

रामा : बाई जरा घाई करा—
टाका झणीं धुणींभांडीं
जायचं मला शिनीमाला
संगं घेऊन् मागार्नीला
पयल्या 'छूट'च्या 'शो'ला म्हंतो जाऊन् बशिन् टेचामंदि !

बाई : रामा—आत नको येऊं—
अजुनी नाही उकळी आली
वरणाची ना डाळहि शिजली
कुठून भांडींधुणीं तुला मी इतुक्यांतच देऊं ?
तुझी सदाची कां रे घाई
शेजाऱ्याघरिं जाउन येई
अजून पुरते झाले का रे रामा साडेनऊ ?

रामा : बाई जरा घाई करा टाका झणीं धुणींभांडीं

पंत : रामा, जा चल नीघ पुढे !
तुझ्यावाचुनी काय गमे तुज अमुचें खेटर अडे ?
पगार घेतां फुकटच का रे ?
स्वावलंबनें बघशिल कैशी 'तिरपिट त्रेधा' उडे !

[मऊ सूर] ऐका माझें जरा बोलणें
उद्यापासुनी स्वावलंबनें
तुम्हीच उरका भांडिं घासणें
तुम्हीच काढा केर नीट अन् तुम्ही धुवा कपडे
रामा, जा चल नीघ पुढे !

रामा : बाय् माजा मयन्याचा टाका पगार
बोलयाचा काय् नाय्, अन् सांगयाचा काय् नाय्
पाहिन बिजा रोजगार

बाई : रामा, तूंच राखिं मम लाज...
चहा ठेवितें तुझियासाठी
ही आणेली असुं दे गाठीं
तूं नसशिल तर कुठुन सिनेमा

कुठला भगिनि समाज?—रामाऽऽऽऽ
ह्यांचि सदाची असलीच तऱ्हा
बोल नको तूं मानूंस खरा
न कळे बाई कसला चढला ह्यांनाच असा माज?
रामाऽऽऽऽ
त्वां धुतलेलीं घालुनि कुडतीं
ह्यांस कचेरिंत मिळते बढती
बोल वरी त्या फुका लावितां
चढवुनिया आवाज...रामा—रामा—
तूंच राखिं मम लाज!

**पंत :** रामा, चुकलों! मज करिं क्षमा
वस्त्रविश्रामाऽऽ
पात्रप्रोक्षणकामाऽऽ
पर्णभरितमुख, कर्ण विडीयुत
कुरलकेशशिर तैलविभूषित
अपरान्तकनिजधामा—

*[पट्टी बदलून]* तूं नसशिल तर कसें व्हायचें सुसह्य हें जीवन
कुठलें पात्राविना व्हायचें नित्याचें भोजन?
तूं नसशिल तर कुठुन यायचा गोविंदा दारीं
कसें फुटावें दहिलाहीचें मडकें अंगावरी?
तूं नसशिल तर कशी दिसावी गोमू दारांत?
कुठुन व्हायचा चौपाटीच्या नाच बंदरांत?
तूं नसशिल तर जिन्याखालची जागा होइल सुनी
कुणीं करावी तेथे नंतर सांगा तेलफणी?
तूं नसशिल तर कुणिं फेकाव्या रसमय पिचकाऱ्या?
दुग्धकेंद्रिं मग कुणिं लावाव्या सांग गड्या बाऱ्या?
तूं नसशिल तर कुणिं आणावें गिरणींतुनि पीठ
तूं नसशिल तर कुणिं घालावें काळें जाकीट?
तूं नसशिल तर हवीं कुणाला गोंड्याचीं बटणें?
तूं नसशिल तर उरेल केवळ उभय नयन मिटणें
तूं नसशिल तर—

**सूत्रधार :** रसिका, परिसा रामकथा
चाळिची व्याकुळ विरहव्यथा—

मुलें शाळे जाती पतिहि रिघती कार्यकरणीं
कुण्या गेहीं आता जमतिलचि बेकार गृहिणी
पुढे डाळी पाटीं निवडित खडे बैसति कशा
मुखें हातांसंगें हलवित रिकाम्या चवकशा
कुणाचीशी कोणी सुरस कथिते चोरुनि कथा
कुणी सांगे वेडी स्वमनिं सलणारी भवव्यथा
कुणी घेई वेणी समय बघुनी माळिण खडी
कुणी पंख्याखाली पडुनि नुसता वेळ दवडी
रसिका, चतुर गड्या तूं खरा
वाया गेली माझी शिखरिणि
लक्ष राहिलें तुझें गुंगुनी
भुलूं नको रे असा, पाहुनी पलिकडला नखरा
ती तिथे उभी राहिली खऱ्यांची शांता
तिज पसंत प्रियकर जिन्याजवळच्या जोश्यांचा अंता—

**शांता :** भर दुपारचें—उघड्या नयनीं ऽऽऽ
स्वप्न देखिलें—मीं चित्र रेखिलें—
टपोर डोळे···(जरी त्यावरी चष्म्याची कुबडी !)
विशाल वाटे भाल—ओठ जणु संत्र्याच्या फोडी
(फोडीसंगें साल होउनी गाल जरी आले)
स्वप्न देखिलें—चित्र रेखिलें—
चाल कशी झोकदार...(पोक न लपलें !)
कुरळ केश माथ्यावर (मधुनि मधुनि पिकले !)
रुंद बाहुवर विसावण्याला आतुरला माथा
विरुनि अनंतीं जाइन मी रे हा बघतां बघतां

**शांतेची आई :** शांते ऽऽऽ

**सूत्रधार :** हाक ऐकूनी मातेची
कशी दचकली राणी
गेलें दिवास्वप्न भंगुनी.

**शांतेची आई :** शांते, करिसी काय इथे ?

**शांता :** छेः ! कुठे, मीं, काय, कधी ग, कुठे काय केलें ?

**शांतेची आई :** त्या पदराखाली काय दडवुनी सांग ठेवियेलें ?

**शांता :** मी ? पदराखाली—कुठे—नाहि ग—आइ नाहि कांही

**शांतेची आई :** कारटे, पाहिलें—दे तें—फोटो—आँ ? अगबाई !
हा मेला तर जिन्याजवळच्या जोशांचा अंता
थांब येउं दे हापीसांतुनि काढतील काटा

*[अंतराळातला आवाज : ]*

तो रविकर का गोजिरवाणा
आवडला अमुच्या राणींना—

**सूत्रधार :** कुठला रविकर कुठली आली येथे फुलराणी ?
विजनांतिल त्या मुग्ध मनांचीं इथे नको गाणीं !
काल पाहिल्या चित्रपटांतिल शिळ्या कढीला ही
आज दुपारीं आणित खोटा ऊत उभी राही
तिचा लाडका जिन्याजवळचा अंतोबा जोशी
पत्रें टंकित बसे कचेरींत थकुनी मेजाशीं
बसला घेउन पुढे ढिगारा
टकटकटकटक टंकित पत्रें
प्रिय सर प्रिय सर शिणलीं गात्रें
खरोखरी प्रिय सरला पित्रे
सरला पित्रे ती पलिकडली
त्याहुनि शांता गोड गोडुली
शांता शांता इनोसंट मन
सरला पित्रे पर्मनंट पण !
हुडकुन काढिन म्हणतों पत्ता
पगार अन् महागाई-भत्ता
टकटकटकटक टकटकटकटक
छान रेडियो जमेल जागा
हवेशीर अन् दोघांपुरती
सरला पित्रे तशी बरी ती
शांतेहुन पण बरीच काळी
दात मूळचे किंवा कवळी
करीन खात्री येतां जवळी
प्रिय सर प्रिय सर सरला पित्रे
अंतू टंकित बसला पत्रें
भावि सुखाचीं पाहत चित्रें



**हेड क्लार्क** : जोशी!! चला आटपा काम
समोरचें तें वाचुन तरि घ्या
"हराम है आराम"
जोशी—चला आटपा काम—

**सूत्रधार** : आषाढघनापरी कडकडे वरिष्ठवाणी वरी
स्वप्न भंगलें—शांता-सरला विरल्या निमिषांतरीं!
रसिका, फिरुनि चला चाळींत!
सांजवेळ जाहली परतले पती धाम गाळीत
अर्ध्या पेंगुळलेल्या नयनीं चार गिळुनिया घास
आळवणी निद्रेची आता शिणलेल्या देहास
छे! पण अजुनी निद्रा कुठली अजुन चालते ट्राम
इथे न मिळणें मागुनियाही हुकुमाचा विश्राम
आणि पलिकडे कुणी गातसे दर्दभरें गाणें—
पिया कुणाचा परदेशाला गेला हरि जाणे.

**चाळीतले संगीत-कला-तडाग एच० मंगेशराव** :
पिया गये परदेस—

**सूत्रधार** : हे तर रसिका चाळींतिल रे अमुच्या सुरसम्राट
सूरसाधना!—साधेल कशी ह्यांना ह्या जन्मांत?
कसलें गाणें जनता घेते चाळीचा धसका
भय चोरांचें आम्हां मुळी ना नको अम्हां गुरखा
सर्व घराणीं कोंबुनि भरलीं यांनी नरड्यांत
तानमूर्च्छना केकाटे जणु बकरी परड्यांत

**एच० मंगेशराव** : नीप नीप प नी नी नी नी पसां पसां पसां
पिया गये परदेस—
सास बुरी मोरि ननद चुनरिया
अजहुन आये
धीट लंगरवा—पनी सारे सा—सारे सारे सारे सारे सा—

**सूत्रधार** : चाळकऱ्यांशीं पुरें मांडिलें संगितांत वैर
कसे आवरूं झाले असल्या गवयाचे थेर

**समेळकाका** : दीन दलितांचा एक नारायण
जावें त्या शरण कोणी बोले

सूर बुडवाया मांडावें भजन
नामसंकीर्तन साधा आता
टाळमृदंगांचा होउं द्या गजर
करा भीमातीर ग्यालरीचें

**एच्च० मंगेशरावांचा आवाज :** पिया गये परदेस—

**चाळकरी मंडळी :** जयजय रामकृष्ण हारी—

**मंगेशराव :** नीप नीप निनिपम पनीसा—

**चाळकरी :** ग्यानबा तुकाराम—

**मंगेशराव :** पिया गये परदेस—

**चाळीतील आबालवृद्ध स्त्रीपुरुष :**

रामकृष्ण हारी—
ग्यानबा तुकाराम—
ग्यानबा तुकाराम—

[*काही वेळ नुसते टाळ, मृदंग—मंगेशरावांचा 'पाडाव' होतो.*]

**सर्व जण अत्यंत गंभीरपणाने :**

भजनें भंगला गायकाचा सूर
राहिला अभंग तरोनीया वर—

**सूत्रधार :** रसिका, सरलें रामायण
हीच रोजची कथा
हेंच ह्या चाळींतिल जीवन...





# ....एक चिंतन

बटाट्याची चाळ अजून उभीच आहे. ऊन खात, पाऊस पचवीत, समोरच्या नवीन-नवीन इमारतींना तोंड देत उभी आहे. खिडक्यांचे आणि कठड्यांचे लाकडी गज अर्ध्याहून अधिक उडाले आहेत. जिने आपली पायरी सोडून वागायला लागले आहेत. भल्याभल्यांचे पाय इथे बसरू लागले आहेत. भिंतींचे पोपडे उडाले आहेत. रंग तर कित्येक वर्षांपूर्वी उडाला. खूपच वर्षे झाली त्याला. आज जो रंग भिंतींना दिसतो ती छटा कुठल्याही डब्यातून येणाऱ्या रंगाची नाही. हा अनेक वर्षे अनेकांनी पुसलेल्या बोटांतून, टेकलेल्या डोक्यांतून, धुरांतून तयार झालेला रंग आहे.

ओळखू येण्यासारखा रंग होता तो फार जुना काळ!—फार फार जुना. त्या वेळी मुंबईची रहदारी कुणालाही धक्के न देता हलत होती. अधिक लफ्फेबाज मंडळी व्हिक्टोरियातून जात-येत. मोटारी मोजक्याच होत्या. त्यांनाही दोन्ही बाजूंना चकचकीत पितळी कंदील होते. त्यामुळे त्या खानदान सोडलेल्या उनाड थिल्लर पोरींसारख्या हुंदडत नव्हत्या. व्हिक्टोरियाच्या घोड्यांची मने न दुखतील अशा बेताच्या वेगाने त्या धावायच्या.

घरातली कर्ती माणसे त्या वेळी हंगेरियन टोप्या घालायची, नाही तर चौकड्यांचे रुमाल बांधायची. वकिलांना पगड्या घ्यायची ऐपत होती—आणि डॉक्टर लोक भक्कम आकाराची फेल्ट हॅट घालायचे. माणसे एक तर म्हातारपणामुळे मरायची किंवा प्लेग, देवी, कॉलरा यांसारख्या मातबर रोगांपुढे मान टाकायची. इन्फ्लुएंझा-देखील जरा अधिक ताकदीचा होता. तात्पर्य, तो काळ 'काळ' म्हणून घ्यायच्या लायकीचा होता.

देशभर पारतंत्र्याचे वारे खेळत होते. पुढारी संख्येने बेताचेच होते. करमणुकीच्या कार्यक्रमांना 'सांस्कृतिक कार्यक्रम' म्हणत नसत. नाटक, नाच, नायकिणीचे गाणे —असे ठसठशीत शब्दप्रयोग होते. आणि असल्या गोष्टींशी संबंधित असणाऱ्यांना वस्तीच्या अलिकडे ओढण्याचा आग्रह नव्हता. नाटकातले नट तोंडाला रंग लावल्याशिवाय बोलत नसत आणि गाणारी मंडळी केवळ तबल्यातंबोऱ्यांच्या आधारावर जगायची. संगीत तिथूनच फुलत होते. परिषदा नव्हत्या आणि चर्चा नव्हत्या. दिवसा मिळणाऱ्या प्रतिष्ठेशी ह्या रात्री जागवणाऱ्या मंडळींना कर्तव्य नव्हते. चांगली उन्हे पायाशी लोळेपर्यंत कुशी बदलत रात्रीच्या सुरांची मस्ती वाळवीत ही मंडळी पडलेली असे.

साहित्याचा बाजार भरलाच नव्हता. फुटकळ विक्रीची दुकाने होती—अजून पेठ तयार झाली नव्हती. कुठेतरी दोनपाच पाले ठोकलेली होती. त्यांत समर्थांचे श्लोक छेलबटाऊ मोहनेला टेकून उभे असत आणि ठकसेन राजपुत्राच्या खांद्यावर मान टाकून शनिमाहात्म्य विसावलेले दिसे. कथाकहाण्या सरळ होत्या. कुणाचे तरी भले व्हायचे नाही तर निसंतान व्हायचे. वायफळ शब्दांचे बुणगे साहित्यात घुसले नव्हते. जे काही तेथे घडायचे ते दांडीवर टाकलेल्या राजापुरी पंचाइतकेच स्वच्छ, बिनसुरकुतलेले आणि देशी! कथानायक आणि नायिका सद्गुणी असत. नायकाने नायिकेला पाहिले की तिच्याशी लग्न करावे असा एक साधा, सरळ, कुठल्याही निरोगी पुरुषाला येणारा विचार त्याच्या मनात येई; आणि मग कथालेखक उगीच त्या दोघांना इकडूनतिकडून हिंडवून शेवटी त्यांचे लग्न जमवीत. मग 'प्रिय वाचक' नावाच्या गृहस्थाला बरे वाटे! 'प्रिय वाचका'चे मागणे त्याहून 'लयी' नसायचे. झोपेपुरते त्याला एखादे पुस्तक लागायचे. कुठल्याही सद्गुणी माधवाचे आणि सुंदर व शालीन मालतीचे लग्न झाले आणि ती सुखाने नांदू लागली की तो निद्रादेवीच्या राज्यात जायचा. निद्रादेवीची वगैरे त्या वेळी राज्ये होती. पुढे ती खालसा झाली.

हा सारा काळ आता गेला. पण बटाट्याच्या चाळीने पाहिलेला हा काळ आहे. बटाट्याच्या चाळीचा रंगदेखील त्या काळाबरोबरच उडत गेला. त्या वेळी 'सफेती' म्हणत रंगाला. रंगसंगती जन्माला आली नव्हती—रंगसफेतीचा तो काळ! तिच्या आयुष्यात मुद्दाम म्हणून दिलेले दोनच रंग : एक मूळचा चुना फासला होता तो, आणि पहिल्या महायुद्धात इंग्रजांचा जय झाला तेव्हा मालकांनी तिला पिवळी केली होती. खिडक्या-कठड्यांना मात्र जे एकदा मद्रासी तपकिरीच्या रंगाचे लिंपण बसले ते कायमचे. त्यानंतर मग चुन्याची बोटे पुसून अगर पानाच्या पिचकाऱ्या टाकून मंडळींनी जी काही रंगोटी केली ती निराळी!

स्थूलमानाने आठवणी सांगायच्या म्हणजे पहिल्या कायदेभंगाच्या चळवळीत चाळीचे कठडे भंगायला सुरुवात झाली. बेचाळिसच्या चळवळीत आणि काही होळ्या मिळून लाकडी गज उडाले आणि खिडक्या उघड्या पडल्या. दुसऱ्या

महायुद्धात ब्लॅक-आउटचे निमित्त होऊन जिन्यातले आणि गॅलरीतले दिवे गेले ते पुन्हा आलेच नाहीत. प्रजासत्ताक दिनाच्या रोषणाईला चाळीतील मंडळी कोटात जाऊन वर्षभराचे दिवे एकदम पाहून घेतात. कठडे गेले, दिवे गेले, फरशी उखडत चालली आहे. भिंतींवर आतल्या बाजूला दुधाचे हिशेब आणि बाहेर कोळशाच्या आणि खडूच्या साहाय्याने काढलेली चाइल्ड आर्ट! मुख्यतः ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत नुसत्या रेषा किंवा क्वचित खिळ्यांनी लांब फराटे ओढलेले आहेत. काही ठिकाणी कोणीतरी 'दृष्ट' किंवा 'डुक्कर' असल्याविषयीचा उल्लेख आहे. दुसऱ्या मजल्याच्या जिन्याच्या एका खांबावर 'नाना कर्झन आहे' असा खिळ्याने लाकडात कोरलेला एक उल्लेख आढळतो. त्यावरून ही चाळ कर्झनच्या काळात उभी राहिली असावी असाही कोणी तर्क बांधील. त्याखेरीज जागोजागी खिळ्यांनी भिंतींत कोरलेल्या उगवता सूर्य आणि उडते कावळे यांच्या चित्रांमुळे इथे आगळी शोभा आली आहे. शौचकुपातल्या भिंतींवर मात्र अगदी अलिकडेच खजुराहोच्या चित्र-कलेला खाली पाहायला लावणारी चित्रे दिसू लागली आहेत. पूर्वी केवळ पानांच्या पिचकाऱ्यांतून काही अभावित आकृती निर्माण होत. परंतु ही अतिप्राचीन धर्तीची चित्रे ही चाळीतल्या अतिअर्वाचीन मंडळीची देणगी आहे, असे म्हणतात.

बाकी एरवी बटाट्याची चाळ आयुष्यभर ओकीबोकीच राहिली. उगीच दसरा-दिवाळीला चारसहा पणत्या, झेंडूची तोरणे आणि आंब्याचे टहाळे सोडले तर चाळीवर बाकी सौंदर्याचे संस्कार जवळजवळ नाहीतच. क्वचित कुणी गॅलरीत रांगोळीही घालीत असत. पण ती घालून होण्यापूर्वीच येणाऱ्याजाणाऱ्यांच्या पावलांनी गॅलरी-भर व्हायची. नव्या नवऱ्या चार दिवस आपापल्या परीने खोल्यांची दारे-खिडक्या सजवायच्या. पण वर्षभरातच दुपटी वाळायला लागायची पुढल्या कठड्यावर, आणि मग पाळण्यांतली मंडळी जमिनीवर झोपायच्या वयाची झाली की गाद्याही वाळत पडायच्या कठड्यावर. अंगाखांद्यावर शोभेची लेणी पडली नसली तरी चाळ राहिली मात्र सदैव नांदतीगाजती! साथीच्या आणि लढाईच्या दिवसांत आसपासच्या चाळी ओस पडल्या, पण बटाट्याची चाळ तश्शी होती. ढीम लागू दिला नाही इथल्या माणसांनी प्लेगाला आणि जर्मन-जपान्यांना! चाळीला वाऱ्याउजेडाचे वावडे! मधल्या चौकात चाळीची सारी घाण साचते. डास आहेत, ढेकूण आहेत, पिसवा आहेत— पण माणसे पणतवंडांना मांडीवर खेळवून गेली. मलेरियात कुडकुडली, प्लेगात गाठी उठल्या, देवी आल्या—पण साठीच्या आतले काही कुणी कुणाच्या खांद्यावरून गेले नाही. चाळीचा चिवटपणा दिसामासांनी चाळकऱ्यांतदेखील उतरला. चाळीतल्या डासांची नाही म्हटले तरी हजारावी पिढी असेल; पण मच्छरदाणी ही वस्तू चाळीत नव्हती. मच्छरदाण्या आल्या त्या बिऱ्हाडांतल्या पोरी कारकुनी करायला लागल्या तेव्हापासून. एरवी माणसे उघड्यावर झोपली. टेबलांवरचे पंखे, भिंतीवरचे आरसे, एकसारखे एक चहाचे कप आणि बश्या, बायकांच्या छत्र्या, मखमली

चपला, मनीब्यागा—असल्या गोष्टी चाळीत आल्या त्या पुरुषांच्या पगारातून नाही, मुलींच्या पगारातून. एवढ्याएवढ्याशा चिमुरड्या, ठिकऱ्या खेळून गॅलरीच्या लाद्या उखडून काढणाऱ्या कारट्या, चाकरमान्या झाल्या. जन्म गेला त्यांचा इथे—आणि अशाच हुदडत आणि कारकुनी करीत राहिल्या तर उरलेला जन्म इथेच जाईल—पण चाळीची लाज वाटते त्यांना. मैत्रिणींना कधीकधी चहाला बोलावतात आणि ओनरशिपचा ब्लॉक शोधण्याच्या गोष्टी बोलतात.

बटाट्याच्या चाळीला एवढ्या एका गोष्टीचे फार फार दुःख होते. पूर्वी असे नव्हते. त्या पोरींना चाळीची ओढ होती. बर्व्यांची येशी लग्न होऊन पनवेलीस सासरी जायला निघाली, तेव्हा दहादहा वेळा वळून चाळीकडे पाहत होती. सगळी चाळ डोळे पुसत होती. वास्तविक बर्व्यांचे आणि काशीनाथ नाडकर्ण्यांच्या वडलांचे—सोनबा नाडकर्ण्यांचे—मुळीच बरे नव्हते. पण येशी व्हिक्टोरियात बसली तेव्हा सोनबा नाडकर्ण्यांनी चार लोकांत धोतराच्या सोग्याने डोळे आणि फ्यॉऽऽ असा आवाज काढून नाक पुसले होते. किती पोरी गेल्या इथून! ससेळकाकांची गुलाब उरणला आपल्या सासरी गेली त्याला किती वर्षे झाली. सोने चोवीस रुपये तोळा होते तेव्हा! आता गुलाबच्या मुलीचे लग्न झाले परवा. प्रत्येक बिऱ्हाडात जाऊन आमंत्रण देऊन आली. बऱ्याच मुलांना आपल्या बापाला अरेतुरे करणारी ही कोण बाई हे कळेना. काशीनाथ नाडकर्णी, भाईसाहेब, सोकाजी ह्यांच्याबरोबर गुलाब लपंडाव आणि छापापाणी खेळली होती चाळीत. पोरांना काय ठाऊक! तिच्या मुलीने "शी:! कसली ग चाळ ही!" म्हटल्यावर जी खेकसली तिच्या अंगावर! इथल्यासारखे दिवस पुन्हा यायचे नाहीत, म्हणाली. लहानपणच्या सगळ्या सगळ्या मैत्रिणींची चौकशी केली. जाता जाता गुप्त्यांच्या खोलीपाशी जराशी थबकली... प्रभातफेऱ्यांच्या दिवसांत...पहाटे...गुप्त्यांचा आतेभाऊ...मनोहर...गुप्त्यांच्या आप्पासाहेबांनी घरातून त्याची ट्रंक फेकून घालवून दिले होते...गुलाबला किंचित गलबलल्यासारखे झाले. गुतीणबाईंना "आलं पाहिजे हो लग्नाला—" म्हणताना गुलाबचा गळा इतका भरून आला होता की, आपले वाक्य पुरे होतेय की नाही याची तिला भीती वाटत होती.

—त्या पिढीला चाळीची माया होती. नळावरची भांडणे नळावर संपायची. झालेगेले नळाच्या पाण्याला मिळायचे. पुन्हा बर्वीणकाकू पावशीणबाईंचे पापड लाटायला स्वतःचे पोळपाटलाटणे घेऊन हजर. त्रिलोकेकरशेटचा 'टाइम्स', बाबा बर्व्यांचा 'केसरी', जनोबा रेग्यांचा 'विविधवृत्त' चाळभर हिंडायचे.

स्वस्ताई आली, महागाई आली—पण नवे गुंजभर सोने कुणी विकत घेतले नाही आणि असलेले विकले नाही. लग्नात अंगावर सोने घेऊन परक्या घरांतल्या मुली यायच्या. यांच्या पोरी दुसऱ्याच्या घरात जाताना घरातले घेऊन जायच्या, नव्या सुना येताना त्यांच्या घरातले घेऊन यायच्या. सोन्याचांदीची अशी साधी

उलाढाल. फार तर पाटल्या मोडून बांगड्या आणि मोहनमाळ मोडून चपलाहार एवढा कायापालट. पुरुष मंडळीदेखील दिवाळीला काय कापडचोपड घेत असत, तेवढीच खरेदी. तीदेखील मुख्यतः धोतरांची आणि मुलांच्या कापडाची. उभ्या चाळीत पॅंट वापरणारे दोघेच गृहस्थ. एक त्रिलोकेकर आणि दुसरे अण्णा पावशे! पैकी त्रिलोकेकर डकची प्यांट गोल नळकांडी होईपर्यंत वापरायचे, आणि अण्णा पावश्यांच्या मुन्शिपाल्टीच्या पाणीखात्याकडून मिळालेल्या खाकी विजारीला पाणीखात्यात असून किती पाणी लागले ते अण्णा जाणे आणि त्यांची पॅंट जाणे! चाळीत एकदोन सिल्कचे आणि एकदोन अल्पाकाचे डगले; बाकी सर्व मद्रास चेकचे कोट! सदरे बहुधा रेघांच्या आणि कळकट रंगांच्या कापडाचे! कोटाचे चिवट कापड दुसऱ्या महायुद्धापूर्वीच गेले. त्या कापडाचे वर्णन 'नैनं छिंदंति शस्त्राणि—नैनं दहति पावकः' ह्याच्या अलिकडे करणे अशक्य! त्याला धोबी फाडू शकत नसे, इस्त्री जाळू शकत नसे. स्लेटपाटीवर खूपसे लिहून बाहीने पुसल्यावर पाटीवर जो रंग दिसतो तशा अगर काळसर पांढऱ्या—राख, काळी रेती आणि पांढरी वाळू मिसळल्यावर दिसणाऱ्या—रंगाचे ते कापड शिंपीदेखील कसे फाडीत असे, देव जाणे. एकूणच टिकाऊपणा हा त्या काळच्या प्रत्येक गोष्टीचा धर्म होता. घरातल्या धाकट्याला पहिल्या चारी यत्ता थोरल्या भावाच्या चड्डयांवर आणि पुस्तकांवर शिकता येत. पुस्तक बदलणे हे ट्रामचा नंबर बदलण्याइतके अशक्य वाटत होते.

चाळीचा वीजपुरवठा हा एडिसनलादेखील धक्का देणारा मामला होता. खाली विजेचा दाब 'भयंकर' असल्याची एक सूचना आहे. याहून त्या विजेत काही भयंकर शिल्लक राहिलेले नाही. बरीच वर्षे तिसऱ्या मजल्यावर वीज चढत नसल्याची एक कथा ऐकिवात आहे. युद्धकाळात ए० आर० पी० च्या नियमांचा भंग घडवतो म्हटले तरी घडू शकला नसता. कोणे एके काळी लावलेले नागमोडी फिलामेंटचे लांबोडके बल्ब (चाळीच्या परिभाषेत 'ग्लोब') परवापरवापर्यंत जीव आणि थोडीशी वीज धरून होते. जिन्यातले दिवे चोरणाऱ्याने ते काय उद्देशाने चोरले देव जाणे. बहुधा चोरी दिवसा झाली असावी. कारण रात्री ते दिवे इतके केविलवाणे दिसत की अगदी अडला चोरदेखील त्यांना हात लावू शकला नसता.

आता जमाना बदलला. काही महिन्यांपूर्वी समेळकाकांच्या घरी विजेची नळी आली. बटाट्याच्या चाळीत ती नळी शोभत नव्हती. काळे जुनेर नेसलेल्या, डोक्यावरचा भांग फाटलेल्या, आडवी चिरी लावलेल्या, तोंडाचे बोळके झालेल्या आणि अंगावरच्या जुनेराच्याच वर्णाच्या आजीबाईंनी आपल्या दोन्ही कानांच्या पाळ्यांवर सिगारेटच्या चांदीच्या गोल टिकल्या कापून चिकटवल्या तर जो अवतार दिसेल तशी बटाट्याची चाळ त्या प्रकाशामुळे दिसू लागली. चाळीला ती नळी रुचली नाही.

तशा बऱ्याचशा गोष्टी चाळीला रुचल्या नाहीत. अण्णा पावश्यांच्या घरात डॉक्टरी सल्ल्याच्या निमित्ताने दुधाच्या कपात पहिले अंडे फुटले तेही चाळीला

आवडले नव्हते. आजवर पावश्यांच्या घरातून मधल्या चौकात पडणाऱ्या केरकचऱ्यात मुख्यतः निर्माल्य आणि दत्ताचे सुकलेले हार पडायचे. त्यात आता द्रोणात गुंडाळलेली अंड्यांची टरफले पडायला लागली. चाळ शहारली. चाळीला घाणीचे वावडे नव्हते. पण कुठल्या खोल्यांतून कुठली घाण पडावी ह्यासंबंधी तिची काही निश्चित मते होती. ह्या मतांबद्दल दिवसेदिवस बेपर्वाई वाढत होती आणि चाळ खचत होती. तिचे आणखी काही पोपडे उडत होते. सासरी जाणाऱ्या मुली कचेरीत जाऊ लागल्या होत्या. आणि मुलीचे लग्न कसे होईल याची चिंता करणारे पूर्वीचे बाप जाऊन कमावत्या पोरीने लग्न केले तर आपले काय याची चिंता करणाऱ्या बापांची पिढी आली होती. बटाट्याच्या चाळीला असल्या बापांच्या डोक्यावर तुळई आदळावी असे लाखदा वाटे! पण मग तिला त्यांची दया येई. तिने ह्या बापांना कठड्याएवढे उंच असल्यापासून पाहिले होते. त्यांनाच काय, त्यांच्याही बापांना पाहिले होते. लांब डगले आणि गोल टोप्या घालणारे! आकाशातला देव आणि ऑफिसातला साहेब ह्यांखेरीज कुणालाही न घाबरणारे! गुप्ते-चौबळ, हट्टंगडी-पावशे यांचे बाप! स्वतःच्या मुलींना नवरे शोधून देणारे, बायकांना वर्षातून फक्त दोन लुगडी घेऊन देणारे, पोरांच्या कानफटीत मारून अभ्यासाला बसवणारे आणि ऐशीनव्वद रुपयांत आठ-दहा जणांच्या संसाराचा गाडा ओढणारे—ते संरक्षक बाप! ज्यांचे पाय जिन्यावर वाजले की पोरांची डोकी पुस्तकांत जात, बायकांचे पाय स्वयंपाकघराकडे वळत, ते! त्यांच्या साहेबांचे रविवारीदेखील त्यांच्याशिवाय चालत नसे. दहा-दहा वर्षांत एकही कॅज्युअल लीव्ह ते घेत नसत. दूधवाला भय्या आणि रामा गडी यांना ते न भिता ठणकावू शकत असत. निराळे बिऱ्हाड करायच्या गोष्टी कुजबुजणाऱ्या मुलाला आणि सुनेला 'गेट आउट' म्हणून सांगण्याची त्यांना हिंमत असे. बायकापोरांना कापाच्या मैदानावरची जत्रा आणि बालगंधर्वाचे नाटक वर्षातून एकदा दाखवणारे! स्वतःला मात्र दहा-दहा वर्षांतून एखादा कोट शिवणारे! ट्रॅमचा आणा वाचवून त्यात मेथीची जुडी बसवणारे. दुसऱ्या महायुद्धाच्या आधीच हे बाप एकामागून एक असे संपले. पावश्यांच्या बाबांबरोबर चाळीतला शेवटला खणखणीत आवाज गेला. गुप्त्यांच्या बाबांचे फुलबूट पायाला येतील असा लंबाचवडा पाय त्यानंतर चाळीला लागला नाही. चौबळांच्या बाबांनंतर काळ्या अल्पाकाचा डगला पुन्हा चाळीत शिवला गेला नाही. आणि हट्टंगडींचे बाप्पा गेले ते जणू आपल्या भरघोस मिश्यांबरोबर सर्वांच्याच मिश्या घेऊन गेले. बटाट्याच्या चाळीने अखेरचे बिनचूक इंग्रजी आणि मेकॉले, स्पेन्सर, मिल ही नावे हट्टंगडीबाप्पा गेले त्यानंतर पुन्हा ऐकली नाहीत.

त्यानंतरच्या बापांची पिढी ही उमेदीत म्हणून आलीच नाही. दुसऱ्या महायुद्धाने त्यांची कंबरडीच मोडली. अन्न महाग, धान्य महाग, कापड महाग, औषध महाग —पण चाळीने निष्ठा सोडली नाही. भाडे तेच राहिले. महागाईच्या वाळवंटात तेवढीच हिरवळ! चाळीला त्याचा अभिमान होता. तिला हा नवा पैसा नको होता.

युद्धकाळातली ती सूज आलेली लक्ष्मी—हिडीस वाटत होती! चाळीबाहेर असला पैसा खूप लोकांच्या खिशांत आला. चाळीत मात्र महागाईभत्त्याच्या चार दिडक्या अधिक आल्या असतील. पण त्या पैशानेदेखील चाळीत पाप आणले! एक भेकडपणा आणला. आता सारे बदलले! संध्याकाळी बाप परतू लागले ते उद्याची चिंता करीत. त्यांच्या आवाजातले त्राण गेले. काही वर्षांपूर्वी स्वैपाकघरात आईला खोबरे किसून देणारी, नाही तर तांदूळ निवडून देणारी मुलगी आता कठड्याला टेकून दिलाची आणि मोहब्बतीची गाणी म्हणायला लागली. चाळीला वाटे, ह्यांचे बाप ह्यांच्या दोन मुस्कुटात का नाही भडकावीत? तिलाही त्या दोन खोल्यांतला शृंगार पाहिल्याच्या आठवणी होत्या. बाप्पा हट्टंगड्यांनी आजीच्या (एच० मंगेशरावांची आई) गळ्यात मोहनमाळ स्वतः घातली होती; पण ती दारे-खिडक्याच काय, पण वरची झापेदेखील बंद करून! आता ह्या पोरी मोठमोठ्याने गॅलरीत जाऊन 'आवस वाढा गे माय' म्हणणाऱ्या भिकारणींसारख्या प्रेमाचा आवस गळा काढून मागत होत्या. चाळीला वाटे, जागच्या जागी कोसळून जावे!

अशी किती दुःखे आणि किती यातना! आता वास्तविक वरवर पाहणाऱ्याला चाळीत किती उत्साह दिसतो. उत्सव होतात, सप्ताह होतात, भगिनीमंडळ निघालेय, पण चाळीचे मन त्याच्यात रमत नाही. पूर्वी बर्व्यांच्या घरी तेवढा गणपती बसायचा. पण समेळकाकांचे दादाजी मखर करीत. एच० मंगेशरावांचे बाप्पा आरत्या गात. चौपाटीवर बर्व्यांच्या घरचा गणपती विसर्जनाला जायचा, पण पाट डोक्यावर घेऊन स्वतः जनोबा रेग्यांचे काका चौपाटीच्या समुद्रात शिरायचे! लाटा अंगावर घेत जनोबांचे काका पाण्यात शिरले की पोरे भ्यायची. मोठी माणसे म्हणायची, "काका, बेतानं." काका आपल्या कोकणी मराठीत ओरडायचे, "रे, समुद्राची भीती कोकण्यांक कित्याक् घालतस! मास्याक् आणि माशे खाणाऱ्याक् पाण्यांचा भय नसतां." त्या वेळी चाळीतल्या पोरांना त्रिलोकेकरशेटचे फादर (त्यांना चाळीत सर्व जण फादर म्हणत.) 'मोफतमदी' (हा त्यांचाच शब्द) भेळ खायला देत. ह्या उत्सवाला कमिटी नव्हती, अकाउंट नव्हता, हिशेबाबद्दल शंका नव्हती. जी गत पुरुषांच्या उत्सवांची, तीच बायकांच्या! बायका भांड भांड भांडत. पण पहिलटकरणीला धीर देण्याचे काम, आजारी बिऱ्हाडात मिठातली आमली पोहोचवण्याचे काम— दिवाळीचा फराळ, पापड-लोणच्यांच्या तयाऱ्या, ह्या सार्वजनिक व्हायच्या. भगिनी मंडळाच्या चर्चा हातात काम असल्याशिवाय व्हायच्याच नाहीत. पापड लाटीत, गोधड्या शिवीत अगर लाडू वळीत साऱ्या चाळीच्या निंदा व्हायच्या. त्यासाठी मंडळाची निराळी कचेरी आणि पदाधिकारिणी नव्हत्या. भांडणाला भांडण म्हणत —'स्पर्धा' म्हणत नसत. मुलांच्या मुंजी, मुलींच्या मंगळागौरी, बारशी, हळदीकुंकवे, असा वर्षभर या ना त्या बिऱ्हाडात सांस्कृतिक कार्यक्रम असायचा. त्याखेरीज हट्टंगडींच्या घरी सिद्धारूढस्वामींचा उत्सव, नाडकर्ण्यांच्या घरची साटमबुवांची

पुण्यतिथी, बर्व्यांच्या घरची गीताजयंती आणि त्रिलोकेकरशेटच्या घरचे नवरात्र (बाबलीबाई 'नवरत्न' म्हणतात, आणि ही चुकी कोणीही दुरुस्त केली नाही.), नागूतात्या आढ्यांच्या वडलांच्या वेळची गुरुपौर्णिमा—हे साऱ्या चाळीचेच उत्सव होते. समेळकाकांच्या घरात सगळ्यांच्या घरच्या सजावटीचा मक्ता होता. मखरे, माळा-तोरणे, कागदी फुले स्वतःच्या खर्चाने ते करीत. हौसेला घटनेच्या नियमात बांधले नंतरच्या पिढीने. आणि मग निवडणुका आल्या—भांडणे आली. चाळीतला ओलावा ओसरला; फक्त ओल राहिली.

पण अजून धागे तुटले नाहीत. अजूनही चाळीत लग्न-मुंज झाली तर माणसे अंग मोडून राबतात. कार्य घरचे आहे, म्हणतात. कुठेतरी एकाच नळाच्या पाण्यातून प्रेम आले ते टिकले आहे. साऱ्यांच्या भांड्यांना रामा गड्यांनी एका रस्त्यावरची माती फासली आहे—त्या मातीची ओढ जराजरा शिल्लक आहे.

पण ती किती टिकणार आहे ही चाळीला चिंता आहे. पायातच कुठेतरी हादरा बसला आहे; आपण खचतो आहो अशी भीती आहे. आद्य मालक कै० धुळा नामा बटाट्यांनी चाळ बांधली तेव्हा चार माणसांचा संसार इथे सुखाचा व्हावा अशी इच्छा भाड्याच्या पैशाच्या खाली दडलेली होती. समोरच्या चाळी आपोआप पडल्या, काही पाडल्या. तसाच प्रसंग एक दिवस आपल्यावर आहे, अशी चाळीच्या पोटात भीती आहे. पण या भीतीने ती खरी हादरली नाही. तिला भीती आहे ती आपल्या मागून जी वास्तू उभी राहील त्यात माणसे दारे बंद करून राहणाऱ्या समोरच्या ब्लॉकमधल्या माणसांसारखी राहतील ही! प्रत्येकाला कदाचित अधिक स्वातंत्र्य असेल; पण ते तीन खोल्यांत, अगदी स्वतंत्र वॉशबेसिन आणि संडास-बाथरूम असणाऱ्या ब्लॉकमध्ये, दिवसभर दारे बंद करून राहण्याचे स्वातंत्र्य तिला भेडसावते! कारण चाळीची दारे आणि ब्लॉकची दारे ह्यांतला मुख्य फरक तिला ठाऊक आहे. बिऱ्हाड परगावी गेल्याशिवाय चाळीतल्या खोल्यांची दारे बंद झाली नाहीत—ब्लॉकची दारे सदैव बंद असतात. ही दारे सताड उघडी—त्या दारांना दाराशी आलेल्या माणसावर अविश्वास दाखविणारी बारीक भोके असतात. इथे आतल्या माणसाच्या पानात काय पडले आहे ते गॅलरीतून जाणाऱ्यायेणाऱ्याला दिसते. अण्णा पावशांनी घेतलेला कढीचा भुरका गॅलरीपर्यंत ऐकू येतो. तिथे टेबलावर जेवतील, पण दारे बंद करून चोरून जेवतील. चाळीला दुःख आहे ते ह्या चोरट्या जीवनाचे!

—पण आता इलाज नाही. चाळ कोलमडत आली आहे. शेवटला घाव कोण घालणार याची ती वाट पाहत आहे. तिला चिंता आहे ती एकच : हा घाव घालणारा, तिने ज्यांचा आजवर भार वाहिला त्या माणसांच्या नातवंडापणतवंडांना सिमेंटकॉंक्रीटच्या प्रचंड कपाटाच्या खणांत बंद करून ठेवणार आहे. त्या कपाटात "त्रिलोकेकरशेट, येता काय बेझिक खेळायला?"—"जनोबा, आज काय पापलेट-बिपलेट गावलो की नाय चांगलो?"—"शांताबाई, यमीबरोबर वाटीभर डाळीचं

पीठ द्या पाठवून."—"कुशाभाऊ, रजा झाली का सँक्शन?"—असे मोकळे आवाज ऐकू येणार नाहीत. पहिलटकरणीच्या पाठीवरून हात फिरवून, ना जातीची ना पातीची अशी शेजारची म्हातारी "अग, बावीस बाळंतपणें झालीं माझीं—" असा धीर देणार नाही. सासरी निघालेल्या चाळीतल्या पोरीकडे पाहून आनंदाने रडणाऱ्या डोळ्यांची संख्या मर्यादित होईल. मॅट्रिकला निघालेला गंपू साऱ्या वडील-धाऱ्या मंडळीच्या पाया पडला होता. नव्या ब्लॉकातला अभिजित किंवा अमिताभ कदाचित रॉक रॉक रॉक म्हणत 'एक्झाम' द्यायला जाईल.

आणि चाळीला वाटते, जमिनीसपाट झालेला आपला देह तीन मजल्यांनी उठून वर येईल आणि म्हणेल, "अरे नाही रे, माझ्या पोटात ह्यापेक्षा खूप खूप माया होती!"

